म. ग्रं. सं. ठाणें
विषय
स. नं.

विषय
ग्रंथालय क्रमांक

म. ग्रं. सं. ठाणें
लेखक पां. ब. रेंजे
पुस्तकाचें नांव
सन १८८५

# धर्माजीरावाचें कुटुंब.

अथवा

## बडोदें राजधानींतील साडेतीन वर्षांची कारकीर्द.

### नीतिवर्धक व मनोरंजक अर्धैतिहासिक कल्पित कादंबरी.

कुलीन स्त्रीपुरुषांच्या उपयोगार्थ

सुशील यमुना, जयदेवी नाटक वगैरे पुस्तकांच्या कर्त्यांनीं रचिली ती,

**पांडुरंग बळवंत देवल**

यांनीं

जगद्धितेच्छु व श्रीविठ्ठल छा० छा०.

( सर्व हक्क राखिले आहेत ).

मत एक रुपया.

# प्रस्तावना.

महासमुद्रांत बुडी मारून मोठ्या कष्टानें जेव्हां ओंजळभर मोतीं बाहेर काढावीं, तेव्हां त्यांत कोठें दाहा पांच दाणे सर्वोत्कृष्ट हातीं लागले तर लागतात! हाच नियम उत्तम पुस्तकांलाही लागू आहे.

आलीकडे शास्त्रीय पुस्तकांपेक्षां नाटकें व कादंबऱ्यांच्या पुस्तकांला बराच ऊत आला आहे. परंतु त्यांत खरोखर सद्बोधवर्धक व कुलीन स्त्रीपुरुषांस वाचण्याजोगीं अशीं एका हाताच्या बोटाइतकीं देखील सांपडणें कठिण होईल! ही गोष्ट खोटी नव्हे.

आपल्या देशांत आर्वाचीन एकाद्या इतिहासाला आधार धरून त्यावर नाटकें किंवा कादंबऱ्या लिहिण्याचा अद्याप प्रघात दिसून येत नाहीं. त्यांतही एकाद्या राजकीय उलाढालीची नाजूक संधि हातांत घेऊन त्यांत आपल्या कल्पनेनें बोधपर एकादें कथानक जडवून देऊन नाटक किंवा कादंबरी झाल्याचें उदाहरण फारसें पाहण्यांत येत नाहीं!! आपल्या देशाच्या उलट प्राच्य देशाकडे पाहिलें असतां त्यांच्यांत लेखनकलेचें चातुर्य अधिक दिसून येत आहे. ही आपली उणीव केव्हां दूर होईल? ज्याणें उठावें त्याणें "कांडलेलेंच पुनः कांडावें." ही खोड चांगली नाहीं. ह्मणजे प्रत्येकांनीं भारत रामायणाच्याच हात धुऊन मागें लागावें हें विद्वत्तेचें लक्षण नव्हे.

असो. ही कादंबरी कितपत योग्य झाली आहे, आणि हिच्या वाचनापासून कोणास काय घेतां येईल हें ठरविण्याचें काम सुज्ञांवरच सोंपवितों.

मु० सोलापूर, ता० १।४।९६. आपला नम्र सेवक, ग्रंथकर्ता.

---

## अनुक्रमणिका.


| भाग. | भागांचीं नांवें. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | सज्जनविपत्ति .... .... .... .... | १ |
| २ | जलप्रलय .... .... .... .... | २१ |
| ३ | अस्सल मोंगलाई .... .... .... | ३९ |
| ४ | खंडोबाची स्वारी .... .... .... | ५९ |
| ५ | गाणारणीचें घर .... .... .... | ७५ |
| ६ | नर्मदा तटाक व टोकरास्वामी .... .... | ९४ |
| ७ | श्रीक्षेत्र डाकूर.... .... .... .... | १२१ |
| ८ | मोठी चोरी व मनुष्यवध .... .... | १४९ |
| ९ | मदनविलास व पिशाच्चाचा खेळ .... | १७२ |
| १० | रयतेचें बंड .... .... .... .... | १९४ |
| ११ | आनंद व धर्मसंस्थापना .... .... | २१५ |

मा. ८२
३१. ११९०

# धर्माजीरावाचें कुटुंब,

अथवा

# बडोदें राजधानींतील साडेतीन वर्षांची कारकीर्द.

## भाग १ ला.

### सज्जनविपत्ति.

ढेंकणाच्या संगें हिरा जो भंगला ॥
कुसंगें नाडला साधु तैसा ॥ १ ॥

'तुकाराम.'

जगामध्यें ज्या अनेक उलाढाली होतात, त्या प्रत्येकीपासून साधक मनुष्यांस कांहीं तरी घेतां येतें; असा शाहाण्यांचा सिद्धांत आहे. त्यांतही राजकीय उलाढाली तर फारच महत्वाच्या आणि लोकोपयोगी असतात. प्रत्येक स्वोन्नतिप्रिय मनुष्यास राजकीय उलाढालींत मोठी संधी सांपडते, ही गोष्ट अगदीं खरी आहे. इतिहासांतील अनेक उदाहरणें या गोष्टीस साक्ष देतात. पहा! एवढ्या थोरल्या रोमन साम्राज्याची कालप्रवाहानें दुर्दशा उडवून दिली तेव्हां पाश्चिमात्य राष्ट्रास, किंबहुना सर्व यूरोप खंडास त्यावेळीं किती अपूर्व लाभ झाला बरें?

अथवा १८ व्या शतकाशेवटीं फ्रान्स देशामध्यें जी मोठी राज्यक्रांति झाली, तिचा उपयोग इग्लं-

डास व जर्मनीस थोडा का झाला? त्याचप्रमाणें सन १७८३ सालीं अमेरिकेनें इंग्लंडच्या दास्यत्वास अखेरची रामरामी ठोकून स्वतंत्रतेची ध्वजा फडकाविली, हीं सर्व फळें तरी राजकीय उलाढालीचींच होत यांत संशय नाहीं.

बडोदें राजधानींत तरी प्रस्तुतची सुधारणा होण्यास म्हणजे **श्रीमंत सयाजीराव महाराज** गायकवाडासारखा उत्तम प्रभु त्या गादीस होऊन राज्याची सुव्यवस्था होण्यास मागील एक प्रकारची राजकीय उलाढालच कारणीभूत झाली नाहीं काय? होय; संशय नाहीं. म्हणून आम्हीं आपल्या प्रिय वाचकांस तसल्या एका उलाढालीचा प्रसंग या कादंबरीच्या द्वारें दाखविण्याचा विचार केला आहे. अशा प्रसंगीं तेथें कसकशा मजा होतात, व काय काय खेळ होतात आणि परिणामीं दूधक्षीराचा निवाडा ईश्वरकृपेनें अखेर कसा होतो; हें या कादंबरींतील कल्पित रूपकावरून प्रिय वाचकांच्या लक्षांत सहज येणारें आहे.

पेशवेसरकारचे कारकीर्दींत दाभाड्यांचें घराणें आपल्या शौर्य धैर्यादि गुणेंकरून फार उदयास आलें होतें; ही गोष्ट बहुश्रुत आहे. सेनापती दाभाड्यांचें नांव ऐकून तरी निदान माहीत नाहीं, असा मनुष्य आपल्या या विस्तीर्ण देशांत मिळणें दुर्मिळ!! या थोर घराण्यांच्या संगतीनेंच पुढें गायकवाडांचेंही घराणें मोठ्या योग्यतेस चढलें! आणि मग त्यांनीं बडोदें येथें आपली गादी स्थापन करून ते राजैश्वर्य भोगूं लागले.

पुढें दैवयोगबलानें दाभाड्यांच्या घराण्यास उत्तरोत्तर उतरती स्थिति लागली. ते एखाद्या गरीब इनामदारासारखें होऊन एका खेडेगांवांत घर करून राहिले. परंतु दाभाड्यांच्या भाऊबंदांपैकीं एक पुरुष पूर्वींपासूनच गायकवाडांस धरून राहिल्यामुळें, त्याचा वंश बडोदें मुक्कामीं बऱ्याच सुखसंपन्न स्थितींत वास करून होता. पुढें बराच काळ गेल्यानंतर बडोद्यांत मल्हाररावांचा अम्मल झाला. त्यावेळीं त्या दाभाड्याच्या वंशांत धर्माजीराव दाभाडे म्हणून फार चांगला पुरुष कुटुंबासहित नांदत होता. त्यावेळची दरबारची स्थिति त्याला आवडेनाशी झाली होती म्हणून त्याणें बहुतेक आपलें अंग तेथील संबंधांतून अगदीं काढतें घेतलें होतें. तरी दरबारचा आरोप धर्माजीरावावर असा एक होता कीं, त्याचा आणि भाऊ शिंद्यांचा स्नेहपणा आहे ! ! वास्तविक पाहिलें असतां या गोष्टींत कांहीं मोठासा सत्यांश देखील नव्हता; परंतु " घर फिरलें म्हणजे घराचे वांसे फिरतात " या म्हणीप्रमाणें बिचाऱ्या धर्माजीरावावर प्रसंग येऊन ठेपला होता.

यानंतर भाऊ शिंदा हाल हाल होऊन मरण पावला. तरी धर्माजीरावावरचा दरबारचा कोप कमी झाला नाहीं. उलट अधिकच वाढला. त्याची नेमणूक आणि वाड्यांतील मुजराही बंद झाला ! ! तेव्हां धर्माजीराव अगदीं घरांत बसून राहिला. कित्येक दुर्गुणी लोकांनीं त्याला महाराज प्रसन्न होण्याच्या बऱ्याच युक्त्या सुचविल्या, परंतु त्या नीच प्रकारच्या

असल्यामुळें अर्थातच धर्माजीरावास आवडल्या नाहींत. कांहीं कार्यसाधु लोकांनीं पापपुण्याकडे, नीति अनीतिकडे, व न्याय अन्यायाकडे न पाहतां खुशाल आपले खिसे यथास्थित त्या अमलांत भरून घेतले ! ! परंतु धर्माजीराव खरोखरच धर्ममूर्ति असल्यामुळें तसले प्रकार करणें त्याला कधीं स्वप्नांतही आवडलें नाहीं.

एकदां धर्माजीरावास असा आंतून एक निरोप येऊन पोंचला कीं, त्यानें एकवेळ महाराजांस त्यांच्या खाजगी मंडळीसहित आपले घरीं बोलवून भोजनाची मेजवानी द्यावी. मात्र त्यांत विशेष तजवीज इतकीच ठेवावी कीं, आपल्या घरच्या खाशा बायकांकडूनच या खाश्या पंक्तींत वाढवावें ! म्हणजे तुमचीं सर्व दुःखें दरबारच्या कृपेनें दूर होऊन जातील. हाही दरबारचा गुप्त निरोप धर्माजीरावास मनापासून आवडला नाहीं हें निराळें सांगणें नको. उलट तो या निरोपामुळें पूर्वीपेक्षां अधिक उदास मात्र होऊन गेला. जर तो या वेळीं हा निरोप ऐकता, तर तो निदान बाहात्तरांश तरी गेला असता ! असो; अशा प्रकारचा निरोप उद्योगी मंडळीकडून धर्माजीरावाकडे कां आला, याची विशेष पंचाईत करण्याचें जरी आपणास या स्थळीं प्रयोजन नाहीं, तरी इतकें येथें सांगून ठेवलें पाहिजे कीं, धर्माजीरावाच्या घरच्या बहुतेक बायका स्वरूपानें केवळ स्वर्गांतील आप्सरेतुल्य अगदीं लावण्यखाणी अशा होत्या.

धर्माजीरावाची बायको सुमतीबाई ही रूपांत, गुणां-

त, आणि संसारिक सर्व कृत्यांत मोठी वाखणण्यासारखी होती. तिच्यासारखी दक्ष व नीतिमती बायको बहुतकरून त्या वेळच्या थोर लोकांच्या स्त्रियांत क्वचितच सांपडली असती, असें म्हटल्यास साहस होणार नाहीं. सुमतीची एक सख्खी बहीण तिच्याजवळच राहत होती. कारण ती बालविधवा व निराश्रित होती. तिचेंही रूप फार वर्णन करण्यासारखें होतें. सुमतीबाईस एक कन्या व एक पुत्र होता. पुत्र दहा बारा वर्षांचा असून कन्या तेरा चवदा वर्षांची लग्नास उपवर झालेली केवळ चंद्रकलेप्रमाणें होती. मुलाचें नांव सद्गुण असें असून कन्येचें नांव नीति असें होतें. ही नीतिबाईच धर्माजीरावाच्या हाल अपेष्टेस बहुतांशीं कारण झाली. कशी म्हणाल तर ऐका:—हिचें रूप इतकें कांहीं उत्तम होतें कीं, स्वर्गीच्या रंभा, उर्वशी, आणि तिलोत्तमा इजपुढें खरोखरच तुच्छ; असें म्हटलें असतां अतिशयोक्तीचा दोष येणार नाहीं! कारण पोथीपुराणांतून स्त्रियांच्या उत्तम रूपांचीं जीं लक्षणें लिहिलीं आहेत, तीं सर्व लक्षणें नीतीच्या ठिकाणीं मोठ्या प्रसन्नतेनें वास्तव्य करीत होतीं. आणि म्हणूनच सर्व स्त्रियांत नीतीचें सौंदर्य अधिक असें म्हटल्यास माझ्या म्हणण्याचें धोरण रूपकद्वारा कोणीकडे आहे, हें सहज सुज्ञवाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. असो, मला सांगायचें म्हणून इतकेंच कीं, धर्म व सुमती या उभय दंपत्यांची कन्या जी नीति व पुत्र जो सद्गुण हीं बहीणभांवडें साऱ्या जगांत देखील वर्णनीय होतीं;

मग एका बडोर्दें शहरांत तीं उत्तम होतीं असें सांगितल्यास नवल तें कोणतें ? असो, या प्रकारचें रूप त्या नीति मुलीचें असल्यामुळें पुष्कळ थोर लोकांच्या मागण्या धर्माजीरावाकडे येऊन पोंचल्या होत्या.

अशावेळीं श्रीमंत मल्हारराव महाराजांचा एक विवाह होऊन गेला असून त्यांच्या त्या म्हाळसाबाई राणीसाहेब वाड्यांत येऊन सेवेसही सादर झाल्या होत्या. तथापि आणखी दोन चार सुंदर राण्या कराव्या, असा महाराजांचा विचार होता. त्यामुळें अनुयायी मंडळी त्या खटपटींत अगदीं सक्त गुंतलेली असे. रोज रोज नव्या नव्या देशांहून व गांवांहून नव्या नव्या पोटोग्राफी वाड्यांत येऊन दाखल होत होत्या. व त्या संबंधानें खाजगी मंडळींतून नित्य नव्या नव्या चर्चाही चालू झाल्या होत्या. शिवाय कित्येक लोक आपल्या उपवर मुली बरोबर घेऊन स्वतः बडोद्यांत येऊन गांवाबाहेरील धर्मशाळेंतही तळ देऊन राहिले होते.

याप्रमाणें श्रीमंतांच्या विवाहाची धामधूम चालू असतां गांवांतच असलेला धर्माजीराव दाभाडे याच्या कन्येचा फार फार लौकिक सरकारच्या कानावर गेला. तेव्हां एक वेळ ती सुंदरी समक्ष दृष्टीस तरी पडावी, अशी महाराजांनीं आपली इच्छा दर्शविली. मग काय पहावयाचें आहे ? मंडळींनीं लागलींच आपला होता नव्हता तेव्हढा प्रयत्न करण्यास आरंभ केला. धर्माजीरावाशीं त्यांनीं नानाप्रकारचीं बोलणीं लाविलीं. तुम्हीं आपली मुलगी महाराजास दाखविली

असतां तुमचें फार कल्याण होईल, असें तें म्हणालें. तेव्हां धर्माजीरावांनीं त्यांना एकच जाब सांगितला कीं, "पुरुषाच्या दृष्टीस आमची मुलगी लग्नापूर्वी कधीं पडावयाची नाहीं! मुलगी पाहणें असल्यास, वृद्ध, पोक्त, सभ्य, आणि कुलीन दोन स्त्रिया कोणी तरी तुमच्या विश्वासाच्या असतील, त्या आमच्याकडे पाठवून द्याव्या; म्हणजे आम्ही त्यांस मुलगी तुमच्याकरितां दाखवितों. उपवर झालेल्या मुली पुरुषांच्या दृष्टीस पडूं देणें, अशी रीत आमच्या घराण्यांत नाहीं!!" याप्रमाणें धर्माजीरावांनीं निस्पृह जबाब दिल्यामुळें, व शिवाय फोटोग्राफही काढून देत नाहीं; असें म्हटल्यावरून दरबारी मंडळींचा त्यावर पूर्वीपेक्षांही विशेष कोप झाला. आधींच धर्माजीरावावर दरबारची कृपा फार मोठी होती, आणि त्यांत हें नवीनच कारण उपस्थित झालें, मग काय पहावयाचें आहे? धर्माजीरावाचें नीतीचें उत्तर व निस्पृहपणाचें भाषण कोणास आवडलें नाहीं; इतकेंच नव्हे, या भाषणावरून तो दरबारचा शत्रु असें उघडपणानें ठरलें गेलें!! असो. त्यानंतर मग खुषमस्करी मंडळींनीं महाराजांस बऱ्याच फोटोग्राफी आणून दाखवून कित्येकांशीं करार मदारही केले. आणि त्यांतील एकीबरोबर तर नवसरीस जाऊन लग्नही लाविलें! शिवाय कांहीं मुलींच्या बापांस नेमणूका करून [illegible] पुढें त्यांच्या मुलींशीं लग्न लावून घेण्या[illegible] आलें होतें.

दरबारची अगदींच अवकृपा झाल्यामुळें उत्तरो-

त्तर द्रव्य संबंधानें धर्माजीराव फारच आडचणींत येत चालला. त्याचा पारख ( सावकार ) त्याला कर्ज देईनासा झाला. कारण आतां त्याची नेमणूक बंद होऊन दरबारच्या अवकृपेसही तो पात्र झाला आहे, हें पारखास समजलेंच होतें; मग तो कर्ज कशाचें देणार ? याप्रमाणें घरांत द्रव्य नाहीं, पारख कर्ज देईना, आणि सरकार नेमणूक देईना; अशी स्थिति झाल्यामुळें अर्थात् धर्माजीराव सर्व प्रकारच्या आडचणींत येऊन पोंचला. अगदीं निरुपाय होऊन गेला. धर्माजीराव मुळापासून आब्रूदार व गर्भश्रीमंत असल्यामुळें त्याला ही स्थिति तोंड धरून बुक्यांचा मार अशा प्रकारची झाली ! ! गांवांत त्याचे कांहीं स्नेही श्रीमंत व वेळेस कार्य करणारे अशापैकीं होते, परंतु त्यांच्या जवळ जाऊन दीन वदनानें आपली लाचारी दाखविणें, धर्माजीरावांस मनापासून आवडेना ! ठीकच आहे, कसें बरें आवडेल ? कारण जो धर्माजीराव गोपाळराव मैराळ दिवाण, रोडे, मुजूमदार, फडणीस, नवाब, पांढरे, घोरपडे वगैरे श्रेष्ठ व श्रीमान लोकांबरोबर मांडीशीं मांडी लाऊन लोडाशीं टेकून बसणारा; तो धर्माजीराव आपल्या चुलीजवळची घरगुती आडचण त्यांच्या जवळ जाऊन सांगेल काय ? छे, छे, अशी गोष्ट व्हावी तरी कशी ! कारण चंदनाचें लांकूड कितीही तुकडे तुकडे करून शेवटीं अग्नींत जरी टाकिलें, तरी तें आपल्या अंगचा कधीं सुगंध सोडून देईल काय ? हत्ती म्हातारा झाला म्हणून तो कधीं आपल्या अंगच्या थोरपणाच्या लीला सोडून

देईल काय? ऊंस चरकांत घालून पुष्कळ पिळून काढला म्हणून कधीं कडू रस आपणापासून देईल काय? त्याचप्रमाणें खरा थोर मनुष्य कितीही संकटांत आला तरी तो आपला थोर स्वभाव कधीं सोडणार नाहीं!

असो; ईश्वर ज्यास तारणारा समर्थ बसला आहे, त्यांस माणसाचे हातून काय भय लागू होणारें आहे? याच संधीस असा एक योग घडून आला कीं, जुने सरकारवाड्याचे पिछाडीस एका सुंदर महालाचें काम व बागेचें काम चालू झालें होतें. त्यावर निरनिराळ्या रीतीचे निरनिराळे कामगार कामावर लागले होते. त्यांत कोणी सुतार, कोणी लोहार, कोणी पाथरवट, कोणी रंग देणारे आणि कोणी सोनेरी फुलें व वेलबुट्टी इत्यादि नकशीचें काम करणारे असे हजारों लोक कामावर लागलेले होते. त्यांत आमचे हे गरीबीस आलेले सरदार धर्माजीराव दाभाडे वेषांतर करून मिसळून गेले!! त्यांनीं आपलें चंदेरी उंची बडोदेंशाई पागोटें घालण्याचें सोडून देऊन एक साधारण जुनें पुराणें बेरंगी पागोटें डोकीवर ठेवून दिलें! अंगांतील बारीक मलमलीचा सदरा व तरतऱ्हेच्या जाळीदार बुट्टीनें वेष्टीत अंगरखा काढून ठेवून ते आतां दुहेरी खादीची एक बंडी मात्र तेवढी अंगांत घालूं लागले! एक्या फाटक्या तुटक्या धोत्राची अंगावर योजना केली!! त्यांच्या कानांत जी मोठ्या मोत्यांची बिगबाळी पांचेच्या लोलकासहित होती, ती तर बिचारी केव्हांच त्यांच्या कानांतून निघून सावकाराच्या घरांत जाऊन घुसली होती!! या-

प्रमाणें आमच्या धर्माजीरावांचा सर्व राजकीय थाटमाट जाऊन ते बेगारी थाटाचे बनले!

नजरबागेच्या मजुरदार मंडळींत शिरून त्यांनीं वर्ष दीड वर्ष आपला संसार स्वतःच्या अंगमेहनतीवर चालविला. परंतु घरांतील मंडळीस त्यांनीं अन्नवस्त्राविषयीं कमी पडूं दिलें नाहीं. तथापि आपण मजुरदार होऊन मजुरी करण्यास जात असतों, ही गोष्ट त्यांनीं घरांतील मंडळीस मुळींच कळूं दिली नाहीं. कारण त्यांना समजलें असतां फार वाईट वाटेल; व कदाचित् ते धैर्य सोडून भलतेच करतील; अशी धर्माजीरावांस मनांतून भीति वाटत होती. आणि ही त्यांची कल्पना खरीही होती. त्यानें घरांतून बाहेर पडते वेळीं आपला राजश्री पोषाक करून बाहेर निघावें, आणि मग गांवाबाहेर जाऊन जंगलांत एक्या पडक्या शिवालयांत भिंतीच्या फटींत आपला तो सरदारी पोषाक लपवून ठेवावा; आणि तेथें बेगारी पोषाक अंगावर चढवून गांवांत येऊन बागेचे कामावर जात असावें. मग पुनः कामावरून सुटका झाली ह्मणजे त्या पडक्या शिवालयांत जाऊन बेगारी थाट तेथें ठेवून सरदारी थाटानें घरीं येत असावें! अशा रीतीनें त्यानें वर्ष दीड वर्ष निभविलें! कांहीं दिवस त्यानें नजरबागेच्या कामावर एक रुपाया रोज मिळविला, मग कांहीं दिवसपर्यंत दीड दीड रुपाया; आणि पुढें पुढें तर मग दोन दोन तीन तीन रुपये मिळविले! तो सर्व कामांत हुशार होता; तरी नकशीचे व सोनेरी वेलबुट्टया तयार करण्याच्या कामांत त्यानें बराच पैसा मि-

९६-२२१२



ळविला. असो, अशा चातुर्यानें कोणाच्या ओळखींत न येतां त्यानें आपला प्रपंच मोठ्या शिताफीनें चालविला; परंतु दुष्ट लोकांस तो शरण गेला नाहीं. त्याचे घरांत त्याच्या सुद्धां एकंदर आठ मनुष्यें होतीं. पैकीं चार बायका आणि चार पुरुष. बायकांपैकीं तिघीजणींचीं नांवें तुम्हीं मागें वाचलींच आहेत. आतां चवथी बाई सांगावयाची राहिली आहे ती धर्माजीरावाची वृद्ध आई सुबुद्धिबाई ही होय. ही फार म्हातारी व अशक्त झाली असल्यामुळें नेहमीं घरांत आंथुरणावर पडून राहिली होती. आणि मागें सांगितलेल्या तीन स्त्रिया त्या तिची उत्तम प्रकारची सुश्रूषा ठेवीत असत. पुरुषांपैकीं, दोघे तुम्हास पितापुत्र माहितच आहेत. राहिले दोघे ते एक मामासाहेब, म्हणजे धर्माजीरावांचे मामा; आणि एक विश्वासू गडी! त्याचें नांव भरंवसा, याप्रमाणें होतें. याप्रमाणें धर्माजीरावाच्या कुटुंबांत आठ मनुष्यें होतीं.

धर्माजीची मुलगी नीतिबाई, हिला आतां चवदावें वर्ष चालू झालें होतें. हिच्या रूपाविषयीं वर्णन मागें एक वेळ आरंभीं केलेंच आहे; तथापि तिच्या गुणाविषयीं येथें थोडेंसें सांगणें प्रशस्त होईल. तिचें नांव नीति म्हणून होतें, तें खरोखर तिला सार्थ साजणारें होतें. कारण ती सर्व गुणानें उत्तम सुशिक्षित होती. ती आपल्या हस्तकौशल्यानें भरजरी कशिद्याचें काम फारच उत्तम प्रकारचें काढीत असे. उंची रंगरंगाच्या मखमालीवर तिनें फार तरतऱ्हेचीं फुलें व राघु साळुंक्यादि पक्षी काढावे. तीं कापडें गांवांतील श्रीमंत

लोकांच्या बायकांत चोळीकरितां, व पुरुषांच्या टोपी-करितां आणि हॉफजाकिटाकरितां फारच खपत अ-सत. म्हणून व्यापारी लोक मोठ्या आग्रहानें तयार करवून घेऊन जात असत. तात्पर्य, धर्मोजीरावाच्या असल्या या आपत्काळीं नीतिबाईकडून त्यास फार साह्य होत असे.

धर्मोजीरावास एक दहा बारा वर्षांचा मुलगा होता म्हणून मागें सांगितलेंच आहे, या मुलाचें सद्गुण असें जें नांव होतें, तें खरोखर अन्वर्थक होतें, असें त्याच्या आचरणावरून दिसून येत असे. तो वयानें लहान होता तरी योग्यतेनें केवळ मूर्तिमंत सद्गुणांचा पुतळाच होता. त्याला, आणखी त्याच्या बहिणीला म्हणजे नीतिबाईला लिहिणें, वाचणें, नम्रतेनें सत्य स्मरून भा-षण करणें, वडिलांची मर्यादा ठेवणें, आणि ईश्वरभ-क्तींत तत्पर राहून सदोदीत सदाचरणांत वेळ घालवि-णें इत्यादि व्यवहारशास्त्राचें उत्तम ज्ञान सुमतीबाईनें (आईनें)च शिकवून दिलें होतें. ही गोष्ट आमच्या प्रिय-कर वाचकांनीं कधीं विसरून जाऊं नये! धर्मोजीरावानेंही या मुलाला फुरसतीच्या वेळीं जवळ घेऊन मराठी, संस्कृत, गुजराथी आणि थोडथोडें इंग्लिश भाषेचेंही ज्ञान करून दिलें होतें. तात्पर्य नीति आणि सद्गुण हीं दोन मुलें रूपगुणेंकरून आणि विद्येच्या संबंधानें फार अद्वितीय अशीं तयार झालेलीं होतीं. मुलीस मु-लाप्रमाणेंच विद्या व सुशिक्षा आणि व्यवहारशास्त्राचें ज्ञान असावें, असें या दंपत्याचें म्हणजे धर्मोजीरावाचें आणि त्याची बायको सुमतीबाई, या दोघांचें मत होतें;

परंतु मुलाप्रमाणें मुलीनें शाळेंत जावें, पुरुषाबरोबर खिदळावें, त्यांच्या बरोबर हवें तेथें फिरण्यास जावें, परक्या पुरुषाशीं प्रेम मैत्रीनें वागावें, गुप्त पत्रें पाठवावीं, निर्भिड आणि मर्यादा शून्य व्हावें, मनास वाटेल त्याला मनास येईल तेव्हां नवरा करण्यास अनमान करूं नये, लग्नास आईबापांची किंवा दुसऱ्या स्वकीय वाडवडील मनुष्यांची परवानगीची अपेक्षा धरूं, नये, इत्यादि गोष्टी; आणि दुसऱ्या अशाच प्राचीन नीतिशास्त्र विरुद्ध गोष्टींत स्त्रियांस स्वतंत्रता असणें हें प्रिय वाटत नसे. त्यांचा मुख्य अभिप्राय असा होता कीं, स्त्रियांचीं मुख्य भूषणें लज्जा आणि मर्यादा हीं होत. या दोन भूषणांस ज्या कृतीपासून भ्रष्टता येईल; तसलें कोणतेंही शिक्षण किंवा तसली कोणतीही संगति स्त्रियांस उपयोगी नाहीं ! ! स्त्रियांस विद्या व सुशिक्षण पाहिजे; परंतु तें घरांतले घरांत चांगल्या आईबापांकडून, चांगल्या सासुसासऱ्यांकडून आणि पुढें विद्वान् व सुशिक्षित नवऱ्याकडून प्रीतियुक्त अंतःकरणानें, आणि मधुर अशा वाणीनें मिळालें पाहिजे! तरच त्या योग्य अशा होतील. आणि या द्वारास सोडून अन्य मार्गेंकरून ज्या सुशिक्षित होऊं म्हणतील, त्या बहुधा नीतिभ्रष्ट अशा होतील यांत संशय नाहीं. त्या विद्वान होतील, परंतु चावट, अमर्यादी, नीतिशून्य,नास्तिक, एककल्ली, निष्ठुर आणि धर्मद्वेष्ट्या अशा मात्र होतील ! मग विद्येची थोरवी काय राहील ? याकरितां ज्या विद्वत्तेवर नीतिशास्त्राचें व स्वधर्मनिष्ठतेचें जबरदस्त दडपण राहूं शकणार नाहीं,

तसली ती विद्वत्ता स्त्रियांस बिलकूल उपयोगी नाहीं. एका रोगावरील एकच औषध जसें प्रकृतिभेदामुळें सर्वांसच उपयोगीं पडत नाहीं, अनुपान बदलावें लागतें; त्याचप्रमाणें पुरुषांस सुशिक्षित होण्याच्या व विद्वान् होण्याच्या ज्या रीतिभाति आहेत, त्याच स्त्रियांस उपयोगीं पडतील असें ह्मणून तसें करतां उपयोगी नाहीं. त्यांतील व्यवस्थेंत फेरफार असला पाहिजे! " असो. याप्रमाणें त्या दंपत्याची स्त्रीशिक्षणाच्या संबधानें समजूत होती, ह्मणून त्यांनीं आपल्या मुलीस ह्मणजे नीतिबाईस होता होईल तेवढी घरींच सुशिक्षित केली होती. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें धर्माजीरावाचा प्रपंच चालू असतां त्याच्यावर आणखी एक महासंकट येऊन उभें राहिलें!! हें संकट कोणतें म्हणाल तर त्यांस कुटुंबांच्या मनुष्यासहित नजर कैद भोगणें कपाळीं येऊन पोंचलें! त्याच्या घरीं सरकारी पाहरा येऊन बसला!!! घरांतील मनुष्य बाहेर जावयाचें नाहीं, आणि बाहेरील कोणी आंत यावयाचें नाहीं. असा बंदोबस्त झाला! तेव्हां मात्र बिचाऱ्या धर्माजीस मोठी चिंता येऊन पडली. कारण या बंदोबस्तामुळें त्याचें बाहेर कामाकाजास जाणें अगदीं बंद होऊन गेलें!! आणि त्यामुळें पुनः त्याला खर्चाव्यर्चाची फारच आडचण होऊं लागली. एकट्या नीतिबाईच्या हस्तकौसल्यावर एवढा मोठा प्रपंचाचा बोजा चालेनासा झाला. याप्रमाणें मोठें संकट ओढवलें! मग सुमतीबाईच्या आंगावर आणि ताराबाईच्या (सुमती-

ची नहींण ) आंगावर कांहीं किडूक मिडूक राहिलें होतें, तेंही चटसारें सावकाराच्या येथें जाऊन पडलें. सरकारी पाहरा आपल्या एथें कां बसला, या विषयींची चौकशी धर्माजीरावानें पुष्कळ हातपाय हालवून केली, परंतु त्यांला पक्कें त्यांतलें कांहीं वर्तमान समजलें नाहीं. उडत उडत इतकेंच कळलें कीं, " गांवांतला आणि वाड्यांतला नित्याचा मजकूर विशेषेंकरून जो रेसिडेन्सींत जाऊन समजतो, तो मीं जाऊन कळवितों; असा दरबारचा मजवर वहीम आहे ! " शेवटीं याबद्दल त्यानें दरबारास पुष्कळ अर्ज वगैरे करून पाहिले, परंतु दाद लागली नाहीं ! !

वास्तविक पाहिलें असतां बिचारा धर्माजीराव असल्या कोणत्याही कामांत नव्हता. तो निव्वळ दिवसभर मजुरी करून आपला निर्वाह करीत होता, आणि ईश्वरास भिऊन सात्वीकपणानें आयुष्याची मर्यादा कशीतरी कंठून राहिला होता. असें असून बिचाऱ्यावर हा गहजब गुजरला होता, तेव्हां दैवाची गति तरी मोठी उलटी चमत्कारिक आहे, असें म्हटलें पाहिजे. असो. धर्माजीरावावर अशा प्रकारचा गहजब ह्मणजे मल्हाररावाच्या हुकुमानें चालू झाला होता, अशी गोष्ट मुळींच नाहीं. यांतील कोणतीच गोष्ट खुद्द मल्हाररावास, किंवा जे उघड रितीनें दिवाणगिरीचें काम, निमित्तमात्रास ह्मणून पाहणारे मिरवत होते त्यांस मुळींच माहीत नसावी, असा संभव होता. हा प्रकार आणि असले दुसरे कांहीं प्रकार खाजगीकडील नाजुक पेशाच्या मंडळीकडून चालू झाले होते.

त्यांत स्वतः ते आपला स्वार्थ अगोदर साधून घेऊन मग बाकी कांहीं त्यांत शेष राहिलें असल्यास, बिचाऱ्या मल्हाररावापर्यंत नेऊन पोंचवीत असत. नाहीं-पेक्षां सर्व अस्मानी सुलतानी मधल्यामध्येंच होऊन जात असे. याप्रमाणें खाजगीकडील प्रत्येक माणूस स्वतः मल्हारराव महाराज होऊन गेला होता. आणि त्यांतील सूत्रधार कोणी गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल होऊन गेले होते. त्यांनीं कांहीं तरी वहीम ठेवून धर्माजीरावास नजर कैद करून ठेवलें! तथापि असल्याही बिकट प्रसंगीं धर्माजीराव व त्याच्या कुटुंबांतील मंडळी डगमगली ह्मणून नाहींतच. सर्व भार ईश्वरावर ठेवून कसे तरी दिवस कंठीत होते.

पुढें थोड्याच दिवसांनीं धर्माजीरावास असें कळून आलें कीं, "हा सर्व गहजब मजवर केवळ माझ्या कन्येकरितां, व मेव्हणी जी ताराबाई हिच्याकरितां ह्मणून आहे!! मीं मंडळीच्या हेतूप्रमाणें वागल्यास हा सर्व त्रास माझा क्षणांत दूर होणार आहे. इतकेंच नव्हे; मीं क्षणांत रंकाचा कुबेरही होण्यास उशीर लागणार नाहीं!" असें त्याला साधारण समजलें, परंतु त्याचें मन तसें करण्यास तयार झालें नाहीं. त्यानें निश्चय केला कीं, "जें होणें असेल तें होईल, परंतु मी किंवा माझ्या कुटुंबांतील कोणी अनीतीच्या वाऱ्यास उभें राहणार नाहींत!" धर्माजीरावाच्या या विचाराप्रमाणेंच त्याच्या घरांतील सर्व मंडळींचे निश्चयपूर्वक विचार ठरलेले होते. नीतिबाईनें तर स्पष्ट आपल्या आईस असें सांगून ठेविलें होतें कीं, "मला पाटीभर

डागिन्यांची, किंवा सवतीच्या कचाट्यांत राहून राज्यसुख भोगण्याची मुळींच इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें शिळे होऊन गेलेल्या पंचपक्वान्नांपेक्षां मला ताजी सजगुऱ्याची भाकरी फार चांगली वाटते. ” खरोखरच डागिन्यांच्या सुखापेक्षां नवऱ्याच्या प्रीतिसुखाची किंमत पुष्कळ पटीनें अधिक आहे. आणि जडावांच्या डागिन्यांपेक्षां नुस्ता कुंकवाचा भव्य टिकला लावण्यांत कुलीन स्त्रियांला शोभा अधिक आहे. पृथ्वीचें राज्यसुख, कुबेराची संपत्ति, आणि मदनासारखा सुस्वरूप पुरुष, इतकें सर्व मिळत असलें तरी शाहण्या आईबापांनीं आपल्या उपवर मुली सवतीच्या घरांत म्हणून कधीं देऊं नयेत. त्यापेक्षां तरुण, सुशिक्षित आणि कुलीन असा वर पाहून खुशाल आपल्या मुली आईबापांनीं देऊन टाकाव्यात, हें फारच हिताचें कलम होय. मग तो कितीही अकिंचन कां असेना!”

सुमतीबाईचाही विचार असाच होता कीं, “डागिन्यांच्या व राज्याच्या सुखाकरितां मी आपली लाडकी मुलगी नीति ही तीन बायकांच्या नवऱ्यास कधीं देणार नाहीं. त्यापेक्षां एखाद्या गरीब मुलास देऊन टाकीन! सवतींच्या आडचणीमुळें रात्रींच्या रात्रीं पतिवियोगानें पलंगावर तळमळत काढण्यापेक्षां पतिसंन्निधानीं असतां घोंगडीवर निजणें बरें नव्हें काय? त्यापेक्षां आपली मुलगी अविवाहित ठेवीन; किंवा आडांत ढकलून देईन!!” आमच्या मतें हा सुमतीबाईचा विचार खरोखर फार नामी होता. कारण जे आईबाप केवळ पैशाच्या आशेनें आपल्या तरुण मुली

सवतीवर आणि म्हाताऱ्या कोताऱ्यास देतात, ते निश्चयानें प्रत्यक्ष कसाई होत, यांत संशय नाहीं. आपल्या स्वार्थाकरितां पोरींच्या जन्मांची खराबी करणें हें शुद्ध मांगांचें कर्म होय ! !

असो. याप्रमाणें धर्माजीरावांचें कुटुंब नीतिमार्गाचें अवलंबन करून सद्धर्मानें दिवस काढीत असतां त्यांच्या दुःखाची अगदीं परमावधी झाली. दुसरा कांहीं उपाय नसल्यामुळें त्यांस तीन तीन दिवस उपास पडूं लागले ! ! शेवटीं एके वेळीं त्यांस चार उपोषणें लागोपाठ पडलीं. तेव्हां मात्र धर्माजीरावाची कंबर अगदीं बसून गेली. पुढें काय विचार करावा, हें त्यांस कांहींच कळेना. एकदां त्याचे मनांत असें येई कीं, ही सर्व हकीकत आणि आपणास होत असलेला त्रास एका अर्जांत लिहून तो अर्ज रेसिडेंटाकडे पाठवावा; परंतु पुनः त्याचे मनांत असें येई कीं, "ज्यांच्या अन्नानें पूर्वीपासून हा माझा जन्मपिंड देह वाढला आहे, त्यांच्यावरच कृतघ्न होऊन वरिष्ठाकडे त्यांचें गाऱ्हाणें करीत फिरावें, हें आपल्या उत्तम शीलाला उचित नाहीं. आपल्या अन्नदात्यास आज नाहीं तर उद्यां तरी करुणा येईल, परंतु इतर सर्वांनीं जसा रेसिडेन्सीमार्फत गव्हरनर जनरलपर्यंत गिल्ला करून सोडिला आहे, तोच कित्ता आपण गिरविणें हें सर्वथैव चांगलें कर्म नाहीं. त्यापेक्षां आपल्या कुटुंबासहित आपण मरून गेलों तर काय दुनिया ओस पडणार आहे ?" वाहवा ! प्रिय वाचकहो, हा धर्माजीरावाचा विचार किती थोरपणाचा होता बरें ? इतराप्रमाणें त्यानें आप-

त्या यजमाना विरुद्ध; गिल्ला केला नाहीं ही सामान्य थोरपणाची गोष्ट नव्हे! कारण महल्लाभाकरितां देखील घरभेद करणें बरोबर नाहीं. फार तर काय; परंतु एक वेळ कोणाचें अन्न खाल्लें तर त्याची क्रिया ठेवावी लागते, मग ज्या गादीच्या अन्नाश्रयेंकरून ज्यांचें रक्तमांस उत्पन्न झालें, त्या गादीच्याच संबंधानें अभिमानरहित होऊन यजमानावर तिळांजुळी घेऊन उठावें, हें कुलीन घराणदारांचें उचित कर्तव्यकर्म नव्हे!! म्हणून आम्ही म्हणतों कीं, त्या वेळच्या बड्या लोकांत आमच्या धर्माजीरावासारखा मनुष्य फार क्वचितच आढळून आला असता! असो. शेवटीं धर्माजीरावाच्या कुटुंबास तसल्या कडक प्रतिबंधांत उपासी पोटीं दिवस काढण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. म्हणून ज्य। दिवशीं त्यांना चार उपोषणें सारखीं लागोपाठ पडलीं, त्या दिवशीं त्यांनीं सर्वांनीं एकत्र बसून निश्चयपूर्वक विचार करून ठेवला कीं, "आज रात्रीं आपण सर्व मिळून एकदम एकाच वेळीं एकामेकांच्या मानेवर माना टाकून या हतभाग्य जिविताचा त्याग करून टाकूं!!"

हाय हाय! बिचाऱ्यानीं त्या रात्रीं मरून जाण्याचा निश्चय केला. सर्वांनीं मिळून एकदम मृत्यूचा पंथ धरला ह्मणजे कोणाकरितां कोणास शोक करीत बसण्याचें कारण राहणार नाहीं, अशी त्यांची कल्पना होती, आणि ती सर्व प्रकारें खरी होती. ज्या कुटुंबांत ह्मणून खऱ्या प्रीतीचा वास आहे, व खऱ्या मायेचें आवरण आहे, त्या कुटुंबाची स्थिति अशीच प्रे-

मबद्ध असावयाची! असो, धर्माजीरावानें आपल्या जुन्या राहत्या घरास आग लावून देऊन त्यांत सर्वांसहित मरून जाण्याचा निश्चय केला. मध्यान्हरात्र उलटून गेल्यावर अग्नि लावून देण्याचें ठरलें. एक भला मोठा मणगटासारखा चिंध्यांचा काकडा तयार करून तो ग्यासच्या तेलांत चांगला भिजवून ठेवला! मध्यघराच्या कडेपाठास चहूंकडे ग्यासचें तेल ह्मणजे रॉकआईल चोपडून ठेवलें होतें. आणि आणखीही कांहीं अग्निप्रवाही पदार्थ जमा करून ठेविले होते; कारण घर लवकर पेटावें ह्मणून!

याप्रमाणें सर्व दिवस त्यांनीं तयारी करण्यांत घालविला. परंतु ही गोष्ट अत्यंत तजविजीनें व साधारणपणानें गुप्त ठेविली होती. आपल्यासहित सर्व घर जळून जाऊन मग दुसरे दिवशीं राख मात्र छलकांच्या हातीं लागावी, असा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली. रात्रीचे २ वाजले. शहरांत सामसूम झाली. घरोघर लोक निद्रा-सुखांत निमग्न होऊन गेले. पोलिसची एक गस्त येऊन गेली होती. कुत्रीं मात्र त्या वेळीं बडोद्यांत फार असल्यामुळें चहूंकडे भुंकून राहिलीं होतीं. चंद्र नुकतांच मावळला असल्यामुळें व आकाशांत चहूंकडे अभ्रें आलीं होतीं म्हणून अंधार किट्ट पडला होता. अशा वेळीं सुरसागरावरील एका जुन्या घरास अग्नीचा प्रवेश होऊन हळुहळू धूर व ज्वाला दिसूं लागल्या; तेव्हां त्या घरांतील एकंदर ८ मनुष्यें एकमेकांच्या गळ्यास मिठ्या घालून व डोळे दुःखाश्रूंनीं भरून परमेश्वराचा धांवा करीत, शेव-

टची घटका आतां भरेल म्हणून वाट पहात बसलीं होतीं. इतक्यांत सर्व घर चोहींकडून एकदम पेटून एकच भडका होऊन गेला!!

---

## भाग २ रा.

## जलप्रळय.

मग तो होऊं नेदी शिण ॥
आड घाली सुदर्शन ॥ १ ॥
त्याचा भार वाहे माथां ॥
करी योगक्षेम-चिंता ॥ २ ॥

'तुकाराम.'

पावसाळ्याची शोभा सर्व ऋतुंपेक्षां मोठी मनोल्हादक असते. चहूंकडे पाणीच पाणी झालेलें पाहण्यांत आलें म्हणजे मनास कांहीं विलक्षण तऱ्हेचा चमत्कार वाटतो. झाडें झुडपें आणि मोठमोठे वृक्ष टवटवीत व हिरवेगार होऊन जातात. पक्षी आनंदानें सर्वत्र विहार करीत असतात. आणि पृथ्वी मोठी तेजःपुंज होऊन हिरवीगार पोषाक केलेली दिसते. बेडकीं वगैरे क्षुद्र प्राणी जागजागीं शब्द करीत असतात. आणि शेतकरी लोकांस मोठा आनंद झालेला असतो. असा हा पावसाळा सर्व ऋतूंचा, सर्व धान्यांचा आणि सर्व सुखसामुग्रीचा उत्पादक असल्यामुळें याच्या आगमनानें सर्व प्राणीमात्रांस आनंद होणें हें साहजिक

आहे. परंतु हाच पावसाळा जर कां नियमापेक्षां थोडा फाजील झाला, तर तो सर्वांस त्रासदायक होऊन नुकसान करणारा असा होतो. पाणी पुष्कळ पडलें ह्मणजे ओला दुष्काळ होतो!! हें सर्वांस ठाऊकच आहे.

बडोद्यांत या वर्षी नियमापेक्षां अधिक पावसाळा झाला. एके उत्तर रात्रीस तर इतका कांहीं पर्जन्य सुमारें चार तासांत पडला कीं, तितका पर्जन्य कधीं तीस वर्षांत पडला नव्हता. विश्वामित्री नदीस इतकें पाणी आलें कीं, पुलावरून दोन दोन पुरुष पाणी होऊन गेलें, सर्व तळीं, विहिरी, ओढे, नाले अगदीं पाण्यानें तुडुंब भरून गेलें. अर्धें बडोदें शहर पाण्यांत तरंगू लागलें. पुष्कळ दुकानांतून पाणी शिरल्यामुळें मालांचा नाश होऊन गेला. कैक रस्ते बंद होऊन गेले. घरांतील सामान सुमान व माणसें काढण्यास ठिकठिकाणीं शहरांतून ताफे फिरूं लागले. खिचडीझांप्याच्या आंत नानासाहेब पोवाराच्या वाड्यापर्यंत पाणी येऊन ठेपलें. खिचडी वांटण्याचें काम दोन तीन दिवस बंद ठेवावें लागलें. सर्वांस असें वाटूं लागलें होतें कीं, आतां आणखी थोडे तास असाच पाऊस पडेल तर बडोदें शहरास मोठा धक्का पोंचणार आहे. तात्पर्य, या जलप्रलयापासून सर्वांस दोन दिवस मोठी भीति पडून गेली होती.

सुरसागर तलावांत तर पाणी मावेना अशी स्थिति झाली. हा तलाव ह्मणजे एक लहानसें सुंदर सरोवरच आहे असें म्हटलें असतां शोभणारें आहे. त्यांत

मल्हारराव महाराजांनीं नुकतीच या तलावाची दुरुस्ती केली होती. यामुळें तर येथें फारच शोभा आली होती. अहाहा! सुरसागर ज्या वेळीं पाण्यानें कांठोकांठ भरून जातो, त्या वेळीं त्याला खरोखर पुष्कर तीर्थाचीच उपमा हुबेहुब शोभा देते. चहूंकडून वस्ती व मोठमोठ्या हवेल्या आणि मध्यभागीं तो सुंदर भव्य तलाव पाहून पाहणाराचें मन अगदीं प्रसन्न होऊन जातें, आणि त्या वेळीं त्याला पुष्कर तीर्थाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. कारण पुष्कर तीर्थाचे सभोंवतीं जशीं उंच उंच देवालयांचीं शिखरें सोनेरी कळसांनीं विराजमान दिसत असतात, त्याचप्रमाणें बडोदें येथील सुरसागरावरही सभोंवतालच्या उंच हवेल्या पाहून पाहणारास तोच भास होतो. पुष्कर तीर्थास जसे चहुंबाजूंनीं फरसबंदी घाट बांधले आहेत, त्याप्रमाणें सुरसागरासही चहूंकडून माणसांच्या व जनावरांच्या सोईकरितां घाट बांधिले आहेत.

असो. या तळ्यांत उंची पोळ झांप्यानें एक जबरदस्त पाण्याचा ओढा वाहत येऊन या प्रसंगीं मिळून गेला होता. आणि त्यांत पुष्कळ मोठमोठालीं झाडें, लांकडें, व आणखी कांहीं निरनिराळ्या प्रकारचें सामान वाहत आलें होतें. पाल्या, पाळणें, भांडीं, इतकेंच नव्हे; गाई, ह्मशी, बैल व गाढवें हीं देखील वाहत आलीं होतीं. असो. उत्तररात्रीं ४ तासपर्यंत अगदीं मुसळधारेसारखा पाऊस पडून व वर सांगितल्याप्रमाणें सर्वत्र जलप्रलय करून पहाटे ६ वाजतां तो बंद होऊन गेला. तेव्हां सर्व लोक घरांच्या बाहेर प-

डून पाणी पाहण्यास निघाले. कोणी खिचडीझाप्याकडे गेले, कोणी बेचरराजीकडे पळत सुटले, कोणी घड्याळी पोळाकडे आणि सिद्ध नाथाकडे गेले. शिवाय हजारों लोक सुरसागरावर बाप्पासाहेब पागेदारांच्या व काठेवाड दिवाणजीचे वाड्याजवळ जमले! जिकडे तिकडे शहरांत त्या दिवशीं पाण्याच्याच गोष्टी!! पाणी पाहण्याशिवाय त्या सकाळीं दुसरें कांहीं काम कोणास नव्हतें. तोंडानें पाण्याच्या गोष्टी, आणि डोळ्यांनीं पाणी पाहण्याचें काम!! असें त्या दिवशीं दिवसभर चाललें होतें.

मल्हारावमहाराजांची कन्या कमाबाईसाहेब यांचा मोठा ४ मजली नवीन वाडा सुरसागरावरच असल्यामुळें त्या आपल्या परिवारासहित हा जलप्रळयाचा देखावा आपल्या खिडकींतूनच पहात होत्या. याप्रमाणें जिकडे तिकडे या वेळीं गडबड उडून राहिली होती. खरोखर आणखी एक दिवस जर पाऊस पडण्याचें काम असेंच चालू राहिलें असतें, तर लहरीपूर दरवाजा बाहेरचा शहराचा भाग ह्मणजे सुमारें अर्धें बडोदें शहर त्या दिवशीं वाहून गेलें असतें. परंतु मोठी खैर झाली कीं, पाऊस लवकरच बंद होऊन गेला! असो, प्रातःकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास उंची पोळझाप्याकडून जो पाण्याचा प्रवाह मोठ्या ओढ्यासारखा वाहत येऊन सुरसागरांत अर्धा प्रवेश करीत होता, व अर्धा पुढें वाहत जात होता, त्या ओढ्यांतून २ मुलें वाहत वाहत दांडेबाजारांतून सुरसागराकडे येऊं लागलीं होतीं. त्यांत एक मुलगा होता, व एक मुलगी

होती. मुलगा सुमारें सोळा वर्षांचे वयाचा होता, आणि एक मुलगी दहा वर्षांची होती. मुलाच्या हातीं एक फुलझांडाचा बराच मोठा ढाळा ( फांदी ) आश्रयास मिळाला होता; आणि मुलीचे हातीं एक शतावलीनामक वेलीची झुपकी ( कुंज ) लागली होती. या दोन आश्रयानी हीं दोन्हीहीं मुलें अद्यापपर्यंत ईश्वरकृपेनें जीवंत राहिलीं होतीं. सुमारें मैल दीड मैल पर्यंत ही वाहत आलीं होतीं. वस्तींत शिरल्यावर मग पाण्याला ओढा कमी होता ह्मणून तो मुलगा पाण्यांत पाय टेकून चालत येत होता, व मुलीस आपल्या आश्रयानें संभाळून आणित होता. दैवगति अनुकूल ह्मणून बिचारे विश्वामित्री नदीच्या थोरल्या ओघांत सांपडले नाहींत. दैवानें थोरला ओघ चुकून हे धाकट्या ओघांतून वाहत आल्यामुळें सिद्धनाथाच्या आलीकडील भागानें वस्तींत येऊन अनायासेंच पोंचले. भीमनाथाच्या पाठीमागें बऱ्याच अंतरावर विश्वामित्रीचा एक मोठा लोंढा एका मोठ्या ओघळींत शिरून तीच ओघळमोठ्या ओढ्याच्या रूपानें आणखी कांहीं ओघळी आपल्या पोटांत घेऊन सिद्धनाथाच्या आलीकडून दांडेबाजारांत वाहत येत होती. त्याच ओघळींत ऐनपर्जन्याचे जोरांत हीं मुलें सांपडून गेलीं होतीं. तीं वाहत वाहत व मधून मधून ठाव लागेल तेथें चालत चालत येऊन एतींच सुरसागरावर येऊन पोंचलीं.

सुरसागराजवळ एका गोघाटाच्या द्वारें हा ओढा सुरसागरांत जाऊन मिळत होता; तेथें पाण्याला ओढ फार असल्यामुळें, मुलांचे पाय पुनः जमिनीवरून सुटले.

आणि तीं दोघेंही सुरसागरांत वाहत जाऊं लागलीं. अगदीं सुरसागराच्या मुखाजवळ जाऊन पोंचलीं. आतां आंत जाऊन शिरणार, इतक्यांत एक कनवाळू मनुष्य तेथें जवळच आपल्या दारांत उभा होता, तो धांवत धांवत जाऊन पाण्यांत शिरला; आणि त्याणें मोठ्या धैर्यानें व युक्तीनें त्या दोघांही मुलांस धरून व उचलून पाण्याबाहेर काढिलें! दोघेंही अगदीं घाबरलीं होतीं, व पाण्यानें सारी रात्र भिजलीं असल्यामुळें लटलटा थरथर कांपूं लागलीं होतीं. त्यांची ती स्थिति पाहून त्या दयावंत मनुष्याच्या पोटांत अगदीं कळवळा उत्पन्न झाला. ह्मणून त्यानें त्यांला आपल्या घरांत नेऊन त्याच वेळीं आवश्य तितकें साह्य केलें.

दोन चार दिवसांनीं मग तीं मुलें चांगलीं हुषार झालीं. तेव्हां त्यांणीं आपली सर्व हकीगत ह्मणजे आपण कोणाचे कोण, कोठील राहणार, नांव गांव काय वगैरे चटसारें सांगून दिलें. तेव्हां ज्या मनुष्यानें त्यांस पाण्याच्या प्रवाहांतून काढून प्राणदान दिलें होतें, त्या मनुष्याची व त्याच्या घरांतील सर्व मनुष्यांची भक्ति त्यांच्यावर बसून गेली. त्यांच्याविषयीं सर्वांस माया उत्पन्न झाली. हीं दोन मुलें आपल्या कुटुंबांतीलच आहेत असें त्यांस वाटलें. तशांत त्या कुटुंबांतीलच एका तरुण बाईस पुढें मुलेंबाळें होण्याची आशा नव्हती. ह्मणजे ती बालविधवा असल्यामुळें, व त्यांच्या जातींत पाट पुनर्विवाह करण्याची चाल नसल्यामुळें, ती बाई मरणकाळपर्यंत तशीच आपत्यावांचूनच रहाणारी अशी होती. त्या बाईची माया तर

सर्वांहून अधिक या दोन मुलांवर बसली. मग घरच्या मालकाच्या ध्यानांत हा प्रकार येऊन गेल्यामुळें त्याणेंही तिला सांगितलें कीं, अतःपर हीं दोन मुलें तुझींच आहेत. या पुढें तूं यांचें पालण पोषण पोटच्या मुलाप्रमाणें करावें. आणि तींही तुला मातोश्री असें समजून तुझ्या हुकमांत रहात जातील. ईश्वरानें तुला घरबसल्या या उत्तम आपत्यांचा लाभ करून दिला आहे. याप्रमाणें पुष्कळ प्रकारें सांगून त्या दोन्हीं मुलांस हातीं धरून त्यांचा हात तिच्या हातांत घालून दिला ! तेव्हां त्या बाईला पराकाष्ठेचा आनंद होऊन गेला; आणि घरांतील सर्व मनुष्यांसही त्याच प्रमाणें आनंद झाला:—

हीं वाहून आलेलीं मुलें फार सद्गुणी होतीं. त्यांणीं दोन चार दिवसांत सर्व मनुष्यांशीं चांगल्या रीतीनें वागून व गोड गोड भाषणें करून सर्वांला अगदीं आपलेसें करून घेतलें. आपण कोणी कुटुंबांतलिच आहों असें करून सोडलें. आणि जिच्या हातांत हात घालून दिला होता, तिला आई असें ह्मणूं लागलें. तिच्या बहिणीस मावशी आणि मुख्य घरच्या मालकांस मामा असें ह्मणूं लागून सर्वांची मायाममता आपल्यावर बसवून घेतली ! घरच्या मनुष्यांनीं त्यांचीं नांवेंही नवीनच ठेवून दिलीं होतीं. तीं अशीं कीं, मुलाचें नांव भ्रमर आणि मुलीचें नांव शतावली असें ठेविलें होतें. कारण इतकें कीं, तो पाण्यांत वाहत आला तेव्हां एका पुष्पाच्या गुच्छावर बसून आला होता ह्मणून त्याचें नांव भ्रमर असें ठेविलें. व मुलगी

वेलीच्या ( शतावली नामक वेली ) कुंजावर बसून आली होती ह्मणून तिचें नांव शतावली असें ठेवलें. हीं नावें त्या दोघांच्या कृतीला, स्वभावाला, आणि वेळेच्या प्रसंगाला अगदीं अनुसरून होतीं. असो. असल्या प्रकारचीं नांवें ठेविलीं यावरून या घरांतील माणसें सर्व मोठीं रसिक होतीं इतकें सिद्ध होतें.

येथपर्यंत सर्व यथास्थित झालें, परंतु या घरांत आल्यापासून या दोन मुलांचें खाण्यापिण्याचे फार हाल होऊं लागले. त्यांजला एक वेळ देखील पोटभर खाण्यास मिळण्याची मारामार पडूं लागली. अर्धपोटीं खाणें; तेंही दिवसांतून एक वेळ मिळावें तर एक वेळ नाहीं ! ! अशी स्थिति पाहून भ्रमरास मोठें वाईट वाटूं लागलें, आणि आश्चर्यही वाटलें कीं, हीं मनुष्यें इतकीं सज्जन आणि थोर घराण्यांतील असतां यांचे इतके असे हे खाण्यापिण्याचे हाल काय ह्मणून होत आहेत ? त्याला स्वतःविषयीं इतकें वाईट वाटेना, परंतु धाकट्या बहिणीविषयीं ह्मणजे शतावलीविषयीं फार वाईट वाटे ! ! कारण त्याचा अगदीं जिवकी प्राण आपल्या बहिणीवर असे. त्यांत आईबाप मरून गेल्यापासून तर तिला याणेंच आपल्या शहाणपणानें संभाळलें होतें, त्या त्याच्या जिवप्राण धाकट्या बहिणीचे खाण्यापिण्याचे हाल पाहून त्याला कसें नाहीं वाईट वाटणार बरें ? त्याच प्रमाणें ज्यांजला तो घरांत आई ह्मणून हांक मारीत असे, व मामा, मावशी, आजी, इत्यादि नावांनीं हांका मारीत असे, त्यांचे तरी हाल

त्याच्यानें कसे पाहवले जाणार ? याबद्दल तो आपल्या ठिकाणीं आठ चार दिवस विचार करीत होता; परंतु त्याला या घराण्याची अशी दुःखद स्थिति कां असावी या विषयींचें कारण बरोबर कांहीं लक्षांत येईना ! शेवटीं त्याच्यानें राहवेना, तेव्हां त्याणें एक दिवस संधी साधून आपल्या आईचे जाऊन पाय धरिले, आणि आपली शपत घालून सर्व हकीगत विचारली. तेव्हां तिणें सर्व वर्तमान सांगून दारांत पाहरा बसला असल्याचेंही सांगितलें आणि शेवटीं हेंही सांगितलें कीं, " आमच्या आयुष्याचे आणखी कांहीं दिवस आह्मांस पाहणें होतें, व बाळा तुझाही लाभ आह्मास प्राप्त व्हावयाचा होता, ह्मणून आम्ही अजून जीवंत राहिलों आहों ! नाहीं तर आठ चार दिवसांपूर्वींच सर्व आम्ही विस्तवाच्या खाईंत मरून जाणार होतों ! ! फार तर काय, सर्व आम्ही मानावर माना टाकून या घरास अग्नि लावूनही बसलों होतों, परंतु दैवगति मोठी विचित्र, आमचें भोक्तृत्व संपलें नसल्यामुळें आम्ही अजून जिवंत राहिलों आहों ! ! त्या दिवशीं आणखी एक तासपर्यंत जर मेघवृष्टि होण्यास आरंभ होत नव्हता तर, आम्ही सर्व सुखानें निजधामास पोंचलों असतों, परंतु तसें होणार कोठून ? आम्ही घरास बत्ती लावून दिली, घर थोडें पेटतही गेलें, आम्ही सर्व बसलों होतों, त्या ठिकाणीं अग्नीचा भडका येऊन पोंचणार होता, इतक्यांत एकाएकी आकाशांतून एक सारखी मुसळासारखी पर्जन्याची धार सुरू होऊन आमचे सर्व मृत्युमनोरथ अगदीं

निष्फळ होऊन गेले! उजेडल्यावर तर तुह्मी वाहत आल्यामुळें तुमची भेट झाली!!"

प्रिय वाचकहो, या मायलेंकरांच्या भाषणावरून तुमच्या पूर्ण ध्यानांत येऊन गेलें असेल कीं, आपला धर्माजीराव दाभाडा सर्व मंडळीसहित ईश्वरकृपेनें अद्याप जीवंत असून त्यानेंच पाण्यांत वाहत आलेलीं मुलें जीवंत बाहेर काढलीं. व त्यांचें संरक्षण करून आपल्या मेव्हणीच्या ओटींत घातलीं! तींच मुलें हीं भ्रमर आणखी शतावली, त्यांच्यावर धर्माजीरावासहित सर्व मंडळीचें प्रेम विलक्षण रीतीनें बसलें, आणि त्या मुलांनींही यांला सर्व प्रकारें आपलींच असें मानिलें. त्यांतही आणखी विशेष गोष्ट ही झाली कीं, धर्माजी-रावाची जी उपवर मुलगी नीति तिचें प्रेम भ्रमरावर जडून गेलें. तसेंच त्याचेंही तिजवर मन बसलें. इकडे धर्माजीरावाचा मुलगा जो सद्गुण व भ्रमराची बहीण जी शतावली या दोघांचें बाळमित्रत्व जमलें!

असो; मागें सांगितल्याप्रमाणें भ्रमरानें आपल्या आईच्या तोंडानें सर्व वर्तमान ऐकल्यावर मग तो एक-दम उठून आपल्या मामाजवळ ह्मणजे धर्माजीरावा-जवळ गेला, आणि आपल्या कंबरेचा एक कसा आणि एक गांठोडी ते सर्व धर्माजीरावाजवळ देऊन सांगितलें कीं, "अतःपर तुह्मी जसे आह्मां दोघांचे रक्षण-कर्ते मालक झाले आहां, त्याच प्रमाणें या द्रव्याचेंही मालक तुह्मीच आहां, प्रस्तुतच्या विपत्ति काळांत याचा व्यय यथायोग्य होणार आहे, याकरितां मनांत कांहींइतकाही संकोच न आणतां हें सर्व आपले

जवळ ठेवून घेऊन त्यांतून चालेल तितके दिवस कुटुंबांचें व आमचें संरक्षण करावें! पुढें काय होईल तें पाहून घेतां येईल! ईश्वर सदोदित ह्मणजे आपले दिवस असेच सारखे ठेवील, असा अर्थ नाहीं. आपण लवकरच या संकटांतून मुक्त होऊं आपण आह्मां लेकरांचें कल्याण यथायोग्य कराल अशी आम्हास पूर्ण आशा आहे. ज्याप्रमाणें तुह्मास नीति आणखी सद्गुण आपलीं वाटतात, त्याप्रमाणेंच तुह्मीं आह्मांसही आपले मानलें पाहिजे, एवढीच माझी शेवटची विनंति आहे" याप्रमाणें बोलून आपल्या जवळचें द्रव्य भ्रमरानें धर्माजीरावाजवळ दिलें, तेव्हां दुसरे दिवसापासून धर्माजीरावाचे घरांत खाण्यापिण्याचा बंदोबस्त यथास्थित राहूं लागला हें निराळें सांगणें नको.

सज्जन व प्रिय वाचकहो, पहा! ईश्वराची लिला किती अगाध (दुर्घट) आहे ती! धर्माजीरावास व त्याच्या कुटुंबांस वांचविण्याकरितां ईश्वरानें त्यीं दिवशीं रात्रीं किती पर्जन्यवृष्टि केली? आणि खाण्यापिण्याची व्यवस्था होण्याकरितां द्रव्य व दोन मुलें कोणीकडून पाठवून दिलीं? काय चमत्कार आहे हा! यावरून सज्जन मनुष्यांचा वाली केवळ परमेश्वर आहे असा सिद्धांत नाहीं का ठरला जात? सारे बडोद्याचे दरबार धर्माजीरावावर फिरून गेले होते तरी ईश्वर फिरला नव्हता हें उघड दिसून येत आहे. असो, आतां हीं वाहत आलेलीं मुलें कोणाची कोण होतीं, बडोद्यास कशीं आलीं, आणि पाण्यांत कशीं सांपडलीं; इतका हा वृत्तांत समजण्याविषयीं वाचकांची उत्कंठा

असेल, ती परिपूर्ण करून हा दुसरा भाग येथें आपण समाप्त करून टाकावा हें चांगलें दिसतें.

भ्रमर आणि शतावली हीं दोन मुलें अगदीं अस्सल मराठी कुळांतील होतीं. त्यांचें आडनांव ( यादव ) जाधव असें होतें. हे दवलताबादेजवळच्या एका खेडेगांवचे रहाणारे असून पूर्वी यांचें घराणें प्रसिद्ध दवलताबादच्या राजघराण्यांत मोडत होतें तें त्यांचे ऐश्वर्य हळूहळू नष्ट होऊन आलीकडे तर ते अगदींच गरीब स्थितींत येऊन पोंचले होते, थोड्याशा इनामांत भावाबंदाच्या घरासहित नांदायचें, ह्मणजे निर्वाह होण्यास फारच आडचण पडूं लागली, तशांतही सरकारच्या कायदेकानूच्या संबंधानें त्यांना वारंवार फार ताप पोंचूं लागला, त्याच प्रमाणें पीक पाण्याचीही दिवसेंदिवस अधिकच आपत्ति पडूं लागली, अशी या घराण्याची मोठी तारंबळ उडून गेली होती, अशा स्थितींत कशी तरी गुजराण चालली असतां इतक्यांत एका वर्षाचे आंतच भ्रमराच्या वडीलमातोश्रींनीं राम ह्मणून सोडिला ! ! मग काय विचारावयाचें आहे ? बिचाऱ्या भ्रमराचें वय पंधराच वर्षांचें सुमारें असतां सर्व खटला त्याच्याच शिरावर येऊन पडला ! त्याणें आपल्या धाकट्या बहिणीस आईबापांच्या पश्चात् फार जीव लावून संभाळलें, गावांत भावाबंदांची पुष्कळ घरें होतीं खरीं, परंतु तीं भ्रमराच्या घराचा द्वेष करीत असल्यामुळें भ्रमर कधीं त्यांजकडे शरण गेला नाहीं. पुढें त्याणें असें ऐकिलें कीं, सध्यां बडोदें येथें श्रीमंत मल्हारराव महाराज यांच्या लग्नाची तयारी

चालू आहे. त्यांजकडून देशोदेशीं आणि गांवोगांवीं सुंदर सुंदर मुलींचे प्रस्तुत शोध चालू झाले आहेत, अशा वेळीं आपण आपल्या बहिणीस घेऊन जर बडोद्यास गेलों तर कांहीं तरी फायदा होईल ! कदाचित् माझी बहीण मल्हाररावास पसंतही पडेल, आणि ईश्वरकृपेनें योग आल्यास हा आपला सर्व घाट जुळूनही जाईल ! या करितां खटपट करून दैवाची परीक्षा पहावी. असा विचार करून भ्रमरानें गुपचूपपणें बडोद्यास जाण्याची तयारी केली, आईचे कांहीं दागिने होते, ते मोडून सुमारें पांचशें रुपये रोख जवळ कसा बांधून घेतले, आणि कांहीं दागीनें होते ते न मोडतां तशीच गांठोडी कंबरेस बांधून घेतली, आणि बहिणीस बरोबर घेऊन तो निघाला.प्रथम अहमदनगरास येऊन तेथून आगगाडींत बसला व मुंबईस येऊन पोंचला. मग मुंबईस एक दिवस राहून तेथून त्याणें एकदम बडोद्याचीं तिकिटें काढलीं, परंतु तीं सबंध दोन काढावयाचीं तीं न काढतां दीडच काढलें, त्यामुळें पुढें फजिता झाला. तो असा कीं, बडोद्याचे आलीकडे पांच चार कोसांवर पूर्वीचें एक जुनें स्टेशन होतें. तेथें या दोघा बहीणभावंडांस उतरून पडावें लागलें! कारण इतकेंच कीं, बहिणीचे जवळ वें तिकीट होतें ह्मणून ! !

भ्रमरानें स्टेशनमास्तरास व गार्डास समजून सांगितलें कीं, आह्मीं अर्धें तिकीट ग्रांड स्टेशनावर मुंबई येथें घेतलें, तेव्हां ही मुलगी तिकिटें देणारास दाखविली होती. तेथें त्यांणीं तर को कांहीं हरकत

घेतली नाहीं, आणि आतां आपण हरकत घेतां हें कसें ? इतक्यावर तुमची मर्जी असल्यास येथपर्यंतचे तिचे अर्धें आणखी पैसे देतों ! या प्रमाणें सागितलें तरी त्या पिसाट झालेल्या गार्डास तें आवडलें नाहीं, आणि त्यानें याला खालीं उतरून दुसरें तिकीट घेण्याचे खटपटींत पाडलें. इतक्यांत गाडीची वेळ भरून ती पुढें बडोद्यांस चालती झाली ! ! मग निरुपायामुळें भ्रमर आपल्या बहिणीसहित सूर्योदय होईपर्यंत घटकाभर स्टेशनावरच थांबला. शोधाअंतीं त्याला समजलें कीं, आतां संध्याकाळपर्यंत येथून पुढें जाण्यास गाडी मिळणार नाहीं, तेव्हां भ्रमरांस आगगाडींत बसण्यासंबंधानें गार्डाच्या बोलाचालीचा राग आला होता, म्हणून त्याणें आतां निश्चय केला कीं, पुनः आगगाडींत म्हणून बसावयाचें नाहीं ! ! त्याणें शेवटीं तेथून पायींच बडोद्यापर्यंत जाण्याचा निश्चय केला, कारण तेथें एखादी बैलाची गाडीही मिळेना आणि घोडेही मिळेना ! मग तो आपल्या बहिणीस हातीं धरून तसाच पायीं पायीं बडोद्याच्या रस्त्यास लागला. बडोदें तेथून सुमारें चार पांच कोस होतें, हें मागें सांगितलेंच आहे. हळूहळू बसत उठत चालण्यास ही मजल त्यांजला संध्याकाळपर्यंत पुरली. त्यांत ती रेताड जमीन ! एक पाय गुडघ्याइतका धुळींत घालावा, आणि दुसरा काढावा, अशी त्या रानांतील वाट ! सुपारी फोडण्यास देखील धोंडा मिळावयाचा नाहीं ! ! चहूंकडे सारखें मैदान; कोठें मोठमोठ्या चखळी व दाट झाडी ! अशा प्रकारच्या अरण्यांतून

जाण्यास बिचाऱ्या या दोन सुकुमार मुलांस पांच कोशांत संध्याकाळ झाली याचें काय आश्चर्य आहे ?

शेवटीं बडोदें सुमारें दीड मैल राहिलें, तोंच सूर्य अस्तास जाण्याचा सुमार येऊन ठेपला. पश्चिमेकडे लाल भडक आकाश होऊन गेलें. आतां पाव घटकेनें आंधार पडेल असें वाटूं लागलें. पक्ष्यांचा किलकिलाट होऊन गेला होता. शेतकरी लोक आपल्या जनावरांसहित लगबगीनें घरांकडे चालले होते. याप्रमाणें संध्यारागाची सर्व तयारी होऊन राहिली होती. या जागेवरून, गर्द अंबराईत व झाडींत गुंडाळून गेलेलें बडोदें शहर फारच नामी दिसूं लागलें होतें. वरच्या बाजूस उजव्या हाताकडे मकरपुऱ्याच्या राजवाड्याचा कांहीं भाग दृष्टिगोचर होऊं लागला होता, आणि शहरांतील मांडवीची इमारत आपलें डोकें वर करून आपल्या वरील मोठ्या घड्याळांत किती वाजले हें तेथूनच दाखवून देत होती, त्याचप्रमाणें तिच्या शेजारींच नजरबागेंतील इमारत मी मांडवीपेक्षांही मोठी आहे म्हणून डोकडोकावून प्रवाशी लोकांस कळवून देत होती. अहाहा ! या जागेवरून ह्मणजे भ्रमर आणि शतावली जेथें हळूहळू चालून बडोद्याकडे येत होती, त्या जागेवरून बडोद्याची शोभा मोठी अप्रतिम दिसून येत होती; तिचें वर्णन किती तरी करावें ? मधून मधून कितीएक देवळांचे सोनेरी कळस चमकून राहिले होते. तशांत त्यांवरून पश्चिमेचीं सूर्यकिरणें पसरून गेलीं असल्यामुळें फारच शोभा आली होती, शहरांतील हजारों हवेल्या चित्रविचित्र रंगानें शोभिवंत

दिसत होत्या, त्याचप्रमाणें शहरांत ठिकठिकाणीं नगारखाने झडून राहिले होते. त्यांच्या सनयांचा मधुर आवाज संध्याकाळच्या रागांतून येथपर्यंत ऐकूं येत होता, त्यामुळें मनास फार आनंद होत असे.

अशा त्या रमणीय बडोद्याचा सुंदर अस्तमानाच्या वेळेचा आश्चर्ययुक्त देखावा पाहून कोणत्या पांथस्थास बरें आनंद व विश्रांति वाटणार नाहीं? आमचा हा छोटा प्रवासी आपल्या बहिणीस हातीं धरून हळूहळू बडोद्याकडे व बडोद्याची शोभा पाहत पाहत चालला होता. त्याला बडोद्यांत केव्हां शिरेन अशी मोठी उत्कंठा झाली होती, परंतु बडोदें वरचेवर पुढें पुढें सरकत चाललें आहे असें त्याला वाटूं लागलें; ह्मणजे अगदीं जवळ आलें आहे आतां आपण आंत शिरून जाऊं असें त्याला क्षणोक्षणीं वाटे मात्र; परंतु पुनः तें तितकेंच लांब आहे, असें त्याला कळून आलें ह्मणजे मोठी निराशा होत असे. शतावली इतकी दमून गेली होती, तरी तिला बडोदें पाहावयास मिळणार आहे हा आनंद मनांत असल्यामुळें चालण्याचे श्रम तिला कळून येत नसत! याप्रमाणें त्यांची स्थिति झाली होती, तरी बडोदें कांहीं शेवटीं त्यांच्यानें गांठवलें गेलें नाहीं!! सुमारें मैलभर बडोदें राहिलें होतें, तोंच अंधार पडून गेला. तेव्हां अंधारांत पुढें जावें तर रस्ता माहीत नाहीं. शहरांत तरी मग रात्रीचें जाऊन कोणाचे घरीं उतरावें? आपणास कोण ओळखणार आहे व कोण जागा देणार आहे? इत्यादि संकटें एकामागून एक येऊन भ्रमरापुढें उभी राहिलीं!

तेव्हां त्याची कंबरच बसली. मग शेवटीं त्यानें पुढें जाण्याचा बेत रहित करून तेथें जवळच्याच शेतांत शेतकऱ्याचें एक खोंपट ( झोंपडी ) होती, त्यांत तो आपल्या बहिणीस घेऊन शिरला!!

हें शेत एका लहानशा ओढ्याच्या किनाऱ्यावर होतें. आणि त्यांतील झोंपडी तर अगदीं ओढ्यास लागूनच होती. हा ओढा पुढें वाहत जाऊन विश्वामित्री नदीच्या एका फांट्यास मिळाला होता. आणि मग बराच लांब जाऊन पुनः आणखी त्याचे दोन भाग झाले होते. पैकीं एक भाग सिद्धनाथाजवळून दांडेबाजारांत येऊन, पुढें तसाच लोकवस्तीच्या भागांतून अर्धा सुरसागरांत शिरून अर्धा आणखी पुढें गेला होता. असो. बिचारा भ्रमर आपली बहीण घेऊन रात्रीच्या वेळीं त्या झोंपडींत राहून गेला असतां, मध्यानरात्र उलटून गेल्यावर, त्याला अंमळ डोळा लागला. इतक्यांत एकाएकीं मोठी पर्जन्यवृष्टि सुरू होऊन आतोनात जलप्रळय होऊन गेला! तरी आपली झोंपडी ह्मणजे वाहून जाईल, असें भ्रमरास पहिल्यानें वाटलें नाहीं. आणि झोंपडीबाहेर तरी असल्या पर्जन्यांत आपल्याला दुसरा आश्रय कोठचा मिळणार आहे? असें मनांत आणून त्यानें हातांत असलेला झोंपडीचा निवारा सोडून दिला नाहीं. इतक्यांत त्या ओढ्याला इतकें कांहीं पाणी चढून गेलें कीं, त्यानें भ्रमरासहित ती झोंपडी आपल्या प्रवाहांत आणून सोडली!! मग काय विचारतां? बिचारा भ्रमर आपल्या आवडत्या बहिणीसहित त्या समुद्रासारख्या अपरंपार ओढ्यांत चेंडूसार-

खा वाहत चालला. परंतु या दोघांचा प्रालब्धयोग मोठा चमत्कारिक होता. आणि ईश्वराचे मनांतून या गरिबास मारावयाचें नव्हतें. ह्मणून चमत्कार असा झाला कीं, एका मोठ्या फुलझाडाची फांदी पुष्पगुच्छासहित भ्रमराच्या हातीं लागली! आणि शतावली नामक वेलीचा एक, जाळ्यांमुळ्यांसहित भला मोठा जबरा कुंज शतावलीच्या हातीं लागला! या दोन जिनसांच्या आश्रयानें ईश्वरकृपेनें दोघेही सुरक्षित वाहत जाऊन सुरसागराच्या तोंडावर गो घांटाजवळ धर्माजीराव दाभाड्याचे हातीं लागले.

बिचारे नशिबाचे पुरे ह्मणून वाहत असतां विश्वामित्रीच्या थोरल्या ओघांत सांपडले नाहींत. धाकट्या ओढ्याच्या ओघांत सांपडून गांवांतच वाहत आले! आणि शिवाय त्यांतले त्यांत अशी एक मजा झाली कीं, भ्रमराची कंबर ह्मणून अगदीं सुटली नाहीं. कारण ती सुटली असती तर द्रव्यसंबंधानें त्यांचें मोठें नुकसान झालें असतें! यावरून ईश्वर तारी त्याला दुजे कोण मारी? ही म्हण अक्षरशः खरी होत आहे. असो. आतां पुढील मजकूर काय झाला तो आमच्या प्रिय वाचकांस ठाऊकच आहे. तेव्हां त्यासंबंधानें येथें द्विरुक्ति कशास केली पाहिजे?

# भाग २ रा.

## अस्सल मोंगलाई.

॥ अंधेर नगरीं बेबंद राजा ॥
॥ टके शेर भाजी टके शेर खाजा ॥ १ ॥
" प्राचीन म्हण "

बडोदें शहराची आंतील रचना फार नावांजण्यासारखी आहे. मुंबई, पुणें, कलकत्ता, जयपूर, आणि लंडन अशीं मोठमोठीं शहरें ज्यांनीं पाहिलीं आहेत, त्यांच्या ध्यानांत जरी हें बडोदें शहर फारसें भरणार नाहीं, तरी मुंबई इलाख्यांत हें शहर पहिल्याच प्रतींत गणण्यासारखें आहे यांत संशय नाहीं. लहरीपूर दरवाज्याचे आंत पाय ठेवल्या बरोबर तर आपण जयपूर शहरांतच प्रवेश केला आहे असें सकृत दर्शनीं वाटल्या वांचून राहत नाहीं. येथील रचना खरोखर सोंगटीच्या पटाप्रमाणें आहे. चहूं बाजूंस चार सोंगटीच्या पटाप्रमाणें सडका असून, मध्यें मांडवी नामक एक भव्य व उंच इमारत चार मजली आहे. शेवटच्या मजल्यावर एक मोठें घड्याळ ठेवलें आहे. मुंबई मध्यें ज्याप्रमाणें क्राफर्ड मार्किटावर, कोटांतील व भायखळ्यावरील, मोठ्या ख्रिश्चन देवळावर सार्वजनिक लोकोपयोगाकरितां मोठमोठीं घड्याळें ठेविलीं आहेत; त्याप्रमाणें, किंवा पुण्यांतील बुधवारवाड्यावर विंचूरकरांनीं घड्याळ ठेवलें होतें, त्याप्रमाणें त्यावेळीं मांडवीवरही

एक मोठें घड्याळ सार्वजनिक लोकोपयोगाकरितां बडोदें सरकारांतून ठेवलेलें होतें. रात्रीं सामसूम झाल्यावर या घड्याळाचा आवाज किती वाजलें हें कळविण्यासाठीं बहुधा सर्व शहरांत ऐकूं जात असे. मांडवीच्या इमारतीवर जाण्यास एका अंगानें एक सोपा मार्ग ठेविला आहे, त्यावरून वर गेलें ह्मणजे शहराची शोभा तेथून फारच नामी दिसून येते. आहाहा! येथून जो शहराचा देखावा दिसतो, त्याचें वर्णन किती करावें? चहूं बाजूंच्या प्रशस्त रस्त्यावरून मोठमोठ्या हवेल्या, त्याला चित्रविचित्र नानाप्रकारचे रंग, व शेवटीं चारीही बाजूस चार मोठमोठे दरवाजे; रस्त्याच्या दोहीं बाजूंच्यां हवेल्यांतून व्यापारी लोकांचीं मोठमोठीं दुकानें; त्यांत कांहीं किराण्यांचीं, कांहीं कापडांचीं, कित्येक जवाहिऱ्याचीं व डागिन्यांचीं, तशींच हालवयांचीं, माळ्यांचीं, सुगंध्यांचीं, हुंडीवाल्यांचीं, आणि सराफांचीं, वगैरे शेंकडों दुकानें लागून गेलीं आहेत! ही शोभा व येथील देखेवींची मजा पाहून एखाद्या परक्या प्रवाशास फार आनंद होऊन जातो.

संध्याकाळच्या वेळेस तर येथील देखावा फारच नामी दिसून येत असतो. कसाही दुःखी कष्टी प्राणी असला आणि तो संध्याकाळच्यावेळीं मांडवीजवळ जाऊन क्षणभर उभा राहिला, तर त्याचा सर्व शिणभाग हरून गेल्याशिवाय राहत नाहीं. साधारण शहरांतून देखील अस्तमानची वेळ समाधानकारक असते. मग हें बडोदें शहर तर राजधानीचें होय! येथील शोभेचा थाट किती वर्णन करावा! आह्मीं आतांच

वर्णिलेल्या ठिकाणीं ह्मणजे सरकार वाड्याचे आसपास संध्याकाळच्या वेळेस गावांतील एकूण एक मनुष्य कोणत्या तरी निमित्तानें पण, एकदां तरी येऊन गेल्यावांचून राहावयाचें नाहीं, असें या स्थळाचें स्थळमाहात्म्य आहे ! त्यांत कित्येक श्रीमान् लोक सुंदर बगळयासारख्या शुभ्र जोडलेल्या दोन घोड्यांच्या वर्गींत बसून याच रस्त्यानें लहरीपूर दरवाज्याच्या बाहेर रेलवे स्टेशनाकडे, क्यांपाकडे, चोरदौडीकडे वगैरे जावयाचे; कोणी घोड्यावर, कोणी मेण्यांत, कोणी हत्तिवर वगैरे बसून याच रस्त्यानें याचवेळीं फिरावयास जावयाचे; त्यांच्या स्वारीपुढें शेंकडों शिपाई, पुरभय्ये, मशालजी, काठीवाले, घोडेस्वार, छत्रीवाले, भालदार, चोपदार वगैरे शेंकडों लोक धांवत असावयाचे; या प्रमाणें श्रीमंत लोकांच्या स्वारीचे थाट पाहून नवखेलोक जे यावेळीं येथें बसलेले असावयाचे, त्यानां फार आश्चर्य व मौज वाटते. अशा प्रकारें बड्या लोकांच्या स्वाऱ्या येऊं जाऊं लागल्या ह्मणजे त्यांच्यांत आपसांमध्यें जीं येथें भाषणें होत असतात तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**पाहिला.**—ही आतां गेली ही स्वारी कोणाची ?

**दुसरा.**—ही गेलेली स्वारी दोस्त महंमद साहेबांची.

**तिसरा.**—छत् ! हे गेलेले नबाब साहेब. यांनाच तीं लाख रुपयांची जाहगीर आहे !

**पहिला.**—आणि त्यांच्या मागून ती ब्राह्मणी बडोदें शाई पागोटी घोड्यावर बसून फडकत गेली ती कोणाची ?

दुसरा.--ते खानगींचे कारभारी !

तिसरा.—छत् ! अशी गोष्ट कधीं होणार नाहीं. ते फडकत गेलेले गृहस्थ बाबासाहेब पागेदार !

पहिला.—बरें; मराठी शाई पागोट्याचे, मखमाली जरीच्या कबज्याचे, व मोठ्या बिगवळीचे असें ते गृहस्थ लहरीपूर दरवाज्यावाटें येऊन, सरकार वाड्याकडे गेले ते कोण ?

दुसरा.--ते खानवीलकर !

तिसरा.—तुह्माला या शहराची माहिती नाहीं.

दुसरा.--पण मला काल गोविंदरावांनींच सांगितलें कीं, खानविलकर ते हेच ह्मणून !

तिसरा.—पण हे हरिबा दादा असलें तर काय घाल ?

पहिला.—दोन तोंडांत !

दुसरा.--तसें नव्हे बाबा;मुळींच ते लिंबाळकर आहेत.

पहिला.—असें कसें होईल? लहरीपूर दरवाजावरील सलामीचा बिगूल खानविलकराशिवाय दुसरा कोणास वाजत नसतो ! !

याप्रमाणें येथें रिकामटेकड्या व नवऱ्या लोकांच्या गप्पा चालू असावयाच्या! राजराजेश्वराच्या देवळांत आणि सरकार वाड्या पुढील विठ्ठलमंदिरांत भिक्षुक लोकांची गर्दी जमून, फुगलेल्या पोटावरून हात फिरवीत व तपकिरीची चिमूट ओढीत गांवांतील घरोघरच्या गप्पा चालू असावयाच्या; त्यांत कोणाच्या घरीं आज श्राद्ध झालें, गर्भादान झालें, वास्तुशांति झाली, मंत्रजागर झाला, जाडू कसे काय होते, दक्षणा काय

मिळाली इत्यादि विषय चालूं असावयाचे. आणि कधीं कधीं तर राजकीय व दरबारी गोष्टी देखील चालावयाच्या. त्यांत " विलायतेच्या रूमशामास सातशें बायका असून तो आतां लवकरच काशीयात्रेस जाण्याकरितां इकडे येणार आहे. त्याची सरबाराई नीट ठेवावी ह्मणून, कायशी मुंबईच्या गवरनरास तार आली आहें लाट साहेबाकडून! तो मुंबईस आला, ह्मणजे आमच्या यजमान साहेबास देखील कदाचित् जावे लागणार आहे मुंबईपर्यंत. आणि यजमान गेले तर आह्मासही जावें लागणार आहे त्यांच्या बरोबर! आणि मग तसे झालें तर अर्थातच आह्माला या खेपेस अनायासें टांकसाळ, राणीचाबाग, कुलाब्याची दांडी, आणि तो मोठ्ठा टोन होल दृष्टीस पडणार आहे. " याप्रमाणें शिळोप्याच्या गप्पा चालूं असावयाच्या! विठ्ठलमंदिराच्या बाहेरच्या आंगीं राजपथावर सुगंध्यांचीं दुकानें आहेत, तेथें चैनी व गुलहौसी लोक यावेळीं उत्तम तरतऱ्हेचा पोशाक करून राजवाड्याजवळची मजा पाहत, एकीकडे तेथें सुरू असलेल्या संध्याकाळच्या रागांतील नगारखान्यांचे मधुर सूर व अलाप ऐकत असवयाचे! अहाहा! काय या वेळचीं येथील बहार सांगावी? उत्तम सुवासीक पुष्पांचा आणि उत्तम आगरादि अत्तरांचा येथें सर्वत्र सुवास पसरलेला असतो, ह्मणून विलासी लोकांचें मन येथें अगदीं रमून गेलेलें असतें! व त्यांच्या घ्राणेंद्रियांची तृप्ति येथें सहज होऊन जाते. राजपथावर येथें सर्वत्र पाणी शिंपून गार केलेलें असतें, तसेंच शृंगारलेले हत्ती

झुलत उभे राहिलेले असतात. शेंकडों घोडेस्वार चाकरी बजावण्याकरितां उभे राहिलेले अतसात ! आणि राज-दर्शनाकरितां बड्या लोकांच्या व कामदार लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात येत असतात !

असो. याप्रमाणें येथील अस्तमानचा थाट मोठा वर्णनीय असतो. अशावेळीं सूरसागराच्या तिरावर एका जुन्या व पडक्या घरांत आमच्या धर्माजीराव दाभाड्यांचें कुटुंब, असलेल्या दुःखस्थितींतच सुखाची कल्पना मानून आनंदानें गोष्टी करीत बसले होते. दरवाजावर सरकारी पाहरा होतांच. तथापि पहिल्या पेक्षां आलीकडे या पाहऱ्यांत अमळ ढिलाई झाली होती. नजर-कैदेंत असलेलें हें कुटुंब खरोखरच आडचणींत व दुःखांत होतें तरी त्यांतील बहुतेक मनुष्यें फार चांगलीं नीतिवंत, विचारी आणि गुणी असल्यामुळें त्यांचे घरांत मूर्तिमंत आनंद नांदत होता, आणि त्या आनंदाच्या प्रभावामुळें आपणांवर संकट किंवा दुःखाचा प्रसंग आहे असें कोणास वाटत नसे. या घरांत जीं चार मुलें होतीं, तीं तर केवळ बृहस्पती सारखी बुद्धीवान् व मदन रतीप्रमाणें रूपवान् आणि सर्वगुण संपन्न अशीं होतीं. त्यांचे परस्पर एकमेकांवर अतोनात प्रेम, जुळलें होतें. एकमेकांस अगदीं जीवकी-प्राण तीं झालीं होतीं. धर्माजीरावाची उपवर मुलगी जी नीति तिचें प्रेम भ्रमरावर कांहीं विलक्षण रितीचें बसून गेलें होतें. त्याचें रूप, त्याचे गुण, त्याचा स्वभाव, त्याची वागणूक, त्याची बोलण्या चालण्याची ढब-इत्यादि प्रकार नीतिबाईस मनापासून आवडत असत.

त्याचप्रमाणें भ्रमराची प्रीतिही नीतीवर अंतःकरणापासून बसून गेली होती. तिचें रूप, तिचे गुण व तिचा स्वभाव त्याला मनापासून आवडत असे. सारांश नीति ह्मणजे जीवकींप्राण त्याला वाटत असें. ज्याप्रमाणें नीति आणि भ्रमराचें प्रेम परस्परांविषयीं जमून गेलें होतें, त्याप्रमाणेंच सद्गुण व शतावलीचेंही मन एकरूप होऊन गेलें होतें. शतावली जरी लहान होती, तरी तिची बुद्धि, स्वभाव, शाहणपण आणि वागणूक एखाद्या पोक्त मोठ्या बायकोप्रमाणें होती. तिच्या मनांत स्वतःच्या भावी संसाराविषयीं जेव्हां विचार येत तेव्हां तिला असें वाटे कीं, सद्गुणाबरोबरच माझें लग्न होईल तर बरें होईल, नाहींपेक्षां मग मी लग्नच करून घेणार नाहीं; सद्गुणानें तर मनांत पूर्ण निश्चय केला होता कीं, ईश्वर कृपेनें जर हे आमचे दुःखाचे दिवस संपून सुखाचे दिवस कधीं आह्मास उगवले, तर मी खरोखरच या शतावलीबरोबरच लग्न करीन. बायको करीन तर शतावली करीन, नाहीं तर लग्नच करणार नाहीं, असो. सारांश इतकाच कीं, सद्गुण शतावली व नीति भ्रमर या चवघांची अगदीं प्रेमरूप गट्टी जमून गेली होती. त्यांच्या मनांत भावी सुखाविषयीं नाना प्रकारचे तरंग येत असत. असल्या प्रकारच्या या अंतस्थ प्रेमरूप स्थितीमुळें, त्याला बाहेरचीं दुःखें ह्मणजे खाण्यापिण्याचे हाल, कपड्यालत्याची उणीव, वगैरे हीं कांहींच मनांत येत नसत. एखादे वेळीं भ्रमर उदासीन आहे, असें नीतीच्या ध्यानांत आलें असतां तिनें लागलीच त्याची हर प्रय-

त्यानें एकांतीं भेट घ्यावी आणि अत्यंत प्रेमानें आपले सुकुमार हात त्याच्या गळ्यांत घालून त्याला नानाप्रकारच्या मधुर भाषणानें विनवून उदासीनतेचें कारण विचारावें ! अहाहा ! अशा वेळीं भ्रमरास जो आनंद व्हावा, त्याची तर किंमतच नाहीं. साऱ्या दुनियेचें मोल या त्यांच्या आनंदास पुरें पडणारें नसे. आणि त्याची आलेली उदासी तर कोणीकडे निघून जात असे याचा पत्ताच नाहीं ! ! त्यानें नीतीस घट्ट प्रेमालिंगन देऊन सांगावें कीं, सुंदरी, तुजसारखी सुशिक्षित मला दुःखविभागीण मिळाल्यावर मग मला उदासीनता ती कशाची ? तूं मजविषयीं कांहीं काळजी करीत जाऊं नकोस. असें ह्मणून त्याणें तिला लौकर घरांतील कार्यास कोणी पाहिलें नाहीं, तोंच लावून देत असावें ! याचप्रमाणें इकडे शतावलीचे जिवास कधीं अमळसें बरें वाईट असलें तर, सद्गुणाचा जीव अगदीं वर खालीं होऊन जात असे.

अशा प्रकारें हें त्यांचें प्रस्तुतचें चोरटें आणि भावी सौख्यप्रद प्रेम, घरांतील सर्व मनुष्यांच्या पूर्णपणें ध्यानीं येऊन गेलें होतें. व त्यावरून सुमतीबाईचा आणि तिच्या बहिणीचा ह्मणजे ताराबाईचा आपसांत निश्चयही ठरून गेला होता कीं, आपण दोघी ईश्वरानें कृपा केल्यास विहिणी विहिणी होऊं ! हा विचार धर्माजीरावाच्या कानावरही जाऊन त्यांचीही संमति या गोष्टीस पूर्णपणें अनुकूळ झाली होती. असो. या प्रकारें तें कुटुंब खरोखर दुःखस्थितींत असतां, आपल्या अंगच्या चांगुलपणानें कसें तरी आनंद मानून दिवस

कंठित होतें. इतक्यांत त्यांच्या दाराशीं एके दिवशीं संध्याकाळीं एक बडोदेंशाई ब्राह्मणी पागोट्याचा गृहस्थ दोन शिपाई बरोबर घेऊन येऊन पोंचला, आणि एकदम घरांत शिरला!! त्यास पाहून घरांतलीं बायकामनुष्यें दिवाणखान्यांतून आंतील घरांत गेलीं. आणि धर्माजीराव, भ्रमर, सद्गुण व ह्मातारा मामासाहेब इतकेजण तेथेंच बसलेले होते. आलेला तोतया कामदार धर्माजीरावास पाहून, 'रामराम धर्माजीराव' असें लवून मोठ्यानें म्हणाला, तेव्हां धर्माजीरावानें 'यावें यावें' ह्मणून त्यास जवळ लोडापाशीं जागा दिली. तो खालीं बसल्यावर धर्माजीरावानें त्यास कोण काय कोठून आला आणि काय आज्ञा आहे असें प्रश्न केले, तेव्हां तो तोतया कामदार म्हणाला कीं, ४ महिन्याखालीं तुमच्या येथें २ मुलें वाहत आलेलीं असून तुम्हीं ती गोष्ट सरकारांत मुळींच कळविली नाहींत; चोरून आपले घरीं ठेविलीं आहेत, ह्मणून तुम्ही सरकारचे गुन्हेगार झाला आहां. आणि त्यासाठीं तुम्हांस पकडून कैद करून आणावें ह्मणून मला सरकारांतून पाठविण्यांत आले आहे. तुम्हास सर्व मंडळीसहित कैद करून नेण्याविषयीं मला हुकूम आहे!! असें ऐकतांच धर्माजीरावाचें हृदयांत एकदम धस्स होऊन गेले. आणि बायकांच्या अंगाचा तर अगदीं थरकांप होऊन गेला, अशा स्थितींत धर्माजीरावाच्यानें कांहीं बोलवेना तेव्हां भ्रमर पुढें होऊन त्या तोतयाला म्हणाला:—

**भ्रमर**—रावसाहेब, पाण्यांत वाहून आलेला मुलगा तो मीच. आणि दुसरी माझी एक बहिण आहे दहा व-

षांची! आम्ही मरत असतां या थोर पुरुषांनीं आम्हांस साहस करून प्राणदान दिलें. आणि आपले घरीं आम्हां अनाथांस आश्रय देऊन आजपर्यंत संरक्षण केलें. त्याबद्दल वास्तविक म्हटलें असतां सरकारांतून या थोर पुरुषास मोठें बक्षिस, निदान नुस्ती शाबासकी तरी मिळणें रास्त आहे. असें असतां त्याचे मोबदला हा उलट परिणाम तुह्मी घेऊन आला आहां हें कसें? ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! कोणा अनाथास संकटाचे वेळीं कोणी वांचविलें, आश्रय दिला, संरक्षण केलें; तर हीं कर्में त्यानें अन्यायांचीं केलीं; असें तुमच्या प्रस्तुतच्या चालूं असलेल्या दरबारी कायद्यांत सांगितलें आहे काय? धर्माजीरावानें असा कोणता सरकारचा गुन्हा केला आहे हें अगोदर तुह्मी येथें सांगितलें पाहिजे.तर तुमचा हुकूम आह्मी शिरसा वंद्य करूं?

**कामदार.**--गुन्हा काय केला आहे, हें आह्माला काय माहीत?

**भ्रमर.**—हें जर तुह्माला ठाऊक नाहीं, तर तुह्मी येथें आलात कशाला?

**कामदार.**—फक्त हुकुमाचे चाकर. आह्मी धरून नेण्याकरितां आलों.

**भ्रमर.**—कोणाला धरून नेणार तुह्मी?

**कामदार.**—मंडळीसहित धर्माजीरावाला

**भ्रमर.**--तुह्मी हुकूम आहे ह्मणतां, तो कोणाचा? मल्हारराव महाराजांचा, किंवा दिवाण साहेबांचा. अथवा आणखी एखाद्या अमलदाराचा आहे? तो हुकूम आह्माला पाहूं द्या.

कामदार.--छत् महाराजांचें नांव तुह्मी एकदम घेऊं नका. परंतु हा हुकूम परंपरेनें त्यांचाच आहे असें तुह्माला मानलें पाहिजे.

भ्रमर.--बरें; चिंता नाहीं. कोणाचा कां असेना, परंतु तो लेखी आहे काय? असला तर दाखवा.

कामदार.--नाहीं. हुकूम लेखी नाहीं.

भ्रमर.--मग तुमचे बरोबर कोणी येणार नाहीं.

कामदार.--आह्मी नेल्यावांचून सोडणार नाहीं.

भ्रमर.--( हातांत धर्माजीरावाची तरवार घेऊन ) असें आहे तर मग न्या पाहूं कसें नेता ते! या असे समोर!! काय तुह्मीं येथें मोंगलाई मांडली आहे काय अगदीं?

सद्गुण.--रावसाहेब, तुह्मी रीतीप्रमाणें वागावें हें बरें. एक लेखी हुकूम तरी दाखवा, अथवा आल्या रस्त्यानें मुकाट्यानें चालते तरी व्हा. नाहींतर येथें आतां खून पडतील!!!

धर्माजीराव.--हें पहा रावसाहेब! आह्मी तुमच्या बरोबर येण्यास ह्मणजे नाहीं ह्मणतों असा अर्थ नाहीं; परंतु हुकूम लेखी पाहिजे. कारण असलीं कामें कोठें तोंडातोंडीं होत असतात काय?

कामदार.-- ( भिऊन जाऊन ) हुकूम आहे खरा; परंतु तोंडी आहे लेखी नाहीं.

भ्रमर.—तोंडी हुकूम कोणाचा आहे, तें तरी नीट समजलें पाहिजे.

कामदार.--( जोर दाखवून चालायचें नाहीं जाणून युक्तीनें ) हें पहा, हुकूम (कानांत सांगतो.) × ×

× चा आहे. ह्मणून ह्मणतो कीं, तुह्मीं एकटे येऊन त्याला सांगितलें तरी पुरें होणार आहे. सर्वजण आतांच माझे बरोबर चला असें मी ह्मणत नाहीं.

**भ्रमर**—असें असेल तर माझा मीच तुमचे बरोबर एकटा येण्यास तयार आहे. धर्माजीराव येणार नाहींत.

**सद्गुण**.—परंतु भ्रमरानें येऊन तेथें काय सांगावें?

**कामदार**.—सांगायचें काय ? इतकें सांगावें ह्मणजे झालें. "पाण्यांत वाहून आलों आहे तो मीच. माझें नांव गांव अमूक. धर्माजीरावानें आह्मास प्राणदान दिलें. तो त्यांचा उपकार स्मरून व त्यांचा आह्मावर फार लोभ जडला आहे ह्मणून आह्मी त्यांच्या जवळ आपले स्वइच्छेनें राहिलों आहो."

**भ्रमर**.—ठीक आहे. हें मी येऊन समक्ष त्यांच्या जवळ सांगतों. पाहिजे असल्यास आतांच तुमच्या बरोबर येतों.

**सद्गुण**.—परंतु मी मात्र तुमच्या बरोबर येणार आहे.

**भ्रमर**.—ठीक आहे. मी देखील सद्गुणाची संगती सोडून पुढें कधीं पाऊल टाकणार नाहीं.

**शतावली**.—( घरांतून ) पण दादा, मला सोडून तूं एकटा जाऊं नको, मी येईन तुझ्या बरोबर.

**धर्माजी**०—पण तुह्मीं जावें त्यापेक्षां मीच त्यांच्याबरोबर जाऊन सांगून यावें हें चांगलें.

**भ्रमर**.—नको मामा नको. तुह्मी घरींच असा घर संभाळण्यास. तुमच्या सारख्यानें तें काम शेवटास लागणार नाहीं. ज्यापेक्षां माझ्याच संबंधानें हा खटला

आहे, त्यापेक्षां मींच तेथपर्यंत जाऊन यावें हें चांगलें.

**सद्‌गुण.**—पण मी बरोबर आलो तर काय वाईट?

**भ्रमर.**—मजकडून ना नाहीं.

**शतावली.**—पण दादा, मला सोडून तूं जाऊं नको. मी तुझ्याशिवाय एथें एकटी कशी राहूं? ( रडूं-लागते. )

**भ्रमर.**—( तिची समजूत करून ) वेडे, तूं अशी भितेस काय ह्मणून? तुला संभाळण्यास आई ( ताराबाई ) आहे, मावशी ( सुमतीबाई ) आहे. मामा ( धर्माजीराव ) आहेत. इतकेजण तुजविषयीं जीवकींप्राण खर्च करणारे असून तू अशी रडतेस ती काय ह्मणून? हीं सर्व माणसें आपल्याला आयतींच देवानीं दिलीं!

**ताराबाई.**—बेटा, ये तूं माझ्याजवळ बैस. आपण बायकांत असावें, पुरुषाबरोबर तें कशाला गेलें पाहिजे? असें ह्मणून ताराबाईनें शतावलीस आपल्याजवळ बसवून घेऊन पोटाशीं धरिलें, आणि तिकडे भ्रमर व सद्‌गुण हे त्या तोतऱ्या कामदाराच्या बरोबर जाण्यास निघाले.

मग भ्रमरानें आपल्या आईस, मावशीस, मामास वगैरेंस नमस्कार करून व सद्‌गुणानेंही तसेंच करून, ते त्या तोतयाबरोबर घराबाहेर पडले. दोघांनींही मोठा ऐटदार पोषाक केला होता. सद्‌गुणानें आपलें लहानसें एक पिस्तुल गोळीबाराच्या सरंजामासुद्धां बरोबर घेतलें, आणि एक लहानसा तमंचाही बरोबर घेतला होता. भ्रमरानें आपल्याबरोबर धर्माजीरावाची तरवार

घेतली होती. ही तरवार फारच उमदी होती. गायकवाडी राहशतींत अशी तरवार त्या वेळीं क्वचितच असेल असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. धर्माजीरावाजवळ त्याच्या जुन्या ऐश्वर्यापैकीं कायती एवढीच जिन्नस राहिली होती. प्रसंग पडला तेंव्हां धर्माजीरावांनीं घरांतील डागिन्यांसुद्धां सर्व जिनसांस सावकाराचें घर दाखविलें, परंतु ही तरवार तेवढी आजपर्यंत संभाळून ठेवली होती. तीच ही तरवार भ्रमरानें बरोबर घेतली. घराबाहेर निघून चालूं लागले तेंव्हां दोनप्रहर रात्रीचा सुमार झाला होता. धर्माजीरावाचा ह्मातारा मामा इतका वेळ कांहीं बोलला नव्हता. तो आतां ह्मणाला कीं, कायहो कामदार साहेब, तुमच्या दरबारांत चौकशीचें काम आतां एव्हां चालत असतें काय? मला वाटतें अशी रीत कोठें नाहीं. याकरितां या आमच्या मुलांला तुम्ही उद्यां सकाळीं घेऊन जावें हें चांगलें. आतां नेऊं नका. यावर कामदारानीं उत्तर दिलें कीं, "हें प्रकरण कायद्याप्रमाणें इतकें लांबणीवर घालून उपयोगी नाहीं. रातींचे रात्रीं आपसांत मिटवून टाकावें हें बरें, असें आमच्या यजमानांच्या मनांत आहे, हें बरें कां वाईट?" इतकें ऐकल्यावर मग ह्मातारा पुढें कांहीं बोलला नाहीं. आणि सर्व मंडळी हळूचकन् मग त्या जुन्या घराच्या बाहेर पडून पुढें चालती झाली.

ते बोळाबोळांनीं गेले. सडकेनें गेले नाहींत. कारण रात्रीचे बारा वाजल्यावर लहरीपूर वगैरे मोठमोठे दरवाजे बंद होत असत. व मनुष्यासही परवानगी असल्यावांचून शहरांत फिरूं देत नसत. बारा वाजल्यावर

शहरांतून फिरण्याची मनाई होती. त्यामुळें ही मंडळी बोळाबोळांनीं जाऊन एका खिडकीपाशीं गेली. ही जरी खिडकी होती, तरी तींतून हत्ती सहज निघून जाईल अशी ती लहान होती. असो. या ठिकाणीं ही मंडळी गेल्यावर त्या कामदारानें ( कारकुनानें ) तेथें कांहीं खूण केल्याबरोबर आंतील माणसांनीं ती खिडकी उघडली. ह्मणजे त्या खिडकीस एक लहानशी दुसरी खिडकी ( दिंडी ) होती, ती उघडली. आणि तींतूण हें मंडळ आंत गेलें. आंत पोलिस शिपायांचें एक लहानसें गेट होतें, तेथें हे कामदारसाहेब अंमळ उभे राहून चिलीम प्याले. आणि नंतर पुढें चालते झाले. पुढें पुढें बोळाबोळांनीं बरेच लांब गेल्यावर एका वाड्यापाशीं जाऊन थबकले. या वेळीं थंडी बरीच पडली होती. चंद्र मध्यावर आल्यामुळें चांदणें स्वच्छ पडलें होतें. बडोद्यांत कुत्रीं फार असल्यामुळें त्या वेळीं आसपास फार ओरडून राहिलीं होतीं. असो, या ठिकाणीं दरवाज्यावर चुटकी वाजल्याबरोबर दरवाजा उघडला गेला. मग हे सर्वजण त्या वाड्यांत गेले. आंतल्या एका दिवाणखान्यांत भ्रमरास व सद्गुणास बसवून तो कामदार आणखी आंतल्या महालांत गेला. मग बराच वेळ झाल्यावर तो बाहेर आला. त्या बरोबर एक फरगोल पांघरलेला बोवा बाहेर आला. त्याच्या डोकीवर दिल्लीची भरजरी टोपी होती, आणि डोळ्यांस चष्मा ( आरसा )लावलेला असून सर्वांग त्या फरगोलानें झांकलेलें होतें. त्याचा रंग काळासांवळा होता. याशिवाय दुसरें कांहीं त्या मनुष्याचे समज-

ण्यांत आलें नाहीं. तथापि तो त्या वाड्याचा मालक असावा असें त्या भ्रमरानें व सद्‌गुणानें तेव्हांच ताडून सोडलें. फरगोल रूमरीव होता, एवढ्यानें जरी तो मनुष्य जाड दिसत होता, तरी तो वस्तुतः सडपातळच असावा असेंही अनुमान दिसून येत होतें.

असो. याप्रमाणें हे घरचे मालक आल्यावर भ्रमर आणि सद्‌गुण या दोघांनीं लवून त्यास रामराम केला. तेव्हां त्यानें नुसता हात देखील उचलला नाहीं; मग रामराम परत घेण्याचें नांव तें कशास? ते तसेच डुलत डुलत मोठ्या ऐटीनें येऊन एका चोपाळ्यावर लोडाशीं टेकून बसले. आणि भ्रमराकडे पाहून म्हणाले.

गृहस्थः—धर्माजीराव दाभाड्याचे घरीं वाहत आलेले इसम तुम्हीच काय?

**भ्रमरः**—( हात जोडून ) होय महाराज, मीच तो हतभाग्य मनुष्य!! आणि हा माझ्याबरोबर धर्माजीरावाचा मुलगा सद्‌गुण आला आहे तुमच्या भेटीस.

**गृहस्थ**—ऊंः सद्‌गुणाचें नांव आह्माजवळ काढूं नका. त्याचें व त्याच्या बापाचें या राज्यांत बिलकूल नांव देखील उपयोगी नाहीं, असा आमचा विचार आहे. पैकीं सद्‌गुण तर आह्मीं आपल्या हद्दींतून बहुधा हांकून दिल्यासारखाच आहे. धर्माचा मात्र अद्याप बिमोड झाला नाहीं, पण त्याविषयीं आम्ही सक्त विचारांत आहों.

**भ्रमरः**—बरें आहे. आपण आपल्या मर्जीप्रमाणें करण्यास समर्थच आहां. परंतु आम्हाला बोलवून आ-

णून इतक्या रात्रीं खावंदांनीं श्रम घेण्याचें कारण काय हें समजण्याची मात्र फार उत्कंठा आहे.

**गृहस्थः**---ऊंः त्यांत काय आहे. श्रम घेणें हें आमचें कामच आहे. कारण महाराजाकरितां आम्हीं आपलीं तन मन धनें अगदीं वाहून टाकिलीं आहेत.

**सद्‌गुणः**---ठीकच आहे. स्वामीभक्तीचें हेंच मुख्य लक्षण आहे.

**गृहस्थः**---तुमची एक लग्न होण्याजोगी उपवर बहिण आहे काय सद्‌गुणराव?

**स०**---होय महाराज, ती अजून कुमारिका आहे.

**गृ०**---म्हणूनच म्हणतों कीं, तिचें आणि तुमचें भाग्य बरोबर उदयास आणा. मी सांगतों यांत तुमच्या कल्याणाची गोष्ट आहे.

**स०**---सवतीवर जाऊन पडावें, किंवा ह्यातार्‍याच्या हातीं लागावें; असें खुद्द आमच्या बहिणीच्या मनांतून नाहीं. आणि घरांतील वडील मनुष्यांचाही तसाच अभिप्राय आहे.

**गृ०**---पण कोट्यावधि रुपयांची दौलत आणि शिवाय राजऐश्वर्य मिळेल तें? त्याची वाट काय?

**भ्रमरः**---संपत्तीकडे तिचें मुळींच पहाणें नाहीं महाराज!

**गृहस्थः**---( रागावून ) तुमच्यासारख्या तरुण पोराकडे मात्र तिचें पहाणें आहे नाहीं?

**भ्र०**---या तुमच्या बोलण्याचा अर्थ मला कळत नाहीं. परंतु प्रीतीच्या गोष्टी कांहीं निराळ्या असतात, एवढें मात्र खरें आहे.

गृ०--परंतु तुमची एक बहिण तुमच्याबरोबर पाण्यांत वाहत आली आहेना?

भ०--होय आहे. पण तिनें आपला प्राण देहासहित प्राणदान देणाऱ्या गृहस्थास मोबदला दिला आहे; ह्मणजे ज्यानें तिला पाण्यांतून बाहेर काढून वाचविली, त्याची ती मनोभावानें सून झाली आहे.

गृ०--ह्मणजे या सद्गुणरावाची ती बायको झाली आहे हाच कीं नाहीं तुमच्या बोलण्यांतला अर्थ?

स०--होय. हाच तो अर्थ. आपल्यासारख्या सुज्ञास जास्त तें फोडून काय सांगावयाचें आहे?

गृ०--मग आणखी एक सुंदर विधवा तुमच्या घरांत आहे, तिचा तरी भाग्योदय तुम्ही आपल्या शहाणपणानें करून घेतां काय?

स०--पण आमच्यासारख्या अस्सल मराठी ज्ञातींत ब्राह्मणाप्रमाणेंच पुनर्विवाह, पाट व मोहतर वगैरे करून घेत नाहींत, याला काय उपाय आहे? हें तुह्माला ठाऊक आहेच.

गृ०--तसें उघड होत नसल्यास मग वाडा करून राहण्यास काय हरकत आहे? मी तिला दोन हजार रुपये दरमहा करून देववितों. शिवाय पांच लाखांचे डागिने! आणि तुमच्यासारख्या तिच्या सर्व आप्त मंडळीस असाम्या करून देतों.

स०--या कामांत खुद्द तिचा सल्ला घेतला पाहिजे. तसें केल्याखेरीज या गोष्टीचें होय नाहीं वगैरे कांहींच उत्तर देतां येत नाहीं. कारण ही ज्याच्या त्याच्या खुषीची गोष्ट आहे.

**गृ०**—तुम्ही पहिल्यानें तिची माझी एकांतीं एक घटकाभर भेट करवा. ह्मणजे मी तिला तेव्हांच कबूल करून सोडतों.

**भ्रमर**—( फार रागावून ) महाराज! तुम्ही ही गोष्ट फार तोंड संभाळून बोला. नाहींतर या ठिकाणीं फार जड जाणार आहे तुह्माला!! ती विधवा बाई प्रत्यक्ष माझी मातोश्री आहे समजलां? मजसारखा उमेदवार पुत्र आणि शतावलीसारखी कन्या तिला असतां तुम्ही वाडा करून रहा ह्मणतां, ही गोष्ट तोंडावाटें काढणें तुह्माला बरें दिसतें काय?

**स०**—खरोखर हें तुमचें बोलणें अगदीं मर्यादेबाहेर आहे महाराज! असल्या बोलण्यापासून अनर्थ होण्यास उशीर लागणार नाहीं.

**गृ०**—तोंड संभाळून बोला कारट्यांनो! नाहींतर आतांच तुह्मांला चांगला खाऊ अर्पण करीन!! कोण आहेरे बाहेर? विसाजीपंत, या कारट्यांना बाहेर नेऊन चांगली समजूत देऊन आणा.

याप्रमाणें यजमानसाहेबांचा हुकूम होतांच विसाजीपंत जवळ येऊन सद्गुणाच्या दंडास धरून ओढून नेऊं लागला. इतक्यांत भ्रमरानें त्या यजमानाच्या श्रीमुखांत अशी एक सडकून लगावली कीं, त्याचा गाल जाणें किंवा याचा हात जाणें! त्याला तिरमिरीच आली. तेव्हां धांवा, धांवा, मेलों, मेलों, अशी त्यानें एकच आरोळी करून दिली. त्याबरोबर विसाजीपंतानें सद्गुणाचा दंड सोडून तो धांवतच यजमानाजवळ येऊन त्यांना सावरूं लागला. इतक्यांत दरवाजाबाहेरील

देवडीवरील दहा पांच शिपाई घेऊन विसाजीपंतास मदत करूं लागले. तेव्हां विसाजीपंतानें त्याला सांगितलें कीं, तुम्ही अगोदर त्या दोन पोरट्यांना धरून ठेवा; नाहींतर ते पळून जातील. हें ऐकतांच शिपाई लोक धांवून भ्रमरावर व सद्गुणावर जाऊन पडले. तेव्हां तेथें खूपच हातघाई होऊन मारामारी झाली. भ्रमरानें तरवार बाहेर काढून सर्वांस पटापट छाटून टाकण्याचा विचार केला; परंतु सद्गुणानें त्याला तसें करूं दिलें नाहीं. तथापि पांच चार जणांस ओझरता तरवारीचा प्रसाद मिळालाच. इतक्यांत सद्गुणानें आपल्या पिस्तुलाचा बार पिस्तुलाचें तोंड भिंतीकडे करून केला. तो बार वायफटच होता तरी ते सर्व लोक भिऊन जिवाच्या आशेनें चहूंकडे चार पळून गेले. इतक्यांत पोलिसचा एक अंमलदार कांहीं शिपायांसह रौंद घेऊन त्या रस्त्यानें जात होता, त्याला ही वाड्यांतली गडबड समजल्याबरोबर तो आंत शिरला. घरच्या मालकांची आणि विसाजीपंतांची अजूनपर्यंत बोबडी वळून गेली होती तरी त्यांनीं तसल्याच स्थितींत त्या अंमलदारास झालेली हकीगत सांगून सर्व अपराध या दोन्ही पोरांचा आहे असें सांगितलें. पोलिस अंमलदारास हे घरचे मालक ठाऊकच होते, तेव्हां त्यांचा त्याला हुकूम आणि भीड कशी मोडतां येणार? त्यानें लागलीच त्या दोन पोरांवर चाल केली. तेव्हां भ्रमरानें तरवार हातीं घेऊन निक्षून त्या अंमलदारास सांगितलें कीं, तुह्माला काय बोलणें असेल तें सर्व दहा हातांच्या अंतरावरून बोला. अथवा कोठें घेऊन चलणें

असल्यास घेऊन चला. आह्मी येतों. परंतु जवळ याल, किंवा अंगाला हात लावाल तर गोष्ट ठीक होणार नाहीं. आह्मीं तुमचीं दहा पांच डोकीं सकृत्दर्शनीं लोळवून टाकिल्याखेरीज तुमच्या हातीं लागणार नाहीं!" पोलिस अंमलदार अंमळ नेबळाच होता. तो यांच्या अवसानाकडे पाहून मनांत भिऊन गेला. मग त्यानें अशी शक्कल काढली कीं, आणखी सहा घंटेपर्यंत तुह्मीं येथेंच कैदेंत रहावें. प्रातःकाळीं तुम्हांस योग्य अधिकाऱ्याकडे नेऊन तुमची चौकशी करवूं. मग भ्रमरानें आणि सद्गुणानेंही त्या अंमलदाराची गोष्ट मान्य केल्यामुळें, अंमलदारानें त्यांस तेथील एका खोलींत कोंडून ठेवून व दोन शिपाई बाहेर त्यांच्या रक्षणार्थ ठेवून आपण निघून गेला.

## भाग ४ था.

## खंडोबाची स्वारी.

॥ स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं ॥
॥ देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥ १ ॥

"सुभाषित"

गायकवाडांच्या घराण्यास खंडेराव कुळदैवत आहे, ह्मणूनच मार्गशीर्ष मासीं चंपाषष्ठिनिमित्त त्यांच्या

घरीं मोठा उत्साह होत असतो. परंतु यंदांच्या वर्षी तर तो उत्साह अधिक बहारीनें करण्यांत आला. मल्हाररावांच्या अंगांत चांगले गुण जे थोडेसे होते, त्यांत औदार्य हा गुण मोठा विलक्षण तऱ्हेचा होता. राज्याधिकार मिळाल्यावर अवघ्या तीन चार वर्षांच्या अवकाशांत त्यांचे हातून जितकें औदार्य दृष्टोत्पत्तीस आलें, तितकें दुसऱ्या गायकवाडी पुरुषांच्या हातानें झालेलें ऐकण्यांत आलें नाहीं. मात्र या औदार्याचा उपयोग योग्य स्थळीं, योग्य काळीं व योग्य पात्रीं झाल्याचें उदाहरण फारच थोडें सांपडेल. अशा कारणानें औदार्याचें बीज व्हावें तसें झालें नाहीं. आणि औदार्यापासून जो सुकीर्तीचा लाभ मनुष्यास प्राप्त होत असतो, तो त्या विचाऱ्यास प्राप्त झाला नाहीं इतकेंच नव्हे; उलट अपकीर्तीचाच वांटा त्याचे नशिबीं फार आला!! असो. असा प्रकार होण्यास मुख्य कारण इतकेंच होतें कीं, ज्यांच्यावर ह्मणून त्यांचा खाजगी रीतीनें पूर्ण विश्वास असे, तीं मनुष्यें बहुधा अगदीं हलक्या दरजाचीं, दुर्गुणी, मूर्ख, कामकाजाविषयीं गैरवाकब, नवखे, जन्मदरिद्री आणि नीतिभ्रष्ट अशीं होतीं. त्यांच्या संगतीनें चांगल्या कामांत देखील वाईट यशाचाच भाग मल्हाररावांच्या पदरांत पडत असे. खाजगी सल्लागार मंडळींत ह्मणजे सर्वच माणसें वाईट होतीं, असा अर्थ येथें घ्यावयाचा नाहीं. त्यांतही कोणी शहाणे, मुत्सद्दी, पापभीरू आणि सदाचारसंपन्न असे लोक होते. परंतु त्यांचें ऐकतो कोण ? असो. आपल्याला काय करावयाचें आहे या गोष्टीशी. परंतु

येथें सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं, आधींच मल्हारराव महाराज उदार; आणि त्यांत मंडळी जी त्याला मिळाली ती बहुतेक स्वकार्यसाधु! मग काय पहावयाचें आहे?

चंपाषष्ठीच्या उत्साहामुळें वाड्यांतील देवघरांत नवरात्र बसलें. त्याचप्रमाणें गांवाबाहेर खंडोबाच्या टेकडीवरही देवळांत उत्साह सुरू झाला, रोज ब्राह्मणभोजनें व दुसरा दानधर्म चालू होता. प्रत्येक कामांत पूर्वीच्या दाखल्याहूनही या वर्षी खर्चाची योजना बरीच अधिक अशी होती. मुख्य चंपाषष्ठीच्या दिवशीं सरकारची स्वारी खंडेरायाच्या दर्शनास निघाली. वर्षांतून दोन तीन स्वाऱ्या फार थाटानें निघावयाच्या, असा पूर्वीपासून दाखला आहे. परंतु यंदा ही चंपाषष्ठीची स्वारी फार थाटानें निघाली. अहाहा!! काय तो स्वारीचा थाट वर्णन ह्मणून करावा? स्वारी गेंडी दरवाजानें जाऊं लागली होती. यामुळें मांडवीपासून तों तहत खंडेरायाच्या देवळापर्यंत सारखा जमाव जमून राहिला होता. "देव पहावा किंवा राव पहावा" अशी आपल्यांत म्हण आहे ती यथार्थ आहे. अलीकडे सातारचें ऐश्वर्य व पुण्याचें ऐश्वर्य नष्ट झाल्यापासून या देशांत स्वदेशी ऐश्वर्याची स्वारी पहाणें असल्यास बडोद्याशिवाय स्थळ राहिलें नाहीं. त्यांत गायकवाडांची दौलत ह्मणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. आमच्यासारख्या गरीब लोकांस गायकवाडाची संपत्ति ह्मणजे केवळ कुबेराचीच संपत्ति होय; असें ह्मटल्यास त्यांत कांहीं विशेष आश्चर्याची गोष्ट नाहीं. कारण ज्यांच्या

वरीं सोन्या रुप्याची तर पर्वाच नाहीं, आणि हिरे, माणकें, मोती तर घोड्यांच्या व हत्तींच्या आंगावरून ही पसरलेलीं दिसतात! मग त्या संपत्तीचें किती वर्णन करावें! असो. हत्तींच्या भरजरी झुलांवरून हिरे जडलेलं होते, आणि सोन्याचे साखळदंड त्यांच्या शुंडेंत शोभत होते. कित्येक हत्तींच्या पाठीवरून चांदीचे हौदे आणि सोन्याच्या आंबाऱ्या होत्या. कोतवाली सालंकृत घोडे, स्वारीच्या पुढें नाचत चालले होते. ते एकापेक्षां एक किमतवान व सुंदर असे असून निरनिराळ्या रंगाचे होते. एकेकास चवरे चवरे मोतद्दार धरण्यास व तितकेच लोक संभाळण्यास ! सोन्याच्या व चांदीच्या तोफा आघाडीस चालल्या होत्या. सर्वांच्या पुढें अगोदर जरीपटक्याचा हत्ती चालला होता आणि त्या मागें घोडेस्वारांची तुकडी चालली होती. त्यांच्या हातांत भाले व कंबरेस तरवारी लटकावेलल्या होत्या. घोडेस्वारांच्या मागें शृंगारलेल्या हत्तींची ओळच्याओळ चालली होती. त्यावरून कांहीं मानकरी लोक व जावई गायकवाडांचे असे डौलदार पोषाक करून ऐटीनें बसून चालले होते. त्या मागें इंग्रजी तऱ्हेच्या बाजावर पावलें टाकीत एक पायदळ पलटण चालली होती. त्या मागें पागेदारांच्या घोडेस्वारांची तुकडी, व त्यांचे पाठोपाठ आरब लोकांच्या मंडळ्या आपल्या टिमक्या वाजवीत चालल्या होत्या.

यामागें ताशेबर्फे, शिंगें, तुताऱ्या, डंके, डफडीं, व कर्णढोल वगैरे बाजे गाजे चालले होते. त्यानंतर खाजगी पेशाचे लोक भालदार, चोपदार, बोथाटीवाले,

निशाणवाले, भाट, चौऱ्या, मोरचलवाले आणि पानसुपारीचे बटवे वगैरे घेणारे शागीर्द पेशाचे लोक चालले होते. आणि सर्वांमागें महाराजांची सोन्याची बगी चालली होती. बगींत सरकारस्वारी बसली होती आणि समोरचे जागेवर त्या वेळचे दिवाण बसले होते. मागच्या अंगास महाराजांवर चौऱ्या, मोरचलें उडत होतीं. आणि बगीच्या मागें तमाम सरदार मंडळी, मानकरी मंडळी, सावकार मंडळी, आणि महाराजांची आप्त मंडळी घोड्यांवर बसून चालली होती. त्यांच्या डोक्यांवरील छत्र्यांची एकच भीड होऊन गेली होती, बिचाऱ्या छत्र्या धरणारांची मोठी त्रेधा उडून गेली होती. कारण घोड्यांच्या गर्दींतून त्यांना पायांनीं चालणें मोठें कठिण झालें होतें. तथापि त्यांची मोठी शाबास खरी! असो. महाराजांच्या अगदीं बगीमागें दोस्तमहंमद मियासाहेबांचा घोडा होता. व त्यांचा चेहराही शूर शिपायासारखा दिसत होता, मग त्यांच्या मागें नबाब, पांढरे, घोरपडे, शिरके, माने, कदम, फडणीस, मोरे, पवार, जाधव, लिंबाळकर, रोडे, मुजूमदार, हरिभक्त, इत्यादि सर्व मंडळी घोडे उडवीत चालली होती. ही शोभा फार पहाण्यालायक होती. आणि मग सर्व स्वारीच्या मागें साहेब-नौबद डुमडूम वाजत चालली होती.

अशा रीतीनें स्वारी चांगल्या थाटानें चालली असतां इकडे सूरसागरावर आमच्या धर्माजीराव दाभाड्यांच्या दारांत एक सारंग रंगाचा उमदा घोडा जीन वगैरे सरंजामासुद्धां येऊन उभा राहिला. त्याला मोतद्दारानें

धरिलें असून बरोबर एक जासूद होता, त्यानें धर्माजीरावास सांगितलें कीं, आपणास आत्तांचे आतां स्वारीकरितां बोलाविलें आहे. याकरितां लवकर चला. तुमच्याकरितां हा घोडा हुजूरांतून पाठविला आहे. तुम्ही होईल तितकी जलदी करून स्वारींत जाऊन दाखल झालें पाहिजे. स्वारी अजून फार लांब गेली नाहीं. दरवाजाचे आंतच आहे! याप्रमाणें हुकूम आल्याबरोबर तो जासुदाच्या तोंडचा निरोप धर्माजीरावास अमान्य करितां येईना, व खोटाही ह्मणतां येईना. शेवटीं जावें किंवा न जावें याविषयीं त्याला मोठा विचार पडला! जावें तर मनदेवता जाण्याविषयीं सल्ला देईना. हजार कुकल्पना मनांत येऊं लागल्या. आणि न जावें तर दरबारचा आणखी अधिक कोप होईल कीं काय ही भीति वाटूं लागली. आलीकडे धर्माजीरावास बऱ्याच दिवसांत स्वारी करितां कधीं बोलावणें आलें नव्हतें, आणि आज मुद्दाम जासुदा हातीं बोलावणें व हुजुरांतून घोडाही आला आहे तेव्हां कसें करावें ह्मणून तो फार वेळ पर्यंत मोठ्या विचारांत व घोटाळ्यांत पडला; परंतू आखेर सर्व मंडळीच्या विचारानें त्यानें स्वारीस जाण्याचें ठरविलें! घरांतील मंडळीस यावेळीं मागील सर्व आठवण झाली, ह्मणजे भ्रमरास व सद्‌गुणास नेऊन एक महिना झाला असून अजून त्यांचा पत्ता नाहीं; व परत येणेंही नाहीं, तेव्हां आतांचा प्रकारही असाच आहे कीं काय? ह्मणून सर्वांस मोठी काळजी पडली, तरी अखेर जाण्याचाच निश्चय होऊन धर्माजी-

राव त्या सारंग्या वारूवर बसून जासुदावरोबर स्वारीस निघून गेला!

सरकार स्वारी खंडोबाचें दर्शन घेऊन परत माघारी फिरली तों संध्याकाळ झाला. आणि वाड्यांत येऊन पोंहोंचेपर्यंत सुमारें चार घटका रात्र झाली. लोक घरोघर निघून गेले, जो तो आपआपल्या गडबडींत. दोन प्रहर दिवसांपासून स्वारीच्या कामांत लोक सक्त अडकून राहिले होते ह्मणून फार कंटाळून गेले होते. घोड्यावरून उतरून आंगावरील पोषाक केव्हां काढून टाकूं असें सर्वांस होऊन गेलें होतें. याप्रमाणें गांवांत सर्व लोक स्वारीहून परत येऊन आपापल्या जेवणाखाणाच्या उद्योगास लागले तरी बिचारा धर्माजिराव दाभाडा अद्याप घरीं आला नव्हता. त्याच्या घरचीं माणसें स्वयंपाक करून वाट पहांत बसलीं होतीं. मुलीं देखील जेवल्या नव्हत्या. ह्मणजे नीती आणखी शतावली देखील जेवल्या नव्हत्या. कारण घरांत सर्व मंडळीची स्थिति यावेळीं कांहीं निराळ्याच प्रकारची होऊन गेली होती. त्यांचें सर्व लक्ष यावेळीं धर्माजी रावाकडे लागून राहिलें होतें. त्यांना खचीत वाटलें कीं, भ्रमर आणखी सद्गुण या प्रमाणेंच धर्माजीरावाची स्थिति झाली असावी. सुमती बाईच्या नेत्रांतून एक सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या; हें पाहून नीति आणखी शतावली ह्याही मोठ्यानें रडूं लागल्या. ताराबाईस आपल्या पुत्राची ह्मणजे भ्रमराची अठवण झाली, ह्मणून ती ही फार शोक करूं लागली. नीतीस या वेळीं तिप्पट दुःख झालें होतें. ह्मणजे एक बापाचें, दुसरें तिच्या प्रियकर भ्रमराचें, आणि तिसरें

भावाचें ह्मणजे सद्गुणाचें. अशा प्रकारें ही सर्व मंडळी या वेळीं अगदीं दुःख समुद्रांत बुडून गेली ! ! ह्मातारा मामासाहेब वरचेवर सर्वांचें समाधान करून धीर देतच होता परंतु काय उपयोग? त्या समाधानापासून धर्माजीरावाच्या प्रत्यक्ष भेटी सारखें समाधान प्राप्त होऊं शकतें काय?

भ्रमर आणि सद्गुण घरांतून गेल्यादिवसापासून सुमतीबाईनें आणि ताराबाईनें तर अन्नपाणी सोडून दिलें होतें. आणि त्यांत आतां धर्माजीरावाची तीच स्थिति झाली, मग काय पहावयाचें आहे? धर्माजीरावाची आई सुबुद्धिबाई हिनें तर अगदीं बिछानाच धरला होता. आणि आतां आज धर्माजीराव अजून आला नाहीं. हें वर्तमान जेव्हां तिला समजलें, तेव्हां तर तिचा जीव अगदीं कासावीस होऊन गेला. रात्रींच्या अकरा वाजण्याचा सुमार झाला तरी अजून धर्माजीराव आले नाहींत असें पाहून मग मात्र सर्वांची कंबर अगदीं बसून गेली. घरांतील सर्व मंडळीला उघड उघड वाईट वाटूं लागलें, परंतु त्यांतले त्यांत दोन मनुष्यांला तोंड धरून बुक्यांचा मार होऊन गेला होता, तें त्यांचें दुःख अवर्णनीय होय. हीं दोन मनुष्यें कोणतीं ह्मणाल तर नीति आणखी शतावली! नीतीस भ्रमरावांचून दाही दिशा अगदीं शून्य दिसूं लागल्या. व शतावलीस सद्गुणावांचून करमेनासें झालें. दोघींसही तें दुःख घरांतील मनुष्यांस उघड दाखवितां येत नव्हतें. त्या सांदी—कोंपऱ्यांत जाऊन रडत बसत असत. नीतीस तर प्रिय—विरह—दुःखाचें ज्ञान बऱ्याच

अंशानें समजूं लागलें होतें. म्हणून स्वप्नांत देखील तिला प्रियकर भ्रमरच नजरेस पडावा. आणि मग तिनें झोंपेंतून चटकन् उठून बसावें; तों भ्रमर कोठेंच नाहीं. मग पुनः तिला रडें कोसळावें. सारांश, अशी तिची स्थिति असतां त्यांत हें अधिक आणखी धर्माजीरावाचें दुःख येऊन पुढें उभें राहिलें. मग या घटकेपासून त्या दोघींला उघड उघड शोक करण्यास जागा झाली. असो. तात्पर्य इतकेंच कीं, धर्माजीरावाच्या भेटीची निराशा झाल्याबरोबर घरांतील सर्वच माणसें दुःखविरहाग्नीनें अगदीं होरपळून गेलीं!!

सूर्योदय झाल्यावर भरंवसा नामक जो गडी होता, त्यानें सर्वांस धीर देऊन आपण धर्माजीरावाच्या शोधास निघून गेला. तो गडी आपल्या नांवाप्रमाणेंच खरोखर होता. गडी गेल्यावर पाठोपाठ मामासाहेबांच्यानें रहावेना, तेव्हां तेही हातांत काठी घेऊन पाहारेकऱ्यांच्या अर्जवानें धर्माजीरावाच्या शोधास घराबाहेर निघून गेले. इतक्यांत एक, दोन घोड्यांची बगी येऊन धर्माजीरावाच्या दारापुढें उभी राहिली. या बगीस चहूंकडून चिकाचे पडदे सोडलेले होते. आणि बगीवर दोन कुणबिणी बसल्या होत्या, पुरुष माणूस कोणी नव्हतें. बगी उभी राहिल्यावर आंतून एक सभ्य, पोक्त आणि भव्य अशी बाई बगीखालीं उतरून धर्माजीरावाच्या घरांत शिरली. तेव्हां घरांत सुमतीबाईनें तिचा चांगला आदरसत्कार करून कोण कोठील वगैरे हकीकत तिला विचारली. तेव्हां त्या बाईनें सांगितलें कीं, यजमान साहेबांची मर्जी तुमच्या धर्माजीरावावर

कालपासून अगदीं फिदा होऊन गेली आहे. ते मागील सर्व राग विसरले असून सर्व गत गोष्टींविषयीं त्यांनीं तुमच्या घरधन्यास माफी केली आहे. कालरोजीं त्यांना स्वारींत येण्याचीही परवानगी देऊन टाकिली असून महाराजांकडून त्यांस लागलीच कालचे कालच एक सारंग घोडा, एक हत्ती व एक मोत्याची कंठी असें बक्षिस देवविलें असून आजरोजीं आमच्या यजमानांनीं तुमच्या यजमानांस भोजनाकरितां आपले घरीं ठेवून घेतलें आहे. भोजन झाल्यावर ते दोघे पुनः वाड्यामध्यें जाणार असून तेथें त्यांची त्यांना आज नेमणुकीची नवी सनद करून माहाराजांकडून देवविणार असून, आजपर्यंत राहिलेला ऐवजही पदरांत घालून देणार आहेत. सारांश, आजरोजीं तुमचा भाग्योदय उदयास आला आहे असें म्हटलें पाहिजे. रात्रीं तुम्ही त्यांची वाट घरीं येण्याविषयीं पाहिली असेल; परंतु काय करतील बिचारे! स्वारी वाड्यांत परत आल्यावर आणखी फार रात्रीपर्यंत त्यांना वाड्यांतच महाराजांजवळ बसून रहावें लागलें होतें. आमचेही यजमान तुमच्या यजमानाबरोबर रात्रीं महाराजांजवळ फार रात्रपर्यंत बसले होते. व बसण्यांत मुख्य कारण तरी तुमच्या कल्याणाचेंच होतें. मग दोघेही घरीं बरोबरच आले. तेव्हां तुमचे यजमान तितक्या रात्रीं तुमच्याकडे येणार होते. परंतु आमच्या यजमानांनीं त्यांस आग्रहानें आतां इतक्या रात्रीं कशास जातां; सकाळीं जातां येईल ह्मणून ठेवून घेतलें. आज प्रातःकाळीं ते येणार होते, परंतु आज आम्ही आपल्या घरीं तुमच्या सर्व

मंडळीस जेवणाची मेजवानी ठरविली असून मी तुम्हास नेण्यास आलें आहे. धर्माजीरावच स्वतः आमच्या यजमानासहित तुम्हांस घेऊन जाण्यासाठीं येणार होते, परंतु बायकांच्या बोलावण्यास बायकांनींच जावें, ही प्रशस्त रीत असल्यामुळें त्यांचा बेत रहित करून मी स्वतांच गाडी घेऊन बोलावण्यास आले आहे. म्हणून बाई कृपा करून गरिबाच्या बोलावण्यास तुम्ही मान दिला पाहिजे. जेवण झाल्यावर पुन्हां याच गाडींतून तुमची परत रवानगी केली जाईल. याकरितां दोघी मुलींस बरोबर घेऊन तुम्ही दोघी बहिणी आतांच कृपा करून मजबरोबर चला.

से या सभ्य बाईचें हें सर्व साखर पसरलेलें बोलणें ऐकून सुमतीबाईसहित अर्थातच सर्वांना आनंद होऊन गेला. मुख्यत्वें धर्माजीराव खुशाल असून त्यांजवर महाराजांची कृपा झाली वगैरे मजकूर ऐकून तर सर्वांला अतिशयच संतोष होऊन गेला. त्या सर्वजणी बिचाऱ्या भोळ्या होत्या! त्यांना हे लुच्चेगिरीचे खेळ काय माहित? भ्रमर व सद्गुणासारखे हुषार मुलगे देखील पाहिल्या सोंगाबरोबर फसून गेले, आणि मागून स्वतां धर्माजीरावही फसून गेला. मग बिचाऱ्या सुमतीसारख्या अबलांची ती काय कथा? त्यांनीं लागलीच तिजबरोबर जाण्याची तयारी केली; परंतु नीतिबाईनें या वेळीं आक्षेप घेतला कीं, "तुम्ही म्हणतां त्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत बाईसाहेब! परंतु घरांत आमची एक म्हातारी आजीबाई अगदीं जमिनीला खिळून राहिली आहे, तिच्याजवळ कोणी तरी संरक्षणार्थ असल्यावांचून

आम्हांस तुमच्याबरोबर येतां येत नाहीं; याकरितां घटकाभर थांबा. आमचे मामासाहेब व भरंवसा गडे हे दोघे बाहेर गेले आहेत, त्यापैकीं कोणी तरी आले ह्मणजे ह्मातारीचें संरक्षण त्यांजकडे सोंपवून आम्ही तुमचेबरोबर निघून येतों. अथवा तुम्हास तरी तोंपर्यंत खोळंबा कशास पाहिजे. आपण पुढें गेलांत तरी चालेल एक कुणबीण येथें ठेवून!आम्ही तिच्याबरोबर मागाहून भाड्याचे गाडींतून येऊं." याप्रमाणें नीतीचें बोलणें ऐकून आलेली बाई ह्मणाली कीं, छे; छे; असें कसें ह्मणतां? भाड्याचे गाडींत बसून येण्यासारखी कां आपली योग्यता आहे? तुम्हास भाड्याचे गाडींत बसवून नेल्यावर मग आमच्यासारखी तुमचीं आश्रित मतणसें असून तीं उपयोगाचीं काय? त्यापेक्षां मी आपली कुणबीण येथें ह्मातारीच्या संरक्षणास ठेविते. मामासाहेब आल्यावर मग ती उठून येईल. शिवाय घरीं गेल्यावर मी तुमच्या आजीबाईकरितां आणि मामाकरितां व भरंवसा गड्याकरितां ताटें वाढून पाठवून देतें व मग तर झालेना?

हें बोलणें ऐकून मग ताराबाईनें आणखी एक आक्षेप काढला कीं, "तुह्मीं ह्मणतां त्या सर्व गोष्टी खऱ्या बाईसाहेब! परंतु वास्तवीक ह्मटलें ह्मणजे मेजवानीस घेण्यास येण्या सारखा आमचा जीव सुचीत नाहीं. आमचीं दोन मुलें, मुलें नव्हत; परंतु आमचे केवळ प्राणच ह्मटलें तरी चालेल. आज महिना झाला, अशीच दरबारच्या बोलावण्यावरून जीं गेलीं आहेत, त्यांचा अजून पत्ता नाहीं. तीं जिवंत आहेत किंवा नाहींत

याची सुद्धां आह्माला वार्ता नाहीं! त्यामुळें खरोखर आमचा जीव सुचीत नाही. मग ती तुमची मेजवानी घेणें आह्मास कसें बरे बरें वाटणार आहे? त्या पेक्षां मख्य आमच्या घराचे खांब धर्माजीरावच तुमचे घरीं ब ाले आहेत ह्मणता, तर ते जेवले ह्मणजे आह्मांस तुमची ाजवानी सर्वांस पोचली असें सहजच होणार आहे; मग व्यर्थ उगीच दुराग्रहांत कां पडता; ”

ताराबाईचें याप्रमाणें बोलणें ऐकून, बाई ह्मणाली कीं, काय तुह्मी वेड्या बायका आहांत! तुह्मांस धैर्य व धोरण बिलकुल दिसत नाहीं. तुमचीं मुलें तर फार हुषार व शूर असल्यामुळें त्यांना दरबारांतून पुष्कळ सैन्य बरोबर देऊन द्वारकेकडे जो वाघरी लोकांनीं दंगा उठविला आहे त्यांवर पाठविले होते. तिकडे त्यांनीं मोठा जय मिळविला असून गायकवाड सरकारची मोठी त्यांनीं कामगिरी बजाविली असल्यामुळें आतां दरबाराला मोठा तुमच्याघराण्याचा अभिमान उत्पन्न झाला आहे;आतां सर्वांची मर्जी तुमच्याविषयीं मोठी प्रसन्न झाली आहे. ही तुमच्या मुलांच्या जयाची खबर कालच पारी निघायचे वेळीं दरबाराला कळली; तेंव्हां लागलीच सर्वांना आनंद होऊन त्यांनीं लागलीच धर्माजीरावास स्वारीस घेऊन येण्याविषयीं हुकूम देऊन घोडा पाठविला. त्याचप्रमाणें स्वारी परत आल्यावरही रात्रीं कांहीं देणग्या धर्माजीरावास मिळाल्या. आणि आतां उद्यां कायशी दिवाणगिरीचीं वस्त्रेंही धर्माजीरावासच द्यावींत ह्मणून दरबारांत विचार चालू झाला आहे. ह्मणून म्हणते कीं, बाईसाहेब, आमच्या गरिबाच्या भो-

जन आमंत्रणास आपण नाहीं म्हणूं नका. हा तुम्हास आजचा शुभ शकुन आहे.

या शेवटच्या बोलण्यामुळें अर्थातच सर्वांनाच आनंद होऊन अगदीं भुरळ पडल्यासारखें झालें. आणि त्यांनीं लागलीच तिच्या बरोबरच जाण्याची सिद्धता केली घरांतील सामान सुमानांचा कांहीं फारसा बंदोबस्त न करितां साधारण रीतीनें कुलपें वगैरे लाविलीं आणि एका कुणबिणीस आजीबाईजवळ संरक्षणार्थ ठेवून मामासाहेब आल्यावर त्यांना हें सर्व वर्तमान सांग असें तिला सांगून ठेवून आपण चवघीही त्या बाईच्या बगींत जाऊन बसल्या; आणि लागलीच बगी चालू झाली. ती कोणत्या रस्त्यानें गेली, हें बगीस पडदे असल्यामुळें समजण्यांत आलें नाहीं. बगींत पुढच्या बैठकीवर दोघीजणी ह्मणजे नीति आणखी शतावली ह्या बसल्या होत्या, आणि मागची बैठक मोठी असल्यामुळें ती वर तिघीजणी बसल्या होत्या. पुढें बरीच लांब बगी गेल्यावर एका बागेच्या दरवाजापाशीं ती उभी राहिली. तेव्हां कुणबिणीनें येऊन झटदिशा बगीचें दार उघडून खालीं उतरा उतरा ह्मणून घाई केल्याबरोबर प्रथमतः नीति आणखी शतावली ह्या पुढच्या बैठकीवरच होत्या, त्या खालीं उतरल्या. इतक्यांत कुणबिणीनें झटदिशी बगीचें दार बंद केल्या. बरोबर बगी आणखी पुढें चालती झाली. ती पुढें बरीच दूर गेल्यावर मग दुसऱ्या एका बागेच्या दरवाजापाशीं उभी राहिली तेव्हां तेथें या बगींत राहिलेल्या तिघीजणी उतरल्या!!

दोनीही बागेच्या दरवाजांपाशीं कांहीं कुणबिणी उभ्या होत्या. त्यांनीं लागलींच उरलेल्या मंडळीस बागेंतील बंगल्यांत नेऊन, त्यांची सर्व प्रकारची बरदास्त अगदीं उत्तम प्रकारें ठेविली. इकडे बायामंडळीं घरांतून बाहेर गेल्यावर थोडक्याच वेळानें मागोमाग मामासाहेब येऊन घरीं पाहतात, तों घरांत म्हातारीशिवाय दुसरें कोणीच नाहीं. कुणबिण बसली होती, तिणें मामासाहेबांस असें सांगितलें कीं, मला येथें धर्माजीरावानें तुम्हास निरोप सांगण्याकरितां बसविलें आहे; तो निरोप इतकाच आहे कीं, "आम्हीं काल जे घराबाहेर गेलों होतों; ते आतांच घरीं आलों आणि सर्व मुलें माणसें घेऊन देशीं जाण्याकरितां स्टेशनावर निघून गेलों आहों. तुम्हीं उशीर न करितां एक गाडी करून म्हातारीला त्यांत घालून व दरवाजाला कुलूप लावून पाठोपाठ लवकर स्टेशनावर निघून यावें. उशीर करूं नये. उशीर झाल्यास गाडी चुकून जाईल!" याप्रमाणें निरोप सांगून कुणबीण चटदिशीं उठून चालती झाली. मग मामासाहेबानें जवळच एक गाडीवाला होता त्याला गांठून त्याची गाडी आणविली आणि त्यांत म्हातारीला घालून घरांत रोकड व डागडागिने थोडेबहुत होते ते घेऊन घराला कुलूप लाविलें, आणि स्टेशनावर निघून गेला. तेथें जाऊन पाहतो तों, मुंबईची व सुरतेची गाडी निघून गेली होती. मात्र डभईला एक गाडी डभईपर्यंतच जाणारी होती तीच तेव्हढी जावयाची राहिली होती. तेव्हां मामासाहेब तिकीट काढून म्हातारीसहित

तींतच जाऊन बसला ! त्याणें असा विचार केला कीं, धर्माजीराव वगैरे मंडळी खचीत गाडींतून पुढें गेली, आपणांस ती गाडी साधली नाहीं, तरी आतां आपल्यास येथें बसून काय करायचें आहे ? त्यापेक्षां डभईस जाणें हें चांगलें व सुरक्षित, परंतु स्टेशनावर राहणें सोंगासारखें होऊन सुरक्षितपणाचें नाहीं. असा विचार करून तो डभईस चालता झाला.इकडे सर्वां मागून भरंवसा गडी फिरून फिरून दमल्यावर घरीं येऊन पाहतो तों घराला कुलूप ! ! ! तेंव्हां त्याचे पोटांत एकदम धस्स होऊन गेलें ! आणि तो मोठ्या विचारांत पडला. पुष्कळ शोध केला तरी शोध ह्मणून कांहींच लागेना. शेवटीं त्याणें निश्चय केला कीं, जें होणें असेल तें होईल; परंतु या सर्व खेळाचा पक्केपणीं शोध करून आपल्या यजमानाचा बिना खरा सुगावा लागल्याशिवाय व त्याची भेट घेतल्याशिवाय हा भरंवसा गडी येथून हालावयाचा नाहीं ! ! असा विचार करून तो त्या घटकेपासून त्या कामीं सक्त गुंतून गेला.

## चवथा भाग समाप्त.

# भाग ५ वा.

## गाणारणीचें घर.

कामातुराणां न भयं न लज्जा ।
चिंतातुराणां न सुखं न निद्रा ॥ १ ॥

'सुभाषित'

प्रातःकाळच्या वेळेस देववेळा ह्मणतात; तें यथार्थ आहे. कारण या वेळेस जिकडे तिकडे नव्या उमेदीची हालचाल सुरू झालेली असते. संध्याकाळीं झाडांवरून एकत्र जमलेले पक्षी या वेळीं झोपेंतून सावध होऊन किलबिल करूं लागतात. आणि दाणापाणी मिळविण्याकरितां उडून जाण्याच्या विचारांत असतात. कोंबडे आपण सावध होऊन दुसऱ्यास सावध करण्याकरितां साद घालीत असतात. कोकील पक्ष्यांचें मधुर गाणें याच वेळीं सुरू झालेलें असतें. सर्व वृक्ष व वेली टवटवीत दिसूं लागतात, आणि त्या वरील नूतन पुष्पें याच वेळीं उमललीं असतात. सर्वत्र मंद व शीतल वायु चालू झालेला असून त्यामुळें ताज्या पुष्पांचा सुगंध सर्वत्र पसरलेला असतो. फळें देखील याच वेळीं रसरसीत दिसूं लागतात. मंद, शीतल व सुगंधयुक्त वायूची झुळूक या वेळीं सर्व प्राणीमात्रांस फार सुखकर वाटत असते. आणि सर्व प्राणिमात्र या वेळीं मोठ्या आनंदांत असतात. अशी ही प्रातःकाळची वेळा फार

मजेदार दिसत असते. या वेळचा देखावा शहरांत लोकवस्तीच्या ठिकाणीं कांहीं निराळा दिसत असतो आणि रानांत निर्मनुष्य ठिकाणीं कांहीं निराळा दिसत असतो. परंतु तूर्त आपल्याला या वेळच्या अरण्यांतील देखाव्याशीं काय कर्तव्य आहे ? आपला संबंध तूर्त बडोदें शहराशीं आहे, तेव्हां अशा सुंदर प्रातःकाळच्या वेळीं बडोदें शहरांत काय घडामोड चालली होती ती आपणास पाहिली पाहिजे.

या वेळीं बडोद्यांतील कर्मनिष्ठ ब्राह्मण, स्नानसंध्येच्या धांदलींत गुंतून गेले होते. सरकारवाड्यासमोरच्या विठ्ठलमंदिरांत सरकारी खर्चानें जी वेदशाळा होती, तींत वेदघोष चालूं झाला होता. कांहीं मुलें व्याकरण, न्याय, अलंकार, साहित्य इत्यादि शास्त्रांचे अभ्यास करीत होतीं. व कांहीं मुलें रघुवंश, माघ, दशकुमार, वगैरे काव्यें घोकीत होतीं. कित्येक तर रूपावली, समासचक्र आणि अमरकोश घोकीत होतीं. सारांश या शाळेंत सर्वत्र मुलांच्या ह्मणण्याची मोठी गडबड उडून राहिली होती. विठ्ठलमंदिरांत देवाच्या पूजेची तयारी चालली होती, ह्मणून सर्वत्र केशरकस्तूरीचा आणि सुगंधिक ताज्या पुष्पांचा सुगंध पसरून गेला होता. विजापूरच्या उंची अगरबत्त्यांचे सुवास लांबवर पसरून गेले होते. या विठ्ठलमंदिरांतील पूजेच्या थाटाप्रमाणें थाट आणखीही शहरांत पांच पंचवीस ठिकाणीं चालूं झाले होते. ह्मणजे मुख्य सरकारवाड्यांतील देवघरांत, वाडींत गोपाळराव मैराळांच्या गणपतीमंदिरांत, नरसिंगजीस, भीमनाथास, बेचराजीस, सिद्ध-

नाथास, गणपतीबोवांच्या गणपतीमंदिरांत वगैरे प्रसिद्ध ठिकाणीं असेच थाट चालूं झाले होते. त्याचप्रमाणें सुमारें दहावीस ठिकाणीं नगारखाने पाहाटच्या रागिणीवर चालूं झाले होते. माळी लोक व बागवान लोक नानाप्रकारचीं फुलें व शाकभाजींचे हारे (मोठ्या टोपल्या) डोकींवर घेऊन मोठ्या लगबगीनें शेतांतून व मळ्यांतून शहरांत येत होते. त्यांच्या हाऱ्यांतून केळीं नारिंगी, रामफळें, सिताफळें, पेरू, संत्रीं, पपनिसें, अननसें, साखरलिंबें, इत्यादि फळें; आणि मुळें, मिरच्या, कोथिंबीर, मेथी, दोडके, पडवळी, तोंडली, गोवारीच्या सेंगा, वांगीं इत्यादि भाज्या भरलेल्या होत्या. ताज्या कोथिंबिरीचा वास चहूंकडे सुटून राहिला होता. गावांतील व्यापारी दुकानदार नुकतेच उठून दुकानें लावण्याच्या बेतांत होते. सासुरवासी स्त्रिया वडील माणसांच्या अगोदर उठून सडासंमार्जनादि कामास लागल्या होत्या, व कित्येक रंगवल्लिका ह्मणजे रांगोळ्या काढण्याच्या नादांत गुंतून गेल्या होत्या. तरुण गुर्जरी स्त्रिया नानाप्रकारचे सुंदर पेहराव करून अर्ध्या अंगावरच एका बाजूनें डागिने घालून पाण्याला चालल्या होत्या. त्यांच्या मस्तकांवरून मृत्तिकेचे घडे एकावर एक ठेवलेले असून त्या उतरंडीस हात न लावतां त्या एकमेकेकींशीं बोलत चालल्या होत्या. कंचिनींच्या घरांतून गवयांचें तालमी देण्याचें काम चालूं झालें होतें. व पहाटच्या रागांतून त्यांचे मधुर स्वर ऐकूं येत होते. आखाडेवाल्यांच्या तालमींतून वस्तादलोक पोराला कुस्त्या शिकवीत होते, ह्मणून त्यांच्या दंड थोपटण्याचे

आवाज रस्त्यावरून जाणाऱ्यायेणाऱ्यास ऐकूं येत होते. विलासी तरुण स्त्रीपुरुषांच्या अद्याप झोंपा पुऱ्या झाल्या नसल्यामुळें त्यांच्या त्या प्रेमभरित मिठ्या अद्याप तशाच कायम होत्या; तथापि सासुरवासी स्त्रीपुरुषें मात्र एकमेकांपासून केव्हांच वेगळीं होऊन गेलीं होतीं.

याप्रमाणें पाहाटच्या उद्योगवेळीं बडोदें शहरांत सर्वत्र चळवळ सुरू असतां आमचे दोन मित्र जे एका घरांत खोलींत कोंडून ठेविले गेले होते, तेही बाहेर पडण्या करितां चळवळ करीत होते. शेवटीं भ्रमराजवळ जी एक उमदा तलवार होती, तिच्या साह्यानें त्याणें तेथील एका खिडकीचे गज चटसारे कापून टाकून बाहेर पडण्यास मोकळी वाट केली. हें काम त्याणीं रात्रीपासूनच सुरू केलें होतें. तरी मनुष्य बाहेर पडेल अशी वाट तयार होण्यास त्याना पहाटेचा पांच वाजण्याचा सुमार येऊन ठेपला ! ! मग माणसास माणूस ओळखूं येऊं नये अशा वेळीं दोघाजणांनींही त्या खिडकींतून बाहेर उड्या मारिल्या ! त्यांच्या उड्या, शेजारील एका नव्या बांधीत असलेल्या वाड्याच्या मधल्या चवकांत पडल्या. भ्रमराची उडी एका काळ्या रंगानें भरलेल्या पिपांत पडली, आणि सद्गुणाची चुन्याच्या पिपांत पडली. तेव्हां त्यांतील पाणी वर उसळलें ! ! तें पाणी तेथें पलीकडे निजलेल्या एका पुरभय्याच्या अंगावर उसळून जाऊन पडलें, त्याबरोबर तो जागा झाला. हा पुरभय्या तेथील सामानासुमानाकरितां रक्षणार्थ शिपाई होता. तो जागा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला. तेव्हां त्याच्या

दृष्टीस हे दोघे चित्रविचित्र झालेले पोरगे आयतेच पडले ! त्याबरोबर तो चोर चोर ह्मणून ओरडला ! ! मग अर्थातच शेजारपाजारचें लोक जागे होऊन तेथें जमा झाले ! मग काय विचारावयाचे आहे ? भ्रमराची आणि सद्गुणाची त्यावेळीं मोठी धांदल होऊन गेली. इतक्यांत त्या चवकांत बाहेरचे लोक पुष्कळच भरून गेले. परंतु कोणाचीही छाती त्या दोघांस धरण्यास जाण्याची होईना ! कित्येक ह्मणूं लागले कीं, हे चोर नाहींत, परंतु या वाड्यांतील प्राचीनकाळचीं हीं भुतें असावींत असें वाटतें ! ! खरोखर लोकांची ही कल्पना अगदीं साजण्यासारखी होती. कारण भ्रमराच्या अंगास काळा रंग लागल्यामुळें तो अगदीं काळाकुळकुळीत होऊन गेला होता. आणि सद्गुण चुना लागल्यामुळें पांढरा होऊन गेला होता. आणि तेव्हां दोघांचीही चर्या भयंकर दिसूं लागली होती. त्यामुळें जमलेले सर्व लोक भिऊन जाऊन कोणीही त्यांच्या अंगावर जाण्यास धजेना ! इतक्यांत भ्रमरानें व सद्गुणानें विचार केला कीं, अशा संधींत जर आपण पळून गेलों नाहीं तर, पुढें आपली फार फजिती होणार आहे. मग त्यांणीं एक मोठी भयंकर कर्कश आरोळी एकदम ठोकून ते त्या पुरभय्याच्या अंगावर धांवले. तेव्हां तो अगदीं भिऊन जाऊन मोठ्या तारांबळीनें तेथून जीव घेऊन पळून जाऊं लागला. त्यासरसे जमलेले लोकही घाबरून चहूंकडे चार पळून जाऊं लागले. आणि त्यांच्या मागें हीं दोन पिशाचें लागलीं.

पुरभय्या पुढें, त्याच्या मागें काहीं शेजारीपाजारी लोक, आणि त्यांमागें हीं दोन रंगीत पिशाच्चें पळत सुटलीं. तेव्हां त्या रस्त्यावर सर्व आळींतून मोठी गडबड होऊन गेली ! पुढें पळत असलेलीं माणसें “ भुतें मागें लागलीं आहेत, धांवा, धांवा; कोणी तरी धांवून सोडवा ” असा आरडाओरडा करीतच पळत सुटलीं होतीं. तेव्हां हा भयंकर प्रकार पाहून त्या गल्लींतून लोकांनीं पटापट आपलीं दारें कवाडें लावून घेतलीं. आणि कित्येकांनीं आपलीं कवाडें अद्याप उघडलीं नव्हतीं तरी ते आंतल्या आंत आंथुरणावर जागे होऊन लटलटा कांपूं लागले होते. त्यांना असें वाटूं लागलें कीं, न जाणो जरी आपले दरवाजे उघडे नाहींत तरी कदाचित् आपल्या घरांत भुतें शिरणार नाहींत कशावरून ? अशा प्रकारें त्या सर्व आळींत सर्वत्र मोठी गडबड उडून गेली. त्यावेळीं लोकांची आरोळी “ भूत भूत ! झिंद ! पिशाच्च ! अशी एकसारखी चालूं झाल्यामुळें ज्या खोलींत भ्रमर व सद्गुण कोंडून ठेविले होते, तेथील दोन शिपाईही जागे होऊन विचार करूं लागले कीं, आपले कैदी तर पळून गेले नाहींत ना ? पुढें खोली उघडून पहातात तों खरेंच ! मग त्यांची मोठी धांदल उडून जाऊन तेही त्या ओरडणाऱ्या मंडळीच्या मागोमाग पळत सुटले; व भुतांनीं आमचे दोन कैदी उचलून नेले ह्मणून सर्वांला ओरडत सांगत पळत जाऊं लागले. शिपाई मागें येत आहेत असें जेव्हां भ्रमरानें पाहिलें; तेव्हां आतां काय युक्ति करावी, याविषयीं त्याला मोठा विचार पडला. पळतां पळतां दो-

घांची मोठी त्रेधा उडून गेली. इतक्यांत तेथें एका मोठ्या वाड्याचा पुढला मोठा दरवाजा उघडा दिसला; तेव्हां त्यांत हे दोघेजण एकदम शिरून थेट माडीवर आणि तिसऱ्या मजल्यावर अंधेरांत, एका कोनांत व आडगळीच्या सामानांत जाऊन लपून बसले ! !

हें घर एका नामांकित व श्रीमंत वेश्येचें होतें. ही व हिची तरुण मुलगी अशा दोघीही चांगल्या गाणारणी होत्या. आज रोजीं प्रातःकाळीं नित्याप्रमाणें त्यांची मोलकरीण अंगण झाडण्याकरितां हातांत केरसुणी घेऊन दरवाजा उघडून बाहेर आली होती आणि पाठमोरी ओणवी होऊन झाडीत होती. इतक्यांत धामधूम होऊन मंडळी पळत आली ह्मणून ती तशीच हातांतल्या केरसुणी सुद्धां काय धांदल आहे कोण जाणें अशा भीतीनें तशीच दार न लावून घेतां घरांत पळून गेली. ती थेट मागील दारी गेली. इतक्यांत मागून हळूच भ्रमर आणि सद्गुण घरांत शिरून त्यांणीं दाराला आंतून कडी लावून घेतली. आणि मग ते ओसरीवरील जिन्यानें माडीवर गेले. तेथें दिवाणखान्यांत घरची मालकीण स्वस्थ पलंगावर निजलेली असून साखरझोपेंच्या अगदीं भरांत होती. पलंगाचा थाट वर्णनीय होता. आणि ही बाई स्वरूपानेंही चांगल्यापैकीं होती. अंगावरील वस्त्र मनसोक्त अस्ताव्यस्त झालेलें होतें. आणि तेथें सर्वत्र उंची अत्तरांचा व सुवासिक पुष्पांचा अगदीं घमघमाट पसरून गेला होता. हा थाट पाहून भ्रमरांच्या मूळ स्वभावाप्रमाणें तो तेथें गुंजारव करूं लागला. व त्यामुळें तेथून त्याचा पाय निघेना ! तो

त्या बाईच्या स्वरूपास, तेथील थाटास, आणि सुवासास वगैरे पाहून बराच गुंगल्यासारखा झाला. तेव्हां सद्गुणानें त्यांस इशारा केला कीं, आपण कोण, आलों आहोंत कोणाच्या येथें, प्रसंग कोणता आहे आपल्यावर आणि प्रस्तुतची वेळ कोणती आहे, वगैरे खुणा देऊन सावध केलें आणि त्यास तो तेथून पुढें घेऊन गेला. पुढें गेल्यावर आणखी एक दिवाणखाना त्यांना लागला. व त्यांतही एक तरुण स्त्री निजलेली होती. हिचें वय केवळ सोळा वर्षांचें असून स्वरूपानेंही फार उत्कृष्ट होती. मागें आह्मीं नीतीचें वर्णन केलें आहे त्याच तोडीची ही होती. किंबहुना तिच्यापेक्षांही कांकणभर अधिक ह्मटल्यास चालेल. तिला पाहून भ्रमराला त्यावेळीं आपल्या प्रियकरणीची ह्मणजे नीतीची आठवण झाली ! तेव्हां तो पुनः तेथून निघेचना. तेथें एक तिच्या उशाकडे मिरजेची सतार टांगलेली होती, ती पहातांच भ्रमराला एक गत वाजविण्याची लहर लागली ! परंतु सद्गुणानें त्याला त्यावेळीं तसें करूं न देतां थेट तिसऱ्या मजल्यावर घेऊन जाऊन मग तेथें दोघेही आंधारांत सामानसुमानाच्या आडगळींत स्वस्थपणीं लपून बसले.

इकडे मागें पळत येत होते, त्या दोन शिपायांनीं हीं भुतें त्या घरांत शिरतांना पाहिलीं होतीं. ह्मणून ते त्या दरवाजाच्या घराशीं येऊन दरवाजाजवळ हांका मारूं लागले व दार ठोठवूं लागले. तेव्हां त्या दंग्यामुळें घरची मालकीण जागी झाली आणि खालीं येऊन दार उघडून दारांत उभी राहिली. तेव्हां शिपायानें

सांगितलें कीं, तुमच्या घरांत दोन भुतें आमचे दोन कैदी घेऊन शिरलीं आहेत. तेव्हां आह्मांस घरांत शिरून झाडा घेऊन त्यांना धरूं द्या ! दुसरे लोक आणखी तेथें जमा झाले ते ह्मणूं लागले कीं, तुमच्या घरांत झिंद गेले ( मुसलमान जातींचीं पिशाचें ) कोणी ह्मणत चोर शिरले आहेत, याप्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं असें सांगूं लागले. तेव्हां घरच्या मालकीणीस यांपैकीं कांहींच खरें वाटेना. मोलकरणीनें तर मुळींच कानावर हात ठेवले कीं, आजून मीं दारच जर येऊन उघडलें नव्हतें तर चोर किंवा भुतें घरांत शिरलीं कशीं ? शेवटीं सूर्योदय होऊन चांगलें ऊन व उजेड झाल्यावर तेथें पोलीसचा अंमलदार आला, ह्मणजे ज्यानें भ्रमरास, व सद्‌गुणास खोलींत कोंडून ठेवलें होतें, तो आला व घरांत जाऊन भुतें आहेत किंवा कोण शिरलें आहे तें पाहूंद्या; ह्मणून त्या बाईजवळ खटपट करून पाहिलीं. परंतु त्याचीही तिच्याजवळ दाद लागली नाहीं. कारण या बाईस दरबारांतील एका मोठ्या मनुष्याचा ह्मणजे ज्याचा तूर्त चालू काळ आहे, त्याचाच आश्रय आहे असें त्याला माहीत होतें. तात्पर्य शेवटीं सर्व लोक तेथून निघून गेले. आणि बाईही घरांत जाऊन आपल्या नित्याच्या उद्योगास लागली.

इकडे भ्रमर आणि सद्‌गुण त्या घरांत तिसरे मजल्यावर दिवसभर उपाशीच होते. तथापि त्यांना तेथें लोणचें, पापड, सांडगे, मोरआंबा, मोरआंवळा वगैरे पदार्थ यथेच्छ खावयास मिळाले. त्यावरच

त्या दिवशीं त्यांणीं आपल्या भुकेची पारणा केली. परंतु पाणी मात्र प्यावयास मिळालें नाहीं. तेथें तिसरे मजल्यावर प्यावयाचें पाणी कोठून मिळणार आहे ? असो. याप्रमाणें दिवस गेल्यावर रात्रीं लवकरच दोघी मायलेकी आपल्या मोलकरणीसहित दारांला कुलपें लावून ठेवून बाहेर निघून गेल्या. त्या बाहेर जाण्यापूर्वी ब्राह्मणाची बाई येऊन स्वयंपाक करून ठेवून गेली होती. वाड्यांतून गाणें व नाच करून आल्यावर मग जेवावें, असा त्यांचा विचार होता. कारण गाण्या नाचण्याचीं कामें जेवल्यावर चांगलीं होत नसतात. असो. याप्रमाणें घरची मालकीण बाहेर निघून गेल्यावर हे दोघे तिसऱ्या मजल्यावरून खालीं उतरले. आणि तेथें असलेला मेणबत्तीचा दिवा एका हातांत घेऊन ते खालीं उतरून स्वयंपाक घरांत गेले. तेथें स्वयंपाकाची सिद्धता होतीच. मग पहिल्यानें परसांत जाऊन तेथें पाण्याचा मोठा हौद भरलेला होता त्या ठिकाणीं त्यांनीं स्नानेंवगैरे केलीं. व रंगानें भरलेले सर्व कपडे अंगावरील धुवून टाकिले. आणि मग पुनः स्वयंपाक-घरांत येऊन यथास्थित जेवणें आटोपून घेतलीं. त्यानंतर दिवाणखान्यांत वरती येऊन थंडीचे दिवस असल्यामुळें हंतरण्यास व पांवरण्यास यथास्थित घेतलें. आणि पुनः पूर्ववत् तिसऱ्या मजल्यावर जाऊन यथास्थित निजून राहिले.

सुमारें अकरा वाजतां रात्रीं नाच व गाणें आटोपून मायलेकी घरीं आल्या. आणि कपडे व दागिने का-

ढून ठेवून स्वयंपाक–घरांत भोजनाकरितां गेल्या तों तेथें काय आहे? स्वयंपाक सगळा चट्ट झालेला असून भांडीं रिकामींच !! आसपास पाहिलें तों उष्टीं ताटें दोन पडलीं असून पाट मांडलेले व तांबे–पंचपात्र्या मांडलेल्या तश्याच आहेत !! हा चमत्कार पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें! तेथें जेवलें कोण त्याविषयीं कांहींच निर्णय होईना !! शेवटीं त्यांना अशी भ्रांति उत्पन्न झाली कीं, आह्मींच तर जेवण करून गाण्याला नाहींना गेलों? म्हणून त्या आपल्याच पोटावरून हात फिरवून पाहूं लागल्या तों, पोटें रिकामीं! मग त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना येण्यास आरंभ झाला. शेवटीं सकाळीं लोक ह्मणत होते त्याप्रमाणें भुतें किंवा चोर तर नाहींना आपल्या घरांत शिरले; असें त्यांस वाटूं लागलें! शेवटीं त्यांनीं हातांत दिवे घेऊन सर्व घरांत शोधलें, तरी कांहींएक विशेष प्रकार दुसरा त्यांच्या ध्यानांत आला नाहीं. तेव्हां आपणच गाण्यास जातांना जेवून गेलों होतों, असें त्यांनीं आपसांत ठरवून शेवटीं त्या निराश होत्सात्या तश्याच उपाशी पोटीं पलंगावर जाऊन निजून राहिल्या.

असो. अशा प्रकारच्या युक्तीनें आणि शहाणपणानें त्यांनीं सुमारें एक महिनाभर तेथें दिवस काढिले. घरांतील खाण्याचे पदार्थ रोजरोज नाहींसे व्हावे, त्याचप्रमाणें आठ चार दिवसांनीं धोब्यानीं धुवून आणून ठेवलेले कपडे नाहींसे व्हावे, पाण्यांनीं भरलेल्या घागरी रिकाम्या व्हाव्यात; त्याचप्रमाणें अत्तराच्या भरलेल्या कुप्या रिकाम्या व्हाव्यात, आणि

फुलांचे हार गजरे ठेवलेल्या ठिकाणाहून नाहींसे व्हावे, येणेंप्रमाणें कांहींना कांहीं तरी चमत्कार रोज घडूं लागले. तेव्हा घरांतील माणसांस खचीत संशय येऊन चुकला कीं, आपले घरांत भूत शिरलें आहे खचित!! मग तिनें अंगारे धुपारे वगैरे बंदोबस्त पंचाक्षऱ्यास बोलावून आणून पुष्कळच केले. दारांच्या उंबरवठ्यांतून खिळे ठोकून बंदोबस्त केला. तथापि चमत्कार होणें बंद झालें नव्हतें.

या प्रकारें एक महिना लोटल्यावर एके दिवशीं रात्रीं घरींच मंडळी जमून गाण्या नाचण्याचा मोठा समारंभ झाला. गाणें चालूं होतें, तेथपर्यंत भ्रमरास फार आनंद झाला होता. व तेथें जो अत्तरांचा घमघमाट व पुष्पांचा सुगंध भरून राहिला होता, त्या योगानें त्याला फारच संतोष होऊन गेला होता. सद्गुणासही तें गायन व नृत्य फार चांगलें आवडलें; परंतु तेथें चाललेलीं थट्टामस्करीचीं फाजील भाषणें, आणि मंडळीचा मनःपूत धुमाकूळ हें आवडलें नाहीं. कांहीं वेळपर्यंत गंमत झाल्यावर मग साजिंदे वगैरे लोक आणि गाणें श्रवणास असलेले दुसरे सर्व लोक हे आपआपल्या घरोघर निघून गेले. फक्त घरच्या मालकिणीचे प्रियकर मात्र राहिले! मग घरची मालकीण, तिची लेक, आणि ते त्यांचे प्रियकर या त्रिवर्गांचीं जीं भाषणें झालीं, तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**आवडाजी**:—कसें काय पंत! मग त्या मोत्याच्या कंठ्याचें कसें काय केलें? आतां मात्र मला वाट पाहण्याची बिलकूल सोय नाहीं. मी साफ सांगतें पहा.

हें काय मेलं! जेव्हां तेव्हां आपले वायदे आहेतच!! मेले वायदे तरी कधीं संपावेत?

**पंतः**—पण मला या महिन्यांत अगदीं फुरसत तरी झाली कां? तुम्ही तर पहातच आहां. घरीं जेवायला जायची तरी फुरसत असते काय? एकेक दिवस घरीं जायला देखील होत नाहीं? जेवणखाण सुद्धां वाड्यांतच! त्यांत अलीकडे या महिन्यांत दरबारचें काम फार वाढून गेलें आहे.

**आवडाजीः**—कां बरें, दरबारचें काम इतकें अधिक वाढायला काय झालें? आणि वाढलें असलें तरी तुम्हाला काय त्याचें? अगदीं हातानें थोडेंच काम करावें लागतें! शेंकडों कारकून हाताखालीं आहेतच. पण का हो पंत, आठरा महिन्यांची म्हणे मुदत मिळाली आहे आपल्या सरकाराला; ही खरी गोष्ट काय?

**पंतः**--ऊंः त्यांत काय अर्थ आहे! असल्या मुदतीला आणि सुद्दतीला कोण विचारतो आहे!! हे सारे खेळ त्या पगडीवाल्याचे आणि त्या तांबडतोंड्याचे आहेत, आह्मला समजत नाहीं कीं काय? पण ह्मणावें बच्चारामजी ( मिशांवर हात फिरवून ) तू ज्याच्या जिवावर उड्या मारीत आहेस त्या लालतोंड्यांचीच येथून उचलबांगडी करण्याचा विचार चालू झाला आहे. तेवढें झाल्यावर मग पाहतों तुझी काय मजा आहे ती!! गुलामानें फार चिवडा करून टाकला आहे अगदीं! फार काय सांगावें, वाड्यांत आज महाराजांच्या पानांत भाजी कोणती होती, ही देखील बा-

तमी सकाळीं साहा वाजतां आपली रेसिडेंसींत ठेवलेली आहे. असा अनर्थ करून सोडलेला आहे !

आवडाजीः—होय, त्यांत कांहीं लटकें नाहीं. राहाशतींतले सारे लहान थोर लोक आपले त्याच्या घरीं पडलेले असतात. तें असो; परंतु आतां शेवटीं दिवाणगिरी कोणाला देण्याचें ठरण्यांत आलें ? मास्तराला मिळणार ह्मणतात; ही खरी गोष्ट काय ? या दोन वर्षांत मेले दिवाण तरी किती झाले !

पंतः—छत् ! मास्तराच्या हातून हें फाटलेलें आभाळ शिवलें जातें काय ? तो आपला गुळाचा गणपती ! !

आवडाजीः—मग तुह्मीच कां पतकरीत नाहीं आपली दिवाणगिरी ? तुह्मी दिवाण झालात ह्मणजे मग बरें होणार आहे आमच्या सारख्यांना.

पंतः—महाराजांच्या मनांत फार आहे मींच दिवाण व्हावें ह्मणून ! पण मींच त्यांना ही गोष्ट करूं देत नाहीं. कारण मीं आतांच दिवाण होणें बरोबर नाहीं. सर्व स्वस्थता झाल्यावर मग दिवाणगिरी काय आपल्या घरचीच आहे.

आवडाजीः—शाबास ! याचें नांव शाहाणपण. पंत, खरें पुसाल तर मी तुमच्या शहाणपणालाच पाहून इतकी तुह्माला भाळून गेलें आहे. ( गालांत हांसेत व पदर वगैरे सावरून लाजल्यासारखे हावभाव करते. )

पंतः—आणि खरोखर माझ्या शहाणपणाची परीक्षा याच घरांत होत आहे, ह्मणून मी याच घरांतील

मनुष्यावर इतका फिदा होऊन गेलों आहे. ( तिच्या हानुवटीला हात लावतो. )

**आवडाजीः**—पण पोरीची तरी कांहीं लाज ठेवा !

**गुंफा०**—मला बाई आतां झोंप येते. ( जांभया देऊं लागते. )

**पंतः**—ठीक आहे, आंधळा डोळेच मागतो. जा, जाऊन नीज जा ?

**आवडाजीः**—मेलं अगदींच निसंग होणं चांगलं नाहीं !

**पंतः**—यांत काय आह्मीं निसंगपणा केला ? दोघांत आतां तूं कां तिसरी, असें कांहीं स्पष्ट ह्मटलें काय ? बोलणें वांकडें लागूं लागल्यावर मग काय उपाय आहे.

**गुंफा०**—पण तुह्मी इतकें स्पष्ट सांगेपर्यंत मी कशाला राहतें आहे इथें ? मी आपली जाऊन आतां निजणारच ! पण मला तेवढी एक गोष्ट विचारायची आहे ह्मणून मी बसलें आहे.

**पंतः**—मला कोणती गोष्ट विचारायची आहे ? रात्र फार झाली ह्मणून मी देखील आतां घरीं जाणार आहे.

**गुंफा०**—विचारणार होतें येवढेंच कीं, त्या हिऱ्याच्या तन्मण्याचें काय झालें ? कां तो सोनारच गिळून बसला ? कां मुळांत ही तुमचीच लोणकढी थाप आहे ?

**पंतः**—तुह्मी वाड्यांत येण्याचें कबूल करीत नाहीं मग तन्मणी कसा मिळणार ?

**गुंफा०**--असें असेल तर मला त्या तन्मणीची मुळींच जरूर नाहीं. नुस्ता तन्मणीच तो काय; परंतु आणखी लाख रुपयांचें जवाहिर मिळत असलें तरी मी त्या गोष्टी करितां ह्मणून वाड्यांत पाय ठेवणार नाहीं, समजला ? " तुह्मीच दोन चार वेळां ह्मणाला, कीं त्या दिवशीं गाणें व करवा नाच पाहून दरबार फार खुष झालें असून त्याबद्दल हिऱ्यांचा तन्मणी बक्षीस मिळणार आहे, व तो सोनाराकडे तयारही होत आला आहे. " या तुमच्या ह्मणण्यावर ही मीं गोष्ट तुमच्या जवळ काढली.

**आवडाजीः**--पण कारटे, गेलीस एक दिवस वाड्यांत ह्मणून काय झालें ? आपल्याला पैशाची गरज ! आपण जर रात्रंदिवस चांगला, रूपवान्, तरुण, गुणवान् असाच कोणी भेटेल तेंव्हांच त्याची गांठ घेऊं, ह्मणून नियम करून बसलों तर आपलें चालणार आहे काय ? बोलून चालून आपण रोजगारी लोक, आपल्याला उंच, नीच, काळा गोरा, लंगडा, पांगळा, लहान, मोठा, लुच्चा, सोदा, वगैरे सर्व सारखे ! पैसा मिळाला ह्मणजे झालें ! ! कां बेरें पंत, मी ह्मणतें तें खरें कीं खोटें ? फार दूर दूर जायला नको. येथच्या येथेंच उदाहरण पहा; मींच जर असा विचार पूर्वी पासून ठेवला असता, तर आजला लाख रुपयांची मत्ता मजजवळ झाली असती काय! आणि आतां खुशाल तुमच्या एकट्याच्याच जिवावर पतिव्रताधर्मानें राहतां आलें असतें काय ? तुह्मीच सांगा.

**पंतः**--तुमचें बोलणें अक्षरशहा खरें आहे.

आणि माझाही अभिप्राय तोच आहे. कारण हे दिवस आतां गुंफेचे पैसे मिळविण्याचे आहेत. आज एक वर्ष झालें, दरबारच्या मनांतून खुद्द गुंफा आपली व्हावी असें आलें असून, गुंफा दाद देत नाहीं; तेव्हां या प्रालब्धाला काय ह्मणावें ? दुसऱ्या रांडा हिच्याहून सुंदर, हिच्याहून तरुण, आणि हिच्याहून गुणवान् असून त्या वर्षोंवर्ष दरबारचा आश्रय मिळावा ह्मणून देवाला नवस करून हरतऱ्हेच्या खटपटी करीत आहेत, तरी त्यांना हा योग जमून येत नाहीं. आणि आमची ही गुंफा आपली खुशाल असल्या आश्रयाला मनगट दाखविते आहे याला काय ह्मणावें ? ठीकच आहे. दरबारचा आश्रय ह्मणजे राजाश्रय मिळणें हें प्रालब्धीं पाहिजे. एखाद्या भिकारड्याची गांठ पडण्यास काय उशीर लागणार आहे.

**आवडाजी**:—अहो; आज एक वर्ष झालेंना हिला समजूं लागून, आजपर्यंत जर हिनें तुमचें व माझें ऐकलें असतें तर लाखो रुपयांची प्राप्ति आजला घरांत येऊन चुकली असती कीं नाहीं ?

**गुंफा**:—मीं एकवेळ सांगितलें आहे कीं, असली गोष्ट मी कधींच करणार नाहीं ह्मणून. फक्त गाणें अणखी नाचणें इतक्या कामापुरती मी तुमची ताबेदारीण आहें.

**आवडाजी**:—तूं अगदीं जन्मपर्यंत आतां ब्रह्मचर्य व्रतानेंच वागशील नाहीं ? आतां अशा गोष्टी सांगत आहेस. पण मग एखाद्या काळुंद्या भिल्लावरोबर देखील निघून जाशील. आजून तर तुझ्या आंग-

ठ्यास देखील आग लागली नाहीं. आणि आतांच नेमन्‌धर्म कशाचा करतेस ! ! !

**गुंफाः**—माझ्या मनायोग्य स्थळ मिळेल त्या दिवशीं मी माझें सर्वस्व अर्पण करीन, परंतु केवळ द्रव्याकरितां तसें मी करणार नाहीं.

**आवडाजीः**—( रागावून ) ऊठ सटवे माझे जवळून ! ! मोठी आली आहे ब्रह्मज्ञान सांगायला ! जीभ कापून टाकीन ठाऊक नाहीं आजून ! ! ! दमधर रांडे; तुझा असा नेम आहे तर मी आतां हट्टासच पडणार आहें तुझ्याकरितां ! !

**गुंफाः**—मी विषाचा पेला पिऊन निजून राहीन; परंतु असली गोष्ट तुमची ऐकणार नाहीं. ( रागानें उठून जाऊन पलंगावर निजून राहते. )

**पंतः**—जाऊंद्याहो आवडाजी. तिच्याच छंदानें जेव्हां ती गोष्ट बेतावर येईल तेव्हां येईल. उगीच आग्रहानें कांहीं होणार नाहीं. चला आतां आह्मालाही द्या रजा. आतां बारावर दोन वाजायचा सुमार येऊन ठेपला. आणि सकाळीं लवकरच उठून वाड्यांत जायचें आहे उद्यां.

**आवडाजीः**—या तुमच्या रंगड्या आज मी ऐकणार नाहीं. समजला ? म्हंटलें आज महिना झाला बरोबर ! कांहीं वाटतें कां मनाला शरम ? ( आंगावरचें धोतर धरते ) आपण मात्र रोज रोज नवीं पक्वान्नं खावीं ? आणि लोकांना महिना महिना उपास पडला तरी चिंता नाहीं. ना ? आज माझा प्राण गेला तरी चिंता नाहीं; परंतु जाऊं देणार नाहीं, मेलों पुरु-

यांची जातच कसायाच्या ब्रिदाची असते कीं काय कोण जाणें. निष्ठुर मेले अगदीं !! ( डोळ्यांतून पाणी काढतें. )

**पंतः**—दुसरें कांहीं नाहीं आणखी; परंतु पाहटे पांच वाजतां स्नान संध्या आटोपून वाड्यांत जायचें आहे ह्मणून ! उद्यां तो मुंबईहून पार्शी नवा दिवाण यायचा आहे. लवकर गेले पाहिजे.

**आवडाजीः**—मी पांच वाजतां जागें करीन मग तर झालेंना ? पण एक झोंप घेतल्याशिवाय जाऊं देणार नाहीं.

**पंतः**—उद्यां येईन, पण आज सोडा.

**आवडाजीः**—उद्यां सोडीन; पण आजः—

प्रिय वाचकहो, इतकें भाषण झाल्यावर मग पंताचा पाय पुढें सरकला नाहीं हें सांगणें नको. ते पिवळी शालजोडी पांघरून तेथें पलंगावर निजले. मग आवडाजीनें विचारलें कीं, आज सकाळची व्यवस्था कशी काय साधली, उत्कृष्ट बेत साधला कीं नाहीं ? मी कसबीण आहे अगदीं असें कांहीं त्यां विचारिला वाटलें म्हणून नाहीं. माझा बोलण्या चालण्याचा थाट व सभ्यपणा, गरतपणाचा हावभाव आणि सोंगाची संपादणी हुबेहुब पाहून त्यांना खचीतच वाटलें कीं, ही कोणा सभ्य थोरा मोठ्यांची बायको आहे. मग लागलींच त्या माझ्याबरोबर घराबाहेर निघून गाडींत बसल्या. आणि मग मीही मोठी जलदी करून त्यांना त्यांच्या नेमलेल्या ठिकाणीं पोंचवून घराकडे तावडतोब निघून आलें. " आवडाजीचें बोलणें चाललें होतें, तेव्हां पंत झोंपेनें अगदीं गुंगून गेले असून अर्ध्या झों-

पेच्या स्थितींतच तिला म्हणूं लागले कीं, मला पूर्ण भरंवसा होताच कीं, तें काम तुमच्याशिवाय चांगलें चोख होणार नाहीं. तेंच अखेर खरें झालें." आतां या कामाबद्दल तुम्ही जें मागाल तें बक्षिस तुम्हास मिळेल. सध्यां या पंताचा सारा देहच तुम्हाला अर्पण केला आहे." याप्रमाणें दोघांचें बोलणें चाललें असतां मग दोघांसही डोळा लागून गेला.

**पांचवा भाग समाप्त.**

---

# भाग ६ वा.

## नर्मदा तटाक आणि टोकरास्वामी.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ॥
देह कष्टविती उपकारें ॥ १ ॥

—तुकाराम.—

अगोदरच नदीतटाकें फार रम्य स्थळें असतात; त्यांत महानदी असून एखादें क्षेत्राचें वास्तव्य त्या ठिकाणीं असल्यास मग तर त्या स्थळाची रम्यता वर्णन करावी तेवढी थोडीच. आपल्या देशांत ज्या पुण्यपावनी भागिरथी आदिकरून पांच सात महानद्या आहेत त्यांतच नर्मदानामक महानदीचीही गणना आहे. ही नदी दक्षिण आणखी उत्तर हिंदुस्थान देशाची

मध्य मर्यादा असून भडोच नामक (भृगुऋषीचें स्थळ) शहराजवळ पश्चिम आरबी समुद्रास जाऊन स्वतंत्रपणानें मिळाली आहे. हिच्या तीरीं बहुत पुण्यदायक क्षेत्रें व तीर्थें असून अनेक प्राचीन सिद्ध ऋषींचे आश्रम आहेत. माळव्यांतील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग ओंकारमहाबळेश्वर हें पवित्रस्थान नर्मदानदीच्याच कांठीं आहे. तेथें या नदीला मोठा खोल डोह झालेला असून त्यांत शंकरस्वरूपी लहान मोठे बाण सांपडतात. तात्पर्य, नर्मदेच्या उभय तीरांवर अनेक प्रकारें चमत्कारिक स्थळें आहेत, तीं या ठिकाणीं आम्हीं कोठपर्यंत वर्णन करावीं? तसें करूं म्हटल्यास निराळेंच एक पुस्तक होणार आहे. परंतु आपल्याला प्रस्तुत निराळेंच या महानदीचें माहात्म्य वर्णन करण्यास स्थळ व वेळ कोठें आहे? तूर्त आपण एका राजधानीच्या उलाढालींत गुंतून गेलों आहों; तेथून आपल्याला नर्मदातटाकीं जाऊन स्वस्थपणीं तिचा मनोरम देखावा पहाण्यास फुरसत आहे कोठें बरें? तथापि आपला थोडा कार्यभाग सध्यां तिकडेही जाऊन पोंचला आहे. ह्मणून त्यांतले त्यांत थोडा अल्पावकाश करून आपण चांदोद करनाळी नामक प्रसिद्ध नर्मदातटाकच्या क्षेत्रांत अंमळ प्रवेश करूं?

गायकवाडसरकारचा बराच मुलूख नर्मदेच्या कांठावर जाऊन पोंचला आहे व कित्येक जागीं बहुतकरून इंग्रजांची आणि गायकवाडांची ही नदी सरहद्दही होऊन राहिली आहे, त्यांत गायकवाडांच्या अमलांत प्रसिद्ध चांदोद करनाळी नामक क्षेत्रें बरींच वसलेलीं

आहेत, करनाळी क्षेत्र पूर्वींचा प्रसिद्ध ऋषि जो कण्व त्याचें तपश्चर्या करण्याचें हें स्थान होय असें ह्मणतात. हाच ऋषि आपला परमरसिक महाकवि जो कालिदास त्याच्या आवडत्या शकुंतला नामक प्रिय नाटकांतील मुख्य नायकिणीचा बाप! असो. आतां आपण करनाळी क्षेत्राची थोडीशी शोभा पाहून मग या क्षेत्राकडे कां वळलों याचाही विचार करूं. अहाहा! करनाळी क्षेत्राची शोभा मोठि वर्णनीय आहे. तेथें नर्मदेचें पात्र मोठें भव्य असून पलीकडे व मध्यें बेटावरील देवस्थानास जाण्यास होडींत बसून फिरावें लागतें. होडींत बसल्यावर तीरावरचा देखावा पाहिला ह्मणजे मोठा मजेदार दिसतो. कै० श्रीमंत गोपाळराव मैराळांनीं येथें नर्मदेला एक सुंदर घांट बांधला असून मोठें देवालय बांधिलें आहे. त्याचें सौंदर्य होडींत बसून पाहिलें ह्मणजे फार नामी दिसतें. या थोर पुरुषाची कीर्ति व नांव नर्मदातटाकीं अजरामर होऊन राहिलें आहे. नर्मदातीरावर या थोर पुरुषाचा पैसा पुष्कळच खर्ची पडला आहे. ठिकठिकाणीं धर्मशाळा, घांट, देवालयें, अन्नसत्रें, आणि नगारखानें त्यांच्या नांवाची साक्ष देत आहेत. असो. जसें नर्मदेचें दर्शन, स्नान, पान, हें नुस्तें पुण्यकारक आहे त्याचप्रमाणें या सुवंद्य पुरुषाचें नुसतें नांव घेणें देखील पुण्यप्रद होय यांत संशय नाहीं. ह्मणून या पवित्र जागेचें वर्णन करीत असतां आह्मास असल्या थोर पुरुषाची आठवण होणें हें सहाजिकच होय. असला मंगलमूर्ति मोहरा नुकतांच मंगलस्वरूप या देशांत झाला होता,

हेंही येथें सांगणें वावगें होणार नाहीं, ठीकच आहे. ज्या ठिकाणीं धर्माचा छल, आणि नीतीला भ्रष्ट करण्याची खटपट चालू झाली, त्या ठिकाणीं या नीतिमान्, सदाचरणी, व धर्मात्म्या पुरुषांची गुजराण कशी चालणार आहे ? त्यानें पुढील भविष्य जाणून अगोदरच दिवाणगिरीच्या जागेला, आपल्या कुबेरातुल्य संपत्तीला, आणि बडोदें शहराला अखेरचा नमस्कार ठोकून आपला अक्षय आनंदरूप कैलासवास पत्करिला होता ! !

असो, सांगायाचें तात्पर्य इतकेंच कीं, करनाळी क्षेत्र व तेथील रमणीय नर्मदेचा प्रवाह पाहून मनाला फार आनंद होऊन जातो. कसाही उदास व दुःखीकष्टी मनुष्य असला तरी या नर्मदेच्या घांटावर जाऊन क्षणमात्र बसला ह्मणजे त्याचा सर्व शीणभाग हरून गेल्यावांचून रहात नाहीं. संसारतापानें तप्त झालेले प्राणी शांतिसुख मिळविण्याकरितां तेथें पुष्कळच जाऊन राहिले आहेत. त्यांत कोणी संन्यासी, कोणी जती, कोणी परमहंस, कोणी जटाधारी व धूम्रपान करणारे असेही कोणी आहेत. आणि नर्मदेच्या गुहेंतून ध्यान लावून बसलेले व समाधिस्थ बसलेले असलेही कित्येक महर्षी अद्यापपर्यंत आहेत. त्यांच्या त्या पवित्र व रमणीय गुहा, सभोंवतालची विस्तीर्ण व भव्य वनश्री, नाना प्रकारचे मोठमोठे गगनचुंबित वृक्ष, तेथें सुटत असलेले वनपुष्पांचे सुवास आणि ऐकूं येत असलेल्या हिंस्र पशूंच्या

भयंकर आरोळ्या इत्यादि प्रकार पाहून नवख्या मनुष्याच्या मनाची स्थिति क्षणभर कांहीं निराळ्याच प्रकारची होऊन जाते. ठीकच आहे. नेहमी शहरांतून व लोकवस्तीच्या कचाट्यांतून राहून मनावर घडून आलेले सहवासाचे परिणाम या ठिकाणीं गेल्याबरोबर एकदम जेव्हां बदलून जातात, तेव्हां मनाची स्थिति क्षणभर कांहीं निराळ्याच प्रकारची होणें हें अगदीं साहाजिकच आहे. अशा ठिकाणीं गेल्यावर आपण एकाद्या निराळ्या सृष्टींत येऊन पोंचलों आहों असें मनुष्याला वाटतें.

असो. अशा रम्यस्थळीं टोकरास्वामी नांवाचे एक प्रसिद्ध विद्वान, योगी आणि सर्वगुणसंपन्न असे संन्यासी राहत होते. हे राजयोगी असून मोठे परोपकारी आणि राजकार्यधुरंधर पुरुष असत. प्रस्तुत बडोदें मुक्कामीं चालू असलेली राजकीय स्थिति यांस सर्व बसल्याजागींच कळून येत असे. बडोद्यांत नित्य काय विशेष गोष्ट घडे, ती यांना ताबडतोब येथें समजून येत असे. परंतु उपाय काय? त्यांना स्वतःला तेथें जाऊन कांहीं खटपट करण्याचें असें मुळींच कांहीं कारण नव्हतें. तथापि होत असलेली अव्यवस्था ऐकून त्यांचा जीव तिळतिळ तुटत असे. गायकवाडी पुरुषांचें कल्याण असावें, गायकवाडी गादी चिरकाळ सुखी असावी, त्या राज्यांत अन्यायाच्या गोष्टी घडून नीतीला व धर्माला धक्का न बसावा एवढीच त्यांची बळकट इच्छा होती.

आणखी दुसरी कोणतीही आशा त्यांना या जगीक व्यवहारापासून नव्हती. अलीकडे धर्माजीरावाच्या कुटुंबाची जी बडोद्यांत दुर्दशा उडून गेली होती, ती त्यांच्या सर्व कानावर गेली होती. त्यामुळें तर त्यांना फारच वाईट वाटून राहिलें होतें. कारण धर्माजीरावाचा आणि टोकरास्वामींचा फार जुना मोठा अप्रतिम स्नेह होता. आणि धर्माजीरावांची कन्या जी नीतिबाई तिजवर तर स्वामींचा फारच लोभ होता, शेवटीं या गोष्टीस काय उपाय करावा या काळजींत रात्रंदिवस स्वामी निमग्न झाले असतां एके दिवशीं प्रातःकाळीं अनायासेंच तो योग स्वामीपुढें प्रत्यक्ष येऊन उभा राहिला. तो प्रकार असाः—

प्रातःकाळीं आठ वाजण्याचा सुमार झाला होता. घाटांवरून कोणाचीं स्नानें, कोणाची संध्या, कोणाचीं वस्त्रें धुणें इत्यादि कामें चाललीं होतीं. कित्येक गोमुखींत हात घालून जप करीत बसले होते. त्यांचीं तीं भस्मचर्चित शरीरें फार भव्य व तेजःपुंज दिसून येत होतीं. कित्येकांच्या गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा शोभत होत्या. व कांहींजण तेथें पार्थिव पूजा करीत बसले होते. नागरिक स्त्रिया मस्तकावरून कलश घेऊन बोलत चालत व एकमेकींचा हात धरून पाण्याला येत जात होत्या. मुख्य टोकरास्वामी मठांत कृष्णाजिनावर ध्यान लावून बसले होते. त्यांच्या पुढें योगवासिष्ठ नामक वेदांतिक ग्रंथ व्यासपीठावर मांडिलेला होता. आणि

पाचपन्नास श्रोते मंडळी वेदांतश्रवणास येऊन बसलेली होती. त्यांत कांहीं संन्यासी भगवीं वस्त्रें परिधान केलेले होते. व पुष्कळ गृहस्थाश्रमीही विरक्तवृत्ति धारण केलेले होते. मठांतील जागा अगदीं चहूंकडे स्वच्छ असून मोठी रमणीय होती. येथून बसल्या बसल्याच नर्मदेचा गंभीर प्रवाह सहज दृष्टिगोचर होत होता.मठांत नानाप्रकारच्या सुवासिक पुष्पवटिका लावलेल्या होत्या, त्यांचा सुगंधयुक्त दर्वळ तेथें सर्वत्र पसरून गेला होता. जिकडे तिकडे तुळसीचीं वनें व बिल्व वृक्ष लागून गेले होते. नगरांतील भाविक स्त्रिया येऊन नित्य प्रातःकाळीं स्वामींचें दर्शन घेत असत, व मठांत चहूंकडे रंगवल्लिका ह्मणजे रांगोळी काढीत असत; तेणेंकरून मठांत चहूंकडे मोठी मनोरम शोभा दिसून येत होती. ठिकठिकाणीं स्वामींच्या भगव्या छाट्या व पांथस्थ ब्राह्मणांचीं धोत्रें वाळत घातलेलीं असत; त्यामुळें नवीन पाहणारास या स्थळाची कांहीं अपूर्व शोभा दिसून येत होती. मठाचे मागील भागीं शेंपन्नास पात्रांचा स्वयंपाक होऊन राहिला होता.

याप्रमाणें टोकरास्वामींच्या मठांत सर्वत्र अनंदमय स्थिति असतां एकाएकीं स्वामींच्या संनिधानीं एक डोसक्यास फेटा बांधलेला व पायांत विजार घातलेला मनुष्य येऊन साष्टांग नमस्कार घालून हात जोडून पुढें उभा राहिला. स्वामी ध्यानस्थ होते, ह्मणून प्रथम त्यांची दृष्टि या मनुष्याकडे गेली

नाहीं; तेव्हां अर्थात त्या मनुष्याला फ[illegible] तसेंच उभें रहावें लागलें. कांहीं वेळानें स्वामीनीं नेत्र उघडून पाहिलें तों समोर एक मनुष्य हात जोडून उभा आहे, असें दिसलें. इतक्यांत त्या मनुष्यानें आणखी एक वेळ साष्टांग नमस्कार घातला! तेव्हां स्वामीनीं कोण, कोठील, तुह्मी नवेच येथें आल्यासारखे दिसतां; नमस्कार पुरे झाले, असें ह्मणून उठून बसण्यास आज्ञा दिली. तेव्हां तो गृहस्थ पुन्हां उठून उभा राहिला. स्वामीनीं त्याच्या तोंडाकडे न्याहाळून पाहिलें. त्याचें तोंड दुःखानें, निराशेनें आणि काळजीनें अगदीं फिक्कट होऊन गेलें होतें तो, आणि त्याचा पोषाकही अगदीं गरिबीचा होऊन इतर होता तरी महाराज दीनदयाळु टोकरास्वामीनीं या गृहस्थाला एकदम ओळखलें! आणि मग त्यांच्यानें धीर धरवला नाहीं. ते सोंवळ्यांत होते तरी तसेच आपल्या आसनावरून उठले आणि तसेच धडक पुढें धांवत जाऊन त्यांनीं त्या गृहस्थाला आपल्या हृदयाशीं कवळून धरिलें! तेव्हां त्या गृहस्थानेंही आपल्या दोन्ही हातांनीं स्वामींस बळकट स्नेहालिंगन दिलें!! उभयतांच्या नेत्रावाटें प्रेमाश्रूंचे पूर चालले होते, त्यामुळें प्रेमजीवनेंकरून एकमेकांस एकमेकांनीं सचैल स्नान घातलें! अहाहा! खऱ्या मित्रधर्माचा आणि खऱ्या स्नेहसंबंधाचा प्रभाव कांहीं निराळाच आहे. तो वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? अथवा त्याची किंमत तरी कोण करील?

मित्रहो, टोकरास्वामीसारख्या समर्थ राजयोग्यानें ज्यांस आपण होऊन उठून प्रेमालिंगन दिलें, असा हा पांथस्थ गृहस्थ येथें कोण आला असावा बरें? बहुतकरून तुह्मांस कांहीं त्याबद्दल कल्पना करतां येणार नाहीं ह्मणून मीच स्पष्ट करून सांगतों कीं, तो आपला ओळखीचा बडोद्यांतील दुर्दैवी मित्र धर्माजीराव दाभाडे होय. त्याची आणि टोकरास्वामींची फार जुनी ओळख व स्नेह होता हें मीं मागें तुह्मांस सांगितलेंच आहे. आणि अलीकडे त्याच्याविषयीं काय उपाय करावा ह्मणून स्वामी काळजींत पडले हो[illegible] हेंही तुह्मांस माहीतच आहे. असो. स्वामीनीं [illegible]ींच त्याला आश्वासन दिलें कीं, "तुह्मीं आतां स्वस्थपणें येथें मजपाशीं राहावें. तुह्मांस कोणत्याच गोष्टीविषयीं येथें कांहींच कमी पडणार नाहीं. शिवाय आमचेजवळ असतां तुह्मास राजकीय उपद्रवाचीही कोणती तोशीस लागूं शकणार नाहीं. शिवाय तुमच्या झालेल्या छलाबद्दल आणि नुकसानीबद्दल येथें बसल्याबसल्या कांहीं तरी योग्य विचार करण्यांत येईल. काळजी करूं नका आणि धैर्य सोडूं नका. परमेश्वर सर्वदां स्वधर्मप्रिय आहे. तो तुमचा शेवट गोड आणि सुखाचा करील. व दुष्टास शासन करील यांत संशय नाहीं. तुह्मास येथें येण्याविषयीं ईश्वरकृपेनें बुद्धि झाली, हें फार चांगलें झालें. मी आजपर्यंत तुमच्याच काळजींत होतों." इत्यादि भाषणें स्वामींनीं धर्माजीरावाबरोबर करून पुढें त्यास मुलांमाणसांविषयीं

व सुमतीबाईविषयीं स्वामींनीं प्रश्न केले. तेव्हां धर्माजीरावाच्या नेत्रावाटें खळखळा दुःखाश्रूंचे लोट चालले. मग तशाच रडक्या गळ्यानें झालेला सर्व मजकूर त्यानें स्वामींस सांगितला कीं, भ्रमर आणि सद्गुण तर मी तेथें असतांच दरबारच्या बोलण्यावरून नाहींसे झाले होते, आणि पश्चात् मला खोटी थाप देऊन स्वारीकरितां ह्मणून जें घराबाहेर काढिलें तें अक्षय बाहेरच काढिलें ! ! आतां मला घरची बायकामनुष्यांची स्थिति माझ्या पश्चात् काय झाली आहे, ती या घटकेपर्यंत अगदीं माहीत नाहीं ! ! घरीं मामासाहेब व भरंवसा गडी मात्र होता; एवढाच काय तो त्यांच्या संरक्षणाचा आधार वाटत आहे. मग इतक्यावर काय झालें असेल तें एका परमेश्वरास माहीत ! "

धर्माजीरावाचे याप्रमाणें वर्तमान ऐकल्यावर स्वामी ह्मणाले कीं, तुह्मी आतां अतःपर कांहींच काळजी करूं नका. मी आतांचे आतां गाडी व माणसें पाठवून तुमच्या सर्व बायकामनुष्यांस खटल्यासहित येथें आणवितों. आणि तशींच दोन शाहणीं मनुष्यें गुप्त रीतीनें पाठवून भ्रमराचा आणि सद्गुणाचाही तपास बडोद्यांत करवितों. काळजी करूं नका. याप्रमाणें सांगून लागलींच गाडी व दोन मनुष्यें बडोद्यास धर्माजीरावाच्या मनुष्यांस आणण्याकरितां पाठविलीं आणि भ्रमराचा व सद्गुणाचा शोध लावण्याकरितांही दोन मनुष्यें गुप्त रीतीनें पाठवून दिलीं. पुढें स्वामींनीं जाऊन आणखी मग सचैल स्नान केलें, आणि धर्माजीरावास-

ही स्नान करण्यास आज्ञा दिली. उपरांत मग स्वामी-चें चार घटकांपर्यंत वेदांतविषयावर पुराण झाल्यावर धर्माजीरावास बरोबर घेऊन इतर सर्व ब्रह्मवृंदासहित स्वामींचें भोजन झालें.

तिसरे प्रहरीं स्वामी, धर्माजीराव व आणखी कांहीं मंडळी बोलत बसली असतां एकदम एक मनुष्य सांगत आला कीं, घाटावरील धर्मशाळेंत एक अति आसन्न झालेल्या म्हातारीला बरोबर घेऊन एक म्हातारा आला आहे आणि त्या दोघांच्याही मनांतून स्वामीमहाराजांचें दर्शन व्हावें असा हेतु फार आहे. तथापि त्या म्हातारीला मठापर्यंत येण्याचें सामर्थ्य मुळींच राहिलें नसल्यामुळें त्यांचा निरुपाय झाला आहे. याप्रमाणें वर्तमान ऐकतांच स्वामीमहाराज त्या वर्तमान सांगणाऱ्या मनुष्यास म्हणाले कीं, कांहीं चिंता नाहीं. त्या गरीब प्रवाशास दर्शनाची इच्छा असून जर येथपर्यंत येण्याची शक्ति नाहींच तर आपण तेथपर्यंत जाऊन त्यांचें दर्शन घ्यावें यांत काय वाईट होणार आहे ? याकरितां चला मी येतों तुमच्याबरोबर. ते प्रवासी कोठें आहेत ते मला कृपा करून तुम्ही दाखवा. इतकें बोलून स्वामी लागलेच जागेवरून उठले. तेव्हां स्वामींबरोबर दहा पांच मंडळी आणखी उठली. त्यांत धर्माजीराव दाभाडेही उठले आणि त्यांच्या बरोबर त्या प्रवाशाकडे जाण्यास निघाले. शिष्यांनीं स्वामींपुढें खडावा आणून

ठेवल्या. त्या पायांत घालून स्वामी चालूं लागले. वाटेंत शेंकडो लोक स्वामींच्या पायांवर मस्तक ठेवीत होते व तितक्याकरितां स्वामींस दहा पांच पावलें चालल्यावर पुनः पुनः उभें रहावें लागत असे. अशा चालण्यामुळें प्रवासी उतरलेली धर्मशाळा मठापासून जरी अगदीं जवळ होती, तरी तेथपर्यंत जाण्यास त्यांना बराच वेळ लागला. धर्मशाळेंत गेल्याबरोबर ह्मातार्‍या पुरुषाची दृष्टि स्वामींवर गेली, त्यासरसा तो धांवतच पुढें सामोरा आला आणि त्यानें स्वामींच्या पायांवर आपलें मस्तक ठेवलें. स्वामींनीं त्याला वरती उठवून पाहिलें तर तो आपल्या धर्माजीरावाचा मामासाहेब! मग मामासाहेबांनीं स्वामींस हातीं धरून सांगितलें कीं आमची बहीण धर्माजीरावाची मातोश्री व जी सुबुद्धि बाई ती हल्लीं येथें आली आहे. व फार थकून गेली आहे. हें ऐकतांच स्वामी, पुढें त्या ह्मातारीजवळ जाऊन पोंचले. म्हातारीचे प्राण अगदीं डोळ्यांत उरले होते. तिणें स्वामींना पाहतांच अंथरुणावरून उठण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो साधला नाहीं. शेवटीं स्वामीच जाऊन म्हातारीजवळ बसले आणि उठण्याचें कांहीं कारण नाहीं, मी तुमच्या जवळच आहें असें बोलून त्यांनीं त्या बाईचें फार फार रीतीनें समाधान केलें. बाईच्या एकंदर बोलण्याच्या झोंकावरून स्वामींस दिसून आलें कीं, तिला असल्या या अंतकाळप्रसंगीं पुत्रभेटीची फार उत्कंठा आहे. मग स्वामींनीं मागले बाजूस पाहून धर्माजी-

रावास हांक मारली ! स्वामी धर्माजीरावास हांक मारतात पाहून म्हातारीस व म्हाताऱ्यास फार कौतुक वाटलें कीं धर्माजीराव येथें येईल कसा ? आणि आम्हाला भेटतो कसचा ! ! परंतु हा योग मोठा चमत्कारिक जमून आला होता. स्वामी धर्मशाळेंत शिरले; त्यावेळीं धर्माजीराव बाहेर घांटावरील मजा पहात अमळ उभे राहिले होते. इतक्यांत आंतून दोन चार माणसें धांवत येऊन, धर्माजीरावास म्हणूं लागलीं कीं, धर्मशाळेंत तुमची मातोश्री आणखी मामासाहेब हेच प्रवासी आले असून स्वामीमहाराज त्यांच्या भेटीकरितां तुह्मास आंत बोलावीत आहेत ! हा निरोप ऐकून धर्माजीरावास फारच आश्चर्य वाटलें आणि ते धांवतच धर्मशाळेंत येऊन पोंचले.

धर्माजीराव धर्मशाळेंत गेल्याबरोबर त्यांच्या दृष्टीस खरोखरीच त्यांची मातोश्री पडली. आणि मामासाहेबही भेटले. मग त्या आनंदास काय पाहावयाचें आहे. मातोश्री अगदीं आसन्न झाली होती, तरी तिच्या नेत्रांवाटें प्रेमाश्रूंचे प्रवाह वाहूं लागले. धर्माजीरावानें तिच्या गळ्याला मिठी घातली. मामासाहेबांनीं धर्माजीरावास पोटाशीं धरलें. आणि सर्वांचें समाधान स्वामीमहाराज स्वतः करीत होते.

आतां ही सर्व मंडळी ह्मणजे धर्माजीराव, त्यांची मातोश्री, आणि मामासाहेब हे त्रिवर्गही करनाळी क्षेत्रास कसे येऊन पोंचले; याबद्दल थोडासा उल्लेख येथें करून दाखविणें हें इष्ट होणार आहे. नाहीं-

पेक्षां वाचकांची शंका मुग्ध राहणार आहे, तें बरोबर नाहीं. म्हणून धर्माजीराव बडोदें येथें असतां आपल्या घरून दरबारचें बोलावणें आलें असतां दरबारास निघून गेला. त्यापुढील वर्तमान येथें सांगणें आवश्य आहे. आणि तसेच मामासाहेब बडोद्याचे स्टेशनावरून डभईपर्यंत येऊन पोंचले असतां पुढें करनाळीस कसे आले, हेंही सर्व येथें स्पष्ट सांगणें अत्यंत आवश्य आहे. याकरितां तितक्या दोन गोष्टी सांगून मग या चरित्राचा पुढील भाग कसा काय झाला हें आपल्याला पाहिलें पाहिजे.

धर्माजीराव दरबारच्या बोलावण्यावरून सारंग घोड्यावर बसून स्वारीस गेले, इतकें आमच्या प्रिय वाचकास माहीत आहे. परंतु पुढें काय झालें, हें वाचकांला आतां सांगतों. जें बोलावणें दरबारचें म्हणून आलें होतें, तें बोलावणें खरोखर कांहीं दरबारचें नव्हतें. तें मधल्यामध्यें खटपटी मंडळींचें होतें. सारंग घोडाही त्यांनींच पाठविला होता. त्यांचा निश्चय असा झाला होता कीं, धर्माजीरावाला बिना जाग्यावरून हालविल्यावांचून घरांतील बायका मंडळी आपल्या हातीं येणार नाहीं. म्हणून त्यांनीं ही स्वारीच्या संबंधानें त्याला घराबाहेर काढण्याची युक्ति योजिली. तो घरांतून बाहेर पडल्यावर थेट जाऊन स्वारींत मिळणार होता, पण त्याला तसें करूं देतो कोण ? अर्ध्या वाटेंत गेल्याबरोबर दोन स्वारांनीं त्याला दौडतच येऊन सांगितलें कीं, तुह्मी दुसऱ्या

वाटेनें जाऊन खंडोबाचे पलीकडच्या मैदानांत बसावें असा सरकारचा हुकूम आहे. आणि खंडोबाचें दर्शन झाल्यावर सरकारस्वारी स्वतः तुमच्या भेटीकरितां त्या मैदानांत येणार आहे. मग सर्व प्रकारचें बोलणें चालणें काय व्हावयाचें तें तेथेंच सर्व व्हावयाचें ठरलें आहे. आज चंपाषष्ठीचा दिवस असल्यामुळें खंडोबाचें दर्शन झाल्याशिवाय तुमची भेट घेणें सरकाराला बरें वाटत नाहीं; ह्मणून पहिला बेत आतां पुनः फिरविला आहे." असें सांगून धर्माजीरावास त्या स्वारांनीं दुसऱ्या वाटेनें ताबडतोब खंडोबाच्या पलीकडील मैदानांत आंब्याच्या झाडाखालीं एका तंबूंत नेऊन बसविलें! तेथील बैठकीच्या थाटावरून धर्माजीरावास आशा वाटली कीं, खरोखरच येथें सरकारस्वारीची आणि माझी भेट होईल! परंतु कशाचें काय! रात्रपर्यंत त्याला तेथें कैदेंत राहावें लागलें, दुसरे दिवशीं सकाळीं घोड्यावर बसून एका कारकूनसाहेबांची स्वारी तेथें येऊन पोहोंचली. त्यांनीं धर्माजीरावास सांगितलें कीं, "सरकारचा हुकूम तुह्मास बेड्या घालून तुरुंगांत टाकण्याविषयीं झाला आहे; परंतु आमच्या यजमानसाहेबांनीं तुमच्याविषयीं सरकारांत फार रदबदली केल्यावरून शेवटीं तुह्मास हद्दपार करावें असें ठरविण्यांत आलें आहे"!! याकरितां आतांचे आतां तुह्मी गायकवाडी हद्दीचे बाहेर गेलें पाहिजे. याप्रमाणें आजचे दिवसांत जर झालें नाहीं, ह्मणजे तुह्मी हद्दपार झाला नाहींत,

उद्यां तुमच्या पायांत बिड्या पडल्यावांचून राहणार नाहींत ! ! याप्रमाणें खंडोबाचे मैदानांत धर्माजीरावास दरबारची आज्ञा समजल्यावर त्यांनीं त्या कारकुनाला विचारलें कीं, इतका हा गहजब आज्ञावर सरकारांनीं काय ह्मणून मांडिला आहे ? तेव्हां कारकुनानें सांगितलें कीं, तुह्मी आपली कन्या सरकारास बायको करून देत नाहीं म्हणून व मेव्हणी एकवेळ तरी दृष्टीस पडूं देत नाहीं ह्मणून ! ! तुमच्या मनांत आजूनही सरकारची कृपा संपादन करावी असें असल्यास मला तुह्मी मी सांगितलेल्या दोन गोष्टींचा कबूल जबाब द्या; ह्मणजे मी एक तासाचे आंत तुमचीं सर्व दुःखें दिगंतरीं नेऊन पोंचवितों. ” कारकुनाचें हें भाषण ऐकिल्यावर धर्माजीरावानें सांगितलें कीं, माझी कन्या उपवर व समंजस झाली आहे तेव्हां आतां लग्नाच्या कामांत मला तिचा सल्ला घेणें भाग आहे. तिनें कबूल केल्यास माझी ना नाहीं, असें मी तुह्मांस स्पष्टपणीं सांगतों. शिवाय मेव्हणीविषयीं म्हणाल, तर त्या कामांत मी अगदीं हक्कदार नाहीं ! ती स्वतः आपणाविषयीं पूर्ण मालकीण आहे. कोणतीही गोष्ट आपल्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें करण्यास ती स्वतंत्र आहे. ह्मणून या दोन्हीही गोष्टींच्या बाबतींत त्या दोघींचा अभिप्राय घेतल्याशिवाय मला माझ्या स्वतंत्रतेवर कांहींच सांगतां येत नाहीं. त्या कामांत मी सर्वोपरीनें लाचार असा झालेलों आहे.

यांप्रमाणें धर्माजीरावाचें भाषण ऐकून कारकून ह्मणाला कीं, " जर ही गोष्ट तुमचे स्वाधीन नाहीं, आणि बायकांच्या खुषीवर आहे, तर मग तसेंच करतां येईल; ह्मणजे बायकांलाच विचारतां येईल. तुह्मी मात्र आतांचेआतांच येथून हद्दपार झालें पाहिजे. मी तुम्हांस येथून परस्पर स्टेशनावर नेऊन सुरतेचें तिकीट काढून देतों. " यांप्रमाणें बोलून लागलीच धर्माजी-रावास बरोबर घेऊन बडोद्याचे जवळ चारपांच कोसा-वर जें एक रेलवे स्टेशन होतें तेथें तो स्वार शिपाई वगैरे खटल्यासहीत निघून गेला. याच स्टेशनावर पूर्वी भ्रमर आणखी शतावली गाडींनीं उतरवून दिली होती. असो. कारकुनानें या स्टेशनावर एक सुरतेचें तिकीट काढून देऊन धर्माजीरावास गाडींत बसवून दिलें. आणि गाडी चालू झाल्यावर तो तेथून खट-ल्या सहीत बडोद्यास निघून गेला.

गाडी चालू झाल्यावर धर्माजीराव मोठ्या विचारांत पडला ! त्याचें सर्व चित्त बडोद्यांतील आपल्या घर मंडळीकडे लागलें होतें. माझी वाट पाहून पाहून त्यांची अवस्था काय झाली असेल या विचारांत तो वेडा होऊन बसला होता. शिवाय सुरतेस जाऊन आपण काय करावें, कोठें उतरावें, काय खावें इत्यादि दुःखमय विचार एका मागून एक त्याच्या मनांत हल्ले करूं लागले. जवळ तर एक पैसासुद्धां नव्हता. आणि कपडे लत्ते तरी आंगावर होते तेवढेच ! आणखी सुरत पर्यंत लांब पल्ल्यावर गेल्यावर आपल्याला बडोद्यांतील

वर्तमान व विशेषेंकरून घर मंडळीचें कुशल कसें समजलें जाईल हा मोठाच जबरदस्त घोर त्याचे हृदयांत उभा राहिला होता. सारांश आतांच्या वेळेप्रमाणें संकटावस्था त्याला या मागें कधींच प्राप्त झाली नव्हती. शेवटीं दोनचार स्टेशनें त्याची अशाच विचाराच्या खालीं निघून गेली. इतक्यांत भडोच स्टेशन जवळ आलें ह्मणून स्टेशनावरील व डब्यांतील लोकही ओरडूं लागले. तेव्हां धर्माजीरावास येथें नर्मदा नदी आहे अशी आठवण झाली आणि नर्मदेच्याच तिरीं आपले एक परम सन्मान्य योगी मित्र वास्तव्य करीत आहे. अशी त्याला एकदम आठवण झाली! आणि या आठवणीबरोबर त्याच्या मनाचा एकदम निश्चय होऊन गेला कीं, जें होणें असेल तें होईल आपण आतां भडोच स्टेशनावरच उतरून पडावें हें ठीक. मग त्या प्रमाणेंच त्यानें केलें. भडोच स्टेशनावर उतरून गांवांत गेला. तेथें करनाळीस जाणारी एक होडी ( लाहान नौका ) त्याणें ठरविली आणि तींत तो बसून करनाळीस जाऊन पोंचला. तेथें घाटावर उतरल्यावर पांच रुपये होडी वाल्यास देण्यास पाहिजे होते, तेव्हां त्याबद्दल त्याणें आंगावरील सुमारें पाऊणशे रुपयांचा जरीकांठी व जरी पदरी शेला आंगावर घेतला होता तो त्या होडीवाल्यास देऊन टाकिला! पुढें मठांत जाऊन टोकरास्वामीस भेटला हें वर्तमान तुह्मी वाचलेंच आहे.

धर्माजीरावाच्या मातोश्रीस घेऊन मामासाहेब डभईस जाऊन उतरला, हेंही मागें वाचलेंच आहे

तुह्मी. डभईस गेल्यावर सुबुद्धिबाईची प्रकृति अधिक बिघडल्यामुळें तिणें आपल्या भावास असा सल्ला दिला कीं, आतां मला तुह्मी आगगाडींत घालून फार लांब पर्यंत प्रवासास नेण्याच्या विचारांत पडूं नका. कारण न जाणो कदाचित् माझा प्राण भलत्याच ठिकाणीं गाडींतच निघून जाणार आहे !! या करितां येथून जवळच आठ दहा कोसांवर नर्मदा तटाक करनाळी क्षेत्र आहे तेथें नेऊन मला ठेवा. माझ्या मुलालेंक-रांचें सर्व कुटुंबाचा बडोद्यांतल्या दरबारी मंडळीनें काय घोटाळा करून सोडला आहे कोण जाणें ! या गोष्टीचाही शोध तेथें बसून कदाचित् होण्यासारखा आहे. शिवाय गुरुवर्य टोकरास्वामींचेंही तेथें दर्शन होऊन सत्समागमाचा लाभ घडण्यांत येणार आहे. ह्मणून मुंबई पुण्याकडे या वेळीं जाण्यापेक्षां नर्मदातिरीं जावें हें मला बरें वाटत आहे." हा ह्मातारीचा अभिप्राय मामा साहेबांस पसंत पडल्यावरून त्यांणीं लागलीच एक भाड्याची डोली करून आणली. आणि त्यांत तिला घालून एका भाड्याच्या तट्टावर आपणही बसला. मग तीं वृद्ध बहीणभावंडे एका दिवसांतच करनाळीस येऊन पोंचलीं. तेथें आल्यावर पुढें टोकरास्वामींची भेट होऊन धर्माजीरावाची व त्याच्या मातोश्रीचीही भेट झाली हें वृत्त तुह्मी आतांच वाचलें आहे. ह्मणून त्याविषयीं येथें पुनः द्विरुक्ति करण्याचें कारण राहिलें नाहीं.

असो. धर्मशाळेंत टोकरास्वामींच्या संन्निधानीं धर्माजीरावाची आणि त्याच्या मातोश्रीची भेट झाल्यावर पुढें स्वामींच्या विचारें असें ठरण्यांत आलें कीं, तेथून आणखीं दोन स्वामींचीं मनुष्यें बरोबर घेऊन गुप्त रीतीनें मामासाहेबांनीं पुनः बडोद्यांत जाऊन बायकामंडळीविषयीं काय व्यवस्था झाली आहे त्याबद्दल, आणि भ्रमर व सद्‌गुणाबद्दल विशेष तपास करावा. शिवाय भरोसा गडी कोठे भेटल्यास त्यासही पाहून घरदार आणि सामानाबद्दल काय विचार झाला आहे तोही अवलोकनांत आणावा! याप्रमाणें विचार ठरून स्वामींनीं मामासाहेबांसुद्धां त्रिवर्गांची रवानगी तेथून खर्चावयास वगैरे देऊन बडोद्यास केली. आणि धर्माजीरावास मातोश्रीसहीत आपले जवळ ठेवून घेतलें.

स्वामी इतकेंच करून राहिले नाहींत; त्यांनीं आणखी एक हुशार मनुष्य आपल्या विश्वासाचा पाहून त्याजबरोबर खुद्द मल्हाररावास एक पत्र लिहून पाठवून दिलें. आणि त्याचें उत्तर त्याच मनुष्याबरोबर पाठवावें, असें त्यांत कळविलें होतें. हें स्वामींचें पत्र मल्हाररावाच्या हातांत पडण्यास एक महिना लागला. कारण तें त्यांच्याच हातांत द्यावें, उशीर लागला तरी चिंता नाहीं; असें स्वामींनीं ह्या मनुष्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें त्या हुशार मनुष्यानें बडोद्यांत जाऊन पत्र मल्हाररावाच्या हातांत पडावें ह्मणून यत्न केला असतां

एक महिनाभरपर्यंत त्याला संधी मिळाली नाहीं. गोसाव्याचें रूप घेऊन तो मल्हाररावाच्या वाड्या भोवतीं आणि त्यांच्या स्वारी शिकारीच्या जागीं टपून फिरत होता. तथापि मल्हाररावाची गांठ एकटकी पडेचना. स्वारी गाडींत बसून रोज दोन वेळ घोंड दौडीवर जाते असें समजल्यावरून तो बैराग्याच्या वेषानें घोंड दौडीच्या सडकेवर रेलवेच्या सडकेच्या पलीकडे आठचार दिवसपर्यंत टपून फिरून राहिला होता. परंतु लौकर योग जमून आला नाहीं. जेव्हां पाहावें तेव्हां गाडींत कोणी तरी मराठशाई पागोट्याचे, किंवा ब्राह्मणी पागोट्यानें असावयाचेंच ! त्यांत विशेषेंकरून ब्राह्मणी पागोटें फार असे ! !

शेवटीं एके दिवशीं प्रातःकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास हा योग साधला ! त्यादिवशीं गाडींत कोणी दुसरे नव्हते. एकटे महाराजच होते. आणि तेही गाडी खालीं उतरून पायोंनेच हळूहळू हवा घेत चालले होते. त्यांची बगी आणि स्वार वगैरे माणसें सर्व बऱ्याच अंतरावर मागें चालत होतीं. कांहीं माणसें पुढें होतीं ; परंतु तींही बऱ्याचलांब अंतरावर होतीं अशी संधी पाहून टोकरास्वामीचा हुशार मनुष्य पुढें सरकून त्यांच्या समोर गेला आणि स्वामीचें नांव घेऊन पत्र हातांत दिलें.

टोकरास्वामीचे नांव त्या प्रांतीं सर्वत्र प्रसिद्ध असून विशेषेंकरून सर्व काठेवाडांतील गुजराथेंतील संस्थानिकांस चांगलें महशूर होतें; तथापि सर्व सं-

स्थानिकांपेक्षां मल्हाररावास तें नांव अधिकच ओ-ळखीचें होतें. कारण मल्हारराव पूर्वी जेव्हां खं-डेरावाच्या अमलांत एका खेडेगांवीं कारागृहवासांत होते, त्यावेळीं त्यांणीं मोठ्या युक्तीनें व यत्नानें टो-कारस्वामीचें साह्य एकदोन विशेष प्रसंगीं मोठ्या आ-दरानें घेतलें होतें. आणि नाजूक प्रसंगीं कित्येक वेळां त्यांणीं स्वामींच्या सल्लामसलतीही मागविल्या होत्या. परंतु आतां अलीकडे महाराज गादीवर ब-सल्यापासून या थोरपुरुषाचें नांव अगदीं विसरून गेलें होतें. असो. बैराग्यानें टोकऱ्यास्वामींचें पत्र ह्मणून-हातांत दिल्यावर महाराजास एकदम स्वामींची आ-ठवण झाली. आणि त्यांणीं तें पत्र एकदम मस्तकीं वंदन केलें! पुढें महाराजांनीं तेथेंच उभें राहून तें पत्र साद्यंत वाचलें; आणि उद्यां याच ठिकाणीं तु-ह्मास या पत्राचें उत्तर मिळेल. असें त्या बैराग्यास सांगून स्वारी पुढें चालती झाली.

दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें त्या बैराग्यास त्या जागीं पत्राचें उत्तर मिळून तो करनाळीच्या रस्त्या-सही परत लागला होता; परंतु त्याचें करनाळीस जाणें झालें नाहीं!! त्याला दरबारी मंडळीच्या मुख्य सूत्रधारांनीं मध्येंच लोक पाठवून पकडून आणिलें, आणि त्याचा झाडा घेतला. तथापि कागदपत्र त्याचे जवळ कांहीं सांपडलें नाहीं. तरी कबूल व्हावें म्हणून याला साहा महिनेपर्यंत अटकेंत ठेविलें होते. या बैराग्यानें मल्हाररावाकडून मिळालेलें पत्राचें उत्तर

आपल्या जवळच्या एका लाकडी सोडग्यांत लपवून ठेवलें होते. तें झाडा घेणाऱ्यांस सांपडलें नाहीं ! ! याप्रमाणें मंडळीला बातमी लागल्यावरून त्यांनीं खटपट केली खरी, तथापि मल्हाररावांचे किंवा स्वामींचें पत्र त्यांच्या हातीं लागलें नाहीं. स्वामींचें पत्र खुद्द महाराजांनीं वांचून पाहून फाडून टाकिलें होतें; आणि महाराजांचें पत्र बैराग्याच्या विशेष धूर्ताव्यामुळें मंडळींच्या हातीं लागलें नाहीं. एवंच या खटपटीपासून मंडळीला फायदा कांहीं झाला नाहीं. मात्र बिचाऱ्या बैराग्यास माहा महिनेपर्यंत मधलेमध्यें व्यर्थ आडकून राहवें लागलें. तथापि कांहीं दिवस गेल्यानंतर बैराग्यानें तो सोटा एका विश्वासू ओळखीच्या मनुष्याबरोबर शेवटीं स्वामीकडे पाठवून देऊन मल्हाररावाचें उत्तर स्वामीस पावतें केलेंच. याचें नांव हुशार मनुष्य !

आतां या दोघांही थोर पुरुषांच्या परस्पर पत्रांतून काय मजकूर होता, हें आमच्या प्रीय वाचकांस कळवून हा भाग आटोपता घ्यावा हें मला बरें दिसतें. म्हणून मी तसें करीत आहे. पहिल्यानें स्वामींचे पत्र महाराजांस पोचलें तें असें होतें;––"चिरंजीव गोब्राम्हण प्रतिपाळक महाराज मल्हारराव गायकवाड यांसी;––श्रीक्षेत्र करनाळी नर्मदा तटाक येथून अखंड शुभचिंतक मित्र टोकरास्वामी यांचा प्रेमपूर्वक अशिर्वाद. आलीकडे महाराजांस या गरीब मित्र स्वामींचा विसर पडत आहे असें अनुभवास येतें, तथापि

त्याबद्दल कांहीं चिंता नाहीं. उत्तरोत्तर महाराजांची विजयश्रीवृद्धिंगत होत जाऊन महाराज सुखसमाधान स्थितींत आणि सौख्यानंदांत रहावेत, एवढीच या गरीब स्वामीची मनापासून इच्छा आहे. प्रस्तुत चालू असलेल्या महाराजांच्या राजकीय कारकिर्दीवरून पाहतां ही माझी गरीबाची इच्छा पूर्ण होईल कीं नाहीं, ही मोठी शंका उत्पन्न झाली आहे. या शंकेचें समाधान जेव्हां माझे मजपासी होईना, तेव्हां हें विनंतीपत्र खुद्द महाराजांकडे पाठविणें भाग झालें आहे. तें कृपेनें व विचारपूर्वक मनांत येऊन उलट उत्तरीं समाधान होईल ही आशा आहे; परंतु इतक्या उपर या पत्राचा अव्हेर झाल्यास ईश इच्छा बलवत्तर समजून समाधान मानून घेणें भाग होईल ! ! दुसरा उपाय काय !

प्रस्तुतची स्थिती पाहतां महाराज आपले पूर्व दुःखाचे दिवस विसरून गेले आहेत असें वाटतें! राज्यपद प्राप्त होण्यास किती पुण्याई लागते, आणि पुण्य संचय होणें किती दुर्घट आहे हें महाराजांच्या स्वप्नांत सुद्धां कधीं येत नाहीं ही अत्यंत दिलगिरीची गोष्ट होय असें म्हणणें भाग झालें आहे ! ! कारण महाराजांच्या मनांत पापपुण्याविषयीं जर कल्पना थोडी तरी वास्तव्य करीत असती, तर प्रस्तुत चाललेल्या अनाचाराच्या गोष्टी महाराजांकडून कधीं आमलांत आल्या नसत्या ! बडोद्यांत आपल्या अमलांत हल्लीं जी अंदाधुंदी व अनाचार चालू झाला आहे त्याचें फळ निःसंदेह ग-

म्हाला थोडके दिवसांत भोगणें प्राप्त होणार आहे ! ! हा भविषार्थ समजल्यापासून या तुमच्या गरीब मित्र स्वामीस परमावधीचें दुःख उत्पन्न झालें आहे. तें पत्रीं कोठपर्यंत लिहावें ?

तथापि आजून या तुमच्या आनाचारप्रभृति रोग समुश्चयांस औषधी मिळण्या सारख्या आहेत. परंतु तुमच्या मनांत वागेल तेव्हां आणि तुम्ही जागे व्हाल तेव्हां ! ! प्रस्तुत तुम्हास महारोगांनीं आणि महानिद्रेनें गांठिलें आहे ! ! त्या निद्रेस आणि रोगास विलायती औषधी गौरवर्ण मनुष्याकडून मिळावीं असी तुमची इच्छा आहे काय ? असल्यास तसले धन्वंतरी पुष्कळच तुमच्या जवळच डोळ्यांत तेल घालून टपून बसले आहेत हें कृपेनें ध्यानीं आणा ! परंतु एकवेळ त्यांची मात्रा पोंचल्यावर मग ती पुनः उतरणार नाहीं. जन्मासी गांठ घालील ! ! पराधीन व्हाल, स्वपद पदच्युत व्हाल, स्वदेश पदच्युत व्हाल, आणि शेवटीं हाय हाय करीत बसाल ! ! ! या साठीं म्हणतो कीं, आपले देशीं औषधच घेऊन तुम्ही लौकर बरें व्हावें हें ठीक जाणून हें पत्र पाहतांच धर्माचा छळ करणें आरंभिलें आहे तें सोडून द्या, तसें च नीतिस भ्रष्ट करण्याचें मनांत आणलें आहे तो दुराग्रह बंद करून टाका ! कारण ज्या राज्यांत धर्म व नीति सुखानें नांदत नाहींत, तें राज्य फार लौकर नाशाप्रत पावतें ! ! !

तुमची शरीरसंपत्ति, द्रव्यसंपत्ति, आणि वंश-संपत्ति चिरकाळ सुखी रहावी, व तुमची यशश्री कीर्ति अखंड वृद्धिगत व्हावी अशी जर तुमची मनापासून इच्छा असेल, तर तुह्मी हें पत्र पहातांच दुष्ट व अपमतलबी लोकांची संगती सोडून त्यांच्यापासून अगदीं दूर व्हा, परस्त्रिया तितक्या प्रत्यक्ष कमाबाई समजा, आणि आपला जो रेसिडेंत साहेब असेल, तोच आपला कुळस्वामी समजून त्याच्या प्रसन्नतेनें वागा!! कळावें यांहून दुसरें कर्तव्य नको. हा आशिर्वाद.

एक गरीब व तुमचा शुभचिंतक.

टोकरास्वामी.

यावर मल्हाररावांनीं उत्तर पाठविलें तें असें होतें:—

"आपल्या पत्रानें मला फार मोठा आनंद व बोध प्राप्त झाला; ह्मणून तें मी आपल्या मस्तकीं धारण केलें आहे! आपण म्हणतां त्याप्रमाणें माझ्या कारकीर्दीची स्थिती झाली आहे खरी; परंतु आतां काय करावें, कोणास शरण जावें, कोण उत्तम सल्ला व साह्य देऊन माझें रक्षण करील असें मला होऊन गेलें आहे!! हल्लींच्या माझ्या स्थितीपेक्षां एखाद्या दुर्दैवी भिकाऱ्याची स्थिती देखील सहस्त्रपटीनें बरी; असें मी समजतों. पण काय करावें अशावेळीं हें मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे!! ज्या लोकांपासून दूर व्हावें असें आपण लिहिलें, त्या लोकांनीं तर मला अगदीं केसागणित बंधन करून

टाकिलें आहे. आतां मी त्यांतून मोकळें कसें व्हावें? दुष्ट संगतीचें वीष माझ्या सर्व आंगांत अगदीं भिनून गेलें आहे तें उतरावें कसें ? असा जबरदस्त धन्वंतरी मला आतां मिळूं शकेल काय ? आपणच सांगा. देशीवैद्याचें देशी औषध या माझ्या महारोगावर लागू होईल काय ? होईल असें असल्यास मी कोणत्या वैद्यास बोलावून आणू ? प्रस्तुत दोही कडील औषधीं जाणणारा असा एक पार्शी जातीचा वैद्य नुकताच आणून मी माझ्या संग्रहास ठेवला आहे. परंतु त्याचें हातून आठरा महिन्याच्या माझे नेमलेल्या आयुष्यांत गुण येतो कीं नाहीं हें पाहण्याचें आजून आशेवर राहिलें आहे. आतां आपल्या कृपेनें या तुमच्या लाचार झालेल्या जुन्या मित्राची स्थिति काय होईल ती खरी !

धर्म आणखी नीति याजविषयीं आपण लिहिलें; तें खरें असेल; परंतु ती गोष्ट किंवा त्यांतील कांहीं मला ठाऊक असेल तर आपल्याच पायाची शपथ ! स्वयंभु माझा स्वभाव भोळा असल्यामुळें व एवढा मोठा पर्वतप्राय कारभार चालविण्यापुरती माझ्या अंगांत आक्रमण शक्ति नसल्यामुळें दुष्ट, हलकट, आपमतलबी अशा मंडळींनीं खाजगी रीतीनें मला अगदीं घेरून टाकिलें आहे व त्यामुळें खरें काय आणि खोटें काय हें निवडून काढण्याविषयीं मी अगदीं भ्रांत होऊन गेलों आहे. तथापि आतां आपल्या पत्ररूपी मात्रेनें जी मला सावध स्थिति प्राप्त झाली

आहे तितक्यानें मी आतां धर्माविषयीं व नीतिविषयीं नीट विचार करण्यास आरंभ करतो यांत संशय नाहीं. जेणेंकरून धर्माचें व नीतीचें रक्षण, तो पंथ आतां मी स्वीकारतों. आणि परस्त्रिया अथःपर मातोश्री-तुल्य या मल्हारीस आहेत असें खचीत समजावें. रेसिडेंत साहेबच आपलें सर्वस्वी कुळदैवत असें मी समजत आहे; परंतु आमचें कारभारी आम्हास एकदम नेऊन विलायत दाखवितात याला मी काय करूं? खरोखर मी तुम्हास विसरलों नाहीं. हे विज्ञापना.

आपला चरण सेवक,

**मल्हारराव गायकवाड.**

---

# भाग ७ वा.

## श्रीक्षेत्र डाकूर.

—o-o:0:o-o—

**अन्य क्षेत्रे कृतंपापं पुण्य क्षेत्रे विनश्यति ॥**
**पुण्य क्षेत्रे कृतंपापं वज्रलेपो भविष्यति ॥ १ ॥**

**" सुभाषित "**

दक्षिणेंत ज्याप्रमाणें श्रीक्षेत्र पंढरपूर भोळ्या लोकांचे भक्तिस्थान आहे, त्याप्रमाणें गुर्जर देशांत श्रीक्षेत्र डाकूर आहे; आगोदरच गुजराथी लोक देवभोळे आहेत.

परंतु त्यांतूनही त्यांची निष्ठा श्री डाकूरनाथावर फार आहे. डाकूरची मूर्ति भक्ताकरितां तेथें द्वारकेहून आली आहे अशी भोळ्या लोकांची समजूत आहे! तें कसेंही असो; परंतु हें स्थान मात्र फार रमणीय आहे. बडोद्यांहून हें सुमारें वीस कोस आहे. गाडी घोड्यावरून गेलें असतां दोन दिवस लागतात. गांव अगदीं लहान असून फार गरीबीची कळा सर्व गांवास आहे; परंतु देवाचें ऐश्वर्य मात्र फार मोठें आहे. देवास लाखों रुपयांचे सुवर्णाचे व जडावाचे दागीने आहेत. त्रिकाळ पुजेचा थाट मोठ्या राजविलासी डौलाचा आहे. तीनीवेळ नवे पोषाक व दागिने देवास घालून फार सुंदर महापूजा बांधलेली असते. शिवाय सणावाराची इतकी ( पूजा ) तर फारच वर्णणीय असते! पुष्कळ राजेरजवाड्यांकडून देवास निरनिराळें मोठें उत्पन्न आहे. आणि खेरीज बाराही महिने सदोदित हजारो यात्रा असते, तिजपासून देवास व पुजाऱ्यांस हजारों रुपयांचे उत्पत्र होत असतें. तात्पर्य येथील देव तर मोठा श्रीमंत आहेच; परंतु देवाचे जिवावर पुजारी, सेवेकरी, उपाध्याय, आणि व्यवस्थापक म्हणजे देवाच्या संस्थानसंबंधानें सर्व कारभार पाहणार हे देखील मोठे कुबेर बनलेले आहेत, या देवास लोणी, खडीसाखर आणि बेसणाचे लाडू फार आवडतात, म्हणून त्याचीं दुकानें येथें फार आहेत. त्याचप्रमाणें देवास गाईचीं खिल्लारेंही पुष्कळ आहेत व देव [illegible] विलासी असल्यामुळें बागबगीचे, जलमंदिरें,

आरसेमहाल आणि चांदीचें पलंग व चौंपाळेही ठिकठिकाणीं शोभायमान आहेत.

अहाहा ! डाकूर क्षेत्रास जाण्याकरितां आगगाडीचे स्टेशनावरून जेव्हां गावांत जाण्याचा विचार करावा, तेव्हां कांहीं वेळपर्यंत नवख्या मनुष्याची स्थिति फार चमत्कारिक होऊन जाते. अगोदर गांवाबाहरची आंबराई व गर्द झाडीच पाहून मन गार होऊन जातें. नंतर गोमती नामक जे देवाच्या समोर भव्य सरोवर आहे; तेथें जाऊन पाहिल्यावर तर मनास फारच आनंद होऊन जातो ! एवढें मोठें तें भव्य व स्वच्छोदकानें भरलेलें सरोवर पाहून आणि त्या सभोंवतीं असलेले गगनचुंबित वृक्ष व त्यावरून बसलेले नानाप्रकारचें सुंदरपक्षी पाहून तेथें जाऊन उभा राहिलेला मनुष्य कितीही कठिण हृदयाचा आणि नास्तिकमताचा असला तरी त्याच्या मनावर या पुरातन स्थानाविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. आणि जेथें लक्षावधी लोकांचे एकनिष्ठ भक्तिप्रेम जडून राहिलें आहे, तेथें कांहीं तरी विशेष महत्व असलें पाहिजे असें पांखाड्यास वाटल्यावांचून राहत नाहीं.

असो. गोमातीच्या घाटांवरचा देखावा पाहून मनास फार आल्हाद होतो. तेथें कोणी स्नानसंध्या करीत नाक धरून बसलेले असतात, कोणी स्नानें करीत असतात, कित्येक गोमुखींत हात घालून बसलेले असतात, कोणी वस्त्रें धूत असतात, कित्येकांस गोपीचंदनाचें ऊर्ध्व त्रिपुंड लावीत असतात; त्याच-

प्रमाणें पुष्कळ गुर्जर स्त्रियांचीं स्नानें चालूं असतात, पुजा चालू असतात, धुणीं चालू असतात, वगैरे नानाविध पुण्यकर्में सुरूं झालेलीं असतात! याप्रमाणें पूर्वकर्में आटोपल्यावर मग सर्वांची दर्शनास जाण्यास मोठी धांदल उडून जाते. डाकुरनाथाचें देऊळ फार मोठें आणि पक्कें चिरेबंदी बांधलेले आहे तरी तेथें नित्य त्रिकाळ इतकी मनुष्यांची गर्दी होऊन जातें कीं, अगदीं सांगतां सोय नाहीं. अहाहा! काय तो आनंद वर्णन करावा? अगोदर देवाच्या देवळाचा उंच आणि सोनेरी भव्य कळस पाहिल्याबरोबरच मनुष्याची तहानभूक हरून जातें. मग देवाचा शामसुंदर पीतपिंताबरधारी व शंखचक्रगदायुक्त अशा कृष्णमूर्तीचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर मग तो संतोष काय सांगावयाचा आहे? दर्शन झाल्यावर अनेक जन्मार्जित पातकाचा क्षय होऊन अक्षय अखंड पुण्योदयाची स्वच्छ शूभ्र ध्वजा अंतःकरणवर उभी राहिल्या वांचून राहत नाहीं! तेथील पुजेचा थाट, आर्तीचा पाठ, समयांचा चकचकाट, रांगोळ्याचा घाट, अगरबत्यांचा घमघमाट, इत्यादि प्रकार पाहून पाहणारांची चित्तवृत्ति अगदीं गुंग होऊन जातें व घटकाभर ते देहभान विसरून जातात.

दर्शन घेऊन देवळाबाहेर पडल्यावरही मोठें कौतूक वाटत असतें. देवळाच्या उंच सोनेरी कळसावर हाजारों पोपट बसून कृष्ण कृष्ण भजन करीत

असतात ! आणि महादरवाज्यावर निरनिराळ्या रंगांतून सनयांच्या सुरावर चौघडा झडून राहिलेला असतो ! तात्पर्य डाकूर क्षेत्र पाहून आनंद होणार नाहीं असा मनुष्य सांपडणें दुर्मिळ होय. म्हणून आपणही असल्या सुंदर स्थळीं क्षणमात्र विश्रांति घेऊन येथील अदृश्य चमत्कार काय काय आहेत ते सूक्ष्म दृष्टीनें आवलोकन करूं म्हणजे आपल्या मनास क्षणभर कर्मणूक होऊन पुण्य क्षेत्रांतही पापमूलक कर्मे कसकसीं चालू असतात हेंही समजण्यांत येईल.

दुपारीं बारा वाजण्याचा सुमार झाला होता. बहुतेक थंडी नाहींसी होऊन वसंतऋतूच्या कारभाऱ्यानें आपल्या हातांत हवेचा संबंध घेतला होता, त्यामुळें अर्थात भर दोनप्रहरीं उष्णतेचा कडाका बराच भासूं लागला होता. त्यांत बहुत करून डाकूर हें अस्सल गुजराथ देशांत मोडत असल्यामुळें एव्हांपासूनच तिकडे चांगला उन्हाळा भासूं लागला होता. वाळूची जमीन चहूंकडे' लाल तापून गेली होती. व प्रवासी लोकांस वाटेंत पाणी पाणी होऊं लागलें होते; परंतु पाण्याचें वास्तव्य मार्गांतून अगदीं संपुष्टांत येऊन गेले होतें. त्यांत कोठें कोठें विहिरी होत्या परंतु त्यांचें पाणी काढणें म्हणजे सप्तपाताळापर्यंत प्रवाशास जाऊन पोचलें पाहिजे ! निदान शंभर हात तरी दोरी पाहिजे आणि आर्धा तास तरी वेळ मोडला पाहिजे तेव्हां तो लोटा वर एकदां आला तर यावयाचा; आणि त्यांतूनही तो भरला आला तर भाग्याचा ! अशा

प्रकारें गुजराथ देशांतील या ऋतूंतील प्रवाशाचें हाल-हवाल असत. वाटेंत सुपारी फोडण्यास सुपारी एव्हढा देखील धोंडा मिळावयाचा नाहीं ! प्रवाशांनीं गरज असेल तर वस्तुप्रमाणें धोंडाही एक संग्रही बाळगावा ! असो. या देशांतील उन्हाळ्याचे दिवस प्रवासी लोकांस कठीण तर खरेच ! परंतु करावयाचे काय ? ज्याच्या कपाळीं प्रवासच भोगणें अशा दिवसांत आलें असेल त्यांनीं तो निमुट भोगला पाहिजे; दुसरा उपाय नाहीं. वास्तविक पाहिलें असतां पक्षी देखील यावेळीं झाडावरून हालत नाहींत व अगदीं शब्द देखील करीत नाहींत ! एक ठिकाणीं सर्वजण आपापल्या कुटुंबांतील जमून अगदीं गुपचूप बसलेलें असतात ! ! जेव्हां संध्याळचा सुमार येऊन गार वारा सुटूं लागेल, तेव्हांच ते त्या जागेवरून उठून मग सर्वत्र विहार करूं लागतात. तात्पर्य उन्हाळ्या दिवसांतील भर दोनप्रहरची वेळ म्हणजे अंमळ कठीण तर खरीच. अशा वेळीं आपल्या प्रीयजनांचा वियोग होऊन एखाद्या चांगल्या मनुष्यास प्रवास कपाळीं येणें म्हणजे केवळ मृत्यूतुल्य होय यांत संशय नाहीं.

परंतु अशाही वेळीं एक बैलगाडी धांपा धांपा टाकीत टाकीत हळू हळू बडोद्याचे रस्त्यानें डाकुराजवळ जवळ जाऊन पोंचण्याच्या बेतांत होती. ही गाडी आधले दिवशीं पाहांटेच बडोद्याहून निघाली होती. ती वाटेंत दिवसभर चालून एक रात्र, मधील एका खेडेगांवीं मुक्कामास राहून आज रोजीं येथें डा-

कुराजवळ येऊन दाखल झाली होती. वाटेंत आंब्र-छाया मात्र ठिकठिकाणीं या गाडींतील प्रवाशास सुखाची मिळत गेली होती. हे दिवस आंब्यांस मोहर येण्याचे असल्यामुळें जागजागीं आंब्यास मोहर फुलून गेला होता; आणि कित्येक झाडास तर लहान लहान कैऱ्याही लटकून राहिल्या होत्या. आंब्रराईत गाडी जाऊन पोंचली म्हणजे मोहराचा वास सर्वत्र सुटून जात असे. परंतु गाडींतील प्रवासी दुःखीकष्टी असल्यामुळें त्यांस या मदन सुवासापासून वाटेंत कांहीं आनंद झाला नाहीं हे मला येथें सांगण्यास विसरतां कामा नये.

थोडया वेळानें ही गाडी गोमतीवर येऊन पोंचली. गोमती सरोवरास ज्या बाजूंनीं घाट नसून व माणसांची गर्दी नसून झाडी मात्र दाट होती, तेथें जाऊन ही गाडी उतरली. तेव्हां तींतून चार माणसें बाहेर आलीं. त्यांत तिघी बायका दक्षिणी पेहरावाच्या असून एक ब्राह्मण तद्देशीय पोशाकाचा होता. तो वयानें म्हातारा व दिसण्यांत मोठा सभ्य दिसून येत होता. त्याच्या दाढीचे केंस देखील अगदीं पांढरे शुभ्र होऊन गेले होते. तीन बायकांत एक उघड उघड मोलकरीण ( कुणबीण ) असावी असें स्पष्ट दिसत होते व बाकी दोघी मोठ्या थोर घराण्यांतील, तेजःपुंज, आणि वयानें सुमारें तीस वर्षांच्या आंत दिसत होत्या. त्यांत एकीच्या कपाळीं कुंकवाचा मोठा भव्य टिकला होता, परंतु दुसरीचे कपाळ पांढरे फिकट दिसत होते. या दोघींच्याही आंगावर डागिने मुळींच नव्हते तरी त्या

स्वरूपानें केवळ प्रत्यक्ष रंभा अप्सरेतुल्यच दिसून येत होत्या. परंतु त्यांतही आणखी जिच्या कपाळीं कुंकू मुळींच नव्हतें तिचें रूप तर अगदीं सुर्वोत्कृष्टच होतें. ती शरीरानें केवळ चवळेच्या शेंगेप्रमाणें असून वयानें पहिल्या पंचविसीच्याच अगदीं सुमारांत होती.

गोमतीवर सर्वांचीं स्नानें झाल्यावर मग त्या ह्मातार्‍या ब्राह्मणानें त्याला देवदर्शनाकरितां देवालयांत नेलें तेथें त्यांणीं देवदर्शन घेऊन देवाची प्रार्थना केली कीं आतां आम्हास या संकटांतून लौकर सोडीव. नाहींपेक्षां हे आमचे प्राण तरी या कुडींतून लौकर सोडीव ! आम्हांस आतां यापुढें धैर्य धरण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. येथें आतां तुझ्या पायाजवळ आम्हीं आलों आहों, म्हणून आमची उपेक्षा अतःपर करूं नकोस; येणेंप्रमाणें त्या दोघींनीं प्रार्थना केली ! मग त्या म्हातार्‍यानें त्याला देवळाचे पिछाडीस एका तेथील गुजराथी ब्राह्मणाचे घरांत नेलें. येथें पूर्वींच त्यांचे करितां सर्व सिद्धता केलेली होती. स्वयपाकासुद्धां सर्व तयारी होती. म्हातार्‍यानें त्याला मोठ्या गोड शब्दानें जेवणाचा फारच आग्रह केला. तेव्हां त्यांणीं मोठे जुलमानें चार घास पोटांत घातले. त्यांच्या पोटांत दोन दिवसापासून अन्न नव्हतें. जेवण झाल्यावर त्यांला अमळसा डोळा लागला. कारण त्यांला दोन तीन रात्रींपासून ह्मणजे बडोद्यांतील सुरसागरावरचें त्यांणीं आपलें घर सोडल्यापासून निद्रा कशी ती ठाऊक नव्हती ! !

प्रीय वाचकहो, या दोघी सुकुमार प्रवासी स्त्रिया कोण होत्या हें तुमच्या ध्यानांत आलें आहे काय? तुमच्या ध्यानीं आले नसल्यास मी सांगतों ऐका. ह्या आपल्या धर्माजीराव दाभाडयाच्या कुटुंबांतील त्याच्या पूर्ण नातलग होत. म्हणजे एक त्याची बायको सुमतीबाई आणि दुसरी त्यांची मेव्हणी ताराबाई! पंताच्या सांगण्यावरून एका गाणारीण कसबीण बायकोनें सभ्य कुलीन बायकोचा वेश धारण करून धर्माजीराव घरीं नसतां कांहीं तरी लोणकडी थाप मारून घराबाहेर काढून नेलें हें तुम्ही मागें वाचलेंच आहे. त्याच ह्या दोघी स्त्रिया. आणि दोघी तिकडे बडोद्यांतील राजमहालांत आडकून पडल्या आहेत आजून. म्हणजे नीति आणखी शतावली बडोद्यांतील राजमहालांत आहेत, आणि सुमती व ताराबाई प्रस्तुत तुमच्या पुढें डाकुरांत उभ्या राहिल्या आहेत! काय ही त्यांची दुर्दशा!! बगींतून पहिल्यानें नीति व शतावली उतरल्यावर बगीपुढें जाऊन एका बागेच्या दरवाजाशीं उभी राहिली. तेथें या दोघी उतरल्यावर बनावट सभ्य बाईनें याला आंतील बंगल्यांत नेऊन बसविलें. तेथें या दोघींचा एक पाट सात ठिकाणीं तेथील आज्ञाधारक माणसांनीं केला. स्वयंपाकही तयार झालेला होता. तेव्हां बनावट सभ्य बाईनें याला जेवणाचा आग्रह केला असतां यांणीं स्वच्छ तिला नकार सांगून विचारलें कीं, आमच्या मुली दोघीजणी अम्हाबरोबर होत्या त्या कुठें आहेत? आणि तुमचे यजमान व आमचे यजमान

कुठे आहेत ! ह्या सर्व गोष्टींचा बरोबर उलगडा समजल्यावांचून आम्ही अन्न घेणार नाहीं ! !

पुढें सभ्य बाईनें उत्तर केलें कीं, आमचे यजमान आतांच बहुतकरून येऊन पोंचतील आणि ते आल्यावर मग तुमच्या यजमानाविषयीं काय वर्तमान आहे तें कळण्यांत येईल !

कांहीं वेळानें तेथें एक बडोदेशाई मराठी पागोट्याचा काळसर बोवा येऊन पोंचला. तो वयानें चाळीशीच्या भरांत होता. कानांत मोठी थोरली दोन मोत्यांची भिगबाळी, व तिला हिरवागार पांचेचा लोलक होता. गळ्यांत मोत्यांची कंठी, हातांत हिऱ्याच्या आंगठ्या इत्यादि त्याचा मोठा वर्णनीय थाट होता. त्याचें स्वरूप त्याला मोठें माशुक वाटत होतें, तरी इतरांस तो कोळशांतील माणीक दिसत होता. असो हा मोठ्या डौलानें तेथें येऊन पोंचला आणि एक खुर्ची तेथें पडली होती त्यावर येऊन एकदम बसला. तेव्हां बिचाऱ्या दोघीजणींनीं आपलें सर्वांगास सफेत शालनाम्यानें झांकून घेऊन तोंडावरूनही बुरखा घेतला होता. मग बनावट सभ्य बाई तेथून निघून गेली. पुढें आलेल्या गृहस्थांनीं त्या दोघींशी बोलण्यास आरंभ केला ते असें:—

**गृहस्थ**—मला वाटतें आतां तुह्मी दोघी जेऊन घ्याल तर बरें होईल. कारण धर्माजीरावास आतां

इकडे येण्याला फुरसत होणार नाहीं. आणि मला तर वाडयांत जेवायाला जायाचें आहे.

**सुमतीबाई**—ते आल्याशिवाय आह्मी अन्न घेणार नाहीं! निदान ते संध्याकाळीं तरी येतील कीं नाहीं.

**गृहस्थ**—नाहीं संध्याकाळीं देखील धर्माजीराव येतील कीं नाहीं नेम सांगवत नाहीं, कारण त्याला सरकारांनीं कांहीं जरूरीच्या नाजुक कामासाठीं बाहेर गांवीं आज सकाळींच पाठविलें आहे ह्मणून ह्मणतो कीं, तुह्मी जेऊन घ्यावें हें चांगलें.

**सुमती०**—कोणत्या बाहेर गांवीं पाठविलें आहे! आणि आपण कोण हें कृपाकरून सांगाल काय?

**गृहस्थ**—त्याला डाकुरास पाठविलें आहे असें मी ऐकिलें; आणि मी महाराजांचा एक प्राणमित्र, बडोदेशाईतील एक श्रीमंत व वजनदार सरदार आहे. आणि इतकेंच नव्हें हल्लींच्या काळीं केवळ महाराजांचा उजवा हात अथवा प्रतिनिधी गायकवाड आहे ह्मटलें तरी शोभण्यासारखें आहे.

**सुमती०**—तर मग सर्व गायकवाडी राज्याचें सूत्र तुमच्या हातांत असेल, असें ह्मटलें पाहिजे!

**गृहस्थ**—होय, यांत काय संशय! तसें नाहीं म्हणणारास शंभर गोहत्येचें पातक लागणार आहे.

**सुमती०**—तर मग आमचीं मुलें अमर आणखी सद्गुण कोणीकडे गडप झालीं आहेत? तें वर्तमान आपल्याला विदित असले पाहिजे.

**गृहस्थ**—त्याला आह्मी वाघरी लोकांच्या बंडावर पाठविलें आहे. ते तिकडे मोठे विजयी झाले आहेत. आणि बहुतकरून एक दोन दिवसांतच आतां येथें येऊन पोंचतील!

**तारा०**—परंतु आजच आमच्या मुलींही नाहींशा झाल्या त्यांची काय वाट झाली? हा घोटाळा आह्मांला कांहीं समजला नाहीं.

**गृहस्थ**—ज्या ठिकाणीं मुली उतरल्या, त्याच ठिकाणीं प्रस्तुत महाराजांच्या थोरल्या राणीसाहेब राहत असतात. त्यांची इच्छा तुमच्या मुली पाहण्याविषयीं फार होती, व त्यांची आज्ञाही होती कीं, धर्माजीरावांच्या बायका मंडळीस घेऊन याल तेव्हां पहिल्यानें त्यांच्या मुलीस मला पाहण्याकरितां मजकडे घेऊन या. त्याप्रमाणें तुमच्या मुली सध्यां आज रोजीं राणीसाहेबांजवळ सुखरूप स्थितींत आहेत. तुह्मी त्यांच्या विषयीं अगदीं काळजी करूं नका. जेणेंकडून त्यांचें कल्याण होईल, अशीच गोष्ट राणी साहेब करतील. फक्त आतां तुमच्याच कल्याणाची मात्र आम्हाला काळजी उरली आहे!

**तारा०**—तुह्मी माझ्यासंबंधानें ह्मणतां होय महाहाराज?

**गृहस्थ**—निःसंशय तुमच्याविषयीं मला फार काळजी वाटत आहे.

**तारा**—तर मग तुमचें मोठें उपकार आहेत मजवर

परंतु मजसंबंधानें तुह्मांस एवढी काळजी कशास वाटूं द्यावी ? मुख्य धर्माजीरावाविषयीं तुमची कृपादृष्टी असली ह्मणजे मग त्यांत आह्मा सर्वांचें अक्षय कल्याणच आहे.

**गृहस्थ०**—धर्माजीराव माझा केवळ पंचप्राण आहे, अगदीं त्याच्या जर केंसास धक्का तर माझ्या जिवास; असें तुह्मी पक्कें समजा. मात्र तुह्मी अगदीं माझ्या सल्ल्यानें चालाल तर.

**तारा०**—आह्मी तुमच्या विचाराच्या बाहेर अगदीं एक पाऊलभर मुद्धां नाहींत समजला ? परंतु आमच्या मुला बाळांचें आणि धर्माजीरावाचें मात्र नुकसान न होईल अशी तजवीज आपण कृपा करून ठेवली पाहिजे. ( रडूं लागतें. )

**गृहस्थ०**—छे, छे, छे ! तुह्मी अगदीं रडूं नका बाईसाहेब. तुह्मी रडल्यावर मग आमच्या सारख्यांचा जवळ असून उपयोग तो काय ? मी तुह्मांस वचन देतों कीं, या घटकेपासून हा सरदार ( छातीला हात लावून ) तन मन धनें करून अगदीं तुमचा झाला आहे !

**तारा०**—असें होईल तर ही ताराही तुमचा उपकार फेडल्याशिवाय राहणार नाहीं. फार तर काय तुमच्या घरची बटीक होऊन ही तारा तुमचा उपकार फेडणारीण आहे !

**गृहस्थ०**—राम राम राम. ही इतकी मोठी प्रतिज्ञा कशाला करितां ?

हें इतकें बोलणें झाल्यावर दोघीजणींला अमळ धीर आला. आणि त्या सरदारालाही मोठा आनंद झाला

वीं, बहुत करून आतां तारा ही आपलिसी झाली यांत कांहीं संशय नाहीं. माझे मनोरथ तारा पूर्ण करणार, अशी त्याला तिच्या संदिग्ध बोलण्यावरून आशा उत्पन्न झाली. आणि मग त्याणें विचार केला कीं, "आतां हें माशुक पाखरूं येथेंच राहूं दिलें तर, न जाणो पंत यांत कांहीं ढवळाढवळ केल्यावांचून सोडणार नाहीं. त्याला या तारेचा छंद फार लागला आहे. तेव्हां तो बामनभाई आपल्या काव्यानें मध्यें शिरून कुत्र्यासारखें पात्र उष्टें केल्याशिवाय सोडणार नाहीं. अथवा असलें हें उत्तम पात्र महाराजापुढें तरी नेऊन खचीत ठेवणार आहे. मग मात्र आपल्याला माशा मारीत बसावें लागेल ! ! त्यापेक्षां आजचे रात्रीसच रातोरात या दोघींही जणीस येथून कोठें तरी लांब नेऊन ठेवावें हें उत्तम. मग कांहीं दिवस गेल्यावर आपण त्या ठिकाणीं जाऊन पुढचा सर्व विचार साधून घेऊं ! " या प्रमाणें या मराठे सरदारानें आपले मनांत विचार करून तो त्यावेळीं तेथून निघून गेला. आणि जाते समयीं त्याणें फारच गोड व धिराचीं भाषणें बोलून त्या दोघी बहिणीस थोड थोडें जेऊंही घातलें !

रात्रीं पुनः तो तेथें आला. आणि म्हणाला कीं, " मीं आज दरबारांत शोध केला त्या वरून असें समजलें कीं, धर्माजीरावास कांहीं दिवसपर्यंत डाकुरांत राहवें लागणार आहे. उद्यां परवां इतक्यांत त्यांचें येणें इकडे होत नाहीं. तेव्हां मला असें वाटतें कीं, तुम्हींच प्रातःकाळीं डाकुरास त्यांचे भेटीकरितां निघून जावें हें चांगलें होणार आहे. तुमची मर्जी या गोष्टीस मान्य

असेल तर मी गाडी माणसें देऊन मोठ्या पहाटेसच तुमची तिकडे रवानगी करून देतों ! " सरदाराच्या या बोलण्यास सुमतीबाईकडून व ताराबाईकडून हुंकार मिळण्यास उशीर लागला नाहीं. कारण त्यांच्या मनांतून धर्माजीरावाची भेट केव्हां होईल असें झालें होतें. पुढें सरदारांनें त्यांना आग्रह करून फराळाचें घातलें. आणि लौकरच निजा आतां, कारण पहाटे पुनः लौकर उठलें पाहिजे असें सांगून तो बाहेर निघून आला. त्याणें अत्तर गुलाब, फुलांचे हार गजरे आणि पुष्कळ मेवा मिठाई त्यांजकरितां तेथें आणविली होतीं; परंतु थोडक्या फराळाशिवाय या दोघी बायांनीं त्यांतून कांहीं एक घेतलें नाहीं. कांहीं वेळांनीं पंत तेथें आला, परंतु बंगल्याच्या बाहेरच सरदाराची व त्याची भेट होऊन तो परत गेला. सरदारांनीं त्याला डाकूरचा वगैरे मजकुर सांगितला नाहीं. मग पाहाटें सुमारें प्रहर रात्र आहे तोंच, एका बैलाच्या गाडींत अवश्य तेव्हढा सरंजाम घालून, एका कुणबिणीसहीत व एका म्हाताऱ्या गुजराथी ब्राम्हणासहित त्या दोघींची रवानगी अगदीं गुपचूप रीतीनें डाकुरास त्याणें करून दिली. पुढें ही मंडळी डाकुरास पोंचून, तेथें स्नान व देवदर्शन वगैरे आटोपून आतांच अमळ लवंडली आहे. येथपर्यंत तुम्ही मागें वाचलेंच आहे. आतां पुढें काय झालें तिकडे आपण लक्ष देऊं.

ज्या घरांत ह्या आपल्या पाव्हण्या दोघी बाया उतरल्या होत्या, तें घर एका गुजराथी ब्राह्मणाचें असून, तो ब्राह्मण तेथें उपाध्येपणाचें काम करीत असे. म-

धून यात्रेची मंदी असली ह्मणजे तो कधीं कधीं बडोद्यासही कांहीं उत्पन्न करण्यासाठीं जात येत असे. बडोद्यांत त्याची बरीच गिऱ्हाईकी होती. हा ब्राह्मण या खेपेस आपल्या ओळखीच्या दोन बायांस घेऊन, बडोद्याहून एका मोठ्या सरदाराच्या आज्ञेनें डाकुरास आला आहे हें तुह्मी जाणिलेंच असेल. म्हणजे गाडींत बसून जो म्हातारा ब्राम्हण बडोद्यापासून डाकुरा पर्यंत आला, तोच ब्राम्हण या घरचा मालक होता. याला बायको होती. ती याच्याही पेक्षां द्रव्यलोभी होती! या दोघांही नवरा बायकोंची फक्त द्रव्यावरच दृष्टी होती. द्रव्य मिळत असलें म्हणजे मग पापपुण्याकडे अगदीं पहावयाचें नाहीं. द्रव्या करितां पाहिजे तीं कर्में करण्यास हें दंपत्य अगदीं एका पायावर तयार असे. फार तर काय; परंतु मनुष्याचा खून करण्यास देखील तयार!! असो. या ब्राम्हणास बडोद्यांतील त्या कामांध सरदारानें द्रव्य आशा देऊन डाकुरास त्या दोघी सुशील स्त्रियांस घेऊन जाण्यास सांगून पुढें काय करावयाचें तीही व्यवस्था सांगून दिली होती! त्यावरून त्या दिवसीं त्या ब्राम्हणानें दिवसभर खटपटींत घालवून सर्व प्रकारची तयारी करून ठेविली होती. माडीवरील दिवाणखान्यांत चारपाट, रांगोळीचे चौक, ताटवाटी, तांब्या, पंचपात्री, तेलवाती घालून तयार केलेल्या चार समया, उदबत्त्या, फुलें, फुलांचे हारगजरे, पानें, सुपाऱ्या, कच्चादोऱ्याचे बंडल आणि हळदीकुंकू, खोबऱ्याच्या वाट्या, नारळ वगैरे सर्व सरंजाम तयार करून ठेवला होता.

दिवाणखान्याच्या पुढच्या बाजूस एक खोली होती, त्यांत एक छपरी पलंग घालून ठेवला होता. त्यावर गुडघ्या इतका नरम बिछाना घातलेला असून, त्यावर सफेत सरपोस टाकलेला होता. ठिकठिकांणीं उश्या गिरद्या होत्या. आणि जवळ पान सुपारीचे तबक सर्व सरंजामानीशीं भरून ठेवलें होते. येथेंही एका ताटांत फुलांचे हार गजरे होते. व मेवामिठाई तबकांतून मांडून ठेविली होती. हवा आंत यावी म्हणून खिडक्या मोकळ्या टाकिल्या होत्या. या खोलीला चार खिडक्या होत्या, पैकीं दोन खिडक्या डाकूरनाथाच्या देवळा शेजारील एका वाड्याच्या मैदानांत आल्या होत्या. हा वाडा डाकूर संस्थानचे वहिवाटदार श्रीमंत बाबासाहेब तांबेकर यांचा असून हे खुद्द या वाड्यांत राहत असत. हे वयानें अगदीं म्हातारे झाले असून मोठे सभ्य, दयावंत, स्वधर्मनिष्ट, आणि डाकूरनाथाचे पूर्ण भक्त होते. हे जातीचे देशस्थ ब्राम्हण असून, मोठे इनामदार आणि घरचे संपन्न होते. जवळ पांच पंचवीस शिपाई, आचारी, पाणके, कारकून, स्वार, गाई, म्हसी, घोडे गाड्या वगैरे, मोठा भारी खटला होता. त्यांची डाकूर गांवावर व आसपास दहा पांच कोसांत मोठी जरब व वजन असे. यांस एक मुलगा व दोघी सुना होत्या; शिवाय पुष्कळ आप्त मंडळी होती. गांवांतील लोक बाबासाहेबास सरकार म्हणत असत.

असो. मागें वर्णन केल्याप्रमाणें आपल्या घरांत गुजराथी ब्राम्हणानें तयारी केल्यावर संध्याकाळ होत आला. दोनप्रहरीं त्या घरांत आल्याबरोबर जेवणाचे

वेळीं ताराबाईनें त्या म्हाताऱ्या ब्राम्हणास विचारलें होतें कीं, येथें आम्हांला तुम्ही धर्माजीरावाच्या भेटीस आणलें, असें असतां धर्माजीराव येथें कोठें भेटले नाहींत हें कसें काय? तेव्हां म्हाताऱ्यानें सांगितलें कीं, ते तेथून आणखी सकाळींच दोन चार कोसांवरील खेडेगांवास गेले आहेत म्हणून त्यांची भेट आतांच होणार नाहीं. बहुधा संध्याकाळीं किंवा उद्यां ते परतून आल्यावर मग भेट होईल. हें ऐकिल्यावर दोघी कांहींशा स्वस्थ झाल्या होत्या.

संध्याकाळच्या वेळेस एक सरदार घोड्यावर बसून दोन स्वारांसहीत तेथें येऊन पोंचला. त्याच्या करितां या गुजराथी ब्राह्मणाच्या घरांत बिछाईत पूर्वींच घालून ठेविली होती. तेथें आल्यावर तो दोन घटका विश्रांति घेत लोडासी टेंकून बसला होता. जवळचे हुजरे व खिजमतगार त्याला वरचेवर चांदिच्या डब्यांतून पक्या पानांचे विडे काढून खाण्यास देत होते. आणि एकजण चांदीची पिकदानी वरचेवर त्याच्या पुढें ठेवित होता. हा सरदार पूर्वींचा आपला ओळखिचा आहेच. याणेंच सुमतीबाईस व ताराबाईस रातोरात बडोदे येथील बागेंतून काढून डाकुरास पोंचविलें होतें. तेव्हां त्याचें वर्णन पुनः येथें विशेष कांहीं करण्याचें कारण उरलें नाहींच. आतां सांगायचें ह्मणून इतकेंच कीं, हा गृहस्थ येथें कोणच्या उद्देशानें आला आहे व त्याणें या दोन बाया येथें कशाकरितां आणल्या आहेत!

कांहीं वेळानें तो उठून आंतमध्यें जेथें ताराबाई व

सुमतीबाई बसल्या होत्या त्या ठिकाणीं गेला. तेव्हां त्या चपापून उठून उभ्या राहून, तोंडावरून त्यांणी लागलीच बुरखा घेतला. नंतर तेथें सरदाराचें व त्यांचें बोलणें झालें तें;—

**सरदार०**—आज तुह्मी किती वाजतां येथें येऊन पोंचला?

**ताराबा०**—सुमारें बारा वाजतां!

**सरदार०**—वाटेंत उन्हाळ्यामुळें फार हाल झाले असतील, परंतु उपाय काय? आगगाडींतून तुह्मास इकडे त्याचवेळीं पाठविण्याची सोय नव्हती. तथापि येथें आल्यावर तर थोडा आराम झाला कीं नाहीं?

**ताराबा०**—तुमच्या व्यवस्थेनें आह्मांस काय कमी पडणार आहे? सर्व कांहीं आराम झाला आहे. परंतु मुख्य ज्या कामाकरितां तुह्मी आह्मांला येथें आणलें, त्याचा तर मागमुस येथें मुळींच काहीं दिसत नाहीं!!

**सरदार०**—कां बरे, असें कां ह्मणतां? त्या गोष्टीची तर येथें पूर्वींच सर्व कांहीं तयारी करून ठेविली आहे.

**सुमती०**—कोणच्या गोष्टीची तयारी, तें आमच्या समजण्यांत आलें नाहीं!

**सरदार०**—आणखी एक घटकेनें सर्व कांहीं समजण्यांत येईल. माझ्या मनांतून धर्माजीरावाच्या सर्व कुटुंबांतील माणसांचें कल्याण करावें असें खचित् आहे.

**सुमती०**—हा तुमचा उपकार आह्मी विसरणार

नाहीं. परंतु आम्हांला तुम्ही ज्या कामाकरितां येथें घेऊन आला तें काम कोठें आहे ?

**सरदार०**—फक्त मुहुर्ताची वाट पाहतों, बाकी सर्व तयारी आहे. मुहुर्तापुढें उपाय नाहीं. सुमारें आणखी एक घटका अवकाश आहे.

**तारा०**—म्हणजे काय ? तुमच्या बोलण्याचा स्पष्टार्थ आम्हांला कळत नाहीं. धर्माजीरावाच्या भेटीकरितां जर आम्हांला येथें आणलें, तर भेटीला मुहुर्त तो कशाला पाहिजे ?

**सरदार०**—तुम्ही माझ्या विचाराप्रमाणें वागाल तर धर्माजीरावाची भेट होईल, सरकाराची प्रसन्नता होईल, भ्रमरसद्गुणाची भेट होईल, नीति आणखी शातावली तुमच्या घरीं येऊन पोंचतील; इतकेंच काय ? तुम्हांला एक महिन्याचे आंत रंकाचा राव करून सोडीन समजला ? जें पाहिजे तें देईन. साऱ्या बडोद्यांत तुमच्या इतके सुखी व श्रीमंत दुसरें कोणीं नाहीं अशी व्यवस्था होईल.

**तारा**—पण आम्ही तुमच्या विचारा बाहेर आहों ते कोठें ? तुमच्या सल्याबाहेर असतों तर; तुमच्या म्हणण्यावर येथपर्यंत कशाला आलों असतों ? आमचा विश्वास तुमच्यावर आहे.

**सरदार०**—म्हणून मीही तुमच्यावर मनापासून प्रीति करतों. बरें, हे डागिने पाहा बरें, तुमच्या मनाप्रमाणें आहेत कीं नाहींत ते ! ( डागिन्याचा डबा पुढें ठेवतो ).

**तारा०**—कोणाचे डागिने आणि कशाकरितां

आणले आहेत ? खेरीज ते आम्हांला पाहून काय करायचे आहेत ?

**सरदार०**—असें वेड घेऊन पेडगांवाला काय म्हणून जावें ? आतां लाज कशाला पाहिजे, येथें कोण परकें आहे ? येऊन जाऊन सुमतीबाई त्या तुमच्या प्रत्यक्ष बहीणच आहेत. हे डागिने पहा. हे मनास आले नाहींत तर दुसरे जडावाचे मिळतील.

**सुमती०**—या तुमच्या बोलण्यावरून आतां आम्हांस भीति उत्पन्न झाली आहे.

**तारा०**—माझ्या आंगाचा तर थरकांप झाला आहे बाई ! !

**सरदार०**—खरोखर मी तुम्हांस माझ्या लग्नाच्या बायकोपेक्षांही अधीक सुखानें ठेवीन. केवळ जीव कीं प्राण अशा रीतीनें मी तुम्हांस गळ्यांतला ताईत करून ठेवीन !

**तारा०**—तुमचे शब्द आतां भयंकर वाटू लागले. ह्मणून काय असेल तुमच्या मनांत तें एकदां स्पष्ट कां सांगाना ?

**सरदार०**—ज्यांत तुमच्या कल्याणाची गोष्ट आहे ती मला केली पाहिजे. मग स्पष्ट सांगणें तें कशाला ? शिवाय तुह्मी ह्मणजे कांहीं अज्ञान दशेंत आहां अशीही गोष्ट नाहीं. तुह्मांला सर्व कांहीं समजतें आहे. हा एवढा मोठा सरदार आणि साऱ्या गायकवाडी राज्याचा प्रतिनिधी, तुमच्या प्राप्ती करितां केवळ अतूर होऊन गेला असून, तुह्मी आपल्या मनाची निष्ठुरता अद्याप सोडून देत नाहीं याला काय ह्मणावें ? हें ता-

रुण्य वारंवार प्राप्त होत नाहीं ! ! अमोल तारुण्याचा उपयोग न करितां जे त्याला व्यर्थ दवडतात, त्या सारखे महामूर्ख जगतीतलावर दुसरे कोणी नाहींत ! ! यासाठीं मी सांगतों कीं, तुह्मी हे डागडागीनें आतां लवकर आंगावर घालून व हिरवी पैठणी नेसून, माझ्या बरोबर गंधर्व विवाह लावण्यासाठीं त्वरेनें सिद्ध व्हावें. हें बरें; नाहींपेक्षां येथें तुमची दशा कठीण होणार आहे

**सुमती०**—अरे दैवा ! हें काय आमच्यावर आणखी संकट ओढवलें ? येथें येऊन आह्मी सर्वस्वी फसून गेलों ! !

**सरदार०**—आणि तेथें बडोद्यांत काय फसला नव्हता ? तुह्मी त्या कसबिणीच्या गोड बोलण्यास भुलून, आपल्या मुलीसहीत आपलें घर सोडून तेथील बागेंतील बंगल्यांत आलात, तेव्हांच फसून गेला आहां. तथापि मला दया आली ह्मणून मीं तेथून काढून तुह्मास इकडे आणलें आहे; हें तुम्ही आपलें सुदैव समजा.

**तारा०**—आम्ही तेथेंच राहिलों असतों तर काय झालें असतें ?

**सरदार०**—पंताचीही आणखी × × × इच्छा तुम्हास पूर्ण करावी लागली असती ! त्यांत एक ब्राह्मण आणखी दुसरा मराठा ! ! मग आठरा धान्यांचें कडबोळें सहज तयार झालें असतें ! ! !

**तारा०**—तेथून इकडे आलों म्हणून आम्हास आतां काय सुख मिळणार ?

**सरदार०**—एक वेळ तुम्ही माझ्याशीं गंधर्व वि-

वाह लावून माझी बायको झाला, असें सर्वांस समजलें म्हणजे मग तुमच्याकडे वाकड्या डोळ्यानें पाहण्याची कोणाची मगदूर नाहीं ! फार तर काय; पंताला आ-णखी × × × देखील मग गप्प बसावें लागेल ! ! आणि माझ्या या नवीन नात्यामुळें सर्व दरबारच्या मंडळीस तुमच्यावर कृपा दृष्टीनें पाहणें भाग येईल.

**तारा०**—पण तुमच्या सारख्या अस्सल मराठी कुळांत आणि थोर लोकांत गंधर्व विवाह करणें कसें प्रशस्त होईल ? आमच्या कुळांत या मागें सात पिढ्यांत तर असा आनाचार कधीं घडण्यांत आला नाहीं ! !

**सरदार०**—मागचीं माणसें सर्व महामूर्ख होतीं. प्रस्तुत सुधारणुकीचा काळ प्राप्त झाला आहे. ब्राम्हणांत देखील गंधर्व विवाह सशास्त्र ठरला असून, तो त्या लोकांत आलीकडे जारी झाला आहे ! मग आम्ही मराठे त्यापेक्षां तर उंच नाहींत ना ? चोरून व्यभिचार करून बालहत्त्या करीत बसण्यापेक्षां सशास्त्र गंधर्व विवाह करून सौख्य भोगून घेणें काय वाईट गोष्ट आहे ?

**तारा०**—तथापि देखील धर्माजीरावास ही गोष्ट विचारल्या शिवाय माझ्यानें तुम्हांस कांहींच सांगवत नाहीं. म्हणून हे डागिने आणि पैठणी तुम्ही धर्माजीराव येईपर्यंत उचलून ठेवा. आणि कृपा करून तुम्हीही येथून क्षणभर दुसरीकडे निघून जा ! !

**सरदार०**—हें कार्य आटोपल्या शिवाय धर्माजीरावाची व तुमची स्वप्नांतही भेट होणार नाहीं हें मी तुम्हांस स्पष्ट सांगून ठेवतों. आणि खेरीज तुमचीही ये-

थून सुटका होणार नाहीं ! ! आतां मुहूर्त भरत आला म्हणून तुम्ही आनंदानें लौकर नटून तयार व्हावें हें चांगलें.

असें म्हणून त्याणें त्या म्हाताऱ्या ब्राम्हणास हांक मारली, तेव्हां तो धांवतच जवळ येऊन म्हणाला कीं, घड्याळांत नऊं वाजून गेले असल्यामुळें, मुहूत बरोबर झाला आहे. आणि आमच्या कडून सर्व तयारी सिद्ध करून ठेवली आहे. चार ब्राम्हण येऊन बसले आहेत, मग आतां उशीर काय म्हणून करता ? तेव्हां सरदारानें सांगितलें कीं, सर्व सामुग्री आणखी ब्राम्हण घेऊन तुम्ही लौकर वरती निघून जा. आणखी कार्यास आरंभ करा. असें सरदारांनीं सांगतांच त्या म्हाताऱ्यानें सर्व जणास वरती आणलें. घराचा दरवाजा आंतून बंद करून घेतला होता व बाहेरचे बाजूस सरदाराचे शिपाई व नोकर बसले होते. याप्रमाणें तयारी झाली, ब्राम्हणांनीं रांगोळ्या व पाट मांडिलें. समया लावून दिल्या. नारळ, कलश, फुलें, पानसुपारी, गुलाल वगैरे सरंजाम पूर्वींचाच तयार केलेला होता. ब्राह्मणांनीं तोंडांनीं कांहीं मंत्र म्हणण्यासही आरंभ केला. वराचे कपाळीं मळवट कुंकवाचा लावून दिला आणि कपाळावर पागोट्याला धरून एक फुलांची मंडोळी बांधून त्याला ( सरदाराला ) पाटावर आणून बसविलें.

आतां वधू जवळ गेली पाहिजे, येथपर्यंत तयारी येऊन ठेपली; तेव्हां सर्व ब्राम्हण मिळून त्या ताराबाईस व सुमतीबाईस हाका मारूं लागले. याप्रमाणें प्रसंग पाहून सुमतीबाईनें तर धाडधाड आपलें कपाळ उंबऱ्यावर आपटून कपाळमोक्ष करून घेऊन, प्राण

देण्याचा संकल्प केला. तेव्हां ताराबाईनें तिला बळकट गच्च आवळून धरून सांगितलें कीं, आतां असें धैर्य सोडून उपयोग होणार नाहीं. येथें आतां युक्तिनें वागून या संकटांतून पार पडलें पाहिजे ! फसलोत तर खरें ! ! आतां दांडगाईचें वर्तन करून निभाव लागणार नाहीं. म्हणून या मेल्यानें जसें युक्तिचे वाटेनें येथें आणून आपल्याला फसविलें, त्याच प्रमाणें आपणही त्याला युक्तिनेंच फसवूं. याप्रमाणें ताराबाईनें तिचें शांतवन करून तिला गप्प बसविलें आणि आपण उठून ते सर्व डागिने आंगावर घातले व पैठणीही नेसली.! हें पाहून सरदाराचा आनंद गगनांतही मावेनासा झाला. तो मनांतलेमनांत भावी ताराबाई कडून मिळणाऱ्या विषय सौख्यांत अगदीं गर्क होऊन गेला. त्याचें देहभान अगदीं नाहीसें होऊन गेलें. त्याला असें वाटलें कीं, " ज्या पेक्षां तारा,माझी प्रीया, माझी प्राणप्रिया आतां पैठणी वगैरे नेसून व डागिने वगैरे घालून तयार झाली आहे, त्या पेक्षां ती आतां खचीत् माझी झाली ! आतां आणखी एका घटकेनें तिच्या आधरपानाचा अमृत तुल्य स्वाद् मला प्राशन करण्यास मिळेल ! आहाहा ! काय माझें भाग्य, मीं आतां वर्णन करावें ! खचित् मी आतां स्वर्गीचा इंद्र आहे यांत संशय नाहीं. आणि हीं तारा निःसंशय तिलोत्तमा होय ! छत्; तिलोत्तमा देखील हिच्यापुढें अगदीं कसपटासमान आहे. कारण त्या हिरव्या पैठणीमुळें व डागडागिन्यामुळें तिचें सौंदर्य आतां पूर्वीपेक्षांही सहस्रपट शोभूं लागलें आहे."

याप्रमाणें काळा सरदार मनांतले मनांत यावेळीं मांडे खात असतां, म्हाताऱ्या ब्राम्हणाकडून तारेचा निरोप त्याला येऊन पोंचला कीं, "विवाह लागण्या पूर्वीं येथील मुख्य दैवत जे डाकूरनाथ त्याचें अगोदर दर्शन झालें पाहिजे असा माझा हेतु आहे. या करितां आपण जोड्यानें अगोदर देवळांत जाऊं!" हा निरोप त्या सरदाराच्यानें मोडवला नाहीं; इतकेंच नव्हें, त्याला या निरोपानें मनांतल्या मनांत फार गुदगुल्या झाल्या. आणि त्याणें लागलींच ब्राम्हणासहीत ताराबाईला व सुमतीबाईला तिचें बरोबर घेऊन पडद्पोशीनिशी देवळांत . जाण्याची तयारी केली. मशाली पेटविल्या व सर्व निघून देवळाच्या पटांगणांत येऊन पोंचले. ही वेळ देवाच्या शेजारतीची होती. म्हणून देवळांत पुष्कळ लोकांची गर्दी होऊन गेली होती. त्या लोकांस सरदाराचे शिपायांनीं एके बाजूस केलें. याच वेळीं देवाचें वहिवाटदार मालक जे **बाबासाहेब तांबेकर** ते देवळांत आले होते. त्यांच्याही बरोबर शिपाई व मशाली होत्या. या म्हाताऱ्याचा नियम होता कीं, दररोज त्रिकाळ देवाचें दर्शन घेतल्यावांचून राहावयाचें नाहीं. असो. तारा फार शहाणी बायको होती. तिणें हा सुप्रसंग वाया जाऊं दिला नाहीं. ती त्या पडद्पोशींतून व गर्दींतून तशीच बाहेर पडून, जुलूम जुलूम म्हणून मोठ्यानें ओरडत धांवत येऊन, बाबासाहेबांच्या पायावर पडली! ती कांहीं केल्या उठेचना!! इतकें हें कृत्य सुमती बाईनें, पाहून तीही पाठोपाठ धांवत येऊन

जुलूम जुलूम; रक्षण करा रक्षण करा; ह्मणून ओरडून बाबासाहेबांच्या पायावर पडली ! ! दोघीही पाय सोडून उठेनात; तेव्हां बाबासाहेबांनीं त्यांस आश्वासन देऊन वरती उठविल्या आणि त्यांची सर्व हकीगत ऐकून घेऊन त्यांजला लागलीच आपल्या मशाली चार शि-शिपाई बरोबर देऊन वाड्याकडे लावून दिले. इतक्यांत हें वर्तमान तेथें सरदारास समजल्यावरून त्याणीं बाबासाहेबांभोंवती मोठीच गर्दी करून दिली. सर्व. देऊळभर गडबड उडून गेली ! देवाची सेज आरती खोळंबून राहिली ! ! सरदारांनीं मागें पुढें न पाहातां आपल्या लोकांसहीत बाबासाहेबावर हल्ला करून लागलींच शस्त्रें चालविलीं. परंतु कसेंही झालें तरी बाबासाहेब तेथचा मालक व हुकमतदार असल्यामुळें हजारो लोक त्याच्या रक्षणार्थ क्षणमात्रांत जमा झाले. त्यांच्या पुढें अर्थातच सरदाराच्या दाहा पांच शिपायांचें कांहीं चाललें नाहीं. ते मार खाऊन चहुंकडे चार पळून गेले आणि बाबासाहेबांच्या लोकांच्या हातीं बडोद्याचे •काळे सरदार कैदी होऊन सांपडले ! ! गंधर्व विवाह लावण्यास ब्राह्मण जे गावांतील जमा झाले होते, ते असल्या त्या गर्दीत तेथून केव्हां नाहींसे झालें हें समजलें नाहीं. परंतु तो ह्मातारा ब्राह्मण मात्र ही गर्दी शांत होईपर्यंत देवळांतील एका आंधाऱ्या ओवरींत लपून बसला होता; आणि मग हळूंच आपल्या घराकडे निघून गेला.

दुसरे दिवशीं बाबासाहेबांनीं सर्व कच्ची चवकशी केली, तेव्हां त्याला सर्व साद्यंत वर्तमान समजलें. आ-

णि आपला जिवलग मित्र जो धर्मोजीराव त्याची पत्नी व मेव्हणी आपल्या हांतून संभाळली गेली, या बद्दल त्याला मोठा आनंद वाटला. शेवटीं त्याणें सर्वांच्या लेखी जबान्या घेऊन सर्व कागदपत्रासहीत तो खटला व कैदी सरदार यांस बडोद्यास रेसिडेंट साहेबाकडे पाठवून देण्याचें ठरविलें! तेव्हां मात्र त्या सरदाराची आपल्या अब्रूच्या बचावाकरितां मोठी त्रेधा उडून गेली. तो बाबासाहेबाजवळ पटपटा पाया पडून दीन वदनानें क्षमा मागूं लागला. आणि कृपा करून सोडून द्यावें ह्मणून गायावाया करून करुणा भाकूं लागला. तेव्हां बाबासाहेबास दया उत्पन्न झाली कीं, हा बडोद्याचा मोठा नामांकित, श्रीमान आणि अब्रूदार व पहिल्या प्रतीचा सरदार आहे. गुप्त रीतीनें दुर्गुणाच्या सपाट्यांत येऊन येथें प्रसंगांत सांपडला आहे. याला अशा खटल्यानिशी बडोद्यास एजंटसाहेबांकडे पाठविला असतां, सर्व राहशतींत याचा मोठा फजिता उडणार आहे. त्यापेक्षां याला पश्चात्तापाची शिक्षा देववून गुप्त रीतीनें अब्रूंतच पाठवून द्यावें हें चांगलें. असें ठरवून, शेवटीं त्याला सांगितलें कीं, तूं फिर्यादीची समजूत आपसांत करीत असल्यास आह्मी तुला सोडून देण्यास तयार आहों. मग सरदारांनीं ताराबाईस व सुमतीबाईस साष्टांग नमस्कार घालून व मातोश्री ह्मणून दोघींच्याही पायावर आपले डोकें ठेवून क्षमा मागितली. तेव्हां त्या दोघी थोर मनाच्या असल्यामुळें त्यांना दया आली. आणि त्यांनीं त्याला सोडून देण्याविषयीं बाबासाहेबांजवळ विनंतीपूर्वक रदबदली

केली. तेव्हां बाबासाहेबांनीं त्या सरदाराला सोडून क्षमालिंगन दिलें आणि एक दिवस ठेवून घेऊन मोठी मेजवानी व पोषाक देऊन, त्याची बडोद्यास रवानगी करून दिली. सुमतीबाईस व ताराबाईस पुढें धर्माजीरावाची भेट होईपर्यंत बाबासाहेबांनीं आपल्या जवळच ठेवून घेऊन त्यांची योग्य प्रकारें बरदास्त ठेविली.

सातवा भाग समाप्त.

---

# भाग ८ वा.

## मोठी चोरी व मनुष्यवध.

॥ कोण दिवस येईल कैसा ॥
॥ नाहीं देहाचा भरवसा ॥१॥

"तुकाराम."

गुजराथेंत नर्मदेच्या खालोखाल आणखी तीन चार नद्या मोठ्या व प्रसिद्ध आहेत. त्यांत तापी, मही व साबरमती ह्या तीन नद्या तर केवळ नर्मदेच्याच बरोबरीच्या आहेत ह्मटलें असतां चालेल. तापी सुरतेजवळ नर्मदेप्रमाणेंच पश्चिम आंरवी समुद्रास मिळाली आहे. साबरमती आमदाबादेस आहे, आणि आमदाबादेच्या व बडोद्याचे दरम्यान, मध्यें मही किनारा आहे. तिकडे

नर्मदेच्या किनाऱ्यावरील मुलखास रेवाकांठा ह्मणतात व मही किनाऱ्यास महिकांठा ह्मणतात. तथापि महि-कांठा कांहीं गोष्टीनें रेवाकांठ्यापेक्षांही अधिक आख्ये-चा आहे. मही नदीचा प्रवाह मोठा भयंकर आहे. पात्र खोल आहे. नांवा नेहमीं चालतात. पाण्यांत सुसरी, मगरी वगैरे भयंकर प्राणी पुष्कळ आहेत. आणि किनाऱ्यास मोठमोठ्या वघळी फार आहेत, अशा मोठ्या वघळी दुसऱ्या कोणत्याही नदीला नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. या वघळी नदी किनाऱ्यापासून वांकड्यातिकड्या सर्पाकृति कोस कोस, दोन दोन कोसपर्यंत लांब गेल्या आहेत. आणि त्या फार खोलही झाल्या आहेत. शिवाय वघळींत वघळी आणखी आडव्या तिडव्या झाल्या असून, त्यांतही आणखी चोरटे लोकांनीं आपणास रहाण्याकरितां गुहा केलेल्या आहेत. त्यामुळें त्या लोकांस राहण्याची तेथें मोठी निर्भय सोय झाली आहे. ते लोक शहरांतून व लहान मोठ्या गांवांतून दरवडे घालून येऊन, त्या ठिकाणीं खुशाल निर्भयपणानें वर्षोंवर्ष राहतात तरी पत्ता लागत नाहीं. याप्रमाणें शेंकडों चोरटे लोक नेहमीं मही नदीच्या वघळींतून राहिलेले असतात व महीकांठचा एजंट साहेब त्यांचा नेहमीं शोध करी असतो, तरी शेवटीं चोरटे लोक सांपडण्याच्या कामांत आवळ्या येवढें पूज्य होतें !! या गोष्टीचें मुख्य कारण त्या वघळी होत. असो. महीनदीच्या किनाऱ्यावर झाडीही फार दाट आहे. मोठमोठे गगनचुंबित वृक्ष शेंकडो लागून गेले आहेत. आणि झाडींतून चित्ते, लांडगे, रानडुकरें वगैरे

हिंसक जनावरें पुष्कळ आहेत. कधीं कधीं वाघ देखील तेथें आरोळ्या ठोकीत असतात. तात्पर्य, महिकांठचा प्रदेश म्हणजे बहुधा तिकडे सर्व गोष्टींनीं भयंकर असा आहे. कोळी, वाघरी व भिल्ल लोकांची वस्ती पुष्कळच असून त्यांतील बहुतेक लोक रस्तेलूट, चोऱ्या, दरवडे, खून वगैरे करण्यांत मोठे पटाईत आहेत. ते लोक बडोदें, सुरत, भडोच, आमदाबाद, नडियाद वगैरे शहरांतून आणि मोठमोठ्या संपन्न गांवांतून दरोडे घालून पुष्कळ द्रव्य संपादन करतात. वाटेंत प्रवाशी मनुष्यावर छापा घालून, वेळेस त्यांचे प्राण देखील घेण्यास कमी करीत नाहींत!! मोठे निर्दय व हरकसबी आहेत. तसेच ते शूर आणि मेहनतीही आहेत. एका दिवसांत पंचवीस तीस कोस जमीन चालून जातात. आणि तेथें दरोडा घालून पुनः रातोरात उजाडण्याच्यापूर्वीं आपल्या जाग्यावर येऊन पोंचतात. कित्येकांचा सर्व संसार रानांतच असून, पिढीजाद ते आरण्यांतच राहतात. भिल्ललोक तिरकामटा मारण्यांत फार हुशार आहेत. आंधारांत शब्दाबरोबर ते नेमका बाण सोडतात, आणि बरोबर मनुष्याची छाती किंवा कंठनाळ छेदन करून टाकितात! काय आजब धोरण निशाण मारण्याचें हें!!

असो. महिकांठावरील एका वाघरी व भिल्ललोकांच्या टोळीनें उन्हाळ्याच्या एका आंधारीरात्रीं बडोद्यास जाऊन दरोडा घालण्याचा बेत केला. सुमारें पंचवीस असामी हात्यारबंद होऊन निघाले. त्यांच्या बरोबर त्यांचा एक अंमलदारही होता. हे लोक दोन

दोन, चार चार असे निरनिराळ्या वाटेनें अस्तमानच्या सुमारें घटकादोनघटका रात्रीं वडोद्याच्या बाहेर अगदीं जवळ येऊन ठेपले आणि तेथें एका नदीच्या खपदाडींत सर्व एकत्र जमले. तेथें त्यानीं तीन तास पर्यंत चांगली विश्रांति वगैरे घेऊन व भाकरी वगैरे खाऊन, नंतर ते पुढें बडोदे शहरांत जाण्याकरितां कंबरा बांधून व शस्त्रास्त्रें घेऊन अगदीं तयार झाले. कोणाच्या घरावर जाऊन डाका घालावयाचा, हा निश्चय त्याणीं अगोदरच करून ठेवला होता. ते फत्तेपूर दरवाजानीं हळू हळू, एक एक जण व दोघे दोघे मिळून मोठ्या बेतानें आंत शिरले !

ही वेळ रात्रीच्या बारावाजण्याच्या सुमारांत होती. ते लोक आंत शिरल्यानंतर फत्तेपूर दरवाजा लौकरच बंद होऊन गेला. चहूंकडे सामसूम होऊन गेली होती, तरी रस्त्यानें एकटें दुकटें मनुष्य आजून येत जात होतेंच. आंधार किट्ट पडला होता. बाहेरख्याली पुरुष, नुकतेच बनातीची टोपी पांघरून हळूच घराबाहेर पडले होते. व प्रीयपात्रांच्या घरीं जाईन केव्हां व तिची भेट होऊन तिला डोळे भरून पाहिन केव्हां, असें त्यांस होऊन गेलें असल्यामुळें त्यांच्या घरांचा रस्ता त्यांना मोठा लांब होऊन गेला होता. ते घाईघाईनें चालत, व लांब लांब पाय टाकीत तिकडे जात होते, ह्मणून अगदीं घामाघूम होऊन गेले होते. घरीं त्यांच्या धर्मपत्न्यांचीं तोंडें भर्ता बाह्यघरीं गेल्यामुळें सुकून गेलीं होतीं. त्या आपल्या बिछान्यावरून तळमळत पडल्या होत्या ! कारण बिच्याऱ्यांस ही

गोष्ट तोंड धरून बुक्यांच्या माराप्रमाणें झाली होती. ह्मणजे नवरा बाहेर गेला ह्मणून त्यांना मनापासून राग आला होता तरी, तसें त्यांना बाहेर सांगतां येत नव्हतें. बिचाऱ्या मनांतल्या मनांत चुरमुरून राहिल्या होत्या. इकडे जारिणी आपल्या प्रीयकरांची वाट पाहत नट्टा-पट्टा करून खिडकीशीं बसूनच राहिल्या होत्या; तोंच त्यांला त्याचे प्रीयकर येऊन पोंचल्यावरोबर आनंद होऊन गेला होता. कित्त्येक विलासमंदिरांतून या वेळीं गाणें, व कोठें सतार वाजून राहिली होती. कित्येक स्थळीं सोंगट्या, गंजिफा व बहुतेक ठिकाणीं भिकार पत्त्यांचे डाव चालू झाले होते. वसंतऋतूंतील पुष्पें सर्वत्र सुगंध देऊन राहिलीं होतीं. मोतियांचे हार गजरे तर सर्वांस प्राणाहून प्रीय झाले होते, ह्मणून ते तरुण युवतींच्याही अगदीं मस्तकावर जाऊन बसले होते. बहुधा वेणी व बुचडा मोतियाच्या गजऱ्या शिवाय रिकामा राहिला नव्हता !

सरकारवाड्यांत तर आजच्या दिवशीं कृष्णा मुधोळकरणीचें गाणें गच्चीवर होऊन राहिलें होतें आणि तेथें निवडक खुषमस्करी मंडळी अगदीं रंगीं रंगून गेली होती. महाराजही लोडाशीं टेंकून आडवे पडून राहिले होते; परंतु त्यांचें चित्त व चेहरा आजरोजीं फार उदासीन दिसून येत होता. कारण काय असेल तें त्यांच्या मनाला ठाऊक; परंतु ते कांहीं तरी मोठ्या गहन विचारांत असावेत असें दिसून येत होतें. असो. अशावेळीं आपल्या ओळखीच्या आवडाजी गाणारणीच्या घरीं काय चाललें होतें, तें आतां आपण जाऊन

पाहूं ह्मणजे आपल्यासही घटकाभर करमणूक झाल्या सारखें होईल. रात्र आंधारी आहे तरी तुह्मी माझ्या बरोबर चालण्यास भिऊं नका. आपण एकमेकांच्या सोबतीनें कसें तरी तेथपर्यंत जाऊन तेथील चमत्कार अवलोकन करूं.

प्रीय वाचकहो, हें पहा आवडाजीचें घर! येथें आवडाजी गच्चीवर बसल्या आहेत आणि त्यांच्या जवळ त्यांचे प्रियकर बसले आहेत. पलिकडच्या आंगास उघड्या जाग्यावर पांढराशुभ्र सरपोस घातलेला गुडघ्या इतक्या उंचीचा बिछाना पडला आहे. घरांत उष्मा फार होऊं लागला ह्मणून व ढेंकूण फार झाले ह्मणून, हा बिछाना बाहेर आला हें तुह्मी मनांत समजून घ्यावें. खालच्या दिवाणखान्यांत आवडाजीची सुंदर लेंक गुंफा ही आपल्या पलंगाजवळ दिव्याशीं बसली असून एक पत्र लिहित आहे. तें आपल्याला वाचायला मिळेल तर बरें होईल कीं नाहीं? त्यावरून तिचें मनोगत आपणाला कळून येणार आहे. ह्मणून पहिल्यानें आतां आपण तिचेंच पत्र पहाण्याचा उद्योग करून मग आवडाजीच्या गच्चीवर जावें ही गोष्ट प्रशस्त दिसत आहे. ह्मणून तसेंच करूं या.

गुंफेचें पत्र याप्रमाणें होतें;—" परम प्रिय महाराज, तुमचें पत्र मला आजरोजीं प्रातःकाळीं बिछान्यावर उशाशीं सांपडलें. सर्व मजकूर वाचून पहातां मला जो आनंद झाला आहे तो एका मनानें, एका हातानें, एका लेखणीनें आणि एका कागदावर मीं कोठपर्यंत वर्णन करून लिहावा? सारांश मी सर्वोपरी दुबळी अ-

नाथ, व असमर्थ अशी आहें. मला या घरांतून काढून कोणी अन्यत्र जर नेईल तर त्याचे उपकार मी आजन्म विसरणार नाहीं! मला येथें अतोनात दुःख व ताप सहन करावा लागत आहे. घरांतील मालकीण माझी प्रत्यक्ष आई नव्हे ! ! मीं एका अस्सल मराठे कुळांतील सत्पात्र वंशामध्यें सुशील आईबापांच्या पोटीं उत्पन्न झालें आहें. परंतु माझे पदरीं महत्त्पाप संचय म्हणून, मला या जारिणीच्या घरीं येऊन रहावें लागलें आहे. माझे आईबाप रानांत लुटले जाऊन व जिवानिशी मारले जाऊन मी नऊं वर्षांची असतांच या चांडाळणीच्या हातीं लागलें ! ! वाड्यांतील एका मुख्याकडे मला चाकरीस पाठविण्यासाठीं आज सहा महिने झाले, खटपट चालू झाली आहे. परंतु मला ती गोष्ट मनापासून कर्तव्य नसल्यामुळें मी होईल तितक्या युक्तिनें व निमित्तानें आजवर टाळाटाळी केली. तथापि आतां मला उद्यांचा दिवस शेवटचा येऊन ठेपला आहे. उद्यां एक वाड्यांत तरी जावें, किंवा विष खाऊन मरावें; या निकरावर ही गोष्ट येऊन ठेपली आहे. परंतु अशास्त्र रीतिनें, अन्यायानें व जारकर्मानें देह विटाळून घेण्यापेक्षां मृत्यु बरा; असा मीं निश्चय केला आहे. मी कुलीन असल्यामुळें माझ्या मनांतून मजयोग्य कुलिनाशीं सशास्त्र विवाह व्हावा, व मीं घरांत राहून संसार करावा असें फार आहे. परंतु ही घरांतील दुष्ट द्रव्यलोभी बाई मला तसें करूं देत नाहीं ! ! तिच्या मनांतून तिची गादी मीं चालवावी, व पुष्कळ द्रव्य मिळवावें असें फार असल्यामुळें ती मला मा-

झ्या मनाप्रमाणें कोठून वागूं देणार? मला समजूं लागल्या पासून तिच्या दुष्ट आचरणाचा तिटकारा वाटूं लागला आहे.

आपण आपल्या बंधुसहित आज तीन महिने या घरांत आहा म्हणून लिहितां हें मोठें आश्चर्य आहे. पिशाच्चाचे खेळ या घरांत होत असून दोन पिशाच्चें घरांत शिरलेलीं आहेत, असा जो पुकारा गांवभर झाला आहे व घरच्या मालकिणीसही अनुभव येत आहे ते सर्व संबंध आतां बरोबर जुळल्या सारखे झाले. आपण कोण काय, व येथें कसे आला आणि कां राहिला वगैरे सर्व मजकूर आपल्या पत्रावरून इत्थंभूत कळला. परंतु आपलें मला आतां प्रत्यक्ष दर्शन होण्याची फार उत्कंठा उत्पन्न झाली आहे. ही माझी अशा, दर्शन देऊन आपण आजचेच रात्रीं पूर्ण केली पाहिजे. कारण उद्यां मी या जगांत जिवंत राहीन किंवा नाहीं हा भरंवसा नाहीं. बहुत करून मी आजचे पहाटेसच आड विहीर करून या दुःखांतून मोकळें होण्याचा निश्चय केला आहे. आपण आज तीन महिन्यापासून जर मजवर मोहीत झाला होता, तर आपल्याच्यानें मला प्रत्यक्ष भेटल्याशिवाय कसें राहवलें, हा मोठा गूढ प्रश्न आहे. तथापि त्या गोष्टीचा निकाल फारसा महत्त्वाचा नाहीं. आपण लिहिल्याप्रमाणें मीं हें आपल्या पत्राचें उत्तर लिहून तिसऱ्या मजल्याच्या जिन्याच्या शेवटच्या पायरीवर ठेवलें आहे. हें पाहून पुढें योग्य कर्तव्य दिसेल तें करावें. सर्व दिवस घरांतील मालकिणीचा सक्त पहारा मजवर असल्यामुळें पत्र

लिहिण्यास आतांच वेळ मिळाला त्यास उपाय नाहीं. लोभ करावा हे विज्ञापना."

आपली दर्शनेच्छु
एक गरीब अबला,

## गुंफा.

प्रिय वाचकहो, याप्रमाणें पत्र लिहून तिणें तें तिसऱ्या मजल्या वरील जिन्याच्या शेवटच्या पायरीवर नेऊन ठेवलें. आणि आपण येऊन आपल्या पलंगावर पडून राहिली. तिच्या मनांत पाहाटेस उठून कोणत्या कुव्यावर जीव देण्यास जावें, काय व्यवस्था करावी, घरांतून बाहेर कसें पडावें वगैरे विचार चालू झालें होते. इकडे गच्चीवर आवडाजी आणखी पंत मोठ्या प्रेमांत गुंग होऊन बसले होते. ती सफेत मलमलीचे अगदीं बारीक उंची पातळ नेसली होती. त्यांतून तिच्या आंगाची गौरवर्ण कांति सहज दृष्टीगोचर होत होती. आंगांत कांचोळीही त्याच मासल्याची होती, परंतु तिच्या कटोऱ्या आणखी कांठ हे जरीचे होते. वेणीस मोतीयाचा गजरा आडकावून दिला होता. आणि वाळ्याच्या अत्तराचा घमघमाट सर्वत्र पसरून गेला होता. पलीकडच्या आंगास चांदीच्या झाडावर उंची आगरबत्या जळत ठेवल्या होत्या. जवळ एक वाळ्याचा पंखा पडला होता, परंतु त्या वेळीं गच्चीवर हवा मंद सुशीतल असल्यामुळें पंख्याचें कांहीं कारण पडत नव्हतें. आवडाजीजवळ पंत एका लोडास टेंकून आडवे पडले होते. त्यांच्या-

जवळ किनखापी लहान उशा व गिर्द्या पडल्या होत्या. कानांत करवंदा एव्हढ्या दोन मोत्यांची जोडी असून, त्याच्यामध्यें हिरवा पाचेचा लोलक लोंबत असल्यामुळें, पंताचा उजवा गाल हिरवा गार दिसून येत होता. त्यांची शेंडी बरीच मोठी असून ती या वेळीं मोकळी सुटून पाठीवर पडली असल्यामुळें, बेलियाचा वास तेथें भरून राहिला होता. वरचेवर आवडाजी त्यांला पक्या पानांचे विडे करून चघळायाला देत होती, व पाठी मागून तमाखुचा चिमूटभर जर्दा आपल्या हातावर ठेऊन वरचेवर हात पुढें करीत होती.

याप्रमाणें पंत व आवडाजी आनंदाच्या भरांत असतां. त्या दोघांचीं जीं भाषणें त्या ठिकाणीं झालीं तींहीं थोडीं ऐकण्यासारखीं आहेत ह्मणून येथें सांगतों. पहिल्यानें आवडाजी ह्मणाल्या;—कसें काय पंत; आज अगदीं मुक्याचें व्रत घेतलें आहे तुह्मी ? या गरीब बापडीवर कांहीं रावोपंताचें वारें आणायचा बेत आहे कीं काय ? एक घंटा झाला स्वारी स्तब्ध आहे अगदीं ! मेला ऐव्हढा कोणता तो गहन विचार चालला आहे. समजला तर बरें होईल.

**पंत०**—बायकांच्या जवळ गहन विचारांची गोष्ट बोलूं नये असें शास्त्र आहे. समजलां ?

**आवडाजी०**—चुलींत घालां तीं सारीं शास्त्रें नेऊन ! ! मेले शास्त्रें लिहिणारे तरी चांडाळ पुरुषच होते कीं नाहीं ? त्यांत जर एखादी माझ्यासारखी स्त्री असती शास्त्रकर्ती, तर पाहिला असतां मग याच पुरुषांचा चमत्कार ! मेल्यानां बायका जर एव्हढ्या नीच

वाटत होत्या, तर ते स्वतः मग बायकांच्याच पोटांतून कशाला जन्माला आले? पुरुषांच्याच पोटांतून कां नाहीं आले!!

**पंत०**—झालें; आला कां राग? सहज बोलण्याला एव्हढा राग ह्मणजे काय गोष्ट ही! एव्हढ्याच करितां आह्मी मुक्याचें व्रत येथें आल्यावर घेत असतों तें. कारण तें बोलणेंही नको आणि राग करून घेणेंही नको असें वाटतें!!

**आवडाजी०**—ठीकच आहे तें; येथें आल्यावर बोलणें चालणें गोड लागेल तेव्हांना! बोला चालायला बाहेर तोटा कां पडला आहे! या सटवी जवळ उगीच यायचें ह्मणून यायचें!! आवडीची जागा असेल तेथें बोलणें आणि चालणें.

**पंत०**—तुमच्याच तोंडानें न्याय झाला. "आवडीची जागा असेल तेथें बोलणें आणि चालणें." न्याय झाला. ही जागा आवडीचीच आहे!

**आवडा०**—मला असला चवचळपणा कोठें करायला येतो आहे? मी तुह्माला साफ सांगून ठेवतें कीं, असला निर्दयपणा माझ्या कांहीं कामास पडायचा नाहीं!! गांवांत दुसऱ्या जागा पुष्कळ आहेत.

**पंत०**—होय आहेत. मी कोठें नाहीं ह्मणतो आहे, पण त्या जागा आवडीच्या कोठें आहेत? साऱ्या जागा आमच्या नावडीच्या आहेत!!

**आवडा**.—आहाहा! उजेड!! जसें कांहीं खरेंच. ह्मणेल कोणी.

**पंत०**—संशय कशाला?—

**आवडा०**—वाहा बरें शपथ !—

**पंत०**—काय ह्मणून ?

**आवडा०**—या आवडाजी शिवाय दुसऱ्या सर्व मातोश्री ह्मणून;—

**पंत०**—या बोलण्यांत अर्थ कां कांहीं आहे ? मनुष्याच्या हांतून आज्ञानपणांत काय एक होत नाहीं ? ह्मणून तसल्या गोष्टी जमेस कां कोणी धरीत असतात !

**आवडा०**—आपण सज्ञान तरी मग केव्हां पासून झाला ?

**पंत०**—तुमची गाठ पडल्यापासून !

**आवडा०**—खरोखर या बोलण्याचा मला मनापासून राग येतो; पण काय करावें कांहीं उपाय चालत नाहीं. तीनदां मी मनांत निश्चय करते कीं, जावें काशीयात्रेस निघून; पण मेलें काय वेड लावून ठेवले आहे मला कोण जाणें ! एक दिवस जर तोंड दृष्टीस पडलें नाहीं, तर मेला हा जीव कसा अगदीं निघून जायला होतो ! !

**पंत०**—तसेंच. तुमच्या प्रमाणेंच मलाही अगदीं हुबेहुब होतें. पण काय करावें ? आवडाजी शिवाय या जिवाला क्षणभर करमतच नाहीं ! !

**आवडाजी०**—उष्टं बोलणें बोलावं त्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षां न बोलावं हें चांगलें.

**पंत०**—बरें आहे राहूंद्यां आमचें बोलणें. भांडणापेक्षां आबोला बरा. आह्मी आपलें बोलणें परत घेतों पाहिजे तर. मग तर झालें ना ?

आवडाजी०—इतकें अगदीं वायद्यावर नको यायला कांहीं ! तुह्मी मला अगोदर इतकें सांगा कीं, भांडणा करितां कां तुह्मी येथें येत असता ? हें काय मेलं आतांशी धरलं आहे कोण जाणं ! बाकीं सर्व घरादारांतील माणसा बरोबर गोड असायचं; आणि तेव्हढं मींच काय पाप केलं आहे कोणाला ठाऊक ! ! ( रडूं लागते. )

पंत०—आहाग वेडे ! विनोदाची गोष्ट तूं अगदीं निकरावरच आणलीस हें काय ? बायका जवळ हें रडण्याचें शस्त्र मोठें जबरदस्त असतें ! उगी. अतःपर आपण बोवा असलें भाषण कधीं करणार नाहीं मग तर झाले ना ? ( जवळ घेऊन समजूत करतो )

आवडाजी०—तुह्माला माझा कंटाळा आला असल्यास मी आपली कुठं तरी काळें करून जातें इथून; मग तर मनाप्रमाणें होईल ना ? एव्हढा जुलमाचा रामराम कशाला पाहिजे ?

पंत०—तुमच्या अगोदर मीच आपला चालता होतो ह्मणजे झालें ना ? ( जाऊं लागतो. )

आवडाजी०—मला ठार मारून टाका आणि मग पुढें पाय घाला ! ह्मणजे माझ्या सवतिला तरी दिवाळी होईल एकदांची.

पंत०—आह्माला मात्र शिमगा होईल तुह्मी गेल्यावर ! !

आवडाजी०—आतां बऱ्या बोलांनीं पागोटं काढायचं आहे, कीं आणखी कांहीं शोभा करून घ्यायची आहे ?

पंत०—तरी ठीकच आहे. आतां बारावर एक वाजून जाऊन दोन वाजण्याचा बेत आला आहे जवळ. आह्माला आज झोप नाहीं कां येऊं द्यायची ?

आवडाजी०—नाहीं कोणाची आहे ? बिछाना तयारच आहे. निजा तुह्मी आपले !

पंत०—तुम्ही ?

आवडाजी०—मी आपली येथें या बिछायती वरच निजणार ! उगीच आडचण नको कुणाला ! !

याप्रमाणें भाषणें झाल्यावर पंतानीं पुनः पागोटें काढून खालीं ठेविलें आणि आवडाजी जवळ येऊन तिला उचलून नेऊन बिछान्यावर ठेविले. मग बिछान्यावर पडल्या पडल्या झोंप लागेपर्यंत दोघांचीं जीं भाषणें झालीं तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

आवडाजी०—कंठ्या बद्दल अखेर काय केलेंत, तें खरें सांगितल्या शिवाय मी तुमच्याशीं भाषण म्हणून करणार नाहीं !

पंत०—आणखी एक महिना कसा तरी तुम्हाला दम धरिला पाहिजे म्हणजे कंठा मिळेल.

आवडाजी०—ठेवा माझ्या गळ्यावर हात पाहुं !

पंत०—गळ्यावरच काय; तू सांगशील तेथें मी हात ठेवण्यास अगदीं तयार आहे !

आवडाजी०—चावटपणा करण्याची जन्म खोडच पडून गेली आहे; त्याला आतां औषध कशाचें मिळणार ! ! पण मी आणखी दुसरी एक गोष्ट विचारू काय ? खरें सांगणें होईल तर विचारतें.

पंत०—खरें सांगण्यासारखें कांहीं असलें तर मीं

खोटें कसें सांगेन ? हा पंत पाळण्यांत देखील कधीं खोटें रडला नाहीं.

**आवडाजी०**—सध्यां बाहेर गुण गुण उठली आहे ती खरी कां खोटी ?

**पंत०**—या मोहगम प्रश्नाचें म्यां उत्तर कसें द्यावें ?

**आवडाजी०**—कापांत साहेबांच्या चाहांत कोणी जहर घातलें म्हणतात ही गोष्ट खरी काय ?

**पंत०**—ही गोष्ट साहेबांच्या बटलरास माहीत; आपल्याला कशी कळणार आहे ?

**आवडाजी०**—पण माझ्या ऐकण्यांत तर कांहीं भलतें सलतेंच आलें आहे. देव करो आणि तसें कांहीं न होवो म्हणजे झालें.

**पंत०**—पण तुमच्या ऐकण्यांत काय गोष्ट आली आहे तें तर कळूं द्या अगोदर.

**आवडाजी०**—मला कांहीं बरोबर माहिती नाहीं; परंतु त्या संबंधांत दरबारचा कांहीं संशय साहेबास उत्पन्न झाला आहे असें लोक म्हणतात; इतकेंच नव्हें, ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध झाली आहे असें ऐकतें ! !

**पंत०**—मी तर ही गोष्ट तुमच्याच तोंडानें आज ऐकतो. आतां उद्यां मात्र या गोष्टी विषयीं जरूर चौकशी केली पाहिजे.

**आवडाजी०**—लोक तर शहरांत नाना प्रकारच्या गोष्टी बोलतात. परंतु त्या विषयीं आपल्याला काय करावयाचें आहे. आम्हाला फक्त तुमच्याविषयीं काळजी ! !

**पंत०**—माझ्याविषयीं तुह्माला अगदीं काळजी क-

रायला नको. कारण गांव जळाला. तरी मारुती बाहेरच असणार! त्याला नुसता ताप देखील लागत नसतो.

**आवडाजी०**—पण हें एव्हढें अचाट कृत्य तरी कोणाचें असावें बरें ?

**पंत०**—भगवंताला ठाऊक ! आपण पदरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचें काम करीत नसतों. जो करील तो भरील.

**आवडाजी०**—पण दरबारांतील बऱ्याच मंडळीचीं नावें लोकचर्चेंत आलीं आहेत; खुद्द महाराजांना देखील हा मजकूर माहीत आहे ह्मणतात. हें खरें काय ?

**पंत०**—मला तर या गोष्टीपैकीं कांहीं एक माहिती नाहीं. तथापि महाराज ह्मणजे या गोष्टींत असतील असें संभवत नाहीं. पण जाऊंद्या ती पंचाईत; त्या गोष्टीच नकोत आपल्याला बोलायला येथें ह्मणजे झालें. कुत्ता जाणें आणि चमडा जाणें ! !

**आवडाजी०**—पण मला एव्हढेंच तुह्मी सांगा कीं, पार्शी दिवाणानीं येऊन काय दिवा लावला ? पहिल्यापेक्षां तर आतां बलबलपुरीच फार झाली आहे. मला वाटतें हें सगळें जाहाजच खालीं बसेल आतां ! !

**पंत०**—तुमच्या बायकांच्या कल्पनेंत काय येईल तें खरें ! तथापि या साहेबाची आतां थोडक्याच दिवसांत येथून उचलबांगडी होऊन जाणार आहे, हें मात्र खरें भविष्य आहे.

**आवडाजी०**—पण याच साहेबानें अमुक अमुक इसम बडोद्यांत नसावेत, ह्मणून खटपट चालविली असतां, आतां आपणच येथून गाशा गुंडाळणार हें कसें ?

**पंत०**—यालाच ह्मणतात पार्शी दिवाणाचा प्रताप ! आजून काय काय गोष्टी बाहेर येतील त्या पाहा.

**आवडाजी०**—एवंच सारा घोटाळा ! आज तीन वर्षे झालीं; परंतु आजून दरबारची सुव्यवस्था कांहीं बसत नाहीं. नवीन आलेली मंडळी तर तिनदां राजिनामे पाठविते ! !

**पंत०**—आणि जुन्यांचा बंब तर मागेंच वाजून चुकला आहे.

**आवडाजी०**—तुमच्यासारखे असे नाना फडणवीस राज्यांतून असून, मग ही येथून तेथपर्यंत बोंबाबोंबी कां बरें असावी ?

**पंत०**—बायकांची एक ह्मण आहेना कीं, मनुष्य उसवलेल्याला दोरा घालील, परंतु निसवलेल्याला काय करील ? तशी स्थिति प्रस्तुत आमच्या दरबारची झाली आहे.

**आवडाजी०**—तुमच्या करणीमुळें, ह्मणजे तुम्हा लोकांच्या करणीमुळें हें सारें बिचाऱ्या महाराजांवर आकाश फाटून गेलें आहे.

**पंत०**—आम्ही काय केलें ?

**आवडाजी०**—त्या धर्माजीरावाच्या घरच्या बायका माझ्या हांतून कां काढून आणविल्या आहेत ?

**पंत०**—म्हणजे. त्या गोष्टीचा आणि दरबारच्या गोष्टीचा अर्थाअर्थी संबंध काय ? ती खाजगी गोष्ट आहे.

**आवडाजी०**—तुमच्या दरबारचा सर्व वाईट लौकीक जो साऱ्या पृथ्वीवर झाला आहे तो तुमच्या वाईट खाजगी आचरणामुळेंच ! ! समजला ? आणि मु-

ल्यत्वें दरबारच्याच मंडळींनीं आपले कांसोटे मोकळे सोडून, माहाराजांचें नांव बद्दु करून सोडिलें आहे. पुष्कळ पतिव्रता स्त्रियांचें पात्यव्रत्य नानाप्रकारच्या युक्तिनें भ्रष्ट करवून, त्यांचे तळतळाट तुम्ही महाराजांस देवविले आहेत. तेच अभिश्राप आतां कोणत्या तरी द्वारानें बाहेर येऊन महाराजांचा नाश करूं पहात आहेत ! ! असो. खरें पुसाल तर मीं देखील तुमच्या नादीं लागून पुष्कळ वाईट आचरणांत सांपडून गेलें आहे. त्याबद्दल मला आतां मोठा पश्चाताप होत आहे. परंतु उपयोग काय ? त्याबद्दल परमेश्वराकडून मला दंड भोगावा लागल्यावांचून चुकणार नाहीं ! ! धर्माजीरावाच्या पतिव्रता स्त्रियांचा तळतळाट, खचित माझ्या उरावर येऊन बसणारा आहे; त्यांत संशय नाहीं. अंतकाळीं त्यांचा विश्वासघात माझ्या छातीवर येऊन उभा राहणार आहे. आतां मी काय करूं ?

**पंत०**—आज तुला झालें आहे तरी काय ? तुझ्या तोंडाचा पन्हाळ आज फारसा कां फुटला आहे ? वर्ष सहा महिन्याचें बोलणें एकदम बोलून घ्यावें असें तुला आज वाटत आहेसें दिसतें ! !

**आवडाजी०**—तुह्मी कांहीं ह्मणा. परंतु मला या गायकवाडी दरबारचा परिणाम आतां नीट दिसत नाहीं. आणि तुमचाही परिणाम चांगलासा दिसत नाहीं. शिवाय माझ्याविषयीं ह्मणाल, तर माझा मला आतां घटकेचाही भरंवसा वाटत नाहीं. बहुधा यमदूत मला न्यायला जवळ आले आहेत असें वाटतें !

पंत०---हें कांय बडबडतेस ! तुला वायुबियु तर झाला नाहीं ?

प्रीय वाचकहो, याप्रमाणें गच्चीवर आवडाजींचें व पंताचें बोलणें चाललें असतांना, इकडे गुंफेच्या खोलींत भ्रमर आणखी सद्गुण येऊन तिच्या भेटी करितां व-सले होते. भ्रमरास तिणें आपल्या पलंगावर बसवून सद्गुणास जवळच्या खुर्चिवर बसविलें होतें. तिच्या भेटीमुळें त्यांस व त्याच्या भेटीमुळें तीस, पराकाष्टेचा आनंद झाला होता. भ्रमर त्या घरांत येऊन सद्गुणा-सहीत तीन महिनेपर्यंत तिसऱ्या मजल्यावरील माडींत राहिला होता, तरी ही गोष्ट घरांतील मनुष्यास कोणास कळली नव्हती. घरांतील अन्न, पाणी, वस्त्रें, फुलें, अत्तरें, वगैरे जिनसा ठेवल्या ठिकाणच्या रोज रोज नाहींशा होत होत्या खऱ्या; परंतु हा सर्व पिशाचाचा खेळ असून, आपल्या घरांत दोन गुप्त पिशाच्चें शिरलेलीं आहेत असें ती अनुमानानें समजून होती. परंतु अन्न-पाण्याशिवाय आणखी कांहीं त्यांचा उपद्रव होत नाहीं व माणसास पिडा होत नाहीं, ह्मणून ती तितक्यावरच्च समाधान मानून होती. गुंफेचें दुरून दर्शन नित्य भ्रमरास गुप्तपणें होत होतें; परंतु भ्रमराचें दर्शन गुंफेस या वेळेस झालें आहे हेंच पहिलें. तेव्हां तिला अर्थातच फार आनंद झाला होता. गुंफेस पाहिल्यापासून भ्रमर तिजवर मोहित झाला होता खरा, तथापि कोणतीही गोष्ट शोधपूर्वक व्हावी, व विचारपूर्वक व्हावी ह्मणून त्यानें तीनमहिने पर्यंत गुप्तपणें धैर्य धरिलें होतें. त्या णें तीन महिने पर्यंत तिची कसोटी पाहिली, तिचें आ-

चरण पाहिलें, तिचा स्वभाव ताडिला, याशिवाय तिचें बोलणें, रीतरिवाज आणि गुण इत्यादि पाहिलें. तेव्हां त्याची पूर्ण खातरी झाली कीं, ही मूल कांहीं वेश्येच्या पोटची नव्हे. कांहीं तरी योग्य कारणानें ही या घरांत आली आहे. शेंवटीं खरोखर वर्तन कळावें ह्मणून त्याणें एक पत्र लिहून तिच्याच बिछान्यावर उशागती ठेवलें, आणि त्यांत तुझ्या भेटी साठीं मी आतुर आहे वगैरे लिहून स्वतःच सर्व मजकुर लिहिण्यायोग्य वाटला तेव्हढा लिहिला होता. तें पत्र गुंफेनें वाचल्यावर तिणें त्याचें उत्तर त्याच रात्रीं नेमलेल्या ठिकाणीं ठेवलेलें वाचकांनीं पाहिलेंच आहे.

असो. हें पत्र वाचल्यावर भ्रमरास मोठा आनंद होऊन तिच्या लिहिण्या प्रमाणें तो खालीं उतरून येऊन, सद्गुणासहीत तिचा पाहुणचार घेत बसला होता. त्याचें रूप पाहून गुंफा अगदीं लुटपूट होऊन गेली. आणि पहाटे जीव देण्याचा विचार होतां तो तिणें सोडून देऊन, भ्रमरास माळ घालण्याचा निश्चय करून सोडिला ! तिणें पहिल्यानें त्याचे बळकट पाय धरून आपलें ऱ्हद्गत कळविलें. तेव्हां त्याणें सांगितलें कीं, " तूं ह्मणतेस या गोष्टीस मी कबूल होईन; परंतु घरांतील माझ्या वडील मनुष्यांचा सल्ला घेतल्यावाचून व एक वेळ पूर्वीच जिला मी आपल्या ऱ्हदयांत वचन देऊन ठेविलें आहे, तिची ( नीतिची ) परवानगी घेतल्यावाचून तुझा मी आंगिकार करणार नाहीं. तुझी मर्जी अमलयास आणखी कांहीं दिवस पर्यंत धैर्य धरून राहा." यावर गुंफेनें उत्तर दिलें कीं, आपण माझी

व्यवस्था कांहीं कां करानात; परंतु मीं तुह्मास मनांतून निश्चय पूर्वक वरिलें खरें !

असें ह्मणून तिनें त्याची मनोभावानें त्या वेळीं यथासांग पूजा केली. त्याचे अंगास सुगंधिक उत्तम उत्तम नानाप्रकारचीं अत्तरें लावलीं. गळ्यांत मोठा थोरला एक मोतिया फुलांचा कमालखानी हार घातला. हातांत गजरे घातले; आणि अंगावर एक मोठा भरजरी शेला घातला. हाच शेला तिला तिच्या गाण्याच्या कसबावरून दरबारांतून बक्षीस मिळाला होता ! असो. या प्रमाणें भ्रमराची पूजा मनोभावानें गुंफेनें केली. आणि त्याचे चरणावर पुनः एक वेळ आपलें मस्तक ठेविलें. नंतर तिणें सद्गुणाचेंही आदरआतिथ्य त्याचप्रमाणें करून, त्यालाही एक शेला अर्पण करून दिला. इतकें झाल्यावर मेवामिठाईचें तबक पुढें ठेवून त्यांतील एक तरी घास भ्रमरांनीं घ्यावा, ह्मणून ती आर्जवें करीत होती. इकडे गच्चीवर बोलून बोलून दोघासही अंमळ डोळा लागला होता. इतक्यांत सर्व घरांत एकदम गडबड होऊन गेली !! पांच पंचवीस हत्यारबंद लोक तोंडास काळें लावून व अंगास काळें वस्त्र गुंडाळून घरांत शिरले होते. त्यांणीं दरवाज्यास व खिडक्यास कड्या आंतून लावून घेतल्या. आणि मनास वाटेल तसा धुमाकूळ चालविला ! जिकडे तिकडे धरा, धरा, मारा, मारा, असा शब्द चालू झाला होता. हा दंगा ऐकून घरची मालकीण जागीं होऊन घाबऱ्या घाबऱ्या उठून अगोदर आपली दागिन्यांची पेटी ज्या खोलींत होती, तेथें जाऊन त्या पेटीवर आडवी पडून राहिली !

तेव्हां चोरास आयतीच मदतगारी झाली. ते दहापांच खोलींत शिरून ती दागिन्यांची पेटी तिजपासून ओढून घेऊं लागले; परंतु ती पेटी सोडून दूर होईना. शेवटीं त्याणीं तिला दूर हो, नाहीं तर ठार मेली जाशील. असेंही पुष्कळ सांगितलें; परंतु ती द्रव्यलोभी स्त्री पेटी वरून दूर कांहीं होईना!! तेव्हां त्यांतील एकानें तिचे लागलीच तुकडे तुकडे केले!!!

इतक्यांत भ्रमर आणखी सद्गुण आपलीं हत्यारें सरसावून त्या दंग्यांत जाऊन शिरले. तेव्हां मग त्या चोरांची खूप हबेलंडी उडून गेली. भ्रमरानें आपल्या तरवारीनें चारपांच मुडदे तेथें पाडिले आणि सद्गुणानें आपला तंमच्या दोघाचौघांच्या पोटांत खुपसला! शेवटीं सद्गुणानें आपल्या पिस्तुलाचे बार करण्यास आरंभ केला. तेव्हां ते चोरटे घाबरून जाऊन त्यांणीं मागल्या पुढल्या दारानें यःपलाय केलें!! परंतु जातेवेळीं त्यांणीं तेथील दोन मोठ्या वस्तु अचानक उचलून नेल्या. त्या कोणत्या ह्मणाल तर, एक दागिन्यांची मोठी पेटी आणि दुसरी केवळ लावण्यरत्नाची खाण अशी ती गुंफा!!!

चोर याप्रमाणें कार्यसिद्धि करून घराच्या बाहेर पडल्यावर, मग बडोद्याचे हुशार पोलीस मशाली पेटवून येऊन आवडाजीचे घरीं. कसा दरोडा पडला ह्मणून शोध करूं लागले. परंतु यावेळीं त्या घरांत एका तिसऱ्या मजल्याशिवाय कोठेंही मनुष्य राहिलें नवतें. इतक्या ह्या गडबडीच्या धांदलींत, पंतसाहेबांची स्वारी

केव्हां निघून गेली, व कशी निघून गेली हें एक ईश्वरासच माहीत! फौजदारांनीं सर्व घराचा झाडा घेतला. तेव्हां त्यास आवडाजीचा मुडदा आणि दुसरे चारपांच मुडदे सांपडले. मग तेथें सर्व मोठमोठे अंमलदार जमले व त्यांणीं सर्व घंराची पाहणी केली. तेव्हां त्यांच्या दृष्टीस तिसऱ्या मजल्यावर भरजरी शेला पांघरलेलीं दोन मनुष्यें पडलीं. हीं मनुष्यें भ्रमर आणि सद्गुण हीं होतीं. त्यांजला तेथून पळून जाण्यास सवड सांपडली नाहीं. शिवाय घरची मालकीण चोरांनीं खोलींत मारून टाकिली हेंही वर्तमान त्या धांदलींत त्यांजला समण्यांत आलें नव्हतें.

तात्पर्य, सरकारच्या हातांत चोर सुटून जाऊन साव सांपडले गेले. शिवाय त्यांच्या आंगावर शेले आणि हातांत रक्तानीं भरलेली तलवार वगैरे मुद्दे होते. या नंतर पोलिसांनीं त्यांचा झाडा घेतला, तेव्हां भ्रमराच्या खिशांत गुंफेचें एक पत्रही सांपडलें. त्यांत पाहाटे मी आडविहीर करणार आहें हेंही लिहिलें होतें, आणि त्या लिहिण्याच्या प्रत्यंतरास ती घरांतून या वेळीं नाहींशीही झाली होती. तेव्हां तें सर्व कांहीं बरोबर जुळून येऊन, द्रव्यलोभाकरितां या दोघांनींच हा खून केला असावा असें ठरलें, व गुंफा आणि दागिन्यांची पेटी हीं याच दोघांनीं लांबविलीं असावीं असें ठरलें!! कारण गुंफेच्या पत्रावरून गुंफेस उघड हे सामील झाले असावे असें पक्कें अनुमान ठरलें. मग पोलीसांनीं आवडाजीच्या घरास कुलपें लावून तेथें पाहरा ठेवला आणि

रीतीप्रमाणें मुडद्याचा पंचनामा वगैरे करून पुढची सर्व व्यवस्था केली. कच्ची चौकशी सर्व झाल्यावर हा खटला पुढें सेशनकमिट झाला.

आठवा भाग समाप्त.

---

# भाग ९ वा.

## मदनविलास व पिशाच्चाचा खेळ.

" वृच्छपत्र तृण खावत है उनकु सतावें काम ॥
" घी शक्कर जो खावत है उनका जाने राम ! "

' कबीर '

प्रसंग आला ह्मणजे कोणी कोणाचें नाहीं. जोंवर चालू काळ तोंवर सर्व आपलें ! परिणामीं पिता पुत्रास सोडून जातो, पुत्र पित्यास सोडितो. याचप्रमाणें काका, मामा, बंधु, बहिणी वगैरे सर्व गणगोताची स्थिति होय ! ! " शितें तोंपर्यंत भुतें " ही म्हण खरी आहे. तारुण्य लयास गेलें ह्मणजे स्त्रिया लोभ सोडितात, द्रव्य लयास गेलें ह्मणजे मित्र आगत्य सोडितात, दान मिळेनासें झालें ह्मणजे याचक दात्याचें घर वर्ज करितात, आरोग्य प्राप्त झालें ह्मणजे रोगी वैद्याची ओळख विसरतात, वरवधूवर अक्षता पडून गेल्या ह्मणजे उभय-

पक्षांकडील लोक मध्यस्थास ओळखत नाहींत, फळें, पुष्पें आणि पर्णे नाहींशीं झालीं म्हणजे पक्षी वृक्षाकडे ढुंकून पाहत नाहींत आणि नवरा हातांत आला म्हणजे सून सासूची पर्वा ठेवीत नाहीं; याप्रमाणें जगाची वागणूक सर्व आपमतलबी आहे!! शाहाणे लोक हे सर्व कपटी व्यवहार जाणत असल्यामुळें आरंभापासूनच सावधपणानें वागतात. म्हणजे जगास ओळखून चालतात; आणि मूर्खांस या गोष्टी कळत नसल्यामुळें ते पदोपदीं गोते खातात!!

वडोद्याच्या गादीवरील त्या वेळचे महाराज जे **मल्हारराव गायकवाड** ह्यांची स्थिति वर लिहिल्याप्रमाणेंच झाली!! त्यांस जगव्यवहाराची ओळख फारच कमी असून, मनुष्याची पारख तर अगदींच नव्हती. विश्वास कोणावर टाकावा, कोणाशीं कितपत सहवास ठेवावा, वेळ कोण, प्रसंग कोण, मित्र कोण, शत्रु कोण वगैरे ज्ञान त्यांच्या ठिकाणीं असावें तितकें नव्हतें! म्हणून शेवटीं त्यांची स्थिति "शिष्यापराधे गुरोर्दंडः" याप्रमाणें झाली. केलें लोकांनीं आणि भोगावें लागलें स्वतः त्यांजलाच!! ज्या लोकांस त्यांनीं आपलेसे केल होते, ज्यांला त्यांनीं सांदीकोपऱ्यांतून काढून उदयास आणिलें, ज्यांला त्यांनीं आपल्या कृपेनें रंकाचे कुबेर करून सोडिलें, तेच लोक शेवटीं त्यांच्यावर उलटून पडले!! ते ऐन प्रसंगीं त्यांच्या जिवावर उठले! आणि शाहणे म्हणून जे जवळ आणून ठेविले होते, तेहीं आपापल्या द्रव्यतुंबड्या यथास्थित भरून ऐन बाणीच्या प्रसंगीं पुढील ओखटें भविष्य कळून आल्या-

बरोबर राजीनामे देऊन चालते झाले!! त्यांस स्वतः देखील तेथें राहण्याचें धैर्य झालें नाहीं, मग ते दुसऱ्यास काय संभाळून धरणार?

याप्रमाणें शहाणे सोडून गेले, मूर्ख जिवावर उठले आणि आप्त सारे फितूर होऊन गेले. आणि कित्येक "रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति" असें ह्मणत कानांत तुळशी घालून बसले! एवंच महाराजांचा मात्र फजिता होण्याचा प्रसंग येऊन जवळ ठेपला. त्यांजला स्वतःचें धैर्य आणि स्थिरबुद्धि ह्मणून कशीती नवतीच. त्यामुळें घटकेंत एक आणि घटकेंत दुसरे असे विचार अमलांत येऊं लागले. क्यांपांत साहेबाजवळ जें बोलणें ठरलें, तें गांवांत आल्यावर मोडून जावयाचें, आणि गांवांत ठरलेले विचार क्यांपांत गेल्यावर मोडावयाचे असा प्रकार चालू होता. शिवाय दरबारांत दोन तीन फळ्या झाल्या होत्या. त्याही एकमेकींचा पाडाव करण्यांत नेहमी गुंतलेल्या असत. आणि प्रत्येक मंडळीच्या कर्तृत्त्वाचा ठसा महाराजांच्या मनावर उठण्यास उशीर लागत नसे. जनानखान्यांत गेले ह्मणजे महाराजांला बायकांनीं हव्या तशा गोष्टी सांगून आपलेसें करावें, पुढें जुन्या मंडळींत महाराज आले ह्मणजे त्यांनींही आपलेसे करून घ्यावें, नव्या मंडळींत बसले ह्मणजे तेथेंही महाराजांनीं एखाद्या खलीत्यावर सही करून द्यावी; आणि क्यांपांत साहेबांपुढें गेले म्हणजे तेथें तर पागोटीं काढून पाहिजे त्या गोष्टी करण्याविषयीं महाराजांनीं कबुली देऊन यावें. असे सर्व प्रकार अगदीं अनियमित, तेजहीन आणि

पोरकटपणाचे चालू झाल्याकारणानें गायकवाडी जहाज बसून जाण्याची वेळ जवळ येऊन ठेपली ! !

पदरची मुख्य मुख्य कामदार मंडळी ( कांहीं लोक खेरीज करून ) अनितीनें वागूं लागली. राज्यांत धर्माचा छल ( धर्माजीरावाचा ) फार झाल्यामुळें राज्यांतून धर्म निघून जाऊन क्षेत्रवासी झाला ! नीति भ्रष्ट होण्याकरितां ( नीतिबाई ) यत्न चालू होतेच. सुमती डाकूरनाथाकडे जाऊन तेथें ( देवाजवळ ) नित्य प्रार्थनापूर्वक दाद मागून राहिली होती आणि सुबुद्धि तर अगदीं हद्दपार झाल्यासारखी होऊन आसन्न होत्साती अंथरुणास खिळून राहिली होती ! ! अशी ओंगळ स्थिति राज्याची झाल्यावर व बहुतेक पुढारी कामदार मंडळी दुर्व्यसनी आणि अक्षरशत्रु असल्यावर व सर्वत्र अनितीचें प्राबल्य वाढल्यावर राज्यसत्तेचा क्षय फार लौकर कसा नाहीं होणार? हाय हाय! मला आतां एकापेक्षां एक दुःखकारक प्रसंग लिहिण्याचे कपाळीं आले आहेत; म्हणून फार वाईट वाटतें. तथापि या सर्व गोष्टीचा परिणाम पुढें शेवटीं आनंददायक होणार आहे, म्हणून त्या आशेवर जीव धरून हे मीं आतांचे दुःखकारक लेख कसे तरी लिहून टाकणार आहें. हें माझ्या प्रीय वाचकांनीं कृपा करून ध्यानांत ठेविलें पाहिजे. असो. अशा संधींत शहरांत सर्वत्र भयंकर बातम्या लोकचर्चेंत सुरू झाल्या होत्या. कोणी म्हणतात कीं, साहेबाच्या विषाच्या प्रकर्णांत महाराजांचें खुद्द आंग आहे. कोणी म्हणत तसें मुळींच कांहीं नाहीं, हा सर्व पिसाचा कावळा आदावतीनें मधल्या आधल्या लो-

कांनीं केला आहे! कोणी म्हणत आतां इंग्रजांची आणि महाराजांची लढाई होणार आहे. कित्येकांनीं सांगावें, इंग्रजांची दहा हजार फौज कांपांत येऊन उतरली आहे!! तात्पर्य, गांवांत नित्यनित्य नव्या नव्या कंड्या येऊन पिकून जाऊं लागल्या! कांहीं कामदार लोकांच्या मुखावरील तेज उतरून गेलें होतें. व सज्जन लोकांस मोठी चिंता उत्पन्न झाली होती. खरोखर त्यावेळीं बडोदें शहराचा रंग अगदीं फिक्कट होऊन गेला होता. त्यांत अशा वेळीं विद्वान् दिवाण, हुशार चीफ् जस्टिस, अष्टपैलू व अनुभविक सरसुभे, इत्यादि ठळक ठळक मंडळी राजिनामे देऊन मुंबईस चालती झाली. तेव्हां तर बडोद्यांतील गरीब प्रजा अगदींच भिऊन जाऊन सर्व शहर उदास दिसूं लागलें.

वर सांगितल्याप्रमाणें मल्हारावी अंमल अगदीं चाळणींतल्या पाण्याप्रमाणें झाला होता, तरी अशा वेळीं देखील त्यांच्या जवळच्या कांहीं लोकांच्या दुर्वर्तनांत फरक ह्मणून पडला नव्हता. त्यांणीं आपली इच्छा पूर्ण करून घेण्याकरितां आपले स्तुत्य उद्योग चालूच ठेविले होते. धर्माजीराव दाभाड्याच्या सुरसागरावरील घरास कुलूप लागलें होतें तरी, त्यांचा भरवसा नामक गडी तेथील देवडीवरून हलून गेला नव्हता. तो देवडीवरच पडून राहिला होता. त्याणें इकडून तिकडून भीक मागून पीठ आणावें, आणि त्याचे पाणगे सुरसागराच्या तिरावर भाजून खाऊन सर्व शहरांतून धर्माजीरावाचा व बायकामनुष्यें वगैरे सर्व कुटुंबाचा शोध करीत फिरत असावें. याप्रमाणें दोन-

रात्रीं पर्यंत उद्योग झाल्यावर मग येऊन दाराचें कुलपाचें दर्शन घेऊन देवडीवर पडून रहावें! याप्रमाणें त्याची दिनचर्या चालू असतां, एके दिवशीं दोन शिपायासह एक कारकून येऊन घराचें कुलूप काढूं लागला. तेव्हां त्याणें त्याला अटकाव केला कीं, मी धर्माजीरावाचा मनुष्य त्यांचें घर संभाळण्यास येथें हजर असतां तुह्मी कुलूप काढणार कोण? मी काढू देणार नाहीं. तेव्हां तो कारकून ह्मणाला कीं, आह्मांस सरकारी हुकूम आहे कीं, हें घर पाडून टाकून येथें रस्ता करावा!! सुरसागराचे भोंवतीं बगी फिरेल असा रस्ता करावयाचा आहे, त्यांत बहुतेक रस्ता सभोंवतीं तयार झाला असून थोडा राहिला आहे, तो तुमच्या घरामुळें अटकून राहिला आहे. ह्मणून आह्मी कुलूप काढून सामानसुमान सरकारांत पोंचवून घर पाडून टाकून जागा मोकळी करणार आहों! कारकुनाचें बोलणें याप्रमाणें ऐकिल्यावर भरोशानें आपला दंडोका खांद्यावर टाकिला, आणि स्पष्ट सांगितलें कीं, हा भरोंसा गडी येथें तुमच्या हांतून ठार झाल्या शिवाय किंवा तुह्मी तिघेही येथें माझ्या दंडोक्यानें ठार झाल्या शिवाय हें घर तुमच्या स्वाधीन कधीं होणार नाहीं. समजला? असें ह्मणून दंडोक्यासहीत तयार होऊन पुढें उभा राहिला. तेव्हां मग आलेले बामनबोवा घाबरून "बरें बरें पाहून घेतों कसें ठार करतोससें!" असें रागानें पुटपुटत तेथून निघून गेले.

सुरसागरावर धर्माजीरावाच्या घराजवळच एक जुनें झालेलें श्रीदत्तमंदीर होतें, त्या दत्तमुर्तिचा आमचा

हा भरोसागडी मोठा निस्सिम भक्त होता. एके दिवशीं रात्रीं भरोसा बाहेरून फिरून आल्यावर निजण्या पूर्वी, आपल्या आराध्य मुर्तीच्या दर्शनास मंदिराजवळ गेला. तो मंदिराचें दार रात्र फार झाल्यामुळें बंद होऊन गेलें होतें. तेव्हां तो सुरसागराच्या तटावरून एका छिद्रावाटें दर्शन घेण्याच्या इराद्यानें छिद्राजवळ आला. या बाजूस मंदिराच्या गरीब स्थितीमुळें भींत नव्हती. कूड होता, व तोही अगदीं जीर्ण होऊन गेला होता. असो. या छिद्रांतून मुर्तीचें दर्शन होईल अशी त्याला भ्रांति होती; परंतु खरोखरच ती भ्रांति होती. कारण या छिद्रावाटें त्याणें पाहिलें तेव्हां त्याला दर्शन तर झालें नाहींच, परंतु देवाचीं कपाटें लागलीं आहेत असें मात्र दिसलें ! ! मग इतकें पाहिल्यावर तो अर्थातच निराश होऊन तोंड माघारें फिरवून चालला. तों त्याला असा भास झाला कीं, मला कोणी हाक मारीत आहे. मग त्याणें पुनः त्या छिद्राशीं कानोसा घेतला तों खरेंच. आंतून पुनः एक " भरंवसा, " अशी हाक आली ! मग भरंवशानें छिद्रांत आपलें मुंडकें घालून पाहिलें तों, आंत लांब देवाच्या कपाठा जवळ एक मिण मिण समई जळत असून, मंडपांत त्याचा उगीच थोडा मंद प्रकाश पडला होता. मग " मला कोणी हाक मारली ? " असें तो हळूच ह्मणाला तेव्हां उत्तर असें आलें कीं, मी श्रीदत्त भक्त असून तुझ्याच सारखा एक दुःखी आहे. परंतु पिशाच्च आहे हाक मारण्याचें कारण असें कीं, तुझ्या धन्याची मुलगी नीतिबाई व शतावली ह्या

दोघी वसंत बागेंतील एका बंगल्यांत फार संकटांत पडून राहिल्या आहेत. याकरितां तूं तेथें जाऊन त्यांना साह्य करावें हें उत्तम आहे. तसें न करशील तर नीतिबाईचें तारुण्य भ्रष्ट होण्याचा रंग जवळ आला आहे. तूं पिशाच्चाचें रूप धरून बागेंत शिरून बैस आणि बंगल्यांतही प्रवेश कर. आणि जशा रितीनें सुचेल तशा रितीनें पुढें तिचें संरक्षण कर. पिशाच्चाचें रूप घ्यावें कशाला असें ह्मणशील, तर त्याचें कारण निराळें आहे. तें तुला पुढें कळण्यांत येईल. पुनः माझ्या भेटीची गरज लागल्यास याचवेळीं येथेंच येतजा ह्मणजे मी भेटत जाईन !

इतकें बोलणें ऐकिल्यावर मग भरोशानें फार वेळ पर्यंत नीट रीतिनें त्या छिद्रावाटें आंत डोकावून पाहिलें, परंतु त्याला कांहीं तेथें दिसलें नाहीं. शेवटीं पिशाच्च माझ्याशीं बोलून गुप्त झालें, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. मग तो त्याच पावलीं तसाच विश्राम-बागेच्या रस्त्यास लागला. बागेजवळ गेल्यावर बागेच्या एक्या कोपऱ्यांतून त्याणें युक्तिनें आंत प्रवेश केला.

येथील बंगला लहानच परंतु चतुष्कोन असून साधा, व टुमदार होता. चहुंकडे चार कारंजीं असून बंगल्या सभोंवतीं मोठ मोठीं झाडें लागून गेलीं होतीं. बागेची रचनाही फार वर्णन करण्यासारखी होती. मधून लहान लहान सडका असून, त्याच्या दोहीं बाजूस मेंदीचे ताटवे बरेंच माजून गेलेले होते. मधील बंगल्या शिवाय या बागेंत दुसऱ्या कांहीं इमारती होत्या परंतु त्या पुष्कळ अंतरावर होत्या. बंगल्याच्या वरील मज-

त्यास चहूंकडून वाळ्याचे पडदे सोडून दिले होते, आणि एका आंगच्या खिडक्या मोकळ्या ठेवलेल्या होत्या. आंत बेताचा प्रकाश दिसून येत होता. एक शांत चंद्रप्रकाशाचा दिवा ( मुन लाईट ) जळत होता. शिवाय हंड्या व झुंबरें पुष्कळ होतीं, परंतु त्यांत दिवें लावलेले नव्हते. मध्यभागीं एक भले मोठें झुंबर टांगलेलें होतें. या माडींत मधल्या दिवाण खान्यांत एक शिसवी छपरीपलंग होता; आणि त्या सभोंवतीं गुलाबी मच्छरदानी होती. पलंगावर गुडघ्या इतका जाड बिछाना घातलेला असून, सफेत स्वच्छ त्यावर पलंगपोस होता. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं उश्या गिरद्या वगैरे बिछान्याची उपसाहित्यें होतीं. चांदिच्या तबकांत पान सुपारीचा सर्व सरंजाम होता. दुसऱ्या ताटांत सुगंधी मोतियापुष्पांचे व गुलाब वगैरे अनेक सुवासीक पुष्पांचे हारगजरे भरलेलें होतें. मेवा मिठाईनें भरलेलीं दोन चार तबकें होतीं. पलंगा जवळ वाळ्याचे आणि दुसऱ्या तऱ्हेचे चमत्कारिक पंखे पडलेले होते. निरनिराळ्या उंची अत्तरांनीं भरलेल्या कुप्या एका चवरंगावर मांडून ठेविल्या होत्या. त्याचप्रमाणें चांदीच्या तांब्या पंचपात्रींतून शीतोदक भरलेलें होतें. एका चौरंगावर उंची व निरनिराळ्या रंगांच्या उत्तम भरजरी पैठण्या पडल्या होत्या, आणि दुसरीकडे जरीची खणाळीं पडलीं होतीं. या शिवाय पलंगाचे जवळ, एका लहानशा तीन पायांच्या वर्तुळाकार टेबलावर ( राऊंड टेबलावर ) एक मोठे थोरले चांदिचे तबक होतें, त्यात सुमारें पंचवीस हजार रुपये किंमतीचे जडावाचे व सोन्याचे

दागिने होते. याप्रमाणें सर्व विलासभोगाचें सामान तेथें बिनचूक रीतिनें सिद्ध केलेलें होतें. फक्त मद्य मात्र न-व्हतें. याचें कारण काय असेल तें असो; तथापि म-हाराजांस मद्याचा अगदीं मनापासून तिटकारा होता, हेंच कारण बहुधा येथें सयुक्तिक दिसतें, दुसरें कांहीं नाहीं. असो.

अशा या उत्तम स्थळीं मोठा मनोरम देखावा हो-ऊन गेला होता; त्याचें वर्णन कोठपर्यंत करावें ? केवळ इंद्राचें नंदनवनांतील क्रीडास्थान, किंवा कुबेराचें आरा-मस्थान, अथवा गंधर्वराजाचें भोग्यस्थान अशी शोभा तेथें बनून गेली होती. अहाहा ! प्रत्यक्ष मदनाला दे-खील हें अपूर्व स्थान पाहून मोह उत्पन्न व्हावयाचा; मग इतरांची कथा काय ? मूर्तिमंत वसंत देखील त्या बागेंत विहार करावयास इच्छा करीत असेल असें वा-टत होतें. रात्र शांत होती व चांदणें स्वच्छ पडलें होतें. जाई, जुई, मोगरे, मोतिया, गुलाब, मदनबाण, पाच, मरवे इत्यादि सुवासांचा सर्व बागेंत दर्वळ पसरून गेला होता. झाडांवरून जातीजातींचे पक्षी बसून राहिले होते; परंतु या वेळीं ते झोपेंत गुंग झाले असल्यामुळें शब्द करीत नव्हते. बंगल्याच्या चारी बाजूंस चार उंच कारंजीं उडत होतीं, त्यांचे फवारे माडीच्या खि-डकीपर्यंत पोंचत होते, म्हणून बारीक बारीक तुषार बं-गल्याच्या आंत दिवाणखान्यांत जाऊन पडत होते. दिवाणखान्याच्या एका कोंपऱ्यांत बाजाची पेटी वाजत होती. तिला किल्ली दिली होती म्हणून तिच्यांतून नि-

रनिराळ्या रागांच्या सुस्वर गति ऐकूं येत होत्या! आणि जवळ एक घड्याळही टिकटिक करीत होतें.

अशा शांत वेळीं व मनोरम स्थळीं तेथील पलंगावर दोघी तरुण स्त्रिया निजल्या होत्या; व त्यांना नुकतीच गाढ निद्रा लागली होती. या स्त्रिया कोण असाव्या बरें? तुमच्या ओळखीच्या आहेत काय प्रीय वाचकहो? त्या गरीब बापड्या तुमच्या ओळखीच्या आहेत खचीत्! त्या आपल्या नीति शतावली आहेत. नीतिच्या तोंडावर तारुण्याचें तेज अगदीं गुलाबाच्या फुला प्रमाणें सतेज दिसत होतें, तरी तें मुख दुःखानें आणि काळजीनें मधून मधून फिक्कट दिसत होतें. नीतिची शरीरकांति केवळ केतकी प्रमाणें होती; व तिच्या खालोखाल शतावलीची होती. तथापि शतावलीच्या ठिकाणीं अद्याप स्त्री दशेची पूर्ण स्थिती येऊन पोचली नव्हती.

आतां सांगितलेल्या बंगल्यांत व बागेंत या वेळीं मनुष्यांची चाहुल अगदीं कोठें नव्हती, तरी एकाएकी एक मनुष्य हळूच पलंगा जवळ आला. त्याचीं नेसलेलीं धोत्रें रेशिमकांठीं असून आगांत एक मलमलीचा सदरा होता. व तो दिसण्यांत गोरा गोमटा होता. त्याणें हळूच पलंगाजवळ येऊन मोठ्या युक्तीनें आलीकडेस निजलेली जी शतावली होती, तिला हळूच उचलून आपल्या खांद्यावर घेतली आणि खालीं उतरून जाऊन एका खोलींत दुसरा एक बिछाना होता त्यावर नेऊन निजविली. इतकें काम करून पुनः तो वर आला. आणि विचार करूं लागला कीं, " आतां कसें

करावें ? आतां महाराज येऊन केव्हां जातात कोण जाणें ! मला तर या सुंदर स्त्रीच्या आलिंगनावांचून आतां एकेक क्षण युगासारखा लोटत आहे ! मला वाटतें महाराज आले नाहींत तोंच व ही सुंदरी जागी झाली नाहीं तोंच, हिला पलंगावर जाऊन बळकट कवटाळून धरावें; व मनोरथ एक वेळ तरी पूर्ण करून घ्यावेत !! कारण जागी झाल्यावर ही कबूल होते कीं नाहीं कोणजाणें ! फार हुशार आहे. मला दाद देईल कीं नाहीं शंका आहे. अथवा महाराज येथें आल्यावर मग परतून जातात कीं नाहीं विचारच आहे, कारण जरी हिणें लग्न करून घेण्याची परवानगी दिली तरी लग्न होईपर्यंत महाराजास हिच्या एकांति भेटीवांचून रहावेल कीं नाहीं वानवाच आहे ! अथवा एकवेळ महाराजाशीं संलग्न झाल्यावर पुनः हें चटक पाखरूं आपणाला वश होतें कीं नाहीं कोणी सांगावें ? याबद्दल कोण हमी घेणार ? त्यापेक्षां महाराज येण्याच्या पूर्वींच आपण हिला एक वेळ प्रेमालिंगन देऊन कृतार्थ होऊन बसावें हा सल्ला सर्व गोष्टींपेक्षां बरा नव्हें काय ? होय. निःसंशय हा सल्ला आपल्या फायद्याचा आहे ! मग आतां उशीर कशाला ? हे माझे बाहु तिच्या आलिंगाविषयीं अगदीं अतुर होऊन गेले आहेत !! ( तिजकडे पाहून ) आहाहा ! काय हें उत्कृष्ठ स्वरूप ! आणि किती हा सकुमारपणा ? वेणी किती उत्कृष्ट आहे केवळ भुजंगच जसा ! नाक किती सरळ हें ? ओंठ तर शुद्ध पिकली तोंडलीच आहेत. आणि विडा खाल्यावांचून लाल भडक दिसत आहेत.

कंठांतून खरोखर विड्याचा पींक दिसेल, इतका तो नाजूक आहे. कंबर पाहून सिंह या देशांतून नाहींसे झाले. हिच्या लुगड्याच्या साध्या पडलेल्या घोळाची आकृति पाहून खरोखर मोर आपला पिसारा वरती करण्यास लाज धरील! आतां वक्षस्थळास म्या कोणती उपमा द्यावी? दोन लहान कठीण आणि सारखे अमृतानें भरलेले सुवर्ण कलश ह्मणूं, किंवा दोन चक्रवाक पक्षी ह्मणूं? चक्रवाकाची उपमा येथें काय उपयोगी? कारण रात्रीं त्यांचा वियोग होत असतो. ह्मणजे चक्रवाक पक्षांतील स्त्रीपुरुषांच्या जोड्यांचा रात्रींचे वेळीं विरह होत असतो. आणि हें जें वक्षस्थळावरील सौख्यनिधी गृहस्थ आहेत त्यांचा वियोग दिवस रात्रींतून कधींच होत नसतो! तेव्हां विरहदुःखी चक्रवाक पक्ष्यांची उपमा येथें काय उपयोगी? त्याचप्रमाणें सुवर्ण कलशाची किंमत तेव्हांच ठरीव होणारी आहे. आणि वक्षस्थळ हें अगदीं अमोल स्थितीचें आहे! तेव्हां दोन्हीही उपमा येथें गौण आहेत. आतां पाय आणि पायांतील शिंदेशाई तोड्यांचें वर्णन करीत कशाला बसावें? उगीच उशीर होतो त्यांत अर्थ नाहीं. मग महाराज आल्यावर कांहीं जमणार नाहीं." असा विचार करून तो पलंगाजवळ पुढें सरसावला आणि हातांत गुलाबदानी घेऊन नीतीच्या आंगावर गुलाबपाणी टाकावें, या इच्छेनें तिच्याजवळ गेला. पाणी टाकून तिला जागृत करावें, अशी त्याची इच्छा होती; परंतु पुनः त्याचा तो विचार फिरला. आणि निद्रिस्थ आहे तोंच प्रथम आलिंगन दिलें ह्मणजे मग

आपोआप जागृत होईल असा त्याणें निश्चय ठरविला. पुढें त्याप्रमाणें करण्यास गुलाबदानी खालीं ठेवून तो सिद्ध झाला, इतक्यांत दरवाजावर चुटकी वाजली त्यासरसा तो चपापला; आणि दरवाजाकडे धांवत गेला. दरवाजा उघडल्यावर एक जासूद धांवत आलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें त्याच्या हातांत एक चिठ्ठी दिली. ती त्यानें लागलीच दिव्याशीं नेऊन वाचली तेव्हां तींतील मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

" तुमच्या विनंतीप्रमाणें धर्माजीरावाची सुंदर कन्या एकवेळ नजरेखालीं घालण्यास मी आजरोजीं यावेळीं बागेंत येऊन पोंचणार होतों. परंतु यावेळीं येण्यास मी सर्वथा लाचार झालों आहे. पुढें मोठा संकटाचा प्रसंग प्राप्त होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. कापांतून आतांच एक पत्र आलें असून, त्यांत प्रातःकाळीं फार जरुरीनें भेटीस बोलाविलें आहे. या पत्राचा विचार मोठा भयंकर दिसत आहे. कसें करावें हें ठरविण्या करितां तुह्मीच आतां इकडे याल तर बरें होईल. धर्माजीरावाची कन्या आमचे बरोबर लग्न करण्यास तयार आहे ह्मणून लिहिले तें बरोबर आहे. परंतु चित्त स्वस्थ झाल्याशिवाय कांहींच विचार करतां येत नाहीं. कळावें. " याप्रमाणें पत्र पाहून जासुदास परत पाठवून देऊन त्याहातीं निरोप पाठवून दिला कीं, " मी आपल्या भेटीस लौकरच येतो. आपण कांहीं काळजी करू नये. " जासूद गेल्यावर या गृहस्थास मोठाच आनंद झाला कीं, " महाराज येत नाहींत ही गोष्ट एकपरतीं आज बरीच झाली ह्मणाय-

च्ची. आपला कार्यभाग आतां चांगला साधणार आहे. पुढें मग हिचें लग्न होवो अगर न होवो. झालें तरी आपली ओळख कायम राहीलच. आणि न झालें तरी आपल्याला एक सुंदर मनाजोगें स्थळ होईलच. दोहींकडून आपला फायदाच होणार आहे. " असा विचार करून तिचें आलींगन घेण्याकरितां जवळ जो गेला तों एकदम नीति ओरडतच उठून बसली ! आणि तिणें पलंगाखालीं उडी ठोकली ! ! तेव्हां काय झालें, ह्मणून हा गृहस्थ मोठ्या ममतेनें विचारूं लागला असतां, नीति ह्मणाली कीं मला कोणी तरी मोठ्यानें पलंगाखालून चिमटा घेतला असें वाटतें ! तेव्हां तो गृहस्थ ह्मणाला, "छत् ! अशी गोष्ट कधींच होणार नाहीं. या बंगल्यांत माझ्याशिवाय आणि तुमच्याशिवाय दुसरें कोणीच नाहीं, मग चिमटा घेईल कोण ? कांहीं तरी चावलें असेल किंवा झोपेंतून तुह्मी बरळत उठला असाल ! तथापि चावलें असेल कांहीं तरी, हीच गोष्ट खरी असली पाहिजे. कारण तुमच्या अगोदर तुमची धाकटी बहीण अशीच ओरडत उठली कीं, मला कांहीं तरी चावलें किंवा कोणीतरी चिमटा घेतला ! " तेव्हां तिला तिच्या आग्रहावरून शेवटीं दुसरीकडे ह्मणजे खालीं नेऊन दुसऱ्या बिछान्यावर निजवावें लागलें आहे.

**नीति०**—( चपापून ) काय, माझी बहीण आतां माझ्या जवळ या पलंगांवर नाहीं काय ? ती मला सोडून कोठें जायची नाहीं क्षणभर; मग दुसरीकडे जाऊन निजेल अशी गोष्ट कशी होईल ?

**गृहस्थ॰**—मी सागतों यांत असत्यपणा मुळींच नाहीं; तथापि ती फार शाहणी मुलगी आहे. आतां ती लहान कां आहे? तिला सर्व कांहीं समजतें. येथें हा सर्व भोगविलासाचा समारंभ आज पाहून ती तर्कानें सर्व कांहीं समजून आपण होऊनच खालीं निघून गेली! खरोखर पाहतां चावण्यांचें हें तिणें उगीच निमित्त मात्र केलें. दोघांत तिसरी बिचारी काय ह्मणून राहील?

**नीति॰**—दोघें कोण?

**गृहस्थ॰**—तुह्मी आणि मी.

**नीति॰**—तुमचें माझें काय नातें आणि काय संबंध?

**गृहस्थ॰**—नातें प्रेमाचें आणि संबंध लोभाचा?

**नीति॰**—हें काय बाई नवीनच अगदीं एकेक!

**गृहस्थ॰**—यांत नवीन कांहीं नाहीं सर्व जुनेंच आहे.

**नीति॰**—पण तुमची आमची ओळख काय?

**गृहस्थ॰**—पलंगावर गेले ह्मणजे ओळख तेव्हांच होती.

**नीति॰**—पण पलंगावर कशा करितां जावें?

**गृहस्थ॰**—मदना करितां!

**नीति॰**—मदन कोण?

**गृहस्थ॰**—रतीचा नवरा.

**नीति॰**—रति कोण?

**गृहस्थ॰**—मदनाची बायको.

**नीति॰**—तुमच्या ह्मणण्याचा उघड अर्थ समजुद्यां.

**गृहस्थ॰**—विलास! दोघांचा विलास!! तुमचा आणि माझा!!!

नीति०—मी आजून कुमारिका आहे.

गृहस्थ०—आह्माला फारच मान्य आहे. एक वेळ प्रथम तुह्मी माझे मनोरथ पुरविलें ह्मणजे पुढें तुमचें कल्याण करीन.

नीति०—माझें कल्याण करणें तुमच्या हातांत काय आहे ?

गृहस्थ०—काय आहे ह्मणजे काय विचारतां; सर्वस्वी महाराज माझ्या अगदीं मुठीत आहेत. त्यांची राणी तुह्माला करीन !

नीति०—पहिल्यानें पुष्पाचा सुवास तुह्मी हुंगून, मग तें पुष्प तुह्मी महाराजास आर्पण करणार काय ?

गृहस्थ०—होय. यालाच ह्मणतात एकनिष्ट राज सेवा ! ! आम्ही स्वतः कोणत्याही गोष्टीचा सुखदुः-खानुभव घेतल्या शिवाय महाराजांच्या सेवेस ती गोष्ट सादर करीत नाहीं.

नीति०—तर मग धन्य आहे तुमची ! ! याच कामावर वाटतें छत्री, मशाल आणि घोडे उडवित फिरतां ? आणि असलींच कामें करण्याकरितां महा-राजांची तुमच्यावर एवढी प्रसन्नता आहे ! ! !

गृहस्थ०—तोंड संभाळून बोल. नाहीं तर या पंताशी गाठ आहे ! होतीस कां नव्हतीस असें या ठिकाणीं करून टाकीन ! !

नीति०—तुमच्याच मुखानें तुमचें सहज नांव समजलें हें बरें झालें ! कदाचित् कधीं महाराजांची माझी गाठ पडलीच तर उपयोग तरी होईल.

गृहस्थ०—तुझ्या शुद्ध स्वरुपानें तुझी आणि म-

हाराजांची आह्मी भेट होऊं देऊं काय जन्मांत तरी? मग आमचें कसब तें काय? शुद्ध नीतिच्या स्वरुपाची आणि त्यांची एकवेळ भेट झाल्यावर मग तेथें आमच्या सारख्यांची डाळ कशी शिजणार आहे? या करितां ज्याप्रमाणें धर्माला हद्दपार केलें, सुबुद्धिला हांतुरणावर खिळून टाकून बडोद्यांतून घालवून दिले, सुमतीला नाहिशी करून टाकिली, आणि सद्गुणाच्या पायांत व भ्रमराच्या पायांत बिड्या घालूनटाकिल्या; त्याचप्रमाणें नीतिलाही अगदीं भ्रष्ट करून सोडिलें पाहिजे. तरच आमच्या शाहाणपणाचें सार्थक !

**नीति०**—हाय हाय ! विस्तु कां पडेना तुमच्या तोंडांत ! ! अशा वासनेचीं फळें आतां लौकरच तुह्माला ईश्वर कृपेनें प्राप्त होतील, समजला? बिचारा गरीब व भोळा मल्हारराव मात्र तुमच्या संगतीनें सर्वस्वी नागवला ! ! !

**गृहस्थ०**—फार शाहणपणानें बोलसील तर जबरदस्तीनें भ्रष्ट करीन; येथें तुझा कोण वाली आहे?

**नीति०**—सर्वव्यापी आणि सर्वसाक्ष परमेश्वर ! प्राण गेला तरी ही नीति आपलें ब्रीद कधीं सोडणार नाहीं ! ! माकडा, तूं मला भ्रष्ट करणार होय? जगांत या नीतिला कोठेंच आश्रा मिळणार नाहीं असें तूं समजतोस काय?

**गृहस्थ०**—खरोखर तुझ्या मनांत काय आहे तें सांग पाहू एकदां. ह्मणजे त्याप्रमाणें मी वागेन.

**नीति०**—माझ्या मनांत महाराजांचें व तुमचें कल्याण व्हावें असें फार आहे.

गृहस्थ०—मग त्या करितां आह्मी काय करावें ह्मणून तूं सांगतेस ?

नीति०—नीतिच्या सल्यानें चालावें. व धर्माजीरावाला ( धर्माला ) गावांत आणून प्रसन्न करावें.

गृहस्थ०—आणखी ?

नीति०—सद्गुणाला आश्रय द्यावा, सुमतिचा आदर करावा, आणि सुबुद्धिला दुखण्यांतून उठवावें !

गृहस्थ०—या शिवाय कांहीं ?

नीति०—( लाजून व पदर सावरून ) भ्रमराला महाराजांचे पदरी योग्य सेवाधर्म असावा.

गृहस्थ०—भ्रमर कोण हें मी समजलों नाहीं ?

नीति०—( फारच लाजून ) नीतिचा प्राण प्रीय !

गृहस्थ०—तूं विवाहींत नसून कुमारिका आहेसना ?

नीति०—होय. मी बाहेरून आजून या शरिरानें कुमारिकाच आहे; परंतु मनानें व अंतःकरणानें मात्र विवाहित झालेली आहे भ्रमराशीं !

गृहस्थ०—मग महाराजाबरोबर लग्न ?

नीति०—प्राण गेल्यानें होणार नाहीं ! !

गृहस्थ०—माझी तरी मग कामना पूर्ण ?

नीति०—या जन्मांत तर नाहीं ! !

गृहस्थ०—"तर मग याच जन्मांत, याच देहीं आणि आतांच मी आपली मनकामना पूर्ण करून घेऊन तुला भ्रष्ट करून सोडणार." याप्रमाणें बोलून तो गृहस्थ नीतिचे आंगावर जबरदस्तीनें तिचें आलिंगन घेण्यास धांवला. इतक्यांत पलंगाखालून महाभयानक आक्राळ विक्राळ असें एक काळें रंगाचें पिशाच्च धांवलें ! ! तें

फार मोठें उंच असून आ पसरूनच पंताच्या आंगा-वर गेलें. तेव्हां पंत घाबरला!! त्याची बोबडी वळून आंगावाटे घामाच्या धारा चालल्या. कंप सुटला, इत-केंच नव्हे, पळतां पळतां पंताचा कासोटाही सुटला. तों जिकडे जिकडे पळत सुटला, तिकडे तिकडे पिशाच्च मागें लागलें. पिशाच्चाच्या हातांत एक सोडगा होता, त्याचे दोन चार रट्टे पंताच्या कंबरेंत बसले. तेव्हां तर त्याची खूप हबेलंडी उडाली!! धांवतां धांवतां वाटेंत त्यानें दोन चार ठिकाणीं साष्टांग नमस्कारही घातले!!!

शेवटीं बंगल्याच्या बाहेर पडून बागेच्या भिंतीव-रून उडी मारून त्याणें घरचा रस्ता सुधारला! ही वेळ पहाटची सुमारें पांच वाजण्याची होती, ह्मणून कांहीं लोक रस्त्यावरून फिरू लागले होते. त्यांच्या दृष्टीस जेव्हां हें नागवें भूत पडलें, तेव्हां ते भूत भूत ह्मणून रस्त्यानें ओरडत पळत सुटले. त्यावरून रस्त्यावर या वेळीं बरीच गडबड उडून गेली, तथापि या गड-बडीस न जुमानतां पंत कसे तरी घरीं जाऊन पोचले. आणि आपल्या धोतराच्या ऐवजीं काठीवर वाळत अ-सलेलें एक लुगडेंच नेसूं लागलें. इतक्यांत वाड्यांतील बोलावणें फार जलदीचें आलें ह्मणून बाहेर येऊन प-हातात तों आपण लुगडें नेसलों आहों, ही चूक त्यां-च्या ध्यानांत येऊन पोचली. मग पुनः आंत जाऊन धोतर नेसून व सर्व पोशाक करून वाड्यांत जाण्या-करितां घरा बाहेर पडून वाड्या जवळ जों गेले, तों तिकडून महाराजांची सडी स्वारी कापांत जाण्या-करितां बगींत बसून चाललेली पंताच्या दृष्टीस पडली.

भेट झाली नाहीं, व बोलणेंही झालें नाहीं ! ! महाराजांचें तोंड फार उतरून गेलें होतें. आणि बगीवरील भालदारही त्या दिवशीं नित्या पेक्षां मोठ्यानें ओरडत चालला होता ! हाय हाय ! या वेळचा उदास झालेला तो देखावा कोणी वर्णन करावा ? महाराजांनीं या वेळीं मात्र आपल्या डोकींतील थोडें शाहणपण खर्ची घातलें होतें. तें हेंच कीं, रेसिडेंट साहेबांच्या बोलावण्यास कांहीं आढेवेढे न घेतां त्यांनीं मान दिला होता ! तसें त्यांनीं दुसऱ्याच्या नादी लागून केलें नसतें तर व नेहमी प्रमाणेंच याही वेळेस चूक केली असती तर परिणाम कांहीं निराळाच झाला असतां ! ! !

असो. यावेळीं महाराज शहरा बाहेर गेले ते पुनः शहरांत परत आले नाहींत ! ! कांहीं वेळानें गायकवाडी पाहारे सर्व ठिकाणचे उठले आणि सर्व ठिकाणीं इंग्रज सरकारचे पाहरे बसले ! ! त्या धांदलींत टोकरा स्वामीचा बंदींत पडलेला मनुष्य आपोंआप सुटून गेला ! इकडे महाराजांची बहुतेक सल्लेगार मंडळी, कामदार मंडळी, आणि पुढारी मंडळी एका मागून एक नजर कैदेंत पडली; त्यातंच आमचे नीति प्रिय कामदार पंत साहेबही बंदींत जाऊन पडले हें निराळें सांगणें नको. इकडे बागेंत पिशाच्यास पाहून नीति अगदीं बेशुद्ध होऊन पडली होती, तशीच उचलून तिला त्या पिशाच्यानें आपल्या पाठीशीं बांधली, आणि शतावली दुसरीकडे निजली होती ती जागी झाली नव्हती, कारण तिला पूर्वींच कोणी पूर्वरात्रीं खाण्यांत अमली पदार्थ चारिला होता; अशास्थितींत तिलाही त्या भुतानें

आपल्या खांद्यावर घेतली. आणि याप्रमाणें दोघी-सही त्यानें तेथून काढून नेलें. सूर्योदयापर्यंत तो तीन चार कोस चालून गेला. आणि मग ओढ्याच्या किनाऱ्यावर झाडी खालीं त्यानें दोघींसही खालीं उतरून ठेविले. उपरांत त्यानें ओढ्याच्या पाण्यांत जाऊन स्नान केलें व पिशाच्चाचा सर्व सरंजाम व रंग आगांवर घेतला होता तो काढून व धुवून टाकिला आणि मग तो पुनः त्या मुलीजवळ येऊन त्यानें त्यांजला अनेक उपचारांनीं सावध केलें.

नीतिनें व शतावलीनें डोळे उघडून जों पाहिलें, तों आपण एका आरण्यांत निर्मनुष्य ठिकाणीं असून फक्त आपला भरोसा गडी मात्र आपल्याजवळ बसला आहे. आहाहा ! भरोशास पाहतांच त्यांजला जो आनंद झाला तो वर्णन करितां येत नाहीं. ही मंडळी अशा प्रकारच्या आनंद सुखांत आहे तों, त्याच रस्त्यानें टोकरा स्वामीच्या दोन मनुष्यासहीत बैलाच्या गाडींत बसून मामासाहेबांची स्वारी करनाळीस जात असतांना त्यांची व यांची एकाएकी नजरानजर झाली ! मग काय विचारावें ? त्यांच्या आनंद समुद्रास तेथें आपरंपार भरती आली. मामासाहेबांनीं लागलीच नीतिस व शतावलीस गाडींत ठेवून देऊन, बोलत बोलत ते सर्वजण करनाळीस निघून गेले. आणि भरोसा गडी बडोद्याकडे आला.

# भाग १० वा.

## रयतेचे बंड.

---:o:---

**अबला यत्र प्रबला बालोराजा निरक्षरो मंत्री ॥**
**नहि नहि तत्र धनाशा जीवित आशापि दुर्लभोभवति**

'राजनीति.'

दोन प्रहर दिवसाचा समय मोठा रखरखित दिसत असतो. घरांतून बाहेर पडावें अशी इच्छा होत नाहीं. सर्वत्र उदास दिसत असतें. अगदीं गरीब स्थितींतले मजूर वगैरे लोक देखील यावेळीं एखाद्या झाडाखालीं विसावा घेत असतात. मग श्रीमंत व सुखी लोक बाहेर कशाला पडतील ? गाई, म्हशी, बैल वगैरे पशु, पाण्याच्या आश्रया जवळ छायेंत बसून रवंथ करित असतात. त्याचप्रमाणें राघु, माकुंक्या, तित्तिर, चक्रवाकु आणि चिमण्या वगैरे निरनिराळ्या जातींचे पक्षी देखील या वेळीं आकाशांत विहार करीत नाहींत. ते एकत्रपणें एखाद्या झाडावर बसलेले असतात. गुराखीलोक व शेतकरी आपलें कर्तव्यकर्म या वेळीं पुरें करून, भाकर तुकडा खात बसलेले दृष्टीस पडतात. कोणी स्वस्थ जमिनीवर खालवर घोंगडी घालून उताणे घोरत पडलेले असतात. शहरांतील श्रीमंतलोक या वेळीं जेवणखाण आटोपून थंडगार हवा व शांत स्थिति ज्या

ठिकाणीं असेल, अशा एखाद्या दिवाणखान्यांत किंवा तळघरांत आपल्या इष्टमित्रांसहीत शिळोप्याच्या गप्पा झोकीत बसलेले पाहाण्यांत येतात. कोणी या वेळीं फांशांच्या सोंगट्या खेळण्याच्या नादांत असतात, कोणी त्यापेक्षां अमळ विचारी असल्यास बुद्धिबळें खेळतात, आणि कोणी तर पत्त्यांचे डाव झोडीत बसतात! सारांश चैनी व खुशालचेंडू लोकांना ही वेळ मोठी प्यारी असते. ते आपला अमोल वेळ खुशाल वायां दवडण्यास भीत नाहींत. मात्र अन्नास महाग झालेल्या लोकांचा या वेळीं फार फजिता असतो. त्यांना विपयी व विलासी लोकांप्रमाणें या वेळीं स्वस्थ झोंप घेण्यास किंवा खेळत बसण्यास मुळींच फुरसत मिळत नसते. ते बिचारे अन्नाकरितां घरोघर हात पुढें करून याच वेळीं फिरत असतात!! ह्मणून ईश्वर कृपेनें या वेळेस जे जेवूनखाऊन तृप्त झाले असतील, त्यांनीं या गरीब लोकांकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. त्यांना दोनप्रहरचे वेळीं शक्तीप्रमाणें अन्नाची मदत देऊन चांगल्या एखाद्या उद्योगाकडे लावून देणें, हें सूज्ञ मनुष्यांचें कर्तव्यकर्म आहे. कारण आपल्याप्रमाणें आपले इतर गरीब देशबांधवही ईश्वरनिर्मितच प्राणी आहेत. तात्पर्य कोणत्याही वेळीं सूज्ञ मनुष्यांनीं भूतदया आणि परोपकारबुद्धि ही जागृत ठेविली पाहिजे. ह्मणजे त्या कृतीनें परमेश्वर संतुष्ट होत असतो.

अशा वेळीं आपल्या बडोदे शहरांत काय चाललें आहे तें आपल्याला आतां पाहणें आहे. बहुतेक लोकांची शहरांत जेवणें होऊन गेलीं होतीं. कचेरीस

जाणारे लोक जेऊन खाऊन कचेरीस गेले होते. आणि सरदार, दरकदार, मानकरी, जाहगीरदार, इनामदार वगैरे सुखी लोक घरांतच कांहीं करमणूक काढून आनंदांत बसले होते. तथापि कोणाच्या मनावर आनंदाची खरी स्थिति नव्हती. शहरांत सर्वत्र उदासी भरून गेली असून चहूंकडे भयाण दिसत होतें. आकाशांत दिवसाचा रंग कांहीं निराळाच दिसत होता. भर दोन प्रहरची वेळ असूनही सूर्य तेजहीन दिसत होता. शहरांतील लोकांस असें वाटलें होतें कीं, ज्यापेक्षां मल्हारराव महाराजास मद्रासेस नेवून पोंचवून आज बरेच दिवस झाले, तरी आजून कांहीं बडोद्याची व्यवस्था सुरळीत होत नाहीं, त्यापेक्षां सरकारच्या मनांतून गायकवाडी गादीविषयीं कांहीं तरी काळेंबेरें आहे खचीत्!! ही त्यांची समजूत फार दृढ होऊन गेली होती. कारण मल्हाररावास मद्रासेस पोंचवून बरेंच दिवस झाले तरी बडोद्यास काय व्यवस्था होतें, याविषयीं विचार पक्का कांहीं समजण्यांत येईना. आणि मल्हाररावांच्या कारकीर्दितील बरेंच शाहाणे लोक आजूनपर्यंत चोरून बडोद्यांत शिल्लक होतेंच, त्यांच्याही तोंडांतून कांहीं वेडें वाकडें उद्गार गरीब लोकांत जाऊन रोज रोज पसरत होतेच. त्यामुळें अशिक्षित व आज्ञानीं लोकांच्या डोक्यांत भलभलते वाईट विचार शिरून गेले होते. आणि त्याचा परिणाम कांहीं तरी वाईट रीतीनें व्हावा असें विचार आंतले आंत चालू झाले होते. तात्पर्य, या वेळची बडोद्याची स्थिति मोठी भयप्रद, अस्थिर, मुर्ख विचाराची व अत्यंत नाजुक झाली होती.

तसल्या स्थितींत गायकवाडी गादीचें पुढें काय हो-
णार; हें मोठ्या राजकार्य धुरंधरासही सांगण्याचें क-
ठीण होऊन गेलें होतें.

बडोदें शहरांत याप्रमाणें स्थिति असतां बडोद्याचे बाहेर यावेळीं एक भयंकर प्रकार आमलांत येण्याचें घाटत होतें. ती गोष्ट कोणती ह्मणाल तर, भ्रमर आणि सद्गुण या दोघांस फासीवर चढविण्याची अगदीं तयारी होऊन राहिली होती. ही जीवघातक जागा मोठी भयंकर दिसून येत होती. या ठिकाणीं तीन खांबी तिकटणें उभे करून बाजूंच्या फळीवर खुनी मनुष्यास उभे करण्याची तजवीज केली होती. मध्यें फास लोंबत होता. आणि चार पांच मांग लोक जवळ उभे होते. पलीकडच्या बाजूस पोलीसच्या पाहऱ्यांत पायांत जड बेड्यांचे दुःख सोसीत आपले भ्रमर आणि सद्गुण हे चिंताक्रांत होऊन बसले होते. त्यांच्या मनाची दुःखप्रदस्थिति या वेळची किती वर्णन करावी ? ! हजारों हजार विचार त्यांच्या मनांत येत जात होते.आपण खरोखर आन्याय न करितां आपल्यावर हा अत्यंत घोर प्रसंग आला ह्मणून दोघांच्याही नेत्रांतून दुःखाश्रुचे लोट चालले होते. सद्गुण तर शांत व थोडा लेकुर स्वभावीच होता ह्मणून तो फार दुःखांत पडला, याचें मोठेसें नवल नाहीं; परंतु भ्रमर इतका शाहणा, हुशार, युक्तिवान् असतांही त्याची देखील कंबर यावेळीं अगदीं बसून गेली ! आज आपण खचित् या जगांतून नाहींसे होणार, आपण आज समजून उमजून देखत देखत मरणार;

असें जेव्हां त्याच्या निश्चय पूर्वक मनांत आलें, तेव्हां त्याच्या मनाची स्थिति अगदीं बेहोष होऊन गेली. मूर्तिमंत मृत्यु त्याजपुढें येऊन उभा राहिला ! ! हाय हाय ! काय हा दुःख प्रसंग बापड्यांवर ! आणि काय ही बडोदे राजधानींतील राक्षसी त्या वेळची अंधाधुदी ! ! खून केला नसून खुनाची शाविती गरीब बापड्यांवर झाली ! आणि त्यांवर दोन न्याया-धीश ( चीफजस्टिस ) निरनिराळे येऊन गेले तरी मल्हाररावी अमलांतील हा खुनी मोकदमा खरा आहे किंवा खोटा आहे हें कोणी पाहिलें देखील नाहीं ! !

पहिल्यानें आवडाजीचा खून झाला तेव्हां मल्हार-रावी अम्मल बडोद्यांत होता ! त्यांत मल्हाररावाच्या अक्षरशत्रु व आर्जवी लोकांच्या हातांत सर्व राज्य सूत्रें, तेच लोक आवडाजींचे घरीं जाऊन तिचे दोस्त असणारे, तेच लोक धर्माजीरावाच्या कुटुंबचा नाश व्हावा ह्मणून यत्न करणारे, आणि त्यांच्याच हातांत पोलीस खात्यांतील अमलदारांच्या व न्यायाधिशांच्या शेंड्या ! ! मग काय पाहावयाचें आहे ? " गुळाचाच गणपती आणि गुळाचाच नैवेद्य ! " तशी स्थिति येथें झाली ! ! पोलीसांनी हा खटला असा बनावट पहिल्या पासूनच तयार केला कीं, तो माजिस्ट्रेट कडे जातांच तेथून त्याणीं लागलीच सेशन कमीट केला ! आणि सेशनांत जातांच लागलीच फासीच्या निकालाला लागून, तो निकाल मंजुरीकरितां हुजूरच्या कौन्सिलांत आला ! ! मग मल्हाररावी गव्हरमेटांची मंजुरी मिळण्यास काय उशीर आहे ? कारण तेथें जे कौन्सल-

दार होते, ते या खुनाच्या चरित्रांतले मुख्य आध्वर्युच होते ! ! मग तेथें विलंब कशाला लागणार? झाला फासीचा हुकुम मंजूर ! आणि तीही फासी एकाला नाहीं, तर दोघांला ! ! !

प्रीय वाचकहो, येथेंच मी साडेतीन वर्षांच्या कारकीर्दिची आतां समाप्ती करतों. कारण यापेक्षां महत्वाचें उदाहरण तें दुसरें आणखी कोणतें सांगितलें पाहिजे? एव्हढ्या एक्या उदाहरणावरून साडेतीन वर्षांची कारकीर्द कशी काय झाली असेल, त्याचें अनुमान सूज्ञ वाचकांच्या ध्यानांत सहज येण्यासारखें आहे ! एकंदरींत चांडाळ चौकडीच्या संगतीनें "मल्हारराव महाराज राज्यपद चालविण्यास नालायक असे ठरले जाऊन मद्रासवासी झाले ! ! " ही गोष्ट जगप्रसिद्ध आहेच. असो. बिचारे भ्रमर आणि सद्गुण मरणभूमीवर बसून मृत्यूघटकेची वाट पहात होते. परंतु माजिस्त्रेट वगैरे कामदार जे तेथें अवश्य येऊन पोंचले पाहिजे होते, ते आले नाहींत, ह्मणून उशीर झाला होता. आतांचा हा फाशीचा नियमीत दिवस तिसऱ्यांदा होता. मागें दोन वेळ दिवस नेमले गेले होते तरी फाशी देण्याचा योग जमला नाहीं. भ्रमराची आणि सद्गुणाची आयुष्याची दोरी बळकट होती ह्मणून या मागें दोन वेळ फाशी होण्यास विघ्नें होऊन आजही तीच स्थिती प्राप्त होण्याचा सुमार येऊन ठेपला.

पूर्वी पहिला दिवस जो फाशीचा मल्हारराव महाराजांच्या मंजुरीनें नेमला गेला होता, त्याच दिवशीं महाराज स्वतः क्यांपात कैदी होऊन बसले, आणि

बडोद्यांत राजकीय सत्तेच्या संबंधांत फेरफार झाला ! ! अर्थात या मोठ्या गडबडीमुळें फासीचा हुकूम मधल्यामध्यें मोहगमांतच राहून गेला ! पुढें मध्यंतरी जे थोड्या दिवसा पुरते कामदार काम पहात होते, त्यांच्या हुकमानें एकदां या हातभाग्य कैद्यांचा निकाल होण्याकरितां दिवस नेमिला गेला होता; परंतु व्हाईसरायांच्या हुकमाप्रमाणें मल्हाररावास त्याच दिवसीं स्पेशल ट्रेनींत बसवून गायकवाडी हद्दी बाहेर लांबच्या पल्ल्यावर नेऊन पोंचविण्याची मोठी कामगिरी व्हावयाची होती, ह्मणून ह्याही दिवशीं दुर्दैवी भ्रमरास या लोकांतून परलोकास पोंचविण्यास मुहूर्त मिळाला नाहीं. आतां आजचा हा तिसरा प्रसंग होता; परंतु ईश कृपेनें आजचाही दिवस अशाच मोठ्या राजकीय गडबडीमुळें अनायासेंच टळला गेला. तेव्हां आतां आपल्या भ्रमरास व सद्गुणास मरणाची भीति राहिली नाहीं असें समजलें पाहिजे. कारण फासीचा दिवस तीन वेळ चुकून गेला ! तेव्हां आतां त्यांचें आयुष्य शंभरावर पंचोत्री आहे असें ह्मणण्यास हरकत उरली नाहीं.

सर्व तयारी झाली. तमासगीरलोक फाशी पाहण्यास हजारों जमून राहिले. परंतु मुख्य अमलदार ज्यांच्या समक्ष हें काम झालें पाहिजे, ज्याजवळ अगदीं मुख्य वरिष्ट अंमलदाराचा ह्मणजे त्यावेळची सर्व सत्ता ज्याच्या हुकमानें चालावयाची; त्याच्या मंजुरीचा हुकूम होता, तो कामगार ह्मणजे माजिस्त्रेट, हाच त्या मरणभूमीवर दोनप्रहरचे बारावाजेपर्यंत येऊन पोंचला नाहीं ! ! नऊवाजतां हें काम व्हावयाचें होतें, तेथें

बारावाजून गेले, तरी हुकूम आमलांत आला नाहीं. सुमारें बारावाजतां बंडाची हूल सर्व शहरांत पसरून गेली. जिकडे तिकडे पळापळी झाली. लोकांनीं आपली घरें दारें लावून आंत जाऊन भीतिनें लपून बसले. शहरांतील सर्व दुकानें खाडखाड बंद होऊन गेलीं. लहरीपूर, फत्तेपूर, गेंडी आणि पाणीदरवाजा असे चारीही दरवाजे बंद होऊन गेले ! !

सुमारें दाहा हजार रयतलोक एकत्र जमले होते. कोणाच्या हातांत काठ्या, कोणाच्या हातांत सोटे, कोणाच्या हातांत दगड, धोंडे, मुसळे, चाकु, सुऱ्या कोयते, पाहरी अशीं आयुधें होतीं. मांडवीजवळ, आणि मांडवीपासून चहूंबाजुंच्या चारीरस्त्यावर लोकांचा फार मोठा जमाव कंबरा बांधून जमून गेला होता. परंतु हे सारे नेबळे लोक होते. सर्व वाणी भाई ! " एमशू ? तेमशू ? करणारे ! ! असल्या लोकांच्यांनीं कोठें शिपाईगिरीचीं कामें होत असतात काय ? आणि यांच्या या कृत्यास बंड तरी कसें ह्मणावें ! तथापि असल्या या नेबळ्या लोकांनीं एक दिवस, एक रात्रपर्यंत सर्व बडोदें शहर, क्यांप; इतकेंच नव्हे सुरत, आमदाबाद, मुंबई, पुणें वगैरे मोठीं मोठीं शहरें आणि तेथील राज्यकर्ते गव्हर्नरादि सर्व बडे साहेबलोक अगदीं एका बोटावर पूर्ण हालवून सोडिले ! ! जिकडे तिकडे टेलीग्राफावर टेलीग्राफ इकडून तिकडे येत जात होते. आणि स्पेशल ट्रेनींतून सोलजरलोकांच्या कंपन्यावर कंपन्या धूम बडोद्याकडे जाऊं लागल्या होत्या. बडोद्यांतील बड्या साहेबाच्या आंगावर

खरोखर कांटा उभा राहिला होता. आणि जरी त्याणें बाहेरून हुशारी दाखवून व्यवस्था चालविली होती, तरी त्याला मनांतून मोठी दहशत उभी राहिली होती. कारण हें प्रकर्ण कोठपर्यंत लांबतें, आणि यांत कोणकोणाचें आंग आहे याविषयीं त्याला आतांपर्यंत पक्का अंदाज लागला नव्हता. लोक नानाप्रकारच्या बातम्या बोलूं लागले. कोणी ह्मणूं लागले या बंडांत सर्व सरदार, दरकदार, मानकरी, जावाईमंडळ आणि पारख लोक अनुकूळ आहेत. कोणी ह्मणूं लागले कीं, गायकवाडांच्या सर्व पायदळ पलटणी व घोडेस्वार रिमाला वगैरे सर्व फितूर होऊन गेले आहेत. कित्येकांनीं गप्प पसरून दिली कीं, बडोद्यापासून पांच सात कोसांवर दहा हजार भिल्ल, कोळी व वाघरी लोक एकत्र होऊन बसले असून, उद्यां पाहाटेंच ते बडोद्यांतील लोकांस साह्य करण्यास येणार आहेत ! ! याप्रमाणें नानाप्रकारच्या भयंकर बातम्या शहरांत पसरून राहिल्या होत्या. कित्येकांनीं तर अशी हूल पसरून दिली होती कीं, मल्हारराव महाराजांस पुनः परत आणून गादीवर बसविण्याचा विचार बंडवाल्यांनीं केला आहे ! !

वास्तविक पाहिलें असतां यांपैकीं कोणत्याही बातमींत कांहीं सत्यांश नव्हता. गांवांतील बडे लोक कोणी बंडवाल्यांस सामील झाले नव्हते. पांच सात कोसांवर भिल्ल लोक मुळींच जमा झाले नव्हते, आणि फौजेपैकीं एका पलटणीशिवाय कोणी फितूर झाले नव्हते. ती पलटण देखील गफलतीनें फसून गेली होती.

मुद्दाम फितूर झाली नव्हती. असो. तात्पर्य इतकेंच कीं; चांगले लोक कोणी या बंडांत मुळींच नव्हते. सर्व बनियेभाई, अल्लड पोरें, मूर्ख, हलकट, दरिद्री आणि भाजी व कडूबदाम विकणारे असे लोकच या दंग्यांत बहुतकरून होते.

एवढ्या या खटपटींत या लोकांनीं इतकें केलें कीं, मल्हाररावाच्या मुलास "शिराळशेटा" प्रमाणें साडे-तीन घटकांपर्यंत गादीवर नेऊन बसविलें! एका पल-टणीकडून त्यास वाड्यापुढें सलामी देवविली, आणि शहरांत साखर वांटली!! इतकें होत आहे तों, क्यां-पांतून लष्करी लोकांची मदत येऊन गांवांतील पोलीस लोकांस पोंचली. परंतु सोलजर लोक व लष्करी लोक शह-रांत शिरण्यास मोठा प्रयास पडला!! लंहरीपूर दरवाजा बंद केला होता, तो आंतील लोक उघडीनात. तेव्हां तोफ लावून दरवाजा उडवून देण्याचा बेत करावा लागला. दरवाज्याजवळ तोफ उभी देखील केली होती; परंतु इतक्यांत आंतील कांहीं लोकांनीं शेवटीं दरवाजा खुला केला. मग लष्कर आंत शिरलें, तेव्हां फारच गडबड उडून गेली! मारामारी, हाणाहाणी, लट्ठालट्ठी पुष्क-ळच झाली. लोकांनीं घरावर चढून कौले देखील मार-लीं. पुष्कळांनीं मार खाल्ला व दिलाही!! कोणाचें पागोटें पडलें, कोणाचें धोतर सुटलें, कोणाचा गाल लाल झाला, एकाचें नासिक तिबकास गेलें! कोणी ना-गवें उघडें झालें. कांहींचे आंगावरील दागिने गेले. कित्येक सभ्य कामगार सुरसागराकडे पळाले. एका-च्या घरांत मोठा दंगा होऊन हांडीं भांडीं सर्व फुटून

गेलीं ! ! वस्त्रें फाडून टाकिलीं, याप्रमाणें सर्व संसाराचा सत्यानाश उडून जाऊन अखेर घरच्या मालकास भलत्याच ठिकाणीं जाऊन लपून बसावें लागले ! ! याप्रमाणें संध्याकाळपर्यंत सर्व शहरांत एकच हलकोल्हाळ होऊन गेला.

शेवटीं सरकारच्या सशस्त्र लोकांपुढें गांवच्या गरीब लोकांनीं अगदीं हात टेकले. मग चहूंकडे पळापळी झाली. ज्याला जिकडे रस्ता मिळेल तिकडे तो पळत सुटला. मग घेलाभाई सोलाभाईच्या घरांत आणि नेमचंद प्रेमचंदच्या घरांत शिरशिरून आश्रय पाहूं लागले; परंतु घरांतील बायका परक्या पुरुषास आपल्या घरांत आश्रय देईनात आणि रस्त्यांत तर धराधरी चालली होती. तेव्हां त्या बिचाऱ्यांस देमाय धरणी ठाय अशी स्थिति होऊन गेली. सरकारचे लोक तर मशाली पेटवून घरांत शिरून बंडखोर लोक धरूं लागले होते. या वेळीं एकमेकांचा सूड उगवण्यास पुष्कळ लोकांस संधि सांपडून गेली. खुशाल एकमेकांनीं आपल्या वैऱ्यांचीं नांवें उगीचच सरकारी अधिकाऱ्यास सांगितलीं आणि त्यांची आब्रू घेववली ! !

शेवटीं पुष्कळ लोक धरून त्यांना शिक्षा दिल्या, व पुष्कळांस सोडून दिलें. दुसऱ्या दिवशीं मल्हारावाच्या दोन बायकांस गादीवर बसविलेल्या मुलासहीत मद्रासेस पाठवून दिलें ! आणि फितूर झालेल्या पलटणीचीं हत्यारें घेऊन त्या लोकांस संतोषानें घरीं निघून जाण्यास हुकूम दिला.

सांगायचें तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, अशा प्रका-

रच्या धांदलींत त्या दिवशीं भ्रमरास आणि सद्गुणास फांशी देण्याचें काम अर्थातच कोणीं न सांगतां तहकूब राहून गेलें हें येथें निराळें सांगण्याची गरज उरली नाहीं. पुढें दोन चार दिवसांत या रयतेच्या बंडाची बरीच स्थिरता होऊन हळू हळू पुढील राजकीय बंदोबस्तासही आरंभ झाला. ती सर्व हकीगत पुढें अनुक्रमें निवेदन होतच आहे.

इकडे त्याच दिवशीं रात्रीं महीकांठावरील ववळींत तेथील एका भुयारांतील भयानक देवीचे देवळांत एक हृदयद्रावक प्रसंग गुजरण्याचा समय येऊन ठेपला होता. गाणारणीचे घरीं मोठी चोरी करून व मनुष्यवध करून जे अट्टल वावरी चोर कृतकार्य होऊन पळाले, ते डागिन्यांच्या पेटीसह ‘ गुंफेस ’ बरोबर घेऊन आपल्या मुक्कामावर महीनदीचे ववळींत येऊन पोंचले. घरीं आल्यावर त्यांनीं मोठा आनंदोत्सव सुरू केला. कारण एवढा मोठा द्रव्यलाभ त्यांना यामागें कधींच प्राप्त झाला नव्हता. म्हणून ते हर्षानें अगदीं फुगून गेले होते. तथापि त्यांतील कांहीं माणसें दुःखीही झालीं होतीं. कारण या सफरींत त्यांचे बरेच जातभाई गाणारणीचे घरांत भ्रमराचे व सद्गुणाचे हातानें यमपुरीस जाऊन पोंचले होते. तथापि या लोकांचा मुख्य सरदार जो होता तो मात्र यावेळीं मोठ्या आनंदांत असून अगदीं देहभान विसरून गेला होता. कारण त्याच्या हातांत गुंफेसारखें सुंदर स्त्रीरत्न सांपडलें होतें. त्याच्या मनांतून तिला आपली बायको करावी असा

बेत होता. आणि तो त्यासंबंधानें आपल्या मनांत पुष्कळच मांडे खात होता.

'गुंफा' बिचारी अगदींच यावेळीं दीन झाली होती. अगीतून निघून फुफाट्यांत पडल्यासारखी तिची अवस्था झाली. लाखो रुपयांची प्राप्ति होत असतां जी दरबारच्या मंडळीस वश झाली नाहीं, जिणें आवडाजीची गैर गोष्ट प्राण जाईपर्यंत ऐकिली नाहीं, ती बिचारी गरीब गाय आतां कसायाच्या हातांत या महीकांठावरील जंगलांत सांपडली ! मग काय पाहावयाचें आहे ? ती यावेळीं मनोभावानें परमेश्वराची करुणा भाकूं लागली. येथें आल्यापासून तिणें अन्नपाणी वर्ज केलें. त्यांत रात्रंदिवस तिला कायती भ्रमराची व सद्गुणाची काळजी फारच लागून गेली होती. घरांत झालेल्या दंग्यानंतर त्यांची अवस्था काय झाली, हें वर्तमान तिला माहीत नव्हतें, ह्मणून राहून राहून तिला रडें कोसळूं लागलें. आतां पुन्हां भ्रमराची भेट होणें कठीण असें वाटून ती फार उदास होऊन गेली होती. शिवाय तिला आपलें पतिव्रत्य आतां या दांडगे लोकांपुढें कसें रक्षण होईल ही मोठी धास्ती पडली होती. तात्पर्य, गुंफेची या वेळची हुबेहुब स्तिति वर्णन करणें फार कठिण काम आहे, केवळ अनाथ अबलेवर असा प्रसंग गुजरणें ह्मणजे या ठिकाणीं खरोखर ईश्वराच्या दयाळूपणाची परीक्षाच घेणें होय असेंच ह्मटलें पाहिजे. आणखी काय ह्मणावें ?

वाघरी लोकांचा नाईक गुंफेचे फार आर्जव करूं लागला. तिनें प्रसन्न व्हावें ह्मणून नानाप्रकारचा जंगली

मेवा तिच्या करितां आणून तो तिजपुढें ठेवी. बकऱ्याचें मांस, उंटाचें मांस, हाल्याचें मांस आणून तिजपुढें तो मांडी आणि भोजन करण्याविषयीं आग्रह करी. सारांश गुंफेला तें ठिकाण फारच कंटाळवाणें झालें. येथून सुटका कशी एकदांची होईल या काळजींत ती सर्ववेळ पडली. कधीं कधीं त्या वाघऱ्यानें वनपुष्पांच्या माळा करून आणून त्या गुंफेच्या गळ्यांत घालण्याकरितां आपल्या घरांतील बायकामाणसांस आग्रह करावा, परंतु तिनें तो सर्व त्यांचा बेत मोडून काढावा. नाईक वाघऱ्याची बायको फार सज्जन होती. ती मात्र गुंफेची फार माया करी. परंतु तिची भाषा गुंफेस व गुंफेची तिला समजत नसल्यामुळें दोघींचे मनोभाव परस्पर बरोबर समजून येत नसत.

अशा प्रकारें वाघरी नाईक गुंफेवर आषक होऊन नानाप्रकारचे प्रयत्न करीत असतां एक दिवस तो तिजवर बलात्कारही करण्यास अगदीं सिद्ध असा झाला. रडून रडून थकल्यामुळें तिला दुःखनिद्रा लागली होती. तेव्हां वाघऱ्यानें तिला हळूच उचलून अरण्यांत एका वघळींत नेलें आणि तेथें गवताचे मृदुशय्येवर तिला निजलेली ठेवून आपण अमळ चिलीम ओढीत बसला. इतक्यांत दुसरे दहा पांच वाघरी लोक तरवारी हातांत घेऊन तेथें येऊन पोंचले. त्यांनीं नायकास रामराम केला आणि ह्मणाले कीं, नाईक साहेब, तुह्मी देवीचा फार मोठा अपराध केला ह्मणून देवी आज सर्वांवर संतप्त झाली असून प्रत्यक्ष बोलूं लागली आहे. आपल्या साऱ्या जन्मांत कधीं देवी प्रत्यक्ष बोलली नाहीं.

आणि आजच हा मोठा चमत्कार आहे. अपराध तुह्मीं एकट्यानें केला असून देवी रागावली आहे सर्वांवर! याकरितां आतांच तुह्मीं तेथपर्यंत चलावें आणि देवी काय सांगत आहे त्याप्रमाणें ऐकून घेऊन पुढील बंदोबस्त करून आह्मा सर्वांची भीति दूर करावी.

सर्व वाघरी लोकांची कुलस्वामिनी ही देवी असून मोठी जागतीजोत असल्याबद्दल सर्व वाघरी लोकांची पूर्वींपासूनच खातरी होती. त्यांची सर्व प्रकारें एकनिष्ठा त्या देवीवर असे. देवी सांगेल तें खरें अशी त्यांची पूर्ण समजूत होती. हें देऊळ महीच्या एका वघळींत गुप्त भुयारांत असून फार भेसूर असें होतें. भोंवतीं किर्र झाडी होती. व भयंकर श्वापदांच्या आरोळ्यांनीं ती भूमी नेहमीं दणाणून जात असे. देवीचा तांदळा फार मोठा व शेंदूरचर्चित आक्राळविक्राळ असा फार भयंकर होता. आणि उंचही पुष्कळ होता. नेहमीं एक वाघरी तेथील पूजाअर्चेच्या खटपटींत गुंतलेला असे. तो पुजारी तेथील सर्व लोकांचा आचार्यच बनून राहिला होता. तो सांगेल देवीचा उपदेश तो सर्वांस ग्राह्य वाटत असे.

असो. वाघरी लोकांच्या नायकास दुसऱ्या दहा पांच वाघरी लोकांनीं येऊन निरोप सांगितला कीं, देवी फार रागावली आहे असें बडे गोवरजी ( पुजारी ) ह्मणतात. याकरितां तुह्मीं तेथपर्यंत चलावें. याप्रमाणें कडक निरोप ऐकून नाईकास फार वाईट वाटलें. माझ्या रतिसौख्यप्रसंगीं हे दुष्ट कोठून आले? असें त्याला वाटून तो अगदीं हिरमुसला होऊन गेला. पण करतो

काय? गोवरजीच्या मुखांतील देवीचा निरोप ऐकून घेणें त्याला अगदीं भाग नव्हतें. ह्मणून तो गुंफेच्या समागमसौख्यवाऱ्यास क्षणमात्र विसरलासा होऊन गुंफेस पहिल्याप्रमाणें उचलून खांद्यावर टाकून देवीच्या देवळांत जाण्यास निघाला. नाईकाबरोबर दाहा पांच मंडळी हत्यारबंद अनायासेंच होती. देवळांत आल्यावर देवीपुढें तोंड करून गुंफेस उभी केली होती. मग सर्व लोक आपापल्या जागीं उभे राहिले. आणि गोवरजी आरती ह्मणूं लागला.

आरती दुपारती सर्व झाल्यावर मग सर्व लोकांनीं देवीवर फुलें तांबडीं उधळिलीं! आणि त्यांनीं गुंफेच्या हातांतही फुलें उधळण्याकरितां दिलीं. तेव्हां गुंफेनें वर मान करून व डोळे उघडून देवीकडे पाहिलें असतां तिचें तें भयंकर स्वरूप पाहून ती फारच घाबरून गेली. आधींच ती अन्नपाण्यावांचून फार अशक्त झाली होती, व काळजीनें, चिंतेनें आणि विरहानें मरणोन्मुख होऊन गेली होती. आणि तशा स्थितींत असतां प्रस्तुत या भयंकर स्थळीं आक्राळ विक्राळ देवीचें स्वरूप पाहून अशा वेळीं तिची काय दशा झाली असेल बरें? तिची स्थिति वाचकांनीं वाचून ध्यानीं आणण्यापेक्षां कल्पनेनेंच ध्यानीं आणावी हें बरें!

तिच्या अंगाचा लटलट कांप झाला. तोंडांची बोबडी वळून गेली. सर्वांगावाटें घामाच्या धारा सुटल्या आणि डोळ्यांस आंधारी आली. इतक्यांत गोवरजी व नाईक मोठ्यानें ओरडून ह्मणाले कीं, गुंफें, अग गुंफे—' देवीवर तांबडीं फुलें लौकर टाक. ' ' नाहींपेक्षां देवी रा-

गावेल!' गोवरजीचें व नाईकाचें भाषण ऐकून गुंफेनें तसाच आपला जीव मुठींत धरून देवीवर फुलें टाकण्यास हात वर केला. इतक्यांत देवी प्रत्यक्ष मोठ्यानें ओरडून ह्मणाली कीं, ' नको नको. मला गुंफेचीं फुलें नकोत, तिचा बळी प्रत्यक्षच पाहिजे आहे. तुह्मा सर्वांवर मी आज प्रसन्न होऊन वरदान देतें कीं, गुंफेचा बळी जो कोणी मला देईल त्याला मी अगणित संपत्ति व पुत्रपौत्रादि संपूर्ण गोष्टींचें सुख देईन. आणि हें काम आतांच झालें पाहिजे. कारण मला गुंफेच्या रक्तपानाविषयीं अत्यंत भूक लागली आहे. ती बत्तिस लक्षणी सुलक्षण कुमारिका आहे, ह्मणून मला प्रिय आहे. याकरितां जो कोणी माझा खरा भक्त असेल त्यानें माझी इच्छा याचवेळीं पूर्ण करावी. तसें करण्यास आळस करील त्याचा मी नाश करीन."

प्रिय वाचकहो, याप्रमाणें देवीच्या तांदळ्यांतून ध्वनी प्रत्यक्ष सर्वांनीं ऐकिल्यावर ते मोठे चकित झाले आणि एकमेकांच्या तोंडांकडे टकमक पाहूं लागले. इतक्यांत नाईकजी ह्मणाला कीं, तुह्मा सर्वांत मी मानानें मुख्य असून देवीचा पूर्ण भक्तही आहें. याकरितां गुंफेस देवीच्या पुढें आतांच बळी देण्याचें काम मीच स्वतः करितों. तुह्मी सर्वजण मला साह्य मात्र करा. असें ह्मणून त्यानें आपली चकचकीत भव्य तरवार म्यानांतून बाहेर काढली आणि तो गुंफेच्या अंगावर तोंड वेडें वांकडें करून चित्त्याप्रमाणें धांवला.

हाय हाय! गुंफेची यावेळची स्थिति तर अतिशय कठिण!! वर्णन करण्यास लेखणी असमर्थ होय. तिनें

नायकाच्या हातांतील आपल्यावर आलेली समशेर पाहून घट्ट डोळे झांकिले, आणि अनाथाचा नाथ जो परमेश्वर त्याचा धांवा सुरू केला. अशा प्राणांतसमयींही तिच्या मनांत एक वेळ भ्रमराची मूर्ति डोळ्यांपुढें येऊन उभी राहिली. आणि त्याची एक वेळ भेट होईल तर या जिवाची इच्छा मरणसमयीं पूर्ण होईल, असें वाटून तिची वृत्ति कांहीं वेळ चलबिचल होऊन गेली!!

याप्रमाणें गुंफेवर प्रसंग आला असतां व सर्व वाघरी लोक निष्ठुरपणानें—पुष्कळ वाघ जसे एका शेळीवर किंवा गाईवर पडावे त्याप्रमाणें पडले असतां व नाईकाचा घांव पडल्याबरोबर मागून सपासप सर्वांचे हात बिचारीवर पडावे असा समय प्राप्त झाला असतां—एकदम फार मोठा आवाज विजेच्या गडगडाटाप्रमाणें होऊन दिव्य प्रकाश पडला! त्याबरोबर तेथील सर्व भूमी हांदळली! आणि देवीच्या तांदळ्यांतून देवीची दिव्य मूर्ति हातांत दिव्य समशेर घेऊन बाहेर पडली!! ही मूर्ति पाहतांच सर्व वाघरी लोक अतिशय गर्भगळीत झाले आणि कित्येक तर बेशुद्ध होऊन जमिनीवर धडाधड पडले. मुख्य नाइकांची दशा तर विचारूंच नका. त्यांची अगदीं बोबडी वळून गेली! गोवर्जी महाराज मागल्या वाटेनें कोणीकडे गेले त्यांचा पत्ता लागला नाहीं!!

असो. देवी बाहेर पडल्यावर तिणें दहा पांचजणांस जागच्या जागींच तरवारीनें लोळविलें! आणि गुंफेस उचलून घेऊन ती देवळाबाहेर चालती झाली. गुंफेस कांहींच यावेळीं स्मृति नव्हती. देवीनें तिला खांद्यावर

टाकून तडक डाकूरचा रस्ता धरला. आणि फटफटीत होऊन तांबडें फुटण्याचा सुमार होत आहे तोंवर ती देवी खांद्यावर गुंफेस घेऊन एका स्वच्छ वाहणाऱ्या पाण्याच्या ओढ्यावर येऊन पोंचली.

प्रातःकाळचा गार वारा लागल्यावर शांतवेळीं गुंफा अमळ सावध होऊन पाहते तों तेथें देवी वगैरे भयंकर देखावा मुळींच कांहीं नाहीं. फक्त आपल्या जवळ एक नवा, साधा, म्हातारा मनुष्य मात्र बसला आहे. गुंफा सावध झाल्याबरोबर म्हातारा मनुष्य ह्मणाला कीं, बाईसाहेब, आपण आमच्या धर्माजीराव दाभाड्यांची सून आहां. आणि मी त्यांचा भरंवसानामक पिढीजादा बंदा गडी आहें. आपण कांहीं काळजी करूं नये. यानंतर आतां तुह्मास दुःख होणार नाहीं. तुमच्या सासू सुमतीबाई आणि ताराबाई यांचा सुगावा डाकुरास लागला आहे. त्यांच्या शोधाकरितां मी तिकडे जात आहें. पण मार्गांत तुमचाही अकस्मात लाभ झाला ही मोठीच आनंदाची गोष्ट होय. तुह्मी सांपडल्यामुळें छोटे यजमान आमचे भ्रमर यांची मीं मोठी कामगिरी बजाविली असें झालें.

ओळखीचीं नांवें आणि खुणा मिळाल्यामुळें खरोखरच गुंफेस मोठा धीर आला. तिणें स्पष्ट डोळे उघडून भरंवशाकडे पाहिलें. त्याचा चेहरा तिणें नीट न्याहाळून पाहिला. तेव्हां तिला वाटलें कीं, हा मनुष्य निःसंशय भला दिसत आहे. याच्यावर भरंवसा ठेवण्यास चिंता दिसत नाहीं. असा विचार करून तिणें त्याला विचारलें कीं, मी येथें संकटांत आहें ही

बातमी तुला कशी कळली? तेव्हां त्याणें धर्माजीरावाच्या एकंदर कुटुंबाची या वेळपर्यंत झालेली सर्व स्थिति तिला कळवून क्षणोक्षणीं मला दत्ताच्या देवळांतील पिशाच्चानें सर्व गुप्त गोष्टी कळवून फार मदत दिल्याचें सांगितलें. आणि पिशाच्चाच्या साह्यामुळेंच नीतिबाईचें पातिव्रत्य संरक्षण माझ्या हातानें होऊन तिला संकटांतून सोडवून शतावलीसह मामासाहेबांबरोबर करनाळीस पोंचवून दिल्याचें सांगून तुमचीही बातमी पिशाच्चानेंच मला सांगितली असें तो ह्मणाला. इतकें ऐकिल्यावर गुंफा ह्मणाली कीं, देवीच्या देवळांत तूं कोठें लपून बसला होतास?

तेव्हां भरंवसा ह्मणाला कीं, मी देवीच्या पोटांत जी पोकळी आहे त्यांत लपून बसलों होतों. पहिल्यानें आल्यावरोबर कांहीं वेळ मी देवीच्या डोऱ्यावर जो भयानक माळवंचा होता त्यांत बसलों आणि मग तुह्मी खचीत तेथें नाईकाजवळ आहां असें कळल्यावर देवीच्या पाठीस कटारीनें भोंक पाडून आंत पोकळी करून त्यांत जाऊन लपून बसून, मग गोवर्जीस सांगितलें कीं नाईकास व गुंफेस मजपुढें आणून गुंफेस मला बळी देऊन टाका. तात्पर्य, अशा रितीनें देवीचें सोंग आणून त्या लोकांस फसवून तुमची सुटका त्यांच्यापासून करून घेतली.

भरंवशाचें आणि गुंफेचें असें भाषण होत आहे तों कर्मधर्मसंयोगानें दोन भुर्ल्यांच्या गाड्या, दोन स्वार, दाहा पांच हत्यारबंद शिपाई आणि एका उमद्या शुभ्र घोड्यावर एक वजनदार गंभीर चेहऱ्याचा मनुष्य बस-

लेला; इतका खटला डाकुरच्या रस्त्यानें येऊन त्या छोट्या नदीवर सकाळच्या आठ वाजण्याच्या सुमारास दाखल झाला.

कांहीं वेळानें मुख्यांच्या गाडींतून दोन बायका बाहेर पडल्या आणि त्यांची व भरंवशाची दृष्टादृष्ट होतांच भरंवसा धांवत जाऊन त्यांच्या पायांवर आडवा पडला. तेव्हां सुमतीबाईच्या आणि ताराबाईच्या डोळ्यांवाटें एकसारखे अश्रुपात वाहूं लागले होते. फार दिवसांनीं ह्या गांठी पडल्यामुळें त्या ठिकाणीं आनंदास व दुःखास एकदमच भरती आली होती. भरंवशानें सर्व मंडळी खुशाल असल्याचें कळवून गुंफेचें संपूर्ण वर्तमान कळवून तिला सुमतीबाईच्या, ताराबाईच्या आणि बाबासाहेब तांबेकराच्या पायांवर आणून घातलें. मग संपूर्ण मंडळींचीं तेथेंच जेवणें झालीं. गुंफा फार दिवसांची उपाशी होती, ती आज जेवली.

भरंवशानें सुमतीबाईला ती गेल्या मागचें सर्व वर्तमान इत्थंभूत सांगून भ्रमर आणि सद्गुणाशिवाय सर्व मंडळी करनाळीस टोकरास्वामीजवळ जमली असून खुशाल असल्याचें सांगितलें. सुमतीबाईनें व ताराबाईनें आपली हकीकत व डाकुरास आलेले आपल्या वरील दुःखाचे प्रसंग व बाबासाहेबांनीं केलेला सांभाळ वगैरे सर्व वर्तमान भरंवशास निवेदन केलें. याप्रमाणें या ओढ्यावर ही वेळ बऱ्याच आनंदानें चार घटका गेल्यावर मग तो सर्व खटला बाबासाहेब तांबेकरांसह बडोद्यास जाण्याकरितां मार्गस्थ झाला.

सुमतीबाईस व ताराबाईस नेऊन धर्माजीरावांच्या

स्वाधीन करावें आणि जमल्यास आपल्या कृतीनें आणि वजनानें धर्माजीरावांच्या कुटुंबाची सुव्यवस्था बडोद्यास कायमची लावावी असें बाबासाहेबांच्या मनांत होतें आणि ह्मणूनच दृढनिश्चयानें ते ही सर्व मंडळी घेऊन डाकुराहून बडोद्यास जात आहेत हें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. दुसरे दिवशीं ही सर्व मंडळी सुखरूपपणें बडोद्यास जाऊन पोंचली.

दहावा भाग समाप्त.

---

# भाग ११ वा.

## आनंद आणि धर्मसंस्थापना.

" सत्यमेवजयते "

' सिद्धांत. '

" चार महिन्यांचा उन्हाळा आणि घटकेचा पावसाळा " अशी एक प्राकृत म्हण प्रचारांत आहे. पण ती अक्षरशहा खरी आहे, असें आह्मास वाटतें. उन्हाळ्यांत रखरखीत झालेली जमीन व भयंकर झालेलें आरण्य पावसाळ्यांत लागलींच शांत व शोभिवंत होऊन जातें. चहूकडे नेत्रांस गारीगार देखावा दिसून येत असतो. वृक्ष टवटवीत झालेले दिसतात. आणि रखरखीत व उघडी नागडी झालेली भूमी पीत पीतांबर नेसून हिरवी चोळी परिधान करिते. नानाप्रकारच्या पुष्पसुगंधेंकरून वनश्री तृप्त होऊन जाते. व सर्वत्र पाण्याचे पाट वहात असतात, जिकडे पहावें तिकडे हिरवा गालिचा आंथरून ठेवला आहे कीं काय अशी शोभा दिसते.

आणि त्यामुळें चित्तास फार आनंद होत असतो. शेतकरी लोकांच्या मुखावर विशेष तजेला दिसून ते मोठे हर्षांत या वेळीं आहेत असें अनुभवास येतें. सर्वांपेक्षां लहान लहान पक्ष्यांस फार आनंद झालेला दिसतो. ते मोठ्या कौतुकानें आणि आनंदानें या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत असतात. ठिकठिकाणीं त्यांला फळें, मुळें कणसें, फुलें, इत्यादि त्यांचें भक्ष्य पुष्कळ झालेलें असतें. व त्यामुळें ते मोठे आनंदी झालेले असतात. पशूंलाही या काळीं मोठा उल्हास झालेला दिसतो. कारण रानांत त्यांच्या चाऱ्याची विपुलता झालेली असते !

तात्पर्य, मेघराजाची वृष्टि सर्व प्राणीमात्रांस मोठी सौख्यदायक होय. परंतु ही वृष्टि परमेश्वराच्या कृपादृष्टीवर अवलंबून आहे. मेघवृष्टीपासून बाहेरचा ताप दूर होऊं शकतो, परंतु अंतःकरणांतील ताप ईश्वराच्या कृपावृष्टीशिवाय शांत होत नाहीं. मनुष्याला त्याचें पाप, ताप आणि दैन्य दूर होण्यास खरोखर जगदिशाची कृपावृष्टीच झाली पाहिजे. दुसरा मार्ग नाहीं. या वेळपर्यंत बडोद्यांतील लोकांस, किंबहुना गायकवाडी राज्यांतील सर्व प्रजाजनांस त्रिविध प्रकारचे ताप प्राप्त झाले होते, ते त्यांणी निरुपायास्तव भोगिले. परंतु आतां मात्र गायकवाडी प्रजेची करुणा परमेश्वरास आली. त्यांची साडेसाती सरली, व ते आनंदी झाले. शहरांतील सर्व घाण निघून जाऊन तें अगदीं स्वच्छ होऊन गेलें. सर्वत्र पर्जन्यानें बाहार करून दिली. त्यामुळें जिकडे पहावें तिकडे गारीगार होऊन गेलें. वृक्ष

टवटवीत झाले. पक्षी आनंदानें उड्या मारूं लागले, गाई, म्हशी पुष्कळ दूध देऊं लागल्या. धान्यांची स्वस्ताई झाली. लोकांला हुषारी आली. प्रत्येकाच्या तोंडांवर सतेजता दिसूं लागली. लोकांला नवीन उद्योग करण्याविषयीं नवीन उमेद आली. सरकारी कामाकाजांत सुधारणा होऊन नियमित स्थिति चालू झाली. न्यायखात्यांत लांचलुचपत बंद झाली. न्याय लौकर व बरोबर होऊं लागला. प्रत्येक खात्यांत जितके काफर्ड साहेब व हणमंतराव जाहगीरदार होते, तितक्यांला एकदम बडतर्फी मिळाली ! ! प्रत्येक खात्यांत आणि आठरा कारखान्यांत चांगले हुषार, प्रामाणिक आणि सुशिक्षित कामगार स्थापन झाले. जाहगीदार, दरकदार, सरदार, मानकरी, जांवई मंडळयांच्या नेमणुकांच्या तक्रारी होत्या, त्याबद्दल एक स्वतंत्र कामदार नेमून चौकशी चालू झाली. त्यांच्या रीतसर समजुती होण्यास आरंभ झाला. खाजगी दौलतीची तपासणी चालू झाली. बंडें मोडलीं. चाहाडखोर लोकांनीं गाशा गुंडाळला ! जिकडे तिकडे व घरांत, दारांत, सरकारी कचेऱ्यांत, खाजगी कामाकाजांत सर्वतोमुखीं नीतीचें स्मरण होऊं लागलें ! धर्माची ग्रहदशा दूर होण्याची वेळ जवळ ठेपली. आणि सुबुद्धि बाईचें दुखणें हळूहळू बरें होण्यास आरंभ होऊन ती बिछान्यावरून उठून बसूं लागली. सुमती बडोदें शहरा जवळ जवळ येऊं लागली होती. याप्रमाणें बडोदें शहरांत आनंदाचा पाया बमला. विजययशाचा स्तंभ रोवला गेला, आणि धर्माची ध्वजा फडकण्याची वेळ जवळ येऊन ठेपली.

पण हें सर्व झालें कशानें ? असा प्रश्न नाहींका येथें उभा रहात ? कारण ज्या बडोदे राजधानीची अगदीं अव्यवस्था होऊन जाऊन ती जिवंत राहते कीं नाहीं याची देखील शाहाणे लोकांस शंका उत्पन्न झाली होती, तीच राजधानी अल्पावकाशांत इतर राजधान्यांस सुधारणेचा कित्ता घालून देण्यास अग्रेसर महागुरु ( प्रोफेसर ) बनली; तेव्हां ही अत्यंत नवलाची गोष्ट झाली कशी; हा प्रश्न आमच्या प्रिय वाचकांच्या मनांत सहजीं येण्यासारखा आहे. ह्मणून त्याविषयीं समाधान येथें झालें पाहिजे हें उघड आहे.

प्रिय वाचकहो, उकिरड्याची दैना सहा महिन्यांनीं फिटतें, आणि तेथें देखील एकादी सुंदर इमारत किंवा फळपुष्पांनीं सुशोभित असा बगीचा बनतो. निरुपयोगी धोंडा उत्तम कारागिराच्या हातांत गेला असतां त्याच धोंड्याची सर्वोत्कृष्ट मूर्ति तयार होते ! सोमलासारखा प्राणघातक पदार्थ उत्तम वैद्याच्या हातांत गेला असतां त्याच पदार्थाची प्राणरक्षक मात्रा तो बनवितो ! त्याचप्रमाणें चाळणीसारख्या सहस्र छिद्रांनीं युक्त अशा बडोदें राजधानीची दुष्ट ग्रहदशा संपून जेव्हां तिला उत्तम यशस्थानीं ग्रह आले, तेव्हां तिला सरटी माधवरावांसारखा उत्तम कुशल कारागीर. आनुभविक धन्वंतरी, भूगर्भशास्त्र जाणता माळी. हुशार मुत्सदि, मार्मिक लेखक. चतुर वक्ता आणि राजकार्यधुरंधर असा पटाईत व्यवस्थापक मिळाला ! मग अशा सर्वज्ञ मनुष्याकडून राजधानींतील घाण निघण्यास काय उशीर लागणार आहे ? सरटी माधवरावांचा पाय

बडोद्यास लागल्याबरोबर बडोद्याच्या उत्कर्षास आरंभ झाला. तेथें चांगले चांगले कामगार, हुषार व सत्यप्रिय न्यायाधीश; धन्वंतरीस देखील लाजविणारे डाक्तर, आणि बृहस्पतीस खालीं बसा ह्मणणारे सल्लागार अशी मंडळी लागलीच जमा झाली. पोलीसखात्याची सुधारणा झाली, न्यायखात्यांत मेहेरबान खरशेटजीसारखे व रावबहादूर गाडगिळांसारखे गृहस्थ येऊन हायकोर्टांत खुर्चीवर विराजमान झाले. मुलकी खात्याचें मुख्य सूत्र एका आनुभविक, हुषार, चलाख व अष्टपैलू अशा मुसलमान गृहस्थाचे स्वाधीन करण्यांत आलें. प्रसिद्ध सत्यप्रिय, मोठा गंभीर, उत्तम मसलती, थंडा विचारी आणि उंच टेंकडीवर उभा राहून सर्व व्यवस्था आसपासची व अष्ट दिशांची पाहाणारा असा रावबहादूर कीर्तने सरटीस मुख्य मंत्री मिळाला. धन्वंतरी पुत्र भालचंद्र भाटवडेकरासारखा बडोद्यांत मुख्य डाक्तर झाला, आणि मेहेरबान पेस्तमजी सारखा विद्वान शोधक, आणि परीक्षक मनुष्य इनाम कमिशनचें व देवस्थानचें काम पहाण्यास मिळाला. मग काय पहावयाचें आहे ? " शुभस्य शीघ्रं " या ह्मणीप्रमाणें बहादूर सरटी माधवरावांस बडोदें राजधानीचे संबंधांत लौकरच सुयशाचा वांटा पदरांत पडण्यास हीं सर्व अमोल रत्नरूप मनुष्यें साह्यकारी झालीं !

मुख्य सरकारच्या हुकुमानें आणि माधवरावांच्या सल्ल्यानें महाराणी जमनाबाईचें आगमन पुण्याहून बडोद्यास झालें. आणि पुढें लौकरच आनंदाचा दिवस बडोद्याचे प्रजेस परम समाधानकारक उगवला ! तो

असा कीं श्रीमंत सद्धर्मप्रतिपालक परम दैववान **प्रभु महाराज सयाजीराव गायकवाड** या कुलदीपक पुण्यवान् मुलाचें दत्तविधान महाराणी मातोश्री जमनाबाई यांच्या मांडीवर झालें! त्यावेळीं शेंकडो तोफांचे धडधाट, हजारों बंदुकांचे फडफडाट, ताश्यामफर्यांचे कडकडाट, गाड्याघोड्यांचे घडवडाट वगैरे एकच गर्दी होऊन गेली होती. हजारों रुपयांचा दानधर्म झाला. बडोद्यांत सर्वत्र पक्वान्नांचीं भोजनें दररोज होत होतीं. इंग्रज सरकारांतून रीतीप्रमाणें तोफांची सलामी, नजर नजराणा वगैरे घेऊन कापांतील वडेसाहेब समारंभास आले होते. यावेळीं नजरबागेंत मोठा भव्य दरबार झाला. मुख्य मुख्य मंत्र्यांस अलंकार वस्त्रें मिळालीं. गांवांत घरोघर पुरणवरणाचे स्वयंपाक झाले. ब्राह्मणभोजनें झालीं. गोरगरीबांस आणि आंधळे पांगळे व लुळ्यांस मिष्टान्नांचीं भोजनें मिळालीं. सर्वांस द्रव्य खैरात वांटण्यांत आली. विद्वानांची संभावना झाली. शास्त्रीपंडित वैदिक यांना खांद्यावर टाकण्यास शालजोड्या मिळाल्या आणि अतितअभ्यागतांस घोंगड्या, तांबे, जोडे, काठ्या, छत्र्या वगैरे दानधर्म झाला.

अहाहा! काय त्या उत्तम दिवसाचें माहात्म्य वर्णन करावें? जितकें वर्णावें तितकें थोडेंच होणार आहे. असो. घरोघरीं त्या दिवशीं रंगवल्लिका (रांगोळ्या) काढून दीपोत्साह फार नामी केला होता, आणि रस्तोरस्तीं ध्वजा तोरणें लावून दिलीं होतीं. हा समारंभ पाहण्यास त्या दिवशीं बाहेरचीं मनुष्यें ह्मणजे आसपासच्या खेडेगांवांतील गोरगरीब मनुष्यें पुष्कळ आलीं

होतीं. बडोद्याच्या बाहेर जितके ह्मणून पायमार्ग होते तितके सारे मनुष्यांनीं कसे अगदीं फुलून गेले होते. त्याच मनुष्यांत आमच्याही ओळखीचीं दोन चार मनुष्यें डाकुराकडील रस्त्यानें बडोद्याकडे येऊन पोंचत होतीं. शेवटीं तीं संध्याकाळच्या वेळेस शहरांत येऊन पोंचलीं. या मंडळीबरोबर डाकूरनाथाचे कारभारी व मोठे वजनदार सभ्य गृहस्थ बाबासाहेब तांबेकर हेही होते. ही मंडळी गांवांत आली तेव्हां संध्याकाळचा सुमार होता हें आतांच सांगितलें आहे. ह्मणून आतां सर्व रस्त्यांवरून दिव्यांचा लखलखाट होऊन गेला होता, एवढेंच मला आतां येथें सांगणें आहे. रस्त्यांवरून दुतर्फा खांब पुरून त्यावरून कमी करून दुतर्फा दिवे लाविले होते. ही दिवाळी राजवाड्यापासून जी एकसारखी सुरू होऊन गेली होती ती लहरीपूर दरवाजानें बाहेर जाऊन थेट राजपथावरून क्यांपापर्यंत जाऊन पोंचली होती. असो. या प्रकारची रोषनाई पहात पहात दोन गाड्या, दोन घोडीं आणि कांहीं पायदळ मनुष्यें असा खटला सुरसागरावरील एका जुन्या, पडकळीस आलेल्या, व कांहींशा जळालेल्या घरापाशीं येऊन उभा राहिला. मग भरंवशानें कुलूप काढून ही सर्व मंडळी घरांत जाऊन राहिली.

प्रथमतः या मंडळीचा विचार करनाळीस धर्माजीरावांकडे जाण्याचा होता, परंतु आतां त्यांचा तो बेत रहित होऊन गेला. तांबेकरांनीं अशी सल्ला दिली कीं, आतां धर्माजीरावांसच इकडे राहण्यास येण्यास कांहीं चिंता राहिली नाहीं. कारण बडोद्याचा मनु प्र-

स्तुत सर्व बदलून गेला आहे. आतां येथें राहण्यांत यत्किंचित्‌ही दुःख होणार नाहीं. मग हा विचार सर्वांस मानवला. आणि भरंवशानें करनाळीस जाऊन सर्वांस घेऊन यावें असें ठरलें! पूर्वीं नीतीस व शतावलीस बागेंतील बंगल्यांतून पिशाच्चाच्या रूपानें काढून तो रानांत गेला होता. हें आमच्या प्रिय वाचकांस ठाऊकच आहे. पुढें तेथें मामासाहेबांची गांठ पडून त्यांनीं नीतीस व शतावलीस गाडींत घालून करनाळीस नेलें. आणि भरंवशास पुनः परतून बडोद्यास पाठवून दिलें. कारण सुमतीबाईचा, ताराबाईचा, भ्रमराचा, आणि सद्‌गुणाचा शोध अद्याप होणें राहिला होता. हा शोध भरोशावांचून होणार नाहीं असें मामासाहेबांस वाटलें. आणि हें त्यांचें वाटणें खरेंही होतें. कारण टोकरा स्वामींनीं दोन हुषार मनुष्यें मामांबरोबर देऊन त्यांची बडोद्यास रवानगी याच कार्याकरितां केली होती; परंतु उपयोग काय झाला? मामासाहेब तीन महिनेपर्यंत बडोद्यांत येऊन फिरले तरी त्यांना कोणत्याही गोष्टीचा शोध ह्मणून शपथेला देखील लागला नाहीं!! इतके ते हुषार! बिचाऱ्या भोळ्या ह्यातान्यास हीं कपटाचीं व कारस्थानी काळीं कृत्यें समजावींत तरी कशीं बरें?

शेवटीं तीन महिने राहून कांहीं एक शोध न लागतां न बिचारे भोळे मामासाहेब रिकाम्या हातानेंच परत करनाळीस बरोबर आणलेल्या बैलगाडींत बसून चालले होते. तो बडोद्यापासून चार पांच कोसांवर एका ओढ्याच्या काठीं नीति व शतावलीसहित भरंवशाची

व त्यांची गांठ पडली. मग त्यानीं भरोशास परत सुमतीबाईच्या व भ्रमराच्या शोधास पाठविलें आणि आपण नीतीला व शतावलीला बरोबर घेऊन करनाळीकडे चालते झाले.

इकडे भरंवसा बडोद्यांत परत आल्यावर त्याला त्याच्या दत्ताच्या देवळांतील प्रिय पिशाच्चाची आठवण झाली ! त्यानें असा विचार केला कीं, ज्यापेक्षां पिशाच्चानें आपल्यास नीतीचा व शतावलीचा शोध सांगितला, त्यापेक्षां तो आपल्यास सुमतीचाही शोध सांगेल ! असा विचार करून तो पूर्वीप्रमाणें बारावर एक दोन वाजण्याच्या सुमारास दत्ताच्या देवळापाशीं गेला. तेथें पूर्वीप्रमाणेंच पिशाच्च त्याच्याशीं बोललें; परंतु दृष्टी पडलें नाहीं. त्यानें भरंवशास सांगितलें कीं, तुला सुमतीबाईची भेट पाहिजे असल्यास डाकुरास तांबेकराच्या घरीं जा. परंतु जातांना महीनदीच्या किनाऱ्यानें जा. तेथें एका वनळींत एक जुनाट देवीचें भुयार आहे. त्यांत एक रात्र अंगाला शेंदूर लावून वस्तीला रहा. तेथें देवीचा एक मोठा तांदळा आहे. तो आंतून पोकळ आहे त्याच्या पाठीशीं एक छिद्र आहे. त्यांत खिळा घालून बाहेर जोरानें ओढ ह्मणजे तांदळ्याचे पाठीचें द्वार उघडलें जाईल. मग तूं आंत जाऊन बैस. तांदळ्याच्या डोळ्यांस दोन छिद्रें आहेत त्यांतून तुला समोर होत असलेला सर्व चमत्कार दिसेल. आणि मग तेथें जी अनाथ स्त्री मारण्याकरितां आणतील तिचें तूं आपल्या चातुर्यानें रक्षण कर आणि तिला घेऊन डाकुरास जा. ह्मणजे मग तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील.

पुढें पिशाच्चाच्या सांगण्याप्रमाणेंच सर्व गोष्टी बरोबर करून भरंवशानें गुंफेस वांचवून तो तिला डाकुरास घेऊन चालला होता, इतक्यांत वाटेंतच सुमतीबाईची भेट मंडळीसहित झाली हें आमच्या प्रिय वाचकांनीं मागील भागांत सर्व वाचलेंच आहे. असो. इकडे मामासाहेब नीतीला घेऊन व शतावलीला घेऊन करनाळीस जाऊन पोंचले. तेथें सर्वांच्या भेटी झाल्या. पुढें कांहीं दिवस गेल्यावर बडोद्याची सुस्थिति झाली हें सर्व वर्तमान टोकरास्वामीस समजलें. तेव्हां त्यांनीं परोपकारार्थ स्वतः एक पत्र लिहून तें आपल्या एका हुषार शिष्याबरोबर सरटीमाधवरावांकडे पाठवून दिलें. तें त्यांना पोंचल्याबरोबर त्यांनीं मस्तकीं वंदिलें. कारण टोकरास्वामींच्या योग्यतेचा लौकिक माधवराव जाणून होते. पुढें त्यांनीं पत्र वाचलें. त्यांतील मजकूर असा होता;—

" राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री सर टी माधवराव दिवाण निसबत गायकवाड सरकार मुक्काम बडोदें यांसी;—

श्रीक्षेत्र मठ करनाळी येथून श्रीधरानंद सरस्वती उर्फ टोकरास्वामी यांचा परम प्रेमपूरित अनेक आशीर्वाद विशेष. मित्ति मजकूरपर्यंत श्रीजगदीशकृपें वर्तमान आनंदरूप असें जाणिजे. यानंतर मजकूर कीं, ईशकृपें गायकवाडी राज्यांचीं सूत्रें आपल्या हातीं आलीं हें श्रवण करून आह्मास परम संतोष झाला आहे. बडोद्याची नष्टचर्या इतउत्तर सरली असें ह्मटलें पाहिजे. आपल्या प्रौढ प्रतापाची कीर्ति आजपर्यंत ऐ-

कून होतों. प्रस्तुत तर समक्ष सांनिध्याचा योग जमून आला आहे. भेट होईल तो सुदिन समजला जाईल.

आपण अंतःकरणापासून सध्यां बडोदें संस्थानची स्थिति उत्तम करण्याचें मनावर घेतलें आहे, हें पाहून फार आनंद होतो. आपल्या त्या सत्कार्यास यथाशक्ति सर्वांनीं मदत करणें हें उचित कर्म होय हें जाणून थोडें कळविण्यांत येत आहे.

कोणत्याही राज्याची सुव्यवस्था राहणें दोन महत्तत्त्वावर अवलंबून आहे. एक धर्मसंस्थापना सुरळीत असणें, व प्रजा संतोषांत राहणें. हीं दोन महत्तत्त्वें राज्य सुरक्षित राहण्याचीं मुख्य साधनें होत. धर्म हा पाया असून त्यावर प्रजासंतोष ही इमारत आहे. हें सर्व आपण जाणतच आहां, मीं कळवावें असें नाहीं. तथापि माजी गायकवाडी अमलांत या दोन तत्त्वांचा ऱ्हास झाल्यामुळें सार्वभौम सरकारास आपल्या सारख्या गृहस्थास बडोद्यांत आणावें लागलें हें आपण विसरतां कामा नये. माजी अमलांत धर्माच्या कुटुंबाचा फार छळ झाला आहे. नीतीस भ्रष्ट करण्याचा यत्न झाला. सुबुद्धीस दुखणेकरी करून आंथरुणावर खिळून टाकिली. सुमतीस आणि तिच्या बहिणीस फार ताप दिला. आणि सद्गुणाचा तर मुळीं कोठें पत्ताच नाहींसा करून टाकिला आहे !!

हें रूपक विचारांतीं आपल्या ध्यानांत येण्यासारखें आहे ह्मणून त्याविषयीं आपण अवश्य विचार कराल अशी आह्मास आशा आहे. विशेष ताप बडोद्यांत झाल्यामुळें धर्ममूर्ति प्रस्तुत येथें क्षेत्रवास करून राहिली

आहे. विचारांतीं आपल्या मनास योग्य वाटल्यास सन्मानानें आपल्या राज्यांत नेण्याचें करावें आणि सद्गुणाचें गौप्यत्व दूर करून सर्वत्र उदय करावा ह्मणजे आपली कीर्ति अजरामर होईल. यांहून विशेष काय लिहावें ? लोभाची वृद्धि शुक्लेंदुवत् असावी हा आशीर्वाद.

मुक्काम श्रीक्षेत्र करनाळी. नर्मदा तटाक. } श्रीधरानंद सरस्वती उर्फ टोकरा स्वामी.

हें पत्र हातांत घेऊन माधवराव वाचीत होते, तोंच डाकुरनाथाचे वहिवाटदार कारभारी बाबासाहेब तांबेकर हे भेटीस आले असून खालीं वसले आहेत अशी वर्दी त्याला येऊन पोंचली. तांबेकर हे वयोवृद्ध, शाहाणे आणि सभ्य गृहस्थ असल्यामुळें माधवरावांनीं त्यांला लागलींच वरती बोलावून घेऊन त्यांची भेट घेतली. घटकाभर दुसरीं तिसरीं भाषणें झाल्यावर माधवरावांनीं टोकरास्वामीचें पत्र तांबेकरांच्या हातांत देऊन वाचण्यास सांगितलें. आणि त्यांचें वाचन झाल्यावर त्यांतील अर्थ काय असावा असा त्यांनीं त्यांला प्रश्न केला ! मग तांबेकरांनीं सांगितलें कीं, मी हीच गोष्ट तुह्मास सांगण्याकरितां मुद्दाम डाकुराहून येथें आलों आहें. आतां पत्राच्या योगानें तर ही गोष्ट आनायासेंच आपल्या पुढें आली हें फार चांगलेंच झालें. असें ह्मणून तांबेकरांनीं आरंभापासून शेवटपर्यंत धर्माजीरावाचें चरित्र माधवरावांस सांगितलें. डाकुरास आपल्या घरीं, सुमतीबाई व ताराबाई कशी आली व तेथें त्यांचा छल

कसा झाला हेंही सर्व सांगितलें. तेव्हां माधवरावांच्या मनास धर्माच्या अपेष्टेबद्दल व नीतीस छळिल्याबद्दल फारच वाईट वाटलें ! ! माधवराव स्वतः धर्माभिमानी, नीतिप्रिय, व सद्गुणांस मनापासून चाहणारा होता. त्याच्या मनाला धर्माजीरावाच्या कुटुंबाबद्दल गोष्ट फार लागून गेली. शेवटीं तांबेकरांनीं सांगितलें कीं, आपण बडोद्यास येऊन सुधारणा करण्यास आरंभ केला आहे, हें मला समजल्यामुळें मी मुद्दाम सुमतीबाईस ह्मणजे धर्माजीरावाचे पत्नीस आणि तिच्या बहिणीसही येथें घेऊन आलों आहें. आतां टोकरास्वामींच्या इच्छेप्रमाणें व माझ्या विनंतीप्रमाणें करनाळीहून धर्मास येथें आणून कायमपणें त्याची व्यवस्था लावून देणें हें काम आपल्या हातीं आहे तें मर्जीनुरूप करावें.

मग माधवरावांनीं सांगितलें कीं, आज रोजीं मी मुद्दाम टोकरास्वामींकडे विनंतिपत्र पाठवून धर्मास बहुमानानें येथें आणविण्याची तजवीज करतों. आपण आतां स्वस्थचित्तानें विऱ्हाडाकडे जावें. आणि धर्म व नीति समारंभानें येथें येऊन राहीपर्यंत आपण डाकुरास जाण्याचें करूं नये. मी आतां या गोष्टीबद्दल सर्व व्यवस्था सुरळीत करतों. याप्रमाणें माधवराव बोलल्यावर तांबेकरांनीं त्यांचा निरोप घेतला. पुढें माधवरावांनीं घोडा, गाडी, पालखी, इत्यादि वहनें व छत्री, मशाल, भालदार, चोपदार इत्यादि शागिर्दपेशा आणि कांहीं स्वार शिबंदी इत्यादि खटला एका सभ्य कारकुनाबरोबर देऊन आणि टोकरास्वामींस त्यांजवळ

एक विनंतिपत्र देऊन धर्मोजीरावाला आणण्याकरितां त्याला करनाळीस पाठवून दिलें.

कारकून सर्व खटल्यासहित करनाळीस जाऊन पोंचला. आणि त्यांणीं माधवरावांचें पत्र स्वामींपुढें ठेवलें. तेव्हां स्वामीनीं तें पत्र वाचून पाहून लागलींच धर्मोजीरावाची रवानगी सर्व मंडळीसहित मोठ्या थाटानें बडोद्यास करून दिली. माधवरावांचे पत्रांत स्वामींस मजकूर होता तो येणेंप्रमाणें;—श्रीमत परमहंस परिव्राजकाचार्य सकळगुणसमर्थ महाराज श्रीधरानंद स्वामी उर्फ टोकरास्वामी, मुक्काम मठ श्रीक्षेत्र करनाळी. चरण सेवेसी तत्पर माधवराव याचे कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसी जे. बहुतां दिवशीं लोभ होऊन स्वामींकडून आज्ञापत्र आलें तें शिरसा वंद्य झालें. ऐसेंच निरंतर आज्ञापत्र पाठवून सद्बोधाचा लाभ देत असावा. पत्रांतील मजकूर पाहून फार संतोष वाटत आहे. आज्ञेप्रमाणें सर्व गोष्टी आतां लौकरच अमलांत येतील. धर्माची संस्थापना होण्याकरितां विनंतिपत्र पाहतांच त्यांला इकडे पाठविण्याची कृपा व्हावी. लवाजमा पाठविला आहे. आमच्या हातून धर्माची योग्यता, नीतीची प्रतिष्ठा व पावित्र्य जितकी ह्मणून संभाळतां येईल, तितकी संभाळण्यास आळस होणार नाहीं हा निश्चय आहे. त्याचप्रमाणें सद्गुणाचा उदय करून प्रजेचा संतोष राखण्याकडेही आमचें लक्ष राहील. सुबुद्धीस बरें करावें आणि सुमतीस सौभाग्यसुख अखंड भोगू देण्यास साह्य करावें असेंही आमचें पूर्ण मानस आहे. माजी राज्यांत ज्या ज्या थोर गृहस्थांनीं धर्मो-

जीरावांस व त्यांच्या कुटुंबास ताप देऊन छळिलें आहे. त्या त्या लोकांस जगदीश इच्छेनें परस्पर शिक्षा अनायासेंच होऊन गेल्या आहेत ! ! त्यांचीं कर्मेंच त्यांस फळास आलीं आहेत ! तेव्हां आतां त्याबद्दल विशेष विचार करण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं. हें कृपेनें ध्यानीं येईल. यांहून विशेष काय लिहावें ? श्रुत होय हे विज्ञापना.

| | |
|---|---|
| मुक्काम बडोदें. बाग | आपला नम्र सेवक, सरटी. माधवराव. |

याप्रमाणें पत्र पाहून स्वामींस फार आनंद झाला. नंतर धर्माजी रावांनीं स्वामींस नमस्कार करून आज्ञेप्रमाणें तो बडोद्याचा रस्ता चालूं लागला. धर्माजीराव एका उमद्या घोड्यावर बसला. आणि सुबुद्धीस मेण्यांत बसविली होती. नीतिबाई व शतावली पालखींत बसल्या होत्या. याप्रमाणें ही मंडळी मोठ्या समारंभानें व थाटानें बडोद्याजवळ आली; तेव्हां सर टी माधवराव ठळक ठळक माणसें बरोबर घेऊन धर्मास व नीतीस सामोरे गेले. गांवाच्या बाहेर एका आराम जागीं धर्माची व माधवरावांची भेट झाली. परस्परांनीं एकमेकांस क्षेमालिंगनें दिलीं. सर्वांच्या भेटी झाल्या. मग वाजत गाजत मोठ्या थाटानें धर्माजीरावांची स्वारी बडोद्यांत प्रवेश करती झाली. शुभ्र बगळीच्या पंखाप्रमाणें ज्या बगीस घोडे जुंपले होते, अशा एक्या सुशोभित बगींत धर्म आणखी माधवराव बसले होते. धर्माच्या बगीमागें शिष्टजन सारे कोणी घोड्यावर, कोणी गाडींत असे स्वारीबरोबर चालले होते. पुढें घोडस्वार आणि कांहीं पा-

यदळ लोक चालले होते. बगीच्या मागें भरंवसा गडी कंबर बांधून उभा राहिला होता. भरंवसा सुमतीबाईच्या व तांबेकराच्या आज्ञेप्रमाणें धर्माजीरावांस घेऊन येण्याकरितां करनाळीकडे चालला होता. परंतु अर्ध्या वाटेंतच धर्माजीरावाची त्याची भेट झाली. धर्माजीरावांची स्वारी डौलानें घोड्यावर बसून बडोद्याकडे चालली आहे हें पाहून भरंवशाचे डोळ्यांस त्यावेळीं आनंदाश्रु आले. मग तो अर्थातच स्वारीबरोबर माघारी आला हें उघड आहे. असो. याप्रमाणें धर्माजीरावाची स्वारी सरकारवाड्याकडे पहिल्यानें गेली. तेथें पोंचतांच श्रीमंत **सयाजीराव महाराज** स्वतः धर्मास व नीतीस सामोरे पांच पावलें पुढें चालून आले. आणि धर्मास प्रेमालिंगन देऊन आपल्या जवळ उजव्या अंगास बहुमानानें बसविलें. नीति व सद्बुद्धि वगैरे स्त्रिया पडद्यांत बसल्या होत्या. मग महाराजाकडून धर्मास वस्त्रें भूषणें देण्यांत येऊन बहुमानदर्शक पानाचा विडा देण्यांत आला. इकडे नीति व सद्बुद्धि इत्यादि स्त्रियांसही लुगडीं, पैठण्या, खण आणि डागडागिने देऊन सन्मान करण्यांत आला. मग कांहीं वेळ आनंदाचीं भाषणें होऊन हा दरबार बरखास्त झाला.

नंतर धर्माजीरावाची स्वारी त्याच थाटानें महाराजानीं दिलेला बहुमानाचा पोषाक अंगावर घेऊन आनंदानें मिरवत सुरसागरावर आपल्या घराकडे जाण्यास निघाली. समागमें बाजे गाजे वाजत होते; व सर्व मानकरी लोक पोंचविण्यास आले होते. धर्माजीराव परतून बडोद्यांत येऊन महाराजांच्या हातानें त्यांची पुनः स्थापना

स्वस्थानीं झाल्याबद्दल शहरांतील दरोबस्त लोकांस आनंद होऊन गेला. असो, धर्माजीरावाच्या घरींही तांबेकरानीं मोठा थाट करून दिला होता. मोठा मंडप घालून केळीचे खांब उभे केले होते. तसेंच नानाप्रकारचे वृक्षपल्लव ठिकठिकाणीं बांधिले होते. दारांत गुढ्या तोरणें उभीं केलीं होतीं. याप्रमाणें थाट झाला. धर्माजीरावानें सुबुद्धि मातोश्रीसह व नीति आणि शतावली कन्यांसह मोठ्या आनंदानें गृहप्रवेश केला. तेव्हां सुमतीबाई पंचारती घेऊन मध्यवरच्या द्वारांत धर्मास ओवाळण्याकरितां सामोरी येऊन उभी राहिली. तिचे डोळे प्रेमाश्रूंनीं व आनंदाश्रूंनीं भरून गेले होते. द्वाराचे पाठीमागून हा सर्व प्रकार ताराबाई सजल नेत्रेंकरून पाहत उभी राहिली होती. त्यादिवशीं इष्टमित्रांसहित धर्माजीरावाचे घरीं पक्वान्नांचें भोजन झालें. दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजनें, दानधर्म आणि आंधळे पांगळे लुळे इत्यादि गरीब लोकांस धर्मानीं जेवायास घालून पुष्कळ दानधर्म केला.

इतकें सर्व झालें परंतु धर्माजीरावाच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांच्या तोंडांवरून खऱ्या आनंदाची ह्मणून कळा अगदीं दिसून आली नव्हती. कारण या सर्व आनंदाच्या सोहळ्यांत त्यांचीं परम प्रियकर दोन मुलें नव्हतीं !

या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं सकाळींच भरंवसा गडी धांवत येऊन सांगूं लागला कीं, आपलीं दोन मुलें भ्रमर आणि सद्गुण यांस आजरोजीं गांवाच्या बाहेरील मैदानांत फांशी देत आहेत ! ! ही

बातमी समजतांच धर्मांजीराव स्वतः धांवतच त्याठिकाणीं गेले आणि " अन्याय होत आहे, अन्याय होत आहे " अशा एकदम एकसारख्या मोठ्यांनीं आरोळ्या ठोकिल्या ! !

आतां फांशीची अगदीं तयारी झाली होती. परंतु धर्मांजीरावाच्या आरोळ्या ऐकून सर्व मंडळी अगदीं चपापून गेली. ज्या अंमलदाराच्या नजरेखालीं हें अघोर काम घडून येत होतें, तो अंमलदारही थोडासा भयभीत झाला. आणि धांवून धर्मांजीरावाच्या पुढें येऊन उभा राहिला. तेव्हां धर्मांजीराव त्याला ह्मणाले कीं, हीं दोन्हीं मुलें आमचीं आहेत आणि तीं अगदीं निरपराधी आहेत. तुह्मी निरपराधी मुलांस फांशी कसें देतां ? ही जबाबदारी परंपरेनें तुमच्यावर येईल. ह्मणून तुह्मी या गोष्टीचा नीट विचार करून जें करणें तें करा. तात्पर्य असें झालें कीं, या धर्मांच्या प्रश्नाचा जबाब त्या अंमलदारांस देतां आला नाहीं. आणि शेवटीं हें सर्व प्रकरण सरटी माधवरावांकडे गेलें. मग माधवरावजींनीं त्यादिवशीं फांशी देण्याचें काम तहकूब ठेवून खटल्याचे सर्व कागदपत्र स्वतः तपासून पाहिले. परंतु त्या कागदपत्रांवरून ती केस सर्व बरोबर आहे असेंच माधवरावांच्या ध्यानांत येऊं लागलें. त्यामुळें अगदीं म्लान तोंड करून धर्मांजीराव त्यादिवशीं माघारी घराकडे आला. घरांत हें वर्तमान समजतांच मोठा आकांत झाला ! ! परंतु गुंफेनें सर्वांचें समाधान करून सांगितलें कीं सरटी माधवरावांकडे मला घेऊन चला. ह्मणजे मी या खटल्याचा खरा तपास लावून देऊन

खरे गुन्हेगार धरून देतें. आणि तुमच्या दोन मुलांस सोडवितें !

मग धर्माजीरावास अर्थातच थोडासा धीर येऊन त्यानें गुंफेस आपल्याबरोबर माधवरावांकडे नेली. तेव्हां गुंफेनें तेथें आपल्या आईच्या घरची सर्व घडलेली हकीकत सांगितली. आणि खरे गुन्हेगार व मुद्देमाल सर्व महीनदीच्या वघळींत आहे असें सांगून दिलें. मग काय विचारता ? माधवरावांनीं लागलींच हुषार पोलीस कामदारांची सशस्त्र लोकांच्या साह्यानिशीं महीवर योजना केली. त्या लोकांनीं जाऊन तें कार्य फत्त्या केलें. मुद्देमालासहीत ते लोक पकडून आणले आणि तपासाअंतीं त्यांनीं सर्व गुन्हा कबूलही केला. गुंफेच्या आईच्या घरांतून जितका माल त्या लोकांनीं नेला होता तो सर्व त्यांनीं दाखवून दिला. आणि तो गुंफेनें ओळखला. मग अर्थातच पुढें सर्व खटल्याचा निकाल यथाप्रकार होऊन ईश्वरकृपेनें भ्रमराची आणि सद्गुणाची त्या कामांतून निर्दोषी ठरून सुटका झाली. यापुढें धर्माजीरावाच्या आनंदास पारावार नाहींसा झाला हें सांगावयास नको.

ज्या दिवशीं भ्रमराची आणखी सद्गुणाची सुटका झाली त्या दिवशीं कचेरींत प्रेक्षक लोकांची फार दाटी होऊन गेली होती. सुटकेचा निकाल ऐकतांच लोकांनीं भ्रमरास आणि सद्गुणास दोन घोड्यांच्या गाडींत बसवून वाजत गाजत मोठ्या समारंभानें त्यांला त्यांच्या घरीं आणून पोंचविलें. घरीं आल्यावर मोठा दरबार झाला आणि तेथें सन्मानार्थ विद्वान् व वजनदार लो-

कांहीं भाषणें होऊन सर्वांनीं धर्माजीरावाचें व त्यांच्या मुलांचें झालेल्या दुःखदायक श्रमाबद्दल शांतवन केलें. धर्माजीरावाच्या घरांतील मनुष्यांस तर आनंदाची आजच्या दिवशीं अगदीं परमावधी होऊन गेली. त्यांचा तो आनंद आमच्या या अशक्त लेखणींतून किती म्हणून वर्णन होऊं शकेल? त्यांत विशेषेंकरून सुमतीबाईच्या व ताराबाईच्या आनंदास सीमा ठरवितां येत नाहीं. शिवाय नीति, शतावली व गुंफा यांच्या चोरट्या आनंदाची तर किंमतच करतां येत नाहीं. कारण त्या तरुणींच्या मनांतून आतां भावी सुखाच्या उकळ्या फुटूं लागल्या होत्या.

दुसरे दिवशीं सर टी माधवरावांच्या विचारें राजवाड्यांत मोठा दरबार भरवून सर्वांसमक्ष श्री. गायकवाड सरकारांनीं धर्माजीरावाविषयीं मोठा सन्मान प्रदर्शित करून, त्यांस आपल्या तैनातींत आपल्या अगदीं संन्निधानीं मोठी मानकऱ्याची जागा देऊन पहिल्या प्रतीचे आपले सरदार बनविलें. आणि बहुमोल पोषाक दिला. याप्रमाणें धर्मास आपला सखा करून गायकवाडांनीं सद्गुणांसही आपल्या जवळ योग्य आश्रय देऊन अलंकार वस्त्रें दिलीं. भ्रमरास त्याचें शूरत्वाची प्रशंसा करून पोषाक देऊन आपल्या सैन्यांत एक मोठ्या हुद्याची जागा दिली. याप्रमाणें **श्री० सयाजीराव महाराजांनीं** गादीवर बसतांच सर्व राज्यांतील झालेली अंदाधुंदी मोडून धर्माचा व सद्गुणाचा झालेला उच्छेद पुनरपि संस्थापित करून नीतीस उत्तेजन दिलें.